

# कर्ण आणि मराठी प्रतिभा

भास्कर गिरधारी

# कर्ण
## आणि
# मराठी प्रतिभा

# कर्ण
# आणि
# मराठी प्रतिभा


लेखक

डॉ. भास्कर गिरधारी



सविता प्रकाशन

औरंगाबाद

कर्ण आणि मराठी प्रतिभा
KARNA AND MARATHI PRATHIBHA
डॉ. भास्कर गिरधारी
BY DR.BHASKER GIRDHARI

प्रकाशक :
सविता प्रकाशन
'मंगलप्रभा' १०९, एन-५ (दक्षिण)
सिडको, औरंगाबाद - ४३१००३

प्रथम आवृत्ती
स्वातंत्र्यदिन :१५ ऑगस्ट ,१९९२.

अक्षर जुळणी
ESCOM SERVICES, AURANGABAD.

मुद्रक : अक्षर मुद्रणालय, संभाजीनगर (औरंगाबाद)

मुखपृष्ठ
शीतल शहाणे, औरंगाबाद.

ग्रथांलयीन वर्गीकरण
द्विबिंदु वर्गांक :
दशांश वर्गांक :

मूल्य : ६० रूपये.

परम पूजनीय
पिताश्री बाबासाहेब
ज्यांनी अतोनात कष्ट सोसूनही
मोठ्या उमेदीने मला
लहानाचा मोठा केले.
त्यांच्या चरणी -

**भास्कर**

## ।। ऋणनिर्देश ।।

‘कर्ण आणि मराठी प्रतिभा’ या ग्रंथाचे हस्तलिखित वस्तुत: १९७९ सालीच मुद्रणसिध्द होऊन प्रकाशाची वाट शोधीत होते. पण योग्य वेळीच योग जुळून येतो. ‘महाभारतातील स्त्रियांचे मनोधैर्य’ हा ग्रंथ सविता प्रकाशनाने प्रसिध्द केल्याचे समजले तेव्हाच सविता प्रकाशनास पत्र लिहून हा ग्रंथ त्यांनी प्रसिद्ध करावा असा मनोदय व्यक्त केला. त्यांनी हस्तलिखित लगेच स्वीकारले. ग्रंथाचे आणि आपल्या परिश्रमाचे आता सार्थक होणार या जाणिवेने ग्रंथ त्यांच्या हाती सोपवला. त्याचे सुफलित म्हणूनच आज सर्वांग सुंदर दृश्य रूपात हा ग्रंथ रसिकांसमोर आला आहे. त्यांचे ऋण शब्दातीत आहे. त्याची उतराई होणे शक्य नाही.

गुरुवर्य डॉ.ह.कि.तोडमल यांचे मार्गदर्शन हा ग्रंथ सिध्द होताना सतत नेमाने घेतले आहे. अनेक बैठकांतून त्यांच्याशी भरपूर चर्चा केली. पुनर्लेखन केले, त्यामुळे या ग्रंथात संशोधनात्मक समीक्षेचा प्रत्यय रसिकांना, अभ्यासकांना येईल. तसेच ~~अनेक~~ महाराष्ट्रातील महाभारताच्या अनेक व्यासंगी-विद्वानांच्या समक्ष भेटीगाठीतून, चर्चेतून वेळोवेळी झालेल्या मार्गदर्शनातून हा विषय उलगडत गेला, स्थलाअभावी त्यांचा निर्देश करता येत नसला तरी या सर्वांचा मी अंत:करणपूर्वक आभारी आहे.

या ग्रंथाची अक्षरजुळणी सौ. शिल्पा काळे (एस्कॉम सर्व्हिसेस) यांनी केली.
तसेच भावपूर्ण व लक्षवेधी मुखपृष्ठ श्री. शीतल शहाणे यांनी तयार केले.
या सर्वांचा मी ऋणी आहे.

शेवटी स्वागतशील महाभारतप्रेमी रसिकांचे आणि चोखंदळ वाचकांचे मनापासून आभार मानतो.

भास्कर गिरधारी
१५ ऑगस्ट, १९९२

प्राचार्य निवास,
चौथा मजला, आर.एम.भट्ट इमारत
२१, गोखले सोसायटी पथ,
परळ, मुंबई - ४०००१२

## ॥ अनुक्रम ॥ :

ऋणनिर्देश -

एक ॥ कर्ण : पारंपारिक आकलन ॥ पृष्ठे : १ ते ३२

दोन ॥ कर्ण : नवे आकलन ॥ पृष्ठे : ३३ ते १२७

॥ एक ॥

# ॥ कर्ण : पारंपरिक आकलन ॥

कर्णाचे विशेष आकर्षण :- २, महाभारतातील कर्ण :- २, कर्ण आणि मराठी साहित्य :- ४, महाभारतनिष्ठ दृष्टिकोन :- ५, बाळशास्त्री हरदास :- ६, शं.के.पेंडसे :- ९, गो.नी.दांडेकर :- ११, कर्णजीवनाची पार्श्वभूमी :- १३, कणखर कर्ण :- १४, कर्णाचा चांगुलपणा :- १५, कल्पनेचे विविध रंग :- १६, अ.दा.आठवले :- १७, डॉ.रा.शं.वाळिंबे :- १९, पारंपरिक दृष्टिकोन :- २०, म.रं.शिरवाडकर :- २२, अनुकम्पा व आकर्षण :- २३, प्रेमा कंटक :- २४, जीवनमूल्ये आणि कर्ण :- २४, महाभारतातील दृष्टी आणि कर्ण :- २५, कर्णाची विविध आकलने :- २६, महाभारतदर्पणात कर्ण प्रतिमा :- २९, टीपांचे संदर्भ :- ३१.

**कर्णाचे विशेष आकर्षण :-**

महाभारताधिष्ठित अर्वाचीन मराठी ललित साहित्यात प्रथमत: आपले लक्ष कर्णाची व्यक्तिरेखा वेधते. अर्वाचीन मराठी साहित्यात आजपर्यंत सर्वांत अधिक लेखन महाभारतातील कर्णाविषयी झाले आहे. कर्णाचे एवढे जबरदस्त आकर्षण मराठी ललित साहित्यिक आणि विचारवंत यांना का असावे, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कर्णावर आधारित साहित्यकृती सर्वांत जास्त असल्यामुळे कर्णाच्या आकर्षणाचा मागोवा येथे घ्यावयाचा आहे. कर्णाविषयीच्या आजपर्यंत उपलब्ध होणाऱ्या सर्व अर्वाचीन कालखंडातील साहित्यकृतींची संख्या पंचवीसपर्यंत भरते. एकटया कर्णाला केंद्र कल्पून या साहित्यकृतींची निर्मिती झाली आहे.

या साहित्यात नवोदित, सुप्रतिष्ठित साहित्यिकांच्या साहित्यकृती आहेत. नाटक, कादंबरी, काव्य इत्यादी साहित्यप्रकारही आहेत. महाभारतानुसार कर्णाच्या व्यक्तिमत्वाचे पारंपरिक आकलन त्यात आढळते, त्याचबरोबर कर्णाच्या व्यक्तिमत्वाचे नवे आकलन, नवे आविष्कारही या साहित्यात आहेत.

एकंदरीत 'कर्ण-प्रकरणा'ची ही व्याप्ती लक्षात घेऊन विवेचनाच्या व अभ्यासाच्या सोयीसाठी 'कर्ण : पारंपरिक आकलन' आणि 'कर्ण : नवे आकलन' असे दोन भाग कल्पिले आहेत.

कर्णविषयक मराठी ललित साहित्याचा विचार करण्यापूर्वी महाभारतातील कर्णाच्या जीवनाचा संक्षिप्त आलेख लक्षात घेणे आवश्यक आहे.

**महाभारतातील 'कर्ण' :-**

मराठी ललित साहित्यात कर्णाच्या व्यक्तिरेखेकडे एका धीरोदात्त नायकाच्या भूमिकेतून पाहिले जाते. त्याचे उदात्तीकरण केले जाते, असा आक्षेप महाभारताविषयी परंपरावादी दृष्टिकोन स्वीकारून, अनंतराव आठवले, डॉ. रा.शं. वाळिंबे, प्रा. सुशीला पाटील, दाजी पणशीकर इत्यादी विचारवंत लेखकांनी घेतला आहे. अर्थात यांच्यापेक्षा ललित साहित्यिकांचा वेगळा दृष्टिकोन आहे. त्यात इरावती कर्वे, दुर्गा भागवत, शिवाजी सावंत, बा. सी. मर्ढेकर, रणजित देसाई, वि. वा. शिरवाडकर, मधु भोसले इत्यादी साहित्यिकांचा समावेश होतो. कुंतीला अवगत असलेल्या 'देवाहुती' मंत्रापासून सूर्याला पाचारण करून जन्मलेला कर्ण हा कानीनपुत्र आहे. जन्मत:च त्याला कवच कुंडले होती. कुंतीने त्याला जन्मल्याबरोबर अश्वनदीत सोडले. पुढे अधिरथ व राधा या जोडप्याने त्याचा सांभाळ केला. कर्णाने शास्त्रास्त्रविद्येत नैपुण्य संपादन केले होते. परशुरामाकडे ब्रम्हास्त्र-प्राप्तीसाठी गेलेल्या

कर्णाला त्याच्या अपराधामुळे दोन शाप मिळतात. 'ऐनवेळी ब्रम्हास्त्रविद्या विस्मरण होईल व 'युद्धात भूमी रथचक्र गिळील' असे ते दोन शाप होते. मात्र 'श्रेष्ठ क्षत्रिय योद्धा म्हणून लौकिक वाढेल' हा वरही कर्णाला मिळतो. आपल्या मल्लयुद्धातील पराक्रमाने तो जरासंधाचा स्नेह संपादन करतो आणि 'मालिनी' नगराचा तो मालक होतो. त्याचे 'जन्मवृत्त' त्याला स्वतःला अज्ञात राहते म्हणून रंगशाला प्रसंगी कर्णाला उपेक्षा सहन करावी लागते. कृपाचार्यांच्या कुलवृत्तान्त-प्रश्नाला त्याच्याजवळ उत्तर नसते. 'सूतपुत्र' म्हणूनच त्याची संभावना केली जाते. त्यावेळी दुर्योधन कर्णाला 'अंगराज' म्हणून राज्याभिषेक करतो आणि त्याच्याशी कायमची मैत्री संपादन करतो. हा प्रसंग डोळयासमोर घडत असून कुंतीला मौन पाळावे लागते. या घटनेपासून कर्ण हा दुर्योधन, दुःशासन, शकुनी यांच्यापैकी एक होतो आणि संपूर्ण महाभारतात पांडवद्वेषाच्या कुटिल कारस्थानात सहभागी होतो. 'चांडाळ-चौकडी' म्हणून या चौघांचा निर्देश केला जातो. तरीही कर्ण अखेरपर्यंत दुर्योधनाशी केलेली मैत्री टिकवून ठेवतो. कर्णाचे सूतकन्यांशी विवाह होतात आणि त्यांच्यापासून त्याला पुत्रप्राप्तीही होते.

कर्णाच्या महत्त्वाकांक्षी अहंकाराला दुर्योधन अधिक खतपाणी घालतो, फुलवितो. वेळोवेळी कर्णाची सूतपुत्र म्हणून उपेक्षा होते. द्रौपदी-स्वंयवराच्यावेळी धृष्टद्युम्न पण जाहीर करताना 'कुलेन', 'बलेन' श्रेष्ठ अशा पण जिंकणाऱ्या वीराशीच द्रौपदी विवाह करील अशी अट सांगतो, तरीही कर्ण त्यावेळी मत्स्यवेध करण्यास पुढे सरसावतो, तेव्हा द्रौपदी 'मी सूतपुत्रास वरणार नाही' असे जाहीरपणे सांगते, त्यामुळे त्याला अपमानित होऊन मागे सरावे लागते.

कृष्ण-कर्ण-संवाद आणि कुंती-कर्ण-संवाद हे कर्णाच्या जीवनातील महत्त्वाचे आणि महनीयता प्राप्त करून देणारे प्रसंग आहेत. शिष्टाई असफल झाल्यानंतर कृष्ण कर्णाला जन्मवृत्त सांगतो. पण पांडवपक्षाला मिळण्याची वेळ निघून गेल्यामुळे आणि दुर्योधनाला दिलेले मैत्रीचे वचन पाळणे आवश्यक असल्यामुळे कर्ण कृष्णाला नकार देतो. कर्ण आणि कुंती यांच्या भेटीत 'तुझे पाच पुत्र जिवंत राहतील' मात्र 'अर्जुन किंवा मी' या त्याच्या अभिवचनातून कर्णाच्या मनाचा मोठेपणा दिसतो. पुढे युद्धात तो अर्जुनाशिवाय अन्य पांडवांना मारीत नाही. धर्मराजालाही तो जीवदान देतो. मात्र पांडवांशी समेट करीत नाही. महाभारतात द्रौपदीवस्त्रहरण, घोषयात्रा-प्रसंग, उत्तरगोग्रहण, आणि अखेरचे अर्जुनाशी झालेले युद्ध या सर्व ठिकाणी कर्ण पराभूत झाला आहे. भीष्म आणि द्रोणांनंतर कर्णाकडे सेनापतीपद येते. भीष्मही कर्णाला त्याचे जन्मवृत्त सांगून युद्धापासून त्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो पण तेही आता त्याच्या दृष्टीने व्यर्थच असते.

कर्णाच्या दिग्विजयानेच आपण पांडवांना जिंकू शकू ही आशा कौरवपक्षात

बळावते. पण इंद्र कर्णाची कवचकुंडले कपटाने हिरावून घेतो.सूर्याने बजावूनही कर्णाने दिलेल्या या दानात त्याची दानत दिसते. कवचकुंडलदानाच्या मोबदल्यात कर्ण इंद्रापासून वासवी शक्ती मिळवितो. सुरूपता अभंग ठेवतो, वस्तुतः ती वासवी शक्ती त्याने अर्जुनवधासाठी जपून ठेवण्याचा प्रयत्न केलेला असतो. पण कृष्णाच्या सल्ल्याने घटोत्कचाशी झालेल्या अनावर युद्धात त्याची वासवी शक्ती खर्च होते.

कर्ण सेनापती झाल्यानंतर आपल्या स्वतःच्या अटींसह शल्य त्याला सारथी म्हणून लाभतो. युद्धारंभी शल्य कर्णाची निर्भत्सना करतो पण कर्णाच्या पराक्रमाने दिपून जातो व नंतर तो त्याला प्रोत्साहन देतो.

कर्णाचा मुलगा वृषसेन यावेळी युध्दात मारला जातो. यानंतर शापित कर्ण रथाचे चाक काढण्याचा प्रयत्न करीत असतानाच कृष्णाच्या सांगण्यावरून अर्जुन त्याचा वध करतो. कर्णवध झाल्याचा आनंद कुंतीने गौप्यस्फोट केल्यानंतर टिकत नाही. उलट पांडवांना कर्णाच्या निधनाचे दुःख होते. अशी ही महाभारतातील सर्वज्ञात कथा आहे. तीत दुर्योधनाच्या दुष्टाव्यात कर्ण प्रत्येक वेळी सहभागी होतो आणि अहंकाराच्या व सूडाच्या भावनेने वावरतांना दिसतो. द्रौपदीवर कोसळलेल्या द्यूत हरल्यानंतरच्या अनवस्था प्रसंगात तो तिची 'बंधकी' म्हणून संभावना करून दुःशासनाला वस्त्रहरणाला चिथावणी देतो. असा हा कर्ण महाभारतात अनेक चांगल्या गुणांनी आणि दुर्योधनाशी मैत्री केल्याने अनेक दुर्गुणांनी, दुष्प्रवृत्तींनी भरलेला चित्रित केला आहे. कौरवांना कर्ण फार मोठा आधार वाटतो. महाभारतात कर्णाचा करूण अंत होतो.

**कर्ण आणि मराठी साहित्य :-**

मराठीतील कर्णविषयक साहित्याचे स्वरूप पाहिले असता साहित्यिकांच्या प्रवृत्तीनुसार त्याचे 'कर्ण : पारंपरिक आकलन' व 'नवे आकलन' असे दोन भाग करता येतात.

या पहिल्या भागात महाभारतातील 'कर्णा' कडे परंपरावादी दृष्टीने पाहणाऱ्या साहित्यिकांच्या साहित्याचा विचार करावयाचा आहे. यामध्ये 'नामूलं लिख्यते किंचित्' या प्रतिज्ञेने एखाद्या ऐतिहासिक सत्यासारखेच कर्ण कथेला जपणारे, शब्दरूप देणारे लेखकही विचारात घ्यावे लागतात. 'राधेय कर्णचरित्र'(वि.स. वाकसकर), 'भारतीय वीरदाता कर्ण'(का.रं. वैशंपायन), 'महारथी कर्ण' व 'महाभारतावरील व्याख्याने'(बाळशास्त्री हरदास), 'महाभारतातील व्यक्तिदर्शन'(डॉ. शं. के. पेंडसे), 'कर्णायन'(गो. नी. दांडेकर), 'महाभारताचे वास्तव दर्शन'(अनंतराव आठवले), ' राधेय कर्ण '(डॉ. रा. शं. वाळिंबे), 'कर्ण खरा कोण होता?'(दाजी पणशीकर)

इत्यादी वैचारिक स्वरूपाच्या लेखनाचा व साहित्यकृतींचा यात सामावेश होतो.

प्रस्तुत ग्रंथात केवळ महाभारताधिष्ठित अर्वाचीन मराठी ललित साहित्याचाच अभ्यास अभिप्रेत आहे पण डॉ. वाळिंबे, अनंतराव आठवले, दाजी पणशीकर इत्यादी लेखकांच्या लेखनाचाही येथे आवश्यकतेनुसार विचार केला आहे. कारण त्यांच्या या लेखनाचे स्वरूप प्रतिक्रियात्मक आहे. 'मराठी ललित साहित्यातील कर्ण' (प्रा. सुशीला पाटील) 'सूर्यपुत्र' (विजय देशमुख) या दोन पुस्तकांचाही विचार याच ठिकाणी करणे उचित ठरते. कलात्मक निर्मिती, रंजन, उद्बोधन यापैकी कोणतीही प्रेरणा या लेखनाच्या मुळाशी आढळत नाही; तर या लेखनात लेखकांची महाभारतनिष्ठा महत्त्वाची आहे. महाभारत हे एक वस्तुस्थितिदर्शक महाकाव्य आहे. हे गृहीत धरून त्यातील इतिहासाला जपण्याच्या भूमिकेतून या वैचारिक लेखनाचा जन्म झालेला आहे. ललित साहित्य निर्मात्या साहित्यिकांनी कर्णकथा एक पुराणकथा मानली आणि कर्ण ही एक पुराण व्यक्ती मानली. महाभारतातील कर्णाच्या निमित्ताने त्याचे चिंतन अवतरेलेले आहे, पण ही भूमिका महाभारताचे पारंपरिक आकलन करणाऱ्या लेखकांची नाही. अव्वल इंग्रजी कालखंडातील आरंभीचे साहित्य महाभारतातील कर्णाचे जीवनचरित्र मराठीतून वाचकांना उपलब्ध करून देण्यासाठीच जन्मलेले दिसते.[१]

**महाभारतनिष्ठ दृष्टिकोन :-**

महाभारतातील कर्ण दुर्योधनाला येऊन मिळालेला आहे याची सतत जाणीव ठेवून या कर्णाच्या ठिकाणी आढळणाऱ्या अद्वितीय सद्‌गुणांबरोबरच त्याच्या अक्षम्य दुर्गुणांचीही नोंद आवर्जून घेणाऱ्या लेखकांचा विचार येथे करावयाचा आहे. कर्णाविषयी पारंपरिक दृष्टिकोण स्वीकारून 'मुळाबरहुकूम' कर्णाचे दर्शन घडविणारे हे साहित्य आहे. आठवले, वाळिंबे, पणशीकर, पाटील इत्यादींचे लेखन यात अंतर्भूत होते. या लेखकांच्या दृष्टीने आजचे मराठी ललित साहित्यिक 'कर्णाची उपेक्षा झाली, तो दुर्दैवी होता. कर्ण नियतीचा बळी ठरला, तो सूतपुत्र होता म्हणून त्याची कड घेतात. कर्णाचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न करतात.' वस्तुतः कर्णाची कीव यावी, त्याच्या जीवनकहाणीविषयी कणव निर्माण व्हावी अशी महाभारतातील कर्णाची स्थिती नाही. शिवाय मूळ महाभारताचे वाचन सर्रास होत नसल्यामुळे ललित साहित्यातील या व्यक्तिरेखाच समाजमनात रुजण्याची शक्यता आहे. म्हणून एक सामाजिक वा राष्ट्रीय कार्य मानून हे परंपरावादी लेखक लेखनास प्रवृत्त झाले आहेत. त्यांचा पिंड व दृष्टिकोन ललित लेखकाचा नाही. तर ते महाभारतनिष्ठ लेखक आहेत. महाभारतातील व्यक्तिरेखांना ऐतिहासिक व्यक्तिरेखांच्या इतके महत्त्व ते देतात त्यामुळे हे लेखक ललित लेखकांवर विकृत चित्रण, पावित्र्यविडंबन इत्यादी दोषारोप करतात. महाभारताकडे एक 'ऐतिहासिक महाकाव्य' म्हणून हे

लेखक पाहतात. पुराणकथा म्हणून पाहत नाहीत. पुराणाच्या सुदूरतेमुळे त्यातील कार्यकारण भावांची संगती लागत नसल्यामुळे, त्यात भवितव्यता आणि नियतीला स्थान असल्यामुळे पुराणाचा वेगळ्या भुमिकेतून विचार करायला हवा ही भूमिका या लेखकांची नाही.

"इतिहासकथांच्या मानाने पुराणकथा अधिक दूरच्या, अधिक धूसर अधिक अद्‌भुत असतात. बहुतेक पुराणकथांतून इतिहास, दंतकथा, संकीर्तन, प्रतीके, चमत्कार, सांस्कृतिक आग्रह इ. चे विवेकाविरोधी आणि तरीही आकर्षक असे मिश्रण झालेले असते. पौराणिक वास्तव हे मर्यादित अर्थाने आणि स्थूल मानानेच वास्तव मानायला हवे. म्हणूनच ललित लेखकांच्या कल्पकतेला आणि स्वतंत्र आकलनाला तिथे भरपूर अवसर असतो. कालिदासाने 'शाकुंतल' मध्ये अथवा भासाने 'प्रतिमा'मध्ये मूळ पुराणकथा कितीतरी बदलून टाकल्या आहेत. लोकांनी स्वीकारलेल्या स्थूल घटना सुरक्षित ठेवून ललित लेखक मूळ कथेतील रिकाम्या जागा आपल्या दृष्टिकोनानुसार भरून काढतो, सूचित असलेले सूत्र वाढवितो, अथवा इतस्तत: विखुरलेले कण एकत्र करून त्यातून नवे आकार आशय निर्माण करतो. म्हणून अशी कलाकृती स्वतंत्र निर्मिती असते. केवळ अनुवाद नसतो. हे स्वातंत्र्य लेखकाला कोणी द्यावे लागत नाही. अथवा ते कोणाकडे मागावे लागत नाही. नाट्यादी ललित साहित्याचा जन्म झाला तेव्हापासून ते अस्तित्वात आहे."[२]

ही प्रस्तुत ग्रंथात महाभारताधिष्ठित ललित साहित्याच्या अभ्यासासाठी स्वीकारलेली भूमिका आहे. 'कर्ण : नवे आकलन' या स्वतंत्र प्रकरणात त्याचा विस्ताराचे विचार मांडला आहे. या प्रकरणात कर्णाचे पारंपरिक आकलन करणाऱ्या बाळशास्त्री हरदास, वाळिंबे, आठवले, पणशीकर इत्यादींच्या कर्णविषयक लेखनांतही स्वत: लेखकांचा दृष्टिकोन कर्णाविषयी लेखन करताना मिसळलेला दिसतो. त्यामुळे उलट या ग्रंथात स्वीकारलेल्या भूमिकेला अधिक बळकटीच येते. महाभारतनिष्ठा सांगणारे भाष्यकारही जेव्हा कर्णाची स्वत:च्या व्यक्तीच्या स्पर्शाने चित्रणे रेखाटू पाहतात, तेव्हा त्यांच्या कर्णाकडे पाहण्याच्या भूमिकेत आणि दृष्टिकोनातही (क्वचित निष्कर्षातही) फरक पडलेला दिसून येतो. यावरून महाभारतातील व्यक्तिरेखांचे वैशिष्ट्य लक्षात येते. या व्यक्तिरेखा पारदर्शक आहेत, संमिश्र, बहुमिती असलेल्या आहेत म्हणून त्यांच्या चित्रणाला अनेक पदर, अनेक परिमाणे लाभतात. 'फाटे फुटतात'. महाभारताला अनुलक्षून रेखाटलेल्या या कर्णाच्या विविध चित्रणातून मराठी लेखकांनी महाभारताच्या आशयाला दिलेला नवा आकार, महाभारताची कर्णकथेच्या संदर्भात त्यांनी केलेली वाढही स्पष्ट होईल.

**बाळशास्त्री हरदास :-**

'महाभारतातील व्याख्यानें' मधील 'कर्ण' आणि स्वतंत्र 'महारथी कर्ण' या

बाळशास्त्रींच्या दोन लेखनकृती वैचारिक आहेत. पण त्यांनी 'महारथी कर्ण' पुस्तकात कर्णाच्या चरित्र कथनाचा प्रयत्न केला आहे. बाळशास्त्री हरदासांनी कर्णाचे चरित्ररूपानं हे जे दर्शन घडविले आहे. त्यापूर्वी अशाच स्वरूपाचा एक प्रयत्न श्री. विं. स. वाकसकर यांनी आपल्या 'राधेय कर्णचरित्र' मध्ये केला आहे.

परंपरानिष्ठ दृष्टिकोन स्वीकारून संस्कृतीतील कर्णाची व्यक्तिरेखा मराठीमध्ये आणण्याचा सुरूवातीचा हा प्रयत्न आहे. त्यात कर्णाची राजनिष्ठा, नि:स्पृह स्वामिनिष्ठा, सत्यप्रियता, कर्तव्यदक्षता, मित्रप्रेमाविषयीची जागरूकता दाखविली आहे. त्याच्या या सद्गुणांप्रमाणेच क्रोधी, मत्सरी, खुनशी, अनीतिमान, इ. दुर्गुणांचे वर्णन केले आहे. सत्त्व, रज, तम या त्रिगुणांनी युक्त असे कर्णाच्या स्वभावाचे महाभारतानुरूप दर्शन येथे घडते. कर्णाच्या प्रयत्नवादी वृत्तीची प्रखरता येथे थोडी अधिकच वर्णिली आहे.

'प्रत्यक्षशत्रू' हा 'हितशत्रू' पेक्षा लाखपटीने चांगला आहे हे शल्याला नि:संदिग्धपणे सांगणारा हा कर्ण अभिमन्यू-वधात सहभागी होतो. त्यांनी कर्णास पांडवांकडून होणारे जयपराजय महाभारतानुसार सांगून सामाजिक चिंतनाचा स्पर्श कर्ण-जन्मकथेच्या निमित्ताने केला आहे.

कुंतीला मंत्रसामर्थ्याने वयाच्या अठराव्या वर्षी कर्णाची प्राप्ती होते. यावर भाष्य करताना वाकसकरांनी त्यावेळची वैवाहिक बंधने शिथिल असली तरी सुप्रजाजननासाठी या गोष्टीचे उदात्तीकरण केलेले आडळते. असे अनुमान काढले आहे. पण यापेक्षा वेगळा असा लेखकाचा ठसा या चरित्रकथेवर उमटलेला आढळत नाही म्हणून हे कर्णचरित्र विशेष लक्षणीय ठरत नाही. महाभारतातील कर्णाच्या व्यक्तिरेखेला सोप्या पद्धतीने सांगण्यापलीकडे फारसे या चरित्रातून साधलेले नाही. या पार्श्वभूमीवर बाळशास्त्रींच्या कर्णाचे रूप विशेष उठावदार आहे. बाळशास्त्री हरदास यांनी कर्णाच्या चित्रणाला महाभारताच्या आधाराने साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. सुष्ट पात्रांना बाळशास्त्रीच्या सात्विक मनोवृत्तीमुळे त्यांच्या व्याख्यानग्रंथात विशेष महत्त्व त्यांनी दिले आहे. कर्णाचे चरित्र रेखाटताना बाळशास्त्री त्याचे एकूण गुणदोष वर्णन करतात.

कर्णाच्या ठिकाणी शूरत्व आणि दातृत्व आहे. दुर्योधनाच्या दुष्कृत्याचा तो एक मित्र म्हणून भागीदार झाला आहे. अर्थातच यामुळे पांडवांचा तो प्रमुख विरोधक बनला. अर्जुनाचा द्वेष करू लागला. कर्णाला त्याची वैयक्तिक महत्त्वाकांक्षा प्रत्येक वेळी उद्युक्त करते. महाभारतात कर्णाच्या दिग्विजयाबरोबरच पराभवही वर्णन केलेले आहेत.

बाळशास्त्री हरदासांनी 'एका अनिवार्य सामाजिक घटनेतून कर्णाची आत्मकेंद्रितता जन्म पावली, त्या आत्मकेंद्रिततेतून त्याचा अहंकार जन्म पावला व त्या अहंकारतूनच

अमर्याद महत्त्वाकांक्षेच्या पिशाचिनीचा उदय झाला, अशी महाभारतकाराची मांडणी आहे',[३] असा कर्णाविषयी निष्कर्ष काढला आहे.

बाळशास्त्री हरदासांना महाभारताच्या घडणीत कर्णाच्या व्यक्तिरेखेचा सिंहाचा वाटा आहे असे वाटते म्हणूनच कर्णाच्या व्यक्तिमत्वासंबंधी अनेक परस्परभिन्न मते प्रचलित असूनही त्याचे व्यक्तित्त्व त्यांना विशेष अभ्यसनीय वाटते. याचे कारण कर्णाचा करूणामय शेवट हा वाचकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवून जातो असे त्यांना वाटते.

आपली परंपरावादी भूमिका असूनही बाळशास्त्रींनी एक महत्त्वाचा समतोल येथे साधला आहे. तो म्हणजे कर्ण केवळ विरोधी कौरव पक्षातील म्हणून त्याच्या सद्‌गुणांकडे ते दुर्लक्ष करीत नाहीत. ''महाभारताच्या इतिहासात महारथी कर्णाचे महत्त्व अनन्यसामान्य आहे. किंबहुना पूर्णावतार भगवान श्रीकृष्णांच्यानंतर या इतिहासाच्या घडणीवर ज्याच्या प्रभावशाली व्यक्तिमत्त्वाचा परिणाम झालेला दिसून येतो अशी कर्ण ही एकच व्यक्ति होय.''[४] असे असूनही त्यांनी कर्णाला न्याय दिला आहे. बाळशास्त्री काहीशा अतिशयोक्तीनेच 'कर्ण नसता तर भारताचे महाभारतही झाले नसते' असे ते म्हणतात. कर्णाच्या व्यक्तिचित्रणात त्यांना अद्‌भुतता आणि अस्वाभाविकता यांचा स्पर्शही जाणवत नाही.(पृ.२४०). त्याचप्रमाणे बाळशास्त्रींनी 'कर्ण ही या बहुरत्ना वसुंधरेत वारंवार पुनरावृत्ती होणारी घटना आहे' हेही अचूकपणे हेरले आहे.

दुर्योधनाच्या मैत्रीच्या फेऱ्यात सापडल्याने कर्ण राजसिंहासनाचा उत्तराधिकारी असूनही वंचित राहिला, शिवाय योग्य वेळी त्याला आपण 'कौंतेय' आहोत हे समजले नाही आणि जेव्हा समजले तेव्हा वेळ निघून गेलेली होती. त्यामुळे कर्णाच्या साऱ्या जीवनालाच वेगळे वळण लागले. एक भलतीच कलाटणी मिळाली असे बाळशास्त्री हरदासांचे प्रतिपादन आहे. पुराणकथेतील घटनांच्या मुळाशी असलेला कार्यकारणसंबंध स्पष्ट करता येत नाही, कर्णाच्या बाबतीत असेच घडते. म्हणून बाळशास्त्रींनी कुंतीला निर्दोष दाखविले व तिच्या कृत्याचे समर्थन केले आहे. पुढे गो. नी. दांडेकरांनीही अशाच प्रकारे राजकुमारी कुंतीची विशिष्ट परिस्थितीतील ही एक कृती म्हणून सहानुभूतीने सावरण्याचा प्रयत्न केला आहे. 'कर्ण-कुंती' यांच्याकडे पाहण्याची बाळशास्त्रींची भूमिका येथे लक्षात घेतली पाहिजे. ते लिहितात, ''तात्पर्य, कुंतीच्या भूमिकेचा मनुष्यस्वभावातील स्वाभाविक अपूर्णता ध्यानात घेऊन विचार केला म्हणजे तिला दोष द्यायला जागाच उरत नाही. तसेंच कर्णाला ज्या परिस्थितीत दैवानें अकारण आणून सोडले तिचा विचार केला तर संतापण्याबद्दल त्यालाही काहीच दोष देता येत नाही.''[५] त्यांच्या या चिंतनात कर्ण-कुंतीविषयी सहानुकंपा दिसून येते. पुराणकथेत महत्त्व असलेले नियतीचे सूत्र मात्र त्यांनी

कर्णाच्या जीवनात सूचित केले आहे. 'कर्णाच्या जीवनात नियतीने एक महत्त्वाची भूमिका बजावली आहे' असे म्हणून त्यांनी फारसे परंपरा न सोडणारे असे आपले स्वतःचे विश्लेषण स्पष्टपणे मांडले आहे. महाभारतीय स्वभावचित्रमालेतील पहिली व्यक्तिरेखा म्हणून साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांनी 'महारथी कर्ण' लिहिले आहे.

या ग्रंथाच्या प्रस्तावनेत कर्णाच्या संदर्भात त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे'...तरी भारतीय युद्ध घडवून यावयास जी अनेक कारणे झाली त्यात महारथी कर्ण याची राजा दुर्योधनासारख्या स्वार्थांध कलिपुरूषाशी घडलेली मैत्री व कर्णाचा महत्त्वाकांक्षी स्वभाव हे सर्वांत महत्त्वाचे कारण होते.'

'...जर एकटा कर्ण कौरवांच्या पक्षाला नसता तर एकतर युद्धापर्यंत प्रसंगच न उद्भवता. दुर्योधनाच्या साम्राज्याकांक्षेचे निर्माल्य होऊन राहिलें असते व युद्धाचे भारत जरी उद्भवले असते तरी त्याचे महाभारत निश्चितच घडून आले नसते. या दृष्टीने महाभारतातील कर्णाचे व्यक्तिमत्त्व अत्यंत अभ्यसनीय आहे. किंबहुना महाभारताच्या इतिहासाची गुंतवण उकलण्यास कर्णाच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास व त्याचे परीक्षण सर्वांत अधिक आवश्यक आहे.'[६] प्रस्तावनेतील हा उल्लेख मुळातून येथे उद्धृत करण्याचे कारण बाळशास्त्रींच्याच शब्दांत त्यांची भूमिका त्यात स्पष्टपणे व्यक्त झाली आहे. महत्त्वाकांक्षी कर्ण आत्मकेंद्रित आणि अहंकारी बनत गेला, स्वार्थ साधण्यासाठी कौरवपक्षाचा आणि कौरवपांडव वैराचाच अवलंब करीत राहिला. आयुष्याच्या अखेरी पांडव आपले भाऊच आहेत या जाणिवेने कर्णाला आजवर केलेल्या कृत्यांमुळे अपराधीपणाची जाणीव झाली. एका सद्‌गुणी व्यक्तीच्या जीवनाशी निगडीत तत्त्वांचा शोध घेऊन, त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा बोध करून देण्याचा बाळशास्त्रींचा हा प्रयत्न आहे.

महाभारतानुसार कर्णचित्र रेखाटणारे बाळशास्त्री हरदास येथे कर्णाविषयीचे स्वतःचे वेगळे विश्लेषण सादर करतात. यावरून महाभारतातील पारदर्शक व्यक्तिमत्त्व लाभलेल्या कर्णासारख्या व्यक्तींच्या चित्रणात लेखकाची भूमिका मिसळतेच. त्यामुळे महाभारतातील व्यक्तींचे लेखकाचे चित्रण भिन्न होते आणि त्या व्यक्तिचित्रणालाही नवे धुमारे फुटतात.

**शं. के. पेंडसे :-**

महाभारतातील कर्णाला स्वतंत्र दृष्टिकोनातून आपल्या व्यक्तिदर्शनपर ग्रंथात[७] चित्रित करण्याचा प्रयत्न शं. के. पेंडसे यांनी केला आहे. कुसंगतीमुळे कर्णाचे सगळे सद्‌गुण मातीमोल झाले हे त्यांचे प्रतिपादनाचे मुख्य सूत्र आहे. मनोविश्लेषणाला

वाव मिळेल अशा तऱ्हेने त्यांनी कर्णाच्या व्यक्तिरेखेवर स्वत:चे भाष्य केले आहे. कर्णाला सूतपुत्र म्हणून जे उपेक्षित जिणे वाट्याला आले त्यामुळेच त्याच्या स्वभावात ताठरपणा आला, तो न्यूनगंडाने पछाडलेला असल्यामुळे त्याचा ठिकाणी आत्मकेंद्रित अहंभाव निर्माण झाला. अर्जुन, द्रौपदी, द्रोणाचार्य, भीष्माचार्य, कृपाचार्य या सर्वांशी त्याचे या ना त्या कारणाने वितुष्ट आले आणि या सगळ्यांच्या विरोधात तो उभा राहिला. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून कर्णाच्या दोषांचे दिग्दर्शन आणि स्पष्टीकरण करण्याचा शं. के. पेंडसे यांचा प्रयत्न आहे.

बुद्धिमान, पराक्रमी, उदार, 'महापुरूष' म्हणून कर्णाचा गौरव करून केवळ दुर्योधनाच्या सहवासाने या महापुरुषाचे व्यक्तिमत्त्व अध:पतित झाले असे त्यांनी सुचविले आहे. 'न्यूनगंडामुळे विवेकशून्य झालेला अध:पतित एक महापुरूष' या शब्दात त्यांनी कर्णाला टिपले आहे.

कौरवांचा एक मोठा आधार होण्याचे भाग्य लाभूनही आपल्या जन्माने आपण हीन लेखले जात आहोत या भावनेने कर्ण नेहमीच असमाधानी व असंतुष्ट राहिला. प्रतिष्ठा लाभण्याच्या संबंधात आपल्यावर फार अन्याय झाला आहे, हे कर्णाच्या जीवनाचे शल्य जाणून घेण्याचा प्रयत्न या नव्या अन्वयार्थातून पेंडसे यांनी केला आहे. पेंडसे यांची भूमिका ललित साहित्यिकाची नसली तरी परंपरेला ज्ञात असलेला महाभारतीय कर्ण अगदी नव्या तऱ्हेने, त्याच्या अंतरंगाचा आणि परिस्थितीचा वेध घेऊन त्यांनी चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नात पेंडसे यांच्या कर्णाच्या व्यक्तिचित्रणाला संपूर्णपणे आगळे, स्वत:चे असे रूप लाभले आहे. पांडवांचा आणि विशेषत: अर्जुनाचा द्वेष करणे, नाश करणे हेच कर्णाच्या जीवनाचे ध्येय बनले. द्रौपदीने स्वंयवरप्रसंगी केलेल्या अपमानाचे द्यूतप्रसंगी त्याने पांडव, द्रौपदीची मानहानी करून अध:पाताची सीमा गाठली. दुर्योधनाने कर्णाच्या बळावरच पांडवांशी वैर पत्करले. कारण 'कथमादित्यसदृशं मृगी व्याघ्रं जानिष्यति ॥' (आदि.१३७-१०) (वाघाचा जन्म हरिणीच्या पोटी होत नसतो.) हे दुर्योधनाने अचूकपणे जाणले होते. पुढे कर्णाला जन्मरहस्य कळूनही त्याची तगमग आणि न्यूनगंड आणखी वाढला. पराक्रमी कर्ण उपेक्षिला गेला. अशी ही पेंडशांनी चित्रित केलेली कर्णाची व्यक्तिरेखा आहे. 'एक अध:पतित महापुरूष' म्हणून कर्ण त्यांना जाणवला आहे. महाभारतातील कर्णाचे चित्र रेखाटताना त्यात स्वत:चे रंग मिसळून कर्णाचे चित्र येथे अवतरले आहे. पेंडसे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून कर्णाकडे पाहिल्यामुळे त्यांनी केलेले कर्णाचे मनोविश्लेषण वास्तवाच्या जवळ पोहचते. कर्णाच्या जीवनातील अद्भुतरम्यतेपेक्षा मानवी पातळीवरून त्याचे चित्रण केले आहे. स्वत:च्या दृष्टिकोनातून ते कर्णाच्या वागण्यामागील, कृतिउक्तीमागील कार्यकारणभाव

सांगण्याचा प्रयत्न करतात. पण प्रत्येक वेळा ते पटण्याजोगे स्पष्टीकरण होणे अवघड असते.[८] पण ही कारणमीमांसा मात्र नव्याने पेंडशांनी सांगितली असल्याने वैचारिक स्वरूपाचे लेखन असूनही ते वाचनीय झाले आहे.

कवचकुंडले गेल्याने कर्णाला मरण आले असे म्हणणे त्यांना योग्य वाटत नाही. कारण कुंडलांच्या दानानंतरही त्याने अनेक महावीरांना पराभूत केले. कर्णाच्या मृत्यूला मानसशास्त्रीय स्पष्टीकरण ते जोडतात.

पेंडशांनी जागोजाग दिलेले शरीरशास्त्रीय स्पष्टीकरण पटण्याजोगे न होता काहीसे हास्यास्पद वाटते. रथचक्रउद्धरण व ब्रम्हास्त्र-विस्मरण या प्रसंगाचेही त्यांचे स्पष्टीकरण याच कोटीतील आहे. कर्णाच्या जीवनाकडे भौतिक व आधुनिक दृष्टीने त्यांनी पाहिले. त्यामुळे कर्णाच्या जीवनातील अद्‌भुतता कमी झाली आहे.

**गो. नी. दांडेकर :-**

गो. नी. दांडेकरांनी आपल्या 'कर्णायन' मध्ये तात्त्विक बाजूची फारशी दखल न घेता मानवी पातळीवरून महाभारतानुसारी भूमिकेतून कर्णाच्या चरित्र-निवेदनाचा प्रयत्न केला आहे.

परिस्थितीमुळे कर्णाला अपमानित जिणे जगावे लागले. अर्जुनाशी तुल्यबळ असूनही समाजातील वृद्ध नेत्यांकडून त्याच्या गुणवत्तेची फारशी कदर झाली नाही. त्याला फारसे प्रोत्साहनही मिळाले नाही. याचा परिणाम म्हणून अर्जुनाविषयी त्याला ईर्षा निर्माण झाली आणि ईर्षेच्या पोटी मत्सर आला. परिस्थितीने लादलेल्या शत्रुत्वामुळे कर्णाचे व्यक्तिमत्त्व झाकाळून गेले. विद्यार्जनासाठी त्याने केलेली तपश्चर्या निर्हेतुक नव्हती, म्हणून ब्रम्हास्त्र प्राप्त करून घेण्यासाठी तो असत्य बोलण्यास प्रवृत्त झाला. कर्णाने गुरूची फसवणूक केली अशी कर्णाच्या अपयशाची कारणमीमांसा श्री. दांडेकरांनी 'कर्णायन' मध्ये सूचित केली आहे. कर्णाच्या अंगच्या अनेक गुणांची प्रशंसा केली असली तरी त्यांची कर्णासंबंधीची भूमिका परंपरावादीच आहे हे येथे लक्षात येते.

कर्णाच्या जीवनाची शोकांतिका झाल्याचा निर्वाळा गो. नी. दांडेकरांनी दिला आहे. विवेचनाच्या ओघात 'प्रा. बापट-गोडबोले' यांनी याच मुद्याला स्पर्श केला आहे.[९] कर्णायनमधून कर्णाच्या भग्नांश जीवनाची कहाणी हृदयस्पर्शी शैलीत गो. नी. दांडेकरांनी वाचकांसमोर ठेवली आहे. कर्णाच्या भावजीवनाचे, आकांक्षांचे, त्याच्या व्यथांचे, शल्यांचे नि आंतरिक समरप्रसंगांचे दर्शन वाचकांना घडवावे या उद्देशाने 'श्रीकर्णायन' वाचकांसमोर ठेवले आहे. गो. नी. दांडेकरांनी 'कर्णायन' मध्ये दुर्वासाची कुंतीने कुमार वयात केलेली सेवा, तिला झालेली वरप्राप्ती, कौरवपांडवांबरोबर त्याचे अध्ययन, धनुर्विद्या, परीक्षेच्या वेळी अर्जुनाशी घडलेला

समरप्रसंग, हीनकुलीन जन्म म्हणून अधिक्षेप, दुर्योधनाची मैत्री, ब्रम्हास्त्र-प्राप्तीसाठी परशुरामांची सेवा, असत्याने मिळवलेल्या विद्येच्या विफलतेचा शाप, द्रौपदीची कामना, तिने केलेला कर्णाचा मानभंग, द्वैतवनातील प्रसंग, उत्तरगोग्रहण प्रसंग, कृष्णशिष्टाईच्या अखेरीस कळलेले जन्मरहस्य, कर्णकुंतीभेट व अखेरचे युद्ध इत्यादी कर्णाच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांची चित्रे मोठ्या समरसतेने रेखाटली आहेत.

गो. नी. दांडेकरांनी कौमार्यावस्थेत पुत्रप्राप्ती होतांना झालेली कुंतीची व्याकुळ मन:स्थिती आणि बऱ्याच वर्षांनंतर पुन्हा पुत्रभेटीतील तिची अपराधी मन:स्थिती यावर आपल्या चित्रणात विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

महत्त्वाकांक्षी माणसाच्या पदरी आयुष्यात दुर्दैवाने नेमके वैफल्य आल्यावर त्याच्या मनात जो संघर्ष निर्माण होतो, त्याचे अत्युत्कट चित्र आपल्या भावोत्कट व करुण रसानुकूल अशा कर्ण-कहाणीत दांडेकरांनी रेखाटले आहे. 'कर्णाच्या जीवनातील कारुण्य व भव्यता मान्य करूनही असे विचारावेसे वाटते की द्रौपदीवस्त्रहरणाचा आदेश देणाऱ्या, केवळ अपमानाची जपणूक करून सूडाच्या प्रेरणेने जीवन जगणाऱ्या, पांडवाचा सत्पक्ष आहे, हे मान्य असूनही असत्पक्षाचे नेतृत्त्व करणाऱ्या कर्णकथेला 'श्रीकर्णायन' असे गौरवून रामकथेच्या पंक्तीत दांडेकर बसवू पाहतात हे कितपत योग्य आहे?' असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. याचे उत्तर एवढेच की ही कर्णाची शोककथा आहे. तिला कलात्मक रूप देण्याचा गो. नी. दांडेकरांनी आपल्या परीने प्रयत्न केलेला आहे. हेच त्यांच्या कर्णाचे वैशिष्ट्य म्हणून लक्षात घेण्याजोगे आहे.. गुणदोषांसह कर्णाचे यथार्थ चित्र रेखाटण्याचा गो. नी. दांडेकरांचा प्रयत्न 'कर्णायन' मध्ये आढळतो.

'श्रीकर्णायन' मधील कर्ण हा महाभारतातील कर्णाचेच अधिक जिवंत व रसरशीत चित्र रेखाटण्याचा एक प्रयत्न आहे. कर्णाच्या जीवनातील ज्ञात समरप्रसंगांना उठाव देण्याच्या प्रयत्नात कर्णाच्या व्यक्तिगत भावजीवनाकडे (कादंबरीकारांप्रमाणे) दांडेकरांनी विशेष लक्ष पुरविले नाही. मात्र कर्णाच्या जन्माच्या पूर्वीची हकिकत जणू काही तीच कर्णाच्या जीवनाला कारणीभूत असल्याने त्यांनी अत्यंत सविस्तर व तपशीलवार चित्रित केली आहे. गो. नी. दांडेकरांना कर्णाच्या जीवनावर या परिस्थितीचा प्रभाव शेवटपर्यंत उमटलेला नव्याने जाणवला आहे. त्याची द्विधा मन:स्थिती त्यांनी नव्याने दाखविली आहे. 'दांडेकरांनी कर्णाच्या स्वभावाची मीमांसा दुर्वासाच्या संदर्भात केली आहे. त्यांची ही कर्णाच्या तामसीपणाचे विवरण करणारी उपपत्ती सर्वमान्य होईल असे वाटत नाही.'[१०] हे. प्रा. पाटील यांचे मत ग्राह्य आहे. पण दांडेकरांनी कर्णाविषयीची आपली जाणीव आणि भूमिका या निमित्ताने व्यक्त केली आहे. गो. नी. दांडेकरांनी 'कर्णायन' मध्ये महाभारतातील ज्ञात कर्णकथेला अधिक रंगतदार स्वरूप प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

'कलाकृती व्यक्तिमत्वाच्या आधारानेच जन्मते' या न्यायाने गो. नी. दांडेकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्पर्श 'कर्णायन' मधील कर्णकथेला, त्याच्या जीवनातील प्रसंगांना झाला आहे.

कर्णायनमधील कर्ण विद्यार्जनासाठी जातांना पित्याला सांगतो ....'मी मर्यादा सोडणार नाही तात ....पण मी अपमान सहन करणार नाही!'[११] येथे कर्णाच्या मानी स्वभावाची जाणीव होते. अधिरथाकडून कुंतीची कथा ऐकताना भाबडेपणाने ती कर्णाला जणू जन्मांतरीची व्यथा ठाऊक आहे असे दांडेकरांनी केलेले वर्णन संपूर्ण काल्पनिक आहे.

**कर्णजीवनाची पार्श्वभूमी :-**

दुर्वासाकडून कुंतीला प्राप्त झालेला वर या प्रसंगावर दांडेकर विशेष भर देतात. अनेक सूक्ष्म बारकाव्यांसह विस्ताराने ते कर्णजीवनाची प्रथम ही पार्श्वभूमी सांगतात. त्यातून नव्याने, दुर्वासाचे उग्र, संतापी, तपःपुनीत, बलवान व्यक्तिचित्र निर्माण करतात. तसेच कुंतिभोज आणि शूरसेन यांच्या स्नेहाच्या संबंधावर नव्याने प्रकाश टाकतात.

दुर्वासांचा बालभाव अजून लोपला नाही या कुंतीच्या जाणिवेला पूरक असेच 'धात्री' मोठे सूचक बोलते. 'म्हणजे हे मूल विवाहापूर्वीच झाले आहे तुला.' (पृ. १२) दुर्वासांच्या हट्टी चित्रणापेक्षा कुंतीच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगाकडे हे चित्र विलक्षण गतीने वाचकांना घेऊन जाते.

सूर्य आणि कुंती यांच्या संवादात गो.नी.दांडेकर यांनी योजिलेले एक वाक्यही असेच मोठे सूचक आहे. कुंती मोहाला का बळी पडली याचा एक वेगळा उलगडा करणारे आहे.

'वृक्षवल्ली मोठ्या झाल्या की फुलाफळांनी, बहरून येणारच' (पृ. २१) पण घडलेल्या घटनेने कुंतीची व्यथा अधिकच तीव्र बनते 'सर्व शरीर जाळीत असलेले हे अमृत माझ्या उदरी कां शिरले?' (पृ. २७) कुमारी आणि माता या पेचात 'टाकवतही नाही आणि धरवतही नाही' अशी कुंती बिकट परिस्थितीत सापडली आहे. कुंती, दुर्वास या कर्णाच्या जन्मापूर्वी संबंधित असलेल्या व्यक्तींच्या मनावर दांडेकरांनी आपले लक्ष विशेष केंद्रित केलेले येथे दिसते. कुंतीचे चित्र त्यांनी मनःपूर्वक रेखाटले आहे.

अर्जुन आणि कर्ण यांच्या बालपणच्या पहिल्या भेटीपासूनच दांडेकर वैरभाव चित्रित करतात. त्यात कर्णाला सावध दाखविण्यात त्यांचे स्वतंत्र व्यक्तिचित्रण-कौशल्य जाणवते. 'आजपासून कर्ण तुझा अनुगत स्नेही झाला आहे' कर्णाने हा एका साध्या क्षुल्लक प्रसंगाच्या निमित्ताने दुर्योधनासाठी घेतलेला निर्णय पटत नाही.

युधिष्ठिराकडून, कवचकुंडलधारी नाजुक छोटया पावलांचा कर्ण 'सूतपुत्र' असल्याचे कुंतीला अगदी सहज कळते. ती कमालीची अस्वस्थ होते. कुंतीची अशीच शोचनीय अवस्था कृपाचार्य जेव्हा 'क्षत्रियांचे थोरपण खड्गाच्या तीक्ष्ण धारेवर, बाणांच्या प्रखर टोकावर अवलंबून असते'. असे कणखरपणे सांगणाऱ्या कर्णाचा रंगागारातील संघर्षाच्या वेळी अपमान करतात तेव्हाही होते.

**कणखर कर्ण :-**

महान गुण आणि महान दोष असलेला कर्ण महाभारतकथेला समतोल प्राप्त करून देतो, पांडवांकडे कृष्ण तर कौरवांकडे कर्ण असे हे समतोलन आहे. 'कर्ण दुर्योधन पक्षास मिळाल्यामुळे दोन्ही पक्ष आता तुल्यबळ झाले आहेत.' हे 'कर्णायन' मधील दांडेकरांचे एक महत्त्वाचे प्रतिपादन आहे. याचाच पाठपुरावा पुढील मराठी साहित्यिकांनीही केलेला दिसतो. कर्णाचे धारदार व्यक्तित्व मोठ्या उत्कटतेने व प्रभावीपणे दांडेकर चित्रित करतात. कर्ण 'जयाची इच्छा करणे हा प्रत्येक क्षत्रियाचा धर्मच आहे' (पृ. ८४) असे मानतो. द्रोणाचार्य कर्णाला ब्रम्हास्त्रविद्या शिकविण्याचे नाकारतात. तेव्हा कर्ण उसळून म्हणतो 'मी या जन्मीच मिळवीन.' यावर द्रोणाचार्य म्हणतात 'त्यासाठी तुला खोटे बोलण्याचे पाप करावे लागेल' तेव्हा कर्ण तडफदार उत्तर देतो, 'पापाच्या भयापेक्षा मला माझ्या शब्दांचे मोल अधिक वाटते.' मी दुर्योधनाला शब्द दिला आहे. (पृ. ८५) येथे कर्णाची वचननिष्ठा दिसून येते.

कमनशिबी कर्णाच्या हातून अनवधानाने गोहत्या घडते. हा प्रसंग वाजवीपेक्षा जास्त विस्ताराने दांडेकरांनी वर्णन केला आहे. 'गाईच्या वधासारखाच तुझा वध होईल.' असा एक वेगळा शाप त्यांच्या या कथेतील ब्राम्हण देतो. एक साधा शाप पण तोही जणू कर्णाची निष्पापता येथे सुचवून जातो. कर्णवधाची तुलना गाईच्या वधाशी करण्यात हेच औचित्य प्रगट झाले आहे. महाभारतकथा आधाराला घेऊन असे सूक्ष्म तपशिलातील बदल त्याच कथेला वेगळे कलात्मक रूप देऊ शकतात याचे हे उत्तम उदाहरण आहे. तसेच परशुराम 'भ्रमर-कीटका'च्या स्पर्शाने जागा होतो. तेव्हा तो 'तू विजयी होणार नाहीस.' असा अनोखा शाप देतो. महाभारतात 'तू ब्रम्हास्त्र विद्या विसरशील' असा शाप आहे. गो. नी. दांडेकरांच्या या शापात सगळे भाकीत व्यक्त झाले आहे. या प्रसंगी गो. नी. दांडेकरांनी केलेल्या नवनिर्मितीचा प्रत्यय येतो. परशुराम निद्रिस्त असताना कर्णाची सदसद्विवेकबुद्धी जागी होते आणि सत्य परशुरामाला सांगून टाकावे असे त्याच्या मनात येते. या कलात्मक प्रसंगनिर्मितीने वाचकांसमोर या घटनेतील सत्य प्रकट होते. त्याला लगेच जे भीषण स्वरूप येते ते विशेष जाणवते. 'कर्णकथा' एक पुराणकथा (माध्यम अथवा साचा ज्याला म्हणता येईल) असून त्यातील तपशिलाचा भाग

वगळून, ती रिती करून त्यात नवा भावार्थ, नवी अनुभूती ललित साहित्यिकाला भरावयाची असते. ही नवी (भावार्थाने युक्त) निर्मिती करण्याकडे वि. वा. शिरवाडकर, शिवाजी सावंत, रणजित देसाई यांचा कल आहे. पण गो. नी. दांडेकरांचे वेगळेपण हे आहे की ते कर्णाचीही पुराणकथा महाभारतातील तपशिलासह यथाक्रम घटनाप्रसंगासह देतात. संक्षेपविस्ताराचे मोरोपंती धोरण स्वीकारतात. त्यामुळे कलाकृतीला बाधक असा अनावश्यक रूक्ष तपशील येऊ लागतो. एखाद्या पुराणिकाच्या निवेदनशैलीची येथे जाणीव होते. त्यामुळे निर्माण होऊ पाहणारे महाभारताचे हे नवे रूप एकात्म परिणाम साधण्यास तोकडे ठरते.

'मग काही काळ गोंधळ झाला, तो सांगता पुरवत नाही' (पान. ११०) 'पळस फुलांनी शोभावा तसे राजे रक्तांनी नाहाले', जरासंध एक कौतुकाचा भाग म्हणून मालिनी नगरी देतो, चित्रांगदकन्यास्वयंवर प्रसंग इत्यादी स्थळांचा या संदर्भात उदाहरण म्हणून निर्देश करता येतो.

**कर्णाचा चांगुलपणा :-**

गो. नी. दांडेकरांचा कर्ण महत्त्वाकांक्षी आहे. सूतकन्यांपेक्षा द्रौपदीसारखी स्त्री त्याला हवी होती. गो. नी. दांडेकर अज्ञात वेदना आणि न्यूनगंडाचे दुःख कर्णाच्या मनामध्ये सलत असल्याचे सांगतात. 'आपणाभोवती जो सूत-परिवार वावरत असतो त्यातले आपण नव्हे.' काही तरी वेगळे, उंच आहोत, केवळ सौजन्यामुळेच तो हे स्पष्टपणे बोलू शकत नव्हता. पण बदकामध्ये वावरणाऱ्या राजहंस पक्ष्याप्रमाणे त्याची गलबल होत होती.' (पृ. ११३)

रणजित देसाईंच्या 'राधेय' मधील 'कर्ण' सूतकुलाचा सदोदित अभिमान बाळगणारा आहे. तर दांडेकरांचा कर्ण त्यातून बाहेर पडू इच्छितो. 'राधेय' मधील कर्णाप्रमाणे केवळ दुर्योधनाच्या आग्रहासाठी, प्रिय वृषालीची संमती घेऊन द्रौपदी स्वयंवराला गो.नी. दांडेकरांचा कर्ण जात नाही तर दांडेकरांचा कर्ण द्रौपदीच्या रूपगुणांनी संमोहित होऊन स्वयंवरास जातो, पण तो सच्छीलही आहे. उदाहरणार्थ 'म्हणजे पांचाली न मिळाली, तर निदान सुवास तरी....' अशा दुःशासनाच्या लोचट उद्गारानंतर कर्ण म्हणतो....' अपरिणीतेविषयी असे बोलू नये दुःशासना.' (पृ. ११४) कर्णाच्या सच्छील मनाचा हा नवा आकार दांडेकर फार काळ टिकवीत नाहीत. दुर्वासांच्या या मानसपुत्राची 'मी सूत कुळीची स्नुषा होऊ इच्छीत नाही.' (पृ. १२२) असे म्हणून द्रौपदीने केलेली अवहेलना कर्णाला असह्य होते. याचा सूड द्यूताच्या कपटकारस्थानाच्यावेळी आणि द्रौपदीला सभेत आणण्याची वेळी तो घेतो. 'कुलटा!' जे शरीर पाचांनी पाहिले ते सर्वांना पाहू दे' कर्णाच्या या उद्गाराचे समर्थन करण्याचा प्रयत्न दांडेकर करतात. द्रौपदीने स्वयंवरप्रसंगी अपमान केला'.... म्हणूनच कर्णाच्या मुखी द्यूतसभेत द्रौपदीला उद्देशून

केलेले अमंगळ भाषण उभे राहते ना.' पण येथे कर्णाचे उदात्त चित्रण न होता उलट तो मनात सूडबुद्धी वागविणारा आहे. 'जशास तसे' या न्यायाने तो वागतो. हे उघड होते, वस्तुतः द्यूतात तो मनापासून सामील नाही, तो औदार्यशील आहे. पण 'तुझ्यासाठी मी मेरूपर्वतद्धा गदगदा हलवीन' ही दुर्योधनाविषयीची कर्णाची निष्ठा प्रसंगविशेषी उफाळून येते. पांडव मृत झाल्याच्या कल्पनेने कर्ण म्हणतो...' वैरे मृत्यूपर्यंतच टिकत असतात दुर्योधना.' तेव्हा प्रात:काली तर्पण करताना त्यांना एखादी तिलांजली वहा' (पान १५४) अशा काही प्रसंगातून गो. नी. दांडेकरांनी कर्णाच्या चांगुलपणाचे दर्शन घडविले आहे.

**कल्पनेचे विविध रंग :-**

महाभारतातील कर्णाच्या, कर्ण या पौराणिक व्यक्तीच्या-आराखड्यात दांडेकर विविध प्रसंगांच्या निमित्ताने कल्पित रंग भरतात.

विराटाशी युद्ध खेळतांना द्रोणाचार्यांवर कर्ण भरपूर तोंडसुख घेतो. कर्मकांडात मग्न असलेल्या ब्राम्हण समाजावर टीका करण्याची संधी येथे दांडेकरांनी घेतली आहे. अश्वत्थामा, कृपाचार्य या टीकेने रागावून अर्जुनाच्या तुलनेत कर्णाचा पराक्रम विशेष नसल्याचे उघडपणे बोलू लागतात. (पृ. १५९) यावर आपले सारे मार्ग दैवाने बंद केल्यामुळे ईर्षेने मिळविणे शक्य आहे असे महत्त्वाकांक्षी कर्णाचे उद्‌गार आहेत. गो. नी. दांडेकरांनी कवचकुंडलदानाच्या प्रसंगातून कर्णाच्या मनाचे अत्यंत हृद्य आणि कलात्मक विश्लेषण केले आहे. त्यांनी कर्णाच्या मनातील भावकल्लोळांना चित्रित करण्यात अपूर्व यश मिळविले आहे." 'देवराज मागायला आला हेच मला पुरे'....'मी काहीही मागत नाही.' (पृ. १७४) यानंतर गो. नी. दांडेकरांनी रंगविलेला सूतपुत्रत्वाच्या मर्यादांची सतत जाणीव बाळगणाऱ्या कर्णाच्या मनातील झगडा मुळातूनच पाहण्याजोगा आहे.

'रे कर्णा, व्यर्थ तुझे सामर्थ्य' अर्जुनाशी वैर का? आपल्याला द्रौपदीविषयी कामना आहे? या प्रश्नांनी हा कर्ण वेढलेला आहे, अस्वस्थ झाला आहे. 'द्रौपदी तुझ्या घरी आली असती, तर तिला काय लाभले असते?'

'सूतकुळींची सून घोडे हाकणारांच्या कुळाची!.' ते उद्यानांतले नवमल्लिकेचे रोप तू तुझ्या बोरी बाभळींच्या वनी लावणार होतास-!. (पृ. १७५) या उद्‌गारातून कर्णाची सारी व्यथा साकार झाली आहे. 'कर्णावाचून मला विषप्राशनच केले पाहिजे' ही कर्णविरहित दुर्योधनाची स्थिती आहे. तो कर्णाला 'जगदेकवीर-अद्वितीय-मित्र' या उपाधी बहाल करतो यावरून कर्ण-दुर्योधन यांच्या उत्कट मित्रत्वाची कल्पना येते.

'कर्णायन' मधील कुंतीला, द्रौपदीची अप्रतिष्ठा झाल्याचे दुःख अत्यंत तीव्र

स्वरूपात जाणवले आहे. कर्णही त्यात सामील झाला आहे. दांडेकरांनी या बारकाव्याला मार्मिकपणे येथे टिपले आहे. कुंती आपली खंत कृष्णाला सांगते तेव्हा कृष्ण तिची समजूत घालतांना म्हणतो -'स्त्री जातीला किती सोसावे लागते आते!' ....सागर मर्यादाही तसे स्त्रियांचे सोसणे.' (पान १८०)

'कर्णायन' मध्ये दांडेकरांनी वर्णिलेली, 'युधिष्ठिर वनवासी होईल म्हणून आपले जन्मरहस्य त्याला कळू नये' ही कर्णाची इच्छा त्याच्या व्यक्तित्वाला फार मोठी उंची प्राप्त करून देते. येथे कर्ण एक मोठा दिलदार माणूस म्हणून गो. नी. दांडेकर चित्रित करतात. 'अर्जुना! विजयी हो, हा आशीर्वाद कर्णाचा.' एवढे मोठे मन या कर्णाचे आहे. द्रौपदीची मनोमनी इच्छा असलेल्या कर्णाला अनपेक्षितपणे उपरती होते. तो म्हणतो, 'द्यूत प्रसंगी माझ्या तोंडून अनुचित शब्द निघून गेले.' तुझ्या सुनेला सांग....' या रणयज्ञात कर्णाची आहुती पडेल, तेव्हा त्याच्यासाठी तुझ्या नेत्रामधून दोन आसवे गळू दे!' (पृ. २०५) दांडेकरांनी कर्णाच्या व्यक्तित्वाला दिलेली ही कलाटणी हृदयस्पर्शी व कलात्मक नव-निर्मितीचा प्रत्यय देते.

'दोन माता, तीन तात तरीही अनाथ' अशा दुर्दैवी मुलाची याहून मनोरंजक कहाणी तुम्ही ऐकली आहे काय?' (पृ. १८९) या प्रश्नातच गो. नी. दांडेकरांच्या 'कर्णायन'चे सारे सार आलेले आहे. मात्र 'कर्णायन'मध्ये कर्णाचे गृहजीवन अवतरू शकले नाही. कर्णाला एक माणूस म्हणून नंतरच्या ललित लेखकांनी विचारात घेतलेला आहे. अर्थात आपल्या कल्पनेचे अनेकविध रंग मूळ कथेत भरून दांडेकरांनी कर्णायन रंगविले आहे. महाभारतनिष्ठ लेखनातही हे नावीन्य आढळते आणि त्यामुळे महाभारतात नवी भर पडते यामुळेच या पारंपरिक आकलनातूनही महाभारत वाढते हे प्रत्ययाला येते.

**अ. दा. आठवले :-**

अ. दा. आठवले यांनी 'आक्षेपांच्या संदर्भात' महाभारताचे वास्तवदर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी आपल्या विवेचनाच्या ओघात कर्णाची प्रतिमा महाभारताच्या संहितेनुसार चित्रित केली आहे. त्यांची भूमिका महाभारतातील कर्णाची व्यक्तिरेखा सादर करण्याची आहे. पारंपरिक आहे. ललित साहित्यिकाची नाही. ऐतिहासिक 'व्यक्ती' म्हणून भारतीय संस्कृतीच्या संदर्भात आठवले, वाळिंबे, पणशीकर इत्यादी विचारवंतांनी 'कर्णा'कडे पाहिले आहे. 'माझे कर्णाशी भांडण नाही. कर्णाविषयी द्वेष, मत्सर तर नाहीच नाही. दुर्योधन, दुःशासन, शकुनी इत्यादी कौरवांपेक्षा तो पुष्कळ चांगला होता हे मला मान्यच आहे. पांडवांपेक्षा तो थोर नव्हता असे माझे मत आहे आणि ते मी साधार विस्ताराने आतापर्यंत सांगितलेले आहे.'[१२] ही कर्णाविषयीची त्यांची ठाम भूमिका आहे आणि ती

त्यांनी सुस्पष्टपणे मांडली आहे. श्री. आठवले यांनी महाभारतात कर्णाचे नाव पांडवांच्या घाताचे कट करणाऱ्यांच्या यादीत आहेच हे ठामपणाने प्रतिपादन करून ललित लेखकांवर हल्ला चढविला आहे. 'कर्णपक्षपात्यांना हे चांगलेच खटकते आहे. निबंध, लेख लिहिणारांना आपल्या लाडक्या मतासाठी काडीचाही आधार न मिळाल्यामुळे या प्रकरणी निसटत्या विधानापलिकडे काही करता आले नाही. पण कादंबरीकारांनी मात्र कर्णाचे दुर्योधनाच्या दुष्टतेला विरोध करण्याचे सोंग वठविले आहे. कादंबरीकारांना आधार विचारण्याची सोय कधीच नसते.' (पृ. ८६) या गोष्टीची जाणीव असूनही अ. दा. आठवले यांनी कादंबरीकार, नाटककार यांना आधार विचारले आहेत. त्यांच्या वेगळ्या भूमिकेला समजून न घेता आपल्या महाभारतनिष्ठ कर्णाच्या चित्रणाच्या आधाराने लालित साहित्यातील 'कर्णा' च्या चित्राशी तुलना केली आहे. ललित लेखकांची प्रवृत्ती आणि ललित साहित्याची प्रवृत्ती लक्षात घेता आठवले यांचा हल्ला 'ललित्यपूर्ण नवनिर्मितीच्या' मुद्यावर परतवून लावता येतो. महाभारताकडे परंपरावादी आध्यात्मनिष्ठ भूमिकेतून ते पाहात असले तरी त्यांनीही कर्णाचे महनीयत्व लक्षात घेतले आहे हे विशेष म्हणावे लागते. 'कृष्णाच्या वचनाला मान न देता कर्ण दुर्योधन पक्षातच राहिला ही कर्णाच्या व्यक्तित्त्वाच्या दृष्टीने विशेष लक्षणीय अशी जमेची बाजू आहे.' 'कर्णाच्या शौय-औदार्य आदि गुणांची प्रशंसा कुणीही केली असली तरी तिचा वास्तव अर्थ प्रत्यक्ष घटनांच्या प्रकाशात जाणून घेतला पाहिजे.' असे ते म्हणतात या गोष्टीला कलानिर्मितीच्या संदर्भातही महत्त्व आहे.[१३]

कर्णाचे शौर्य आणि औदार्य सापेक्ष होते. त्याच्या शूरत्वाच्या ललित साहित्यात गाजावाजा होण्याइतपत कर्ण गुणी होताच पण कर्ण दिग्विजयाप्रमाणे पराभवपर्वही लक्षात घ्यायला पाहिजे. नुसत्या शौर्याचे वर्णन कर्णाविषयी ललित साहित्यिकाला वाटणारी सहानुभूती जिव्हाळाच व्यक्त करते असा त्यांचा रोख आहे. अ.दा. आठवले यांनी 'महाभारतातील कर्ण' (प्रकरण दुसरे) आणि परिशिष्टात (चौथे परिशिष्ट) 'ललित साहित्यातील कर्ण' अशी दोन कर्णविषयक प्रकरणे लिहिली आहेत. स्वत:चा वेगळा कर्ण मांडण्याची त्यांची भूमिका नाही. त्यांना फक्त महाभारत संहितेच्या संदर्भात कर्ण व कर्णविषयक ललित साहित्य तपासावयाचे आहे. मात्र त्यांनी या लेखनात काही वेळा आक्रमक व आवेशपूर्ण पवित्रा घेऊन लिहिले आहे. उपरोधाचा अवलंब केला आहे. त्यांचा सगळा रोख 'कर्णभक्तांवर' आहे, कर्णाविषयी सहानुभूतीने लिहिणाऱ्या लेखकांवर आहे.

कर्णाच्या सद्गुणांपेक्षा दोषांचेच आधिक्य महाभारतात असल्याने ललित साहित्यात कर्णाचे उदात्त चित्रण येऊच नये असे श्री. आठवले यांना प्रामाणिकपणे वाटते. उलट कर्णवधाचे 'पाप्याला शिक्षा' म्हणून ते समर्थन करतात आणि 'रथचक्र

उद्धरण' म्हणजे कर्णाचे काळकादूपणाचे धोरण असा विवेचनाच्या ओघात नवा मुद्दा उपस्थित करतात. आठवले यांनी महाभारताचे (आक्षेपांच्या संदर्भात) घडविलेले वास्तवदर्शन हे निश्चित मूलगामी संशोधन म्हणता येईल पण शेवटी महाभारताकडे पाहण्याचा हा एक पारंपरिक दृष्टिकोन आहे. शुद्ध महाभारतीय दृष्टिकोन आहे. त्यामुळे इरावती कर्वे, दुर्गा भागवत, शं. के. पेंडसे यांचे निबंध त्यांनी संशोधनपर व वैचारिक म्हणून गृहीत धरले. वस्तुतः हे निबंध लालित्याची, आत्मनिष्ठ अभिव्यक्तीची जोड लाभल्यामुळे 'ललितगद्य' या सदरात मोडतात. या ललित लेखकांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्पर्श या लेखनाला लाभला आहे. 'युगांत' मधील इरावती कर्वे यांचे भीम व द्रौपदी यांच्या उत्कट प्रेमाचे चित्रण या संदर्भात उल्लेखिल्यास लेखिकेच्या स्वतंत्र कल्पकतेचा प्रत्यय येईल. हीच गोष्ट 'व्यासपर्वा'तूनही 'युगांत' पूर्वीच सूचित झाली आहे. महाभारताकडे पाहण्याचा हा एक दृष्टिकोन अमान्य करता येत नाही पण विशुद्ध वाङ्मयीन दृष्टिकोनातून पाहिले तर भास, कालिदास यांनी जो मार्ग मोकळा करून दिलेला आहे त्याच वाटेने आमचे ललित लेखन मार्गक्रमण करीत आहेत् हे स्पष्ट दिसते. वस्तुतः प्रस्तुत ग्रंथात केवळ ललित साहित्याचाच विचार करावयाचा आहे, पण ज्या वैचारिक साहित्याने ललित लेखकांनाही विचार करावयास लावला त्यांचा अत्यंत संक्षेपाने येथे परामर्श घेतला आहे.

**डॉ. रा. शं. वाळिंबे :-**

'नामूलं लिख्यते किंचित्' या प्रतिज्ञेने डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी अ. दा. आठवले यांच्याप्रमाणेच 'व्यासपर्व', 'युगांत' यांसारख्या लेखनकृतीवरील प्रतिक्रियांतून आपला, ('कर्ण' आणि 'भीष्म' या महाभारतातील व्यक्तींवर) प्रबंध सादर केला आहे. त्यांचाही महाभारतनिष्ठ दृष्टिकोन या लेखनामागे दिसून येतो. पण ज्याप्रमाणे आठवले विवेचनाच्या ओघात काही नवे मुद्दे उपस्थित करतात तसेच काहीसे डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्याही बाबतीत झाले आहे. महाभारताच्या सखोल चिंतनातून त्यांचे 'राधेय कर्ण' साकार झाले आहे. ललित लेखकांच्या भूमिकेतून कादंबरीकार-नाटककारांनी केलेले लेखन एकवेळ समजून घेता येईल पण संशोधनपर वैचारिक लेखनावर त्यांच्या टीकेचा मुख्य रोख आहे. 'व्यासपर्व' आणि 'युगांत' चे स्वरूप ललित गद्यात्मकच असल्याने त्यांचाही त्यांनी ललित लेखन म्हणून विचार करायला हवा होता असे वाटते. डॉ. वाळिंबे यांनी कर्णाचे स्वतःच्या दृष्टिकोनातून चरित्रचित्रण केले असल्याने महाभारतातील कर्णाच्या व्यक्तिचित्राचे हे विश्लेषण आणि समीक्षणच असल्याने त्यांचे हे लेखन वैचारिक स्वरूपाचे आहे. 'व्यासपर्व' आणि 'युगांत' मधील लेखनाशी ते संलग्न असल्याने येथे

हे ललितेतर लेखन, संक्षेपाने विचारात घेतले आहे.

'कर्णाची व्यक्तिरेखा महाभारताने जशी काढली तशीच ती मराठीत अवतीर्ण करणे हे या पुस्तकाचे प्रमुख उद्दिष्ट आहे' हे प्रस्तावनेत त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. हे कर्णचरित्र साद्यन्त अधिकृत आणि सटीक असून कर्णाच्या जीवनातील घटना प्रसंगांची समीक्षा त्यात केली आहे.

महाभारत कर्णाची संमिश्र व्यक्तिरेखा साकार करते. सद्गुणांवर मात करणारे किंबहुना सद्गुणांना छेद देणारे कर्णाचे दुर्गुण आहेत. कर्णाचे क्षात्रतेज, त्याचा पराक्रम त्याच्या शत्रूंनाही मान्य आहे. अशा कर्णाची उपेक्षा करून चालणार नाही हे त्यांचे मुख्य प्रतिपादन आहे.

कर्णवध हे धर्मसंस्थापन आहे असे युधिष्ठिराला वाटते तर कृष्ण अर्जुनाला म्हणतो, 'सर्व पापांच्या मुळाशी कर्णच आहे.' महाभारताच्या संशोधित आवृत्तीतील श्लोकांचे पुरावे देत आपल्या प्रतिपादनातील आशय डॉ. वाळिंबे यांनी साधार मांडलेला आहे.

**पारंपरिक दृष्टिकोन :-**

चंपा नगरीत 'कर्ण' वाढतो, हे कुंतीला गुप्त दूतांकडून समजले होते. 'समानधर्मे व्यसनेषु सख्यम्' या न्यायाने दुर्योधनाशी त्याची बालपणीच मैत्री जडते. द्रोणाचार्य अर्जुनाबद्दल पक्षपाती होते. त्यावेळच्या रीतीनुसार त्यांनी अक्षत्रियाला दिलेला नकार समर्थनीय ठरतो. महाभारतकालीन समाजमूल्ये आणि जीवनमूल्ये भिन्न होती, त्या संदर्भात विचार करणे आवश्यक आहे. म्हणजे द्रोणाचार्य, कृपाचार्यांना दोषी ठरविता येणार नाही. आज जरी त्यांचे कृत्य गर्हणीय वाटले तरी त्या काली ते न्याय्य होते असे म्हणावे लागते, ही एक महत्त्वाची गोष्ट डॉ. वाळिंबे यांनी नजरेस आणून दिली आहे. महाभारतकालीन दृष्टिकोनातून ते या सर्व घटनांचा विचार करतात हे पटण्याजोगे आहे. 'महाभारतासारख्या आपल्या राष्ट्रीय वारशाची विडंबना प्रत्यक्ष भारतभूमीतच होऊ नये याच हेतूने कर्णाच्या निमित्ताने एवढा प्रपंच अवश्य कर्तव्य म्हणून केला.'[१४] अनंतराव आठवले यांच्या प्रमाणेच महाभारतनिष्ठ व तर्कशुद्ध अशी डॉ. वाळिंबे यांची भूमिका आहे. या भूमिकेत कलावंताच्या नवनिर्मितीला, नव्या जाणिवेला माणसाचे जीवन आणि मन उलगडविण्याच्या किमयेला थारा नाही, म्हणून या वैचारिक लेखनातून उपस्थित होणाऱ्या काही नव्या मुद्यांचाच विचार येथे करणे क्रमप्राप्त आहे.

कर्णाच्या दुष्टाव्याला मुत्सद्दीपणाची आणि मार्मिकतेची जोड होती. आपण सत्यवादी असल्याचे कर्ण भासवीत असे, ही विसंगती डॉ. वाळिंबे यांनी कर्णाचे सूर्याशी

संभाषण या प्रसंगातून टिपली आहे. खोटे बोलून परशुरामाकडे विद्या संपादन करणारा कर्ण असत्य बोलण्याऐवजी मी जीव देईन (पृ. २३) असेही म्हणतो. हा कर्ण परशुरामाचा अपराधी असूनही परशुरामाने 'न त्वया सदृशो युद्धे क्षत्रियो भविता भुवि ॥' (शांतिपर्व.३.३३) असे उद्‌गार कर्णाविषयी काढले आहेत. 'तूच सर्व अनर्थाचे, वैराचे आणि कलहाचे मूळ आहेस.' असे उद्‌गार कृष्णाप्रमाणेच नकुलानेही काढले आहेत. डॉ. वाळिंबेना हीच, कर्णाची 'अनर्थाचे मूळ' म्हणून प्रतिमा जाणवली आहे. द्यूतक्रीडेच्या मुळाशी उघडपणे नव्हे पण प्रच्छन्नपणे कां होईना कर्ण होता, द्रौपदी - वस्त्रहरण प्रसंगात त्यांना कर्णाचा मर्यादातिक्रम विशेष तीव्रतेने जाणवतो. शापाच्या भीतीने तो पुढे त्याबद्दल पश्चात्ताप व्यक्त करतो. पण कर्णाच्या या नीच कृत्यावर पांघरून घालण्याचा कोणी प्रयत्न करू नये, चांडाळ-चौकडीचा कर्ण हा म्होरक्या होता असे डॉ. वाळिंबे साधार प्रतिपादन करतात.

स्वतःच्या प्राणापेक्षा, क्षात्रवृत्तीपेक्षाही त्याला कीर्तीचे मोल अधिक वाटे म्हणूनच दानशूर म्हणून त्याने डंका मिरविला असे डॉ. वाळिंबे म्हणतात. ['यस्त्वं प्राण विरोधेन कीर्तिमिच्छसि शाश्वतीम्'। (वनपर्व .२८५. ३)] कवचकुंडलाच्या दानाच्या मोबदल्यात कर्णाने मिळविलेली अमोघ वासवीशक्ती तेवढीच महत्त्वाची आहे. इंद्राने शचीसाठी कुंडले नेली ही वार्ता स्वतः कर्णानेच पसरविली. येथे कर्णाच्या उदात्त दातृत्वाचे फोलपण डॉ. वाळिंबे यांनी लक्षात आणून दिले आहे. महाभारतातील कर्णचरित्राच्या संशोधन-समीक्षेतून डॉ. वाळिंबे यांनी असे हे कर्णाविषयी काही नवे निष्कर्ष काढले आहेत. दानशूर कर्ण 'अंगराज्य' स्वीकारतो, कवचकुंडल दानात त्याची वाणिज्यवृत्ती, दांभिकपणा दिसतो, भीष्म जिवंत असेपर्यंत न लढणे यात त्याच्या पोरकटपणाचा भाग दिसतो. कदाचित भीष्माला श्रेय जाईल अशी त्याची वृत्ती होती. यावरून कर्ण सामान्यच होता असाच या सर्व घटनांच्या अन्वयार्थातून बोध होतो. कर्णाच्या दृष्टीने काही जमेची बाजूही डॉ. वाळिंबे यांनी आपल्या या संशोधनपर ग्रंथात मांडली आहे. कुंतीच्याही अगोदर कृष्ण कर्णाला त्याचे जन्मरहस्य सांगतो. पण कर्ण फक्त पांडवांना कटू बोलल्याबद्दल खेद व्यक्त करतो. कृष्णाचेही ऐकत नाही. हाच कर्ण कुंतीच्या (विनंतीशिवायच) मुलांच्या रक्षणाचे वचन देतो. वासवीशक्ती निर्वाणीच्या वेळी योजावयाची ही कर्णाची कल्पना कृष्ण कारस्थानाने उधळली जाते. कुंतीला दिलेल्या वचनातील कर्णाचा स्वार्थ डॉ. वाळिंबे यांनी मात्र स्वतंत्रपणे येथे उलगडून दाखविला आहे. त्याला आपल्या मनाचा मोठेपणा कुंतीला दाखविता आला, वचनाला जागण्याची वृत्ती सिद्ध करता आली. पराभूत वैऱ्याला जीवदान देण्याचे औदार्य दाखविता आले, पांडवांची मानहानी व विटंबना करून जीवदान दिल्याने मृत्यूपेक्षाही भयंकर शिक्षा त्यांना झाली. अशा या नव्या निर्वचनांसाठी 'राधेय कर्ण' एक वैचारिक

स्वरूपाचे पुस्तक असूनही येथे विचारात घ्यावे लागले आहे.

कर्णचरित्रावर आणि स्वभावावर मूलगामी स्वरूपाचा प्रकाशझोत टाकण्याचा डॉ. वाळिंबे यांचा प्रयत्न 'राधेयकर्ण' मध्ये आढळतो. महाभारतकाराचा व्यक्तिदर्शनातील अलिप्तपणा जाणून घेऊन, त्या निर्मात्याचा कल विशद करण्याचाही येथे प्रयत्न आहे. शरशय्येवर पडलेल्या भीष्माला पाहून कर्ण अपराधी मनाने क्षमायाचना करतो येथे त्याची माणुसकी व्यक्त होते. त्याचप्रमाणे सर्व परिस्थितीत दुर्योधनाविषयी त्याने दाखविलेली निष्ठा असामान्य होती हे कृष्ण, कुंती यांच्या प्रलोभन, आर्जवांनाही तो झुगारतो यावरून सिद्ध होते. अशा काही कर्णाच्या गुणांची नोंद डॉ. वाळिंबे यांनी घेतली आहे.

कर्णाची उपेक्षा झाली. कर्णाला आपले जन्मरहस्य केव्हा कळले, अस्त्रदर्शनानंतर ब्रम्हास्त्र प्राप्तीसाठी, कर्ण परशुरामाकडे गेला, या मुद्यांच्या संदर्भात त्यांनी इरावती कर्वे यांच्या प्रतिपादनाचे खंडन करून त्यांच्या लेखनातील हे मुद्दे कपोलकल्पित असल्याचे म्हटले आहे. पण ललित लेखन म्हणून 'व्यासपर्व' व 'युगान्त' चा विचार केल्यास डॉ. वाळिंबे यांनी केलेल्या खंडनाची तीव्रता निश्चितच कमी होते.

'कर्ण आतून जळत होता, जन्माच्या काळिम्यामुळे अगतिक झाल्याने जळत होता.' ही इरावती कर्वे यांची कर्णजीवनाची संगती डॉ. वाळिंबे यांना निराधार वाटते. कारण अधिरथ आणि राधा यांच्या पोटचे आपण आहोत हे कर्णाला ठाऊक होते हे इरावतीबाईंचे गृहीतच निराधार होते हे त्यांनी दाखवून दिले आहे. पण यासारखे अनेक प्रसंग ललित लेखक स्वतःच्या अनुभूतीच्या आणि अभिव्यक्तीच्या प्रकाशात पुढेमागे करतो, त्यांना नवे अर्थ प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करतो असे म्हणता येते. 'युगान्त' हा महाभारताचे तात्त्विक संशोधन करणारा ग्रंथ म्हणता येणार नाही कारण त्यात महाभारताची भावनिक, सामाजिक, व्यक्तिगत ललित व कलात्मक पातळीवरील संगती शोधण्याचा प्रयत्न केला आहे. याचा विचार पुढील प्रकरणात विस्तृतपणे केला आहे.

**म. रं. शिरवाडकर :-**

'कर्ण आणि अर्जुन' आणि 'शल्य म्हणे राधेय' या 'हस्तिनापूर' मधील दोन लेखात म. रं. शिरावाडकरांचा कर्णविषयक दृष्टिकोन व्यक्त झाला आहे. महाभारतातील काही घटनांचा, व्यक्तित्वांचा आणि त्यांच्याशी निगडित असलेल्या चमत्कारांचा मागोवा घेणारा 'हस्तिनापूर' हा म. रं. शिरवाडकरांचा ग्रंथ आहे. त्यातील 'कर्णा'चे चित्र येथे पाहावयाचे आहे.

महाभारतातील अनेक व्यक्ती वैशिष्ट्यपूर्ण असल्या तरी कृष्ण, अर्जुन, कर्ण

आणि दुर्योधन या म. रं. शिरवाडकरांना विशेष महत्त्वाच्या आणि परिणामकारक वाटतात. त्यांनी 'अर्जुना'सारख्या विलोभनीय व्यक्तिचित्राला अद्वितीय मानून कर्णाचे व्यक्तिमत्त्व अर्जुनाच्या जवळपास येणारे आहे असे म्हटले आहे. कर्णार्जुन तुलना करताना त्यांनी हे आपले मत व्यक्त केले आहे.

'कर्ण हा प्रक्षुब्ध समुद्रासारखा, तर अर्जुन हा शांत असलेल्या म.ासागरासारखा आहे. दुर्दैवी परिस्थितीवर मात करूनही अखेर दुर्दैवापुढे बळी गेल्यामुळे कर्णाच्या भोवती एक विलक्षण तेजाचे वलय पसरले आहे. त्यामुळे कर्णाबद्दल कुणालाही आत्मीयता वाटते.[१५] शिरवाडकरांचे लक्ष येथे दुर्दैवी कर्णाकडे वेधले गेले आहे. पण कर्णाभोवतीचे तेजाचे वलय बाजूला सारले तर अर्जुनाच्या तुलनेत कर्ण सामान्य वाटेल असे त्यांचे मत आहे. त्यांचा हा दृष्टिकोन महाभारताशी जवळीक सांगणारा आहे.

**अनुकम्पा व आकर्षण :-**

कर्ण पराक्रमी आहे पण तो आत्मश्लाघा करतो. परिस्थितीच्या कचाट्यात तो सापडलेला आहे. त्यामुळे ही त्याची आत्मश्लाघा क्षम्य ठरते. तसेच या कर्णाने द्रौपदीचा क्रूर उपहास केला, दुर्योधनाला पांडवांविरूद्ध सतत चिथावणी दिली. तरीही कर्णाचे व्यक्तिमत्त्व त्यांना विलोभनीय वाटते. अशीच स्थिती मराठीतील ललित साहित्यिकांचीही झाली आहे. त्यांनी आपल्या साहित्यकृतीत कर्णाच्या या विलोभनीय व्यक्तिमत्त्वाचेच दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. पदोपदी प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देऊन कर्ण मोठा झाला. याचा रास्त अभिमान वाटणे स्वाभाविक आहे. कर्णाविषयी आत्मीयता वाटण्याचे हेच प्रबळ कारण सर्व ललित साहित्यिकांत प्रकर्षाने जाणवते. ह्या मुद्यालाच म. रं. शिरवाडकरांनी येथे नेमकेपणाने स्पर्श केला आहे.

महाभारतीय युद्धात, चित्रांगद आणि घटोत्कचाशी झालेल्या युद्धात कर्णाचा पराक्रम स्पष्ट होतो. बेचैन करून टाकणारे कवचकुंडलाचे दान त्याचे औदार्य सिद्ध करते. कोपिष्ट ब्राम्हण आणि परशुराम यानी दिलेल्या शापामुळे कर्णाविषयी अनुकम्पा आणि आकर्षण वाटू लागते. ललित साहित्यिकांना कर्णाच्या जीवनातील याच घटना त्यांच्याविषयी जिव्हाळा वाटायला लावणाऱ्या ठरल्या आहेत. हे खरे असले तरी कर्णाभोवतालचे अद्‌भुतरम्येतेचे वलय दूर सारणारे शिरवाडकरांचे हे विवेचन आहे. 'मात्र कवचकुंडलांची कथा काय किंवा शापकथा काय, त्या कर्णाबद्दल वाटणारी आत्मीयता वाढविण्यासाठीच महाभारतात अवतीर्ण झाल्या आहेत, हेही लक्षात ठेवले पाहिजे.' (पृ. ६९) कर्णाविषयी वाटणारी विशेष आस्था स्पष्ट करतांना क्षत्रिय असूनही सूतपुत्रत्व त्यांच्या वाट्याला आले आहे. परशुराम, द्रोणाचार्य यासारख्या गुरूनी व द्रौपदीने कर्णाची मानहानी केली या घटनांकडे

'हस्तिनापूर' मध्ये शिरवाडकरांनी लक्ष वेधले आहे. या चित्रणामुळे कर्णाविषयी आपल्या मनात सहानुभूती निर्माण होते व त्याच्या दोषांकडे लक्ष जात नाही. फार तर डोळेझाकही करावीशी वाटते अशी कर्णाकडे पाहण्याची शिरवाडकरांची दृष्टी आहे.

दुर्योधनाच्या पाठीशी राहण्याची त्याची मित्रनिष्ठा मान्य करूनही अनेकदा त्याचा आत्मगौरव अनाठायी आहे हे लक्षात येते. घोषयात्रा, द्रौपदी-स्वयंवर, कर्णार्जुन-युद्ध, जयद्रथवध, गोहरण इत्यादी प्रसंगी कर्णाची वल्गना व्यर्थ ठरली. अश्वत्थाम्याने 'काहीच न करता तू वृथा वल्गना करतोस' हाच आरोप त्याच्यावर केलेला आहे. म. रं. शिरवाडकर कर्ण हा अर्जुनाइतकाच, किंबहुना त्याच्यापेक्षा जास्त पराक्रमी होता ही कल्पना भ्रामक व निराधार असल्याचे निःसंदिग्धपणे सांगतात. येथे म. रं. शिरवाडकर कर्णाच्या व्यक्तिमत्त्वाचे कलात्मक आकलन सादर करीत नाहीत तर महाभारताच्या आधारे वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या या लेखाचे स्वरूप वैचारिक विवेचनाचे आहे. अर्जुनाशी कर्णाची तुलना करून आपला वस्तुनिष्ठ दृष्टिकोन येथे शिरवाडकरांनी व्यक्त केला आहे.

**प्रेमा कंटक :-**

कर्णाविषयीचे आपले 'मुक्तचिंतन' प्रेमा कंटकांनी 'देव की पुरुषार्थ?'[१६] या लेखांत केले आहे. कर्ण-जीवनावर एक अनोखे भाष्य लेखिकेने येथे केले आहे. सकृत्दर्शनी वाटणाऱ्या कर्णाविषयीच्या सहानुभूतीलाही लेखिकेने येथे अवसर दिला नाही. कर्णजन्मापूर्वीच्या प्रसंगांच्या अनुरोधाने प्रेमाबाईंनी कर्णाच्या स्वभावाचे विश्लेषण करण्याचा एक नवा प्रयत्न येथे केला आहे.

**जीवनमूल्ये आणि कर्ण :-**

मनाची शुद्धता आणि मनमोकळेपणाऐवजी कर्ण ईर्ष्या बाळगणारा सूड-बुद्धीचा होता हे त्यांनी परशुरामाशी त्याने केलेल्या असत्य भाषणातून दर्शविले आहे. महाभारतानुसार कर्णार्जुन तुलनेत अर्जुनाला त्यांनी अधिक गुण दिले आहेत. कर्ण शस्त्रास्त्रात निपुण होता पण व्रती व संयमी जीवनाची बैठक त्याला नव्हती हे त्यांनी मार्मिकपणे दाखविले आहे. ज्या वातावरणातील आणि विचारसरणीतील (गांधीवादी) लेखिका आहे त्याचा परिणाम त्यांच्या कर्णाच्या आकलनात जाणवतो. म्हणून अध्ययन अध्यापनाच्या प्रसंगावर लेखिकेने विशेष भर दिला आहे. नैतिक पातळीवरून कर्णापेक्षा अर्जुन श्रेष्ठ ठरविलेला आहे. या नैतिकतेच्या जीवनमूल्यांतून त्यांनी कर्णाकडे पाहिले आहे. म्हणून त्यांचे निष्कर्ष आगळे आहेत. हे वैशिष्ट्यपूर्ण चिंतन कर्णाच्या चिंतनाला नवी दिशा देणारे आहे. कर्णाच्या कवचकुंडलदानाला व एकूण त्याच्या औदार्याच्या भूमिकेला कंटकांनी स्वतःच्या चिंतनातून वेगळीच

कलाटणी दिली आहे. त्याच्या दानाला आणि मनौदार्याला तत्कालीन समाजप्रतिष्ठेची तहान होती असे त्यांनी दाखविले आहे. त्यांची समाजविषयक चिंतकाची भूमिका येथे दिसते. दानाच्या परिणामाची दखल न घेता दानाच्या प्रतिष्ठेला त्याने अधिक जपले, ब्राम्हणांकडून पूर्वी मिळालेल्या दोन शापांमुळेच त्याने ब्राम्हणाला नकार देण्याची पुन्हा हिम्मत केली नाही, अशी मौजेची प्रतिपादने येथे आढळतात.. म्हणूनच प्रेमा कंटकांचे हे 'पारंपरिक आकलन' असूनही त्यात स्वतंत्र दृष्टी आहे. स्वतंत्र प्रतिपादन आहे. त्यामुळेच महाभारताची वाढ झालेली दिसून येते. त्यात मौलिक भर पडलेली दिसून येते. महाभारतातील घटनांची आणि व्यक्तित्वांची किती विविध तऱ्हांनी संगती लागू शकते हे येथे स्पष्टपणे जाणवते. एका संस्काररहित माणसाची त्याच्या हीन अभिरुचीने घडलेली शोकांतिका या स्वरूपात कर्णकथा कंटकांना जाणवते.

कर्णाची स्वामिनिष्ठा सगळ्या लेखकांप्रमाणेच त्यांनीही वाखाणली आहे. कर्णाचे इमान पक्के असल्याने त्याने भीष्म, श्रीकृष्ण, कुंती, सूर्य यापैकी कोणाचेही ऐकले नाही हे विशेष आहे.

कर्णाची आत्मप्रशंसा करण्याची लकब, दुर्योधनाच्या दुष्कृत्यांची त्याने केलेली भलावण यासारख्या व उपरोक्त नवीन स्पष्टीकरणातून शेवटी प्रेमा कंटक यांनी कर्ण हा तमोगुणी होता असाच निष्कर्ष काढलेला आहे. 'कर्णाचा जन्म धर्म लोपातून झाला आहे. नीच पुरुषांच्या आश्रयामुळे त्याची बुद्धी ईर्ष्यावश होऊन गुणी पांडवांचा द्वेष करणारी झाली.'[१७] कर्णाविषयीच्या भीष्माच्या या उद्गाराप्रमाणेच प्रेमा कंटकांनी कर्णाकडे पाहिले आहे. सेनापती म्हणून कर्ण दोन दिवसांपेक्षा अधिक काळ जगत नाही, हा त्यांनी आपल्या मुक्त चिंतनातून लक्षात आणून दिलेला नवा विचार आहे. संस्कारविहीनता, उच्च सामाजिक जीवन व नीतिमूल्यांचा अभाव या गोष्टींच्या संदर्भात कर्णाची अर्जुनाशी तुलना करून कर्णाची 'संस्कारविहीनता' त्या स्पष्ट करतात. तेच कर्णाच्या अध:पाताचे त्यांना मुख्य कारण जाणवले आहे.

**महाभारतीय दृष्टी आणि कर्ण :-**

महाभारतातील कर्णाची ही महाभारतानुसारी पारंपरिक दृष्टिकोनातून रेखाटलेली शब्दचित्रे पाहिल्यानंतर कर्णाचे जीवन संमिश्र, गुणदोषांनी युक्त आहे, गुंतागुंतीचे आहे हे येथे लक्षात येते. ललित साहित्यिकांप्रमाणेच समीक्षक विचारवंतांनाही कर्णाच्या व्यक्तिमत्त्वाने आकर्षित केले आहे हे दिसून येते. यातूनच कर्णविषयक ललित, वैचारिक संशोधनपूर्ण असे संमिश्र आणि वैविध्यपूर्ण लेखन झाले आहे. कर्णाचे आव्हान व आवाहन ललित व ललितेतर अशा दोन्हीही क्षेत्रांतील लेखकांना आहे. शुद्ध महाभारतीय दृष्टीतून कर्णाकडे पाहणाऱ्या लेखकांना ललित साहित्यिकांच्या

कर्णचित्रणात त्याच्या दोषांनाही गुणस्वरूप प्राप्त झाले आहे असे वाटते. त्यामुळे ललित लेखकांवर ते अत्यंत आक्रमक व विघातक शब्दातही टीका करतात.

या ललित साहित्याची प्रकृती आणि पुराणकथांचे स्वरूप लक्षात घेतले तर त्यांचे सगळे हल्ले परतवून लावता येण्याजोगे आहेत. महाभारताशी मिळतीजुळती भूमिका घेणाऱ्या लेखकांच्या गटात प्रामुख्याने बाळशास्त्री हरदास, गो. नी. दांडेकर, शं. के. पेंडसे, म. रं. शिरवाडकर, प्रेमा कंटक, डॉ. रा. शं. वाळिंबे, अनंतराव आठवले इत्यादींचा समावेश येथे केला आहे. या प्रत्येकाने रेखाटलेली कर्णाची चरित्रचित्रे पाहिली असता त्यांतही फरक दिसतो. भिन्न प्रतिपादने आढळतात. काही नवीन मुद्दे उपस्थित केलेले दिसून येतात. प्रत्येकाने स्वत:च्या जीवनदृष्टीतून कर्णाच्या जीवनाची पाहणी करून वेगवेगळ्या प्रसंगांना, कर्णाच्या व्यक्तिमत्वाच्या पैलूंना, कमीअधिक, प्रधानगौण भावाने स्थान दिले आहे. आपल्यापरीने कमीअधिक व भिन्नभिन्न प्रकाशझोत टाकले आहेत. त्यात भावरेखांची आणि रंगांचीही विविधता दिसून येते.

महाभारताशी जुळती भूमिका घेणाऱ्या या लेखकांच्यामध्येही जेंव्हा वेगवेगळे निष्कर्ष आढळतात, एकाच घटनेची वा प्रसंगाची वेगवेगळी उकल आढळते, अनेक नवे मुद्दे नव्याने उपस्थित केले जातात व विशेषत: कर्णाचे प्रत्येकाचे स्वतंत्र विवेचन आहे हे लक्षात येते, तेव्हा महाभारत प्रमाण मानून त्याला धरून लिहिणाऱ्यांची जर अशी स्थिती होत असेल तर मग ललित साहित्यिकांना दोष देण्यात फारसा अर्थ दिसत नाही. कलावंताला तर स्वातंत्र्य आहेच. त्याच्या कलात्मक अनुभवात जे विश्व सामावते ते आणि तेवढेच विश्व त्याचे असते. साहित्यिकांना तर पुराणकथांनी (इतिहासापेक्षाही) कितीतरी अधिक प्रमाणात स्वातंत्र्य घेण्याची सनद दिली आहे.

**कर्णाची विविध आकलने :-**

महाभारतातील कर्णाचे प्रत्येकाचे आकलन येथे लक्षात घेतल्यास, प्रत्येकाचे कर्णविषयक विवेचन स्वतंत्र व आगळे आहे असे लक्षात येते.

बाळशास्त्री हरदास गुणदोषांसहित महाभारतीय कर्णाचे दर्शन घडवितात व त्यातून महाभारतकाराला अभिप्रेत असलेल्या तात्त्विक चिंतनाचे संसूचन करतात. तर गो. नी. दांडेकर दुर्वासाचा तामसी मानसपुत्र म्हणून कर्णाचा विचार करतात. आदित्य, पांडू, अधिरथ, दुर्वास, कुंती आणि राधा या सगळ्यांचाच तो पुत्र आहे, हेही गो.नी.दांडेकरांनी नव्याने चित्रित केले आहे. दांडेकर कर्णाचे कणखर चित्र रेखाटतात पण त्याबरोबरच भारतीय युद्धातील त्याची द्विधा मन:स्थिती विशेष प्रभावीपणे उलगडून दाखवितात. कुंतीच्या मन:स्थितीचे विस्तृत तपशीलवार व

अनुकम्पा निर्माण करणारे चित्र रेखाटतात. कर्ण व कृष्ण परस्परविरुद्ध पक्षात असल्याने एकूण समतोल निर्माण झाला आहे. गो. नी. दांडेकरांचे हे सारे नवे विवेचन आहे.

डॉ. शं. के. पेंडसे आधुनिक शास्त्रांच्या (विज्ञान, मानसशास्त्र, शरीरशास्त्र इत्यादींच्या) साहाय्याने कर्णाचे व्यक्तिदर्शन घडवितात त्यामुळे मेंदूतील मनोविकृतीमुळे कर्ण ब्रह्मास्त्र विसरला, कवचकुंडलाचे दान करूनही तो पराक्रमीच होता, असे नवे निष्कर्ष ते काढतात. कर्णाच्या जीवनातील अद्‌भुतता बाजूला सारून त्यांनी सरळ कृष्णाच्या कपटनीतीनेच त्याचा मृत्यू झाला आहे असे नमूद केले आहे. अ. दा. आठवले यांनी विशुद्ध महाभारतीय दृष्टिकोन स्वीकारुन (ललित व ललितेतर साहित्य तपासून) महाभारताचे वास्तव दर्शन घडविले आहे. प्रामुख्याने दुर्गा भागवत, इरावती कर्वे, आनंद साधले, शिवाजी सावंत, वि. वा. शिरवाडकर यांच्यावर त्यांचे आक्षेप असून त्या आक्षेपाच्या संदर्भातच त्यांनी कर्णाचे जीवन विशद केले आहे. कर्णाविषयी ललित साहित्यिक अनाठायी सहानुभूती बाळगून लेखन करतात हा त्यांचा मुख्य आक्षेप आहे. वस्तुतः कर्ण असदभावपूर्वक सारे करीत असे. त्याचे शौर्य व औदार्यही सापेक्ष होते. कर्णाचे पराक्रम गैरवाजवी वाटतात. साहित्यातील कर्णचित्रण महाभारत संहितेला सोडून आहे असे प्रतिपादन त्यांनी आपल्या शुद्ध महाभारतीय दृष्टीतून केले आहे. कलेची किंवा वाङ्:मयीन मूल्यांची जाणीव आठवले कोठेही ठेवीत नाहीत. डॉ. रा. शं. वाळिंबे यांनीही आठवले यांच्याप्रमाणेच महाभारताची भांडारकर संस्थेची संशोधित प्रत प्रमाण मानून 'नामूलं लिख्यते किंचित्' या न्यायाने कर्ण दुष्टच होता हे साधार सांगितले आहे. डॉ. वाळिंबे यांची महाभारतनिष्ठ दृष्टी 'युगान्त' व 'व्यासपर्व' सारख्या ग्रंथातील वादग्रस्त विवेचनाच्या खंडनासाठी प्रतिक्रिया रूपात व्यक्त झाली आहे. महाभारतातील कर्णाच्या जीवनकहाणीचे वास्तवदर्शन घडविताना त्यांनी कर्णजीवनाची जी समीक्षा केलेली आहे त्यातून कर्णविषयक डॉ. वाळिंबे यांचाही एक वेगळा दृष्टिकोन साकार झाल्याचे दिसून येते.

महाभारतकालीन समाजरचनेचा विचार केला म्हणजे द्रोणाचार्य, कृपाचार्य न्याय्य व योग्य वागले, कर्ण म्हणजे चांडाळ चौकडीतील एक होता. द्यूत, वस्त्रहरण यांसारख्या प्रसंगातून हे स्पष्ट होते. कर्णाच्या ठायी असत्य भाषणाचा दुर्गुण होता. त्याने आपल्या दातृत्वाचा डंका आपल्यातील 'न्यून' भरून काढण्यासाठी वाजविला. महौदार्य तेवढ्यासाठीच त्याने स्वीकारले होते. त्याला प्राणापेक्षा कीर्ती अधिक महत्त्वाची वाटे. अमोघ वासवीशक्ती घेऊनच त्याने कवचकुंडलांचे दान केले, कर्ण जर खरोखरच दानशूर असता तर त्याने मग 'अंगराज्य' स्वीकारले नसते. ऐन युद्धाच्या प्रसंगी भीष्म सेनापती आहे म्हणून कर्ण लढत नाही, यात

कर्णाचा पोरकटपणा दिसतो. या सगळ्या कर्णाच्या जीवनाला लांछन आणणाऱ्या गोष्टी आहेत. ही कर्ण जीवनाची नवी संगती सांगितल्यानंतर डॉ. वाळिंबे कर्णाच्या जीवनाची जमेची बाजूही सांगतात.

निर्वाणीच्या वेळी कर्ण वासवीशक्ती योजण्याचे ठरवितो, कुंतीला मुलांच्या संरक्षणाचे वचन देतो. भीष्माची क्षमा मागतो आणि दुर्योधनावरील आपली अलौकिक निष्ठा अभंग ठेवतो. इत्यादी गोष्टींचा या संदर्भात उल्लेख ते करतात.

म. रं. शिरवाडकर यांनाही अर्जुनाच्या तुलनेने कर्ण सामान्य वाटतो. असा प्रेमा कंटकांप्रमाणेच, अर्जुनाशी तुलना करून त्यांनी निष्कर्ष काढला आहे. कर्णाच्या भोवतालचे अद्भुतरम्येतेचे वलय वगळून ते विचार करतात, त्यामुळे त्यांना कर्णाचे व्यक्तित्व विलोभनीय वाटते. कर्णाचे कवचकुंडलदान आपल्याला बेचैन करते आणि कर्णाला त्याच्या दुर्दैवाने मिळालेले शाप त्याच्याविषयीची अनुकम्पा निर्माण करण्यास कारणीभूत होतात, अशी कर्णाविषयी आपली मर्यादित सहानुभूती त्यांनी व्यक्त केली आहे. प्रेमा कंटकही 'कर्णार्जुन' तुलना करून एक वेगळाच कर्ण उभा करतात. गुरुशिष्य सामंजस्य असणे आवश्यक असते, ते परशुराम द्रोण व कर्ण या गुरुशिष्यांत नसल्यामुळे कर्णाची विद्या फलद्रूप होत नाही, हा एक नवा विचार त्यांनी मांडला आहे. कर्ण शुद्ध आणि मोकळ्या मनाचा नव्हता, तो पराक्रमी असला तरी व्रती व संयमी नव्हता. कर्णाच्या महत्त्वाच्या उणिवांकडे त्यांनी नव्याने आपले लक्ष वेधले आहे. प्रेमा कंटक यांनी नैतिक मूल्यातून आणि स्वत:मध्ये रूजलेल्या गांधीवादी विचारसरणीतून कर्णजीवनावलोकन केले आहे. दानाची प्रतिष्ठा मोठी मानली पण दानाच्या परिणामाचा विचार कर्णाने केलेला नाही. कर्णाने ब्राम्हण वेषातील इंद्राला दान का दिले, याचा 'ब्राम्हणांच्या शापांमुळे, ब्राम्हणाची धास्ती कर्णाने घेतली होती' असा एक नवा अन्वयार्थ लावण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. कर्णाच्या स्वामिनिष्ठेची भलावण करून त्यात कर्णाचा इमानीपणा व्यक्त झाला आहे, असे म्हणून पुढे त्यांनी या सद्‌गुणाचेही मार्मिक खंडन केले आहे. कर्ण दुर्योधनाच्या दुष्कृत्यात सहभागी होतो, तो कुठेही दुर्योधनाच्या दुष्कृत्यांचा निषेध करीत नाही, तसे केले असते तर दुर्योधनाला कर्ण मित्र म्हणून चाललाच नसता. हा त्यांचा एक नवा शोध पटण्याजोगा आहे. 'कर्ण सेनापती म्हणून फक्त दोन दिवसच टिकू शकला,' हाही त्यांचा नवा मुद्दा आहे. कर्णाची संस्कारविहीनताच त्याच्या अध:पाताला कारणीभूत झाली, असे प्रेमा कंटकांच्या सुसंस्कारावर प्रेम करणाऱ्या मनाला जाणवले आहे.

अशी ही विविध प्रतिपादने, मतमतांतरे पाहिली म्हणजे महाभारतनिष्ठांच्याही महाभारत-विवेचनात वेगळेपणा आहे हे लक्षात येते. याला कारण महाभारताच्या स्वरूपातच सापडते. महाभारताचा विचार एक पुराणकथा म्हणून केला पाहिजे.

ललित साहित्यिकाची भूमिका समजावून घेऊन या पौराणिक व्यक्तीचे पारदर्शकत्व मान्य केले पाहिजे. म्हणजे मग मराठी प्रतिभावंतांनी आपल्या स्वतंत्र चिंतनाने महाभारताचे नवे आविष्कार केले आहेत, हे लक्षात येते.

**महाभारत दर्पणात कर्ण-प्रतिमा :-**

'कर्णाच्या विपर्यस्त रूपांचा मराठी वाङ्:मयसृष्टीत सुळसुळाट झाला. शेवटी श्री. अ. दा. आठवले व श्री. रा. शं. वाळिंबे यांनी या साऱ्या रूपांना जेरबंध करून वास्तव कर्णासमोर अपराधी म्हणून उभे केले.'[१८] प्रा. सुशीला पाटील यांच्या या विधानाचे परीक्षण करणे प्रस्तुत संदर्भात उपयुक्त ठरते. कारण कर्णविषयक लेखनाला श्री. आठवले वा श्री. वाळिंबे यांच्या लेखनाने आळा बसला असे नाही. उलट रणजित देसाई यांची नवी कादंबरी 'राधेय' यानंतरच १९७३ मध्ये अवतरली. 'मृत्युंजय' चे नाट्यरूपांतर झाले. 'तो राजहंस एक' 'अर्ध्य'. 'सूर्यपुत्र' 'कर्ण खरा कोण होता?' इत्यादी कर्णाविषयी आपले चिंतन साकार करणारी साहित्यसंपदा नावारूपाला आली, हे सारे कशाचे द्योतक आहे? याचा अर्थ महाभारतावर आधारित साहित्याची निर्मिती सतत होत राहणार आहे. त्यात परंपरानिष्ठ व सर्जनशील लेखकाची भूमिका या दोन्हीही अस्तित्वात राहणार आहेत असे दिसते. 'महाभारत हे महाकाव्य आहे. कलावंताची प्रतिभा नि कल्पकता जे चित्र रेखाटते त्यातून त्याची जीवनाविषयक दृष्टी व्यक्त होत असते.'[१९] हे. प्रा. सुशीला पाटील यांनी पुढे म्हटलेले आहेच. तेव्हा काव्यात्मक, कलात्मक न्याय हाच कलाकृतीच्या संदर्भात विचार करतांना महत्त्वाचा असतो, म्हणून त्याकडे ललित साहित्याच्या टीकाकारांनी लक्ष दिले पाहिजे.

प्रा. आठवले मोकळ्या मनाने लिहितात, ' या नाटक, कादंबऱ्या, कवितांचे ललित वाङ्:मयाच्या दृष्टीने परीक्षण करणे हे माझ्या कक्षेबाहेरचे आहे, असे मी मानतो.[२०]

'व्यासपर्व' आणि 'युगान्त' या साहित्याचा 'ललित गद्यावतार' म्हणून विचार करणेच न्याय्य होईल. एकदा ही भूमिका स्वीकारली म्हणजे, आठवले म्हणतात त्याप्रमाणे 'असत्यावर आधारलेला अनिर्बंध कल्पनाविलास' या साहित्याला म्हणता येणार नाही. मात्र महाभारताशी तुलना करून साहित्यिकांनी कर्णाचे उदात्तीकरण करण्यासाठी कल्पनाविलासाचा अवलंब कसा केला आहे, हे दाखविण्याचा अधिकार जरूर या महाभारतनिष्ठ लेखकांना आहे. पण हे दाखवीत असतांना या प्रत्येकाचे कर्णाच्या जीवनाचे आकलन एक वेगळे रंगरूप आणि आकार घेऊन अवतरते, हे लक्षात आल्याशिवाय राहत नाही. विविधहेतूंनी काही मूलभूत गोष्टींचा शोध घेण्यासाठी ही निर्मिती होते. अशी नवनिर्मिती सतत होत राहणे हेच महाभारताचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. येथे साहित्यिकांना महाभारत संहितेवर आक्षेप घ्यावयाचे

नाहीत. एखादे सूत्र घेऊन त्यांना आपले स्वत:चे भाष्य करावयाचे असते.[२१] या आशयाचे विचार माधव मनोहरांनी मांडले आहेत. त्यांच्या दृष्टीने हे भाष्य आहे, आक्षेप नाहीत.

महाभारतातील व्यक्तिरेखा इहतत्त्व आणि परतत्त्वांनी युक्त आहेत. त्या मानवी आहेत. एकाच वेळी मानवाचे आणि महामानवाचे रंग घेऊन त्या अवतरल्या आहेत. आपल्या प्रतिभासामर्थ्याने साहित्यिकांना या व्यक्तींना नव्या दृष्टीने व नव्या अनुभूतीने साकार करता येते. पुराणकथेतील व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे पाहिले म्हणजे या चित्रणातील विविध रंग संभवनीय होतात. मग 'माणूस' शोधण्यासाठी ही व्यक्तिदर्शने अवतरतात.

★★★

# टीपांचे संदर्भ

१. अभिनव कर्णवध नावाचे चतुष्प्रवेशात्मक नाटक (१८९६),'राधेयकर्ण चरित्र' (१९२१) किंवा कर्णाची उत्कट तत्त्वनिष्ठा (१९३६) या लेखनातही मराठीत कर्णकथा आणण्याची प्रवृत्ती दिसते.

२. अभिव्यक्ती : डॉ.भा.व्यं.गिरधारी प्रस्तावना : वि.वा.शिरवाडकर, १९७७, (पृ.८)

३. महाभारतावरील व्याख्याने : बाळशास्त्री हरदास,१९५१,आ.१ली (पृ.२४१)

४. महाभारतावरील व्याख्याने : बाळशास्त्री हरदास,१९५१,आ.१ (पृ २३९)

५. महाभारतावरील व्याख्याने : बाळशास्त्री हरदास,१९५१, (पृ २४७)

६. महारथी कर्ण : बाळशास्त्री हादास, १९५१, आ. १ ली (प्रस्तावना पृ.३)

७. महाभारतातील व्यक्तिदर्शन : शं.के.पेंडसे, १९६४,आ.१ ली (पृ५५९ ते ६१३)

८. 'कर्णाच्या कानांच्या पाळ्यांना मांसाच्या गोळ्या चिकटलेल्या असाव्यात, आणि आकार रचना व रंग यामुळे त्या रत्नजडित कुंडलासारख्या दिसत असाव्यात असाही तर्क करता येतो.'
महाभारतातील व्यक्तिदर्शन : शं.के.पेंडसे, १९६४,आ.१ ली (पृ५९३)

९. 'गो.नी.दांडेकरांच्या 'कर्णायन'(१९६२) या शोकांतिकेतील नायक कर्ण हा आहे. दैवगती, परिस्थितीमुळे कर्णाच्या मनोरचनेत झालेला तमोगुणांचा शिरकाव या विविध कारणांमुळे कर्णाचे जीवन ही एक उदात्त, गंभीर शोकान्तिका ठरली.असा श्री.दांडेकरांचा अभिप्राय आहे.'
मराठी कादंबरी तंत्र आणि विकास : बापट/गोडबोले (आ.३,१९७३ : पृ.१७५)

१०. मराठी साहित्यातील कर्ण : प्रा.सुशीला पाटील, १९७४, आ. १ ली,(पृ.३३)

११. श्रीकर्णायन: गो.नी.दांडेकर, १९७१, आ.३ री, (पृ.४०)

१२. महाभारताचे वास्तवदर्शन : अ. दा. आठवले .१९७०. आ. १ ली, (पृ १११)

१३. 'महाभारत हा एक प्रामाणिक ग्रंथ आहे आणि तो एक वास्तव इतिहास आहे.' (पृ.३६) हे गृहीत धरूनच अनंतराव आठवले यांनी आपली भूमिका या ग्रंथात विशद केली आहे.

१४. राधेय कर्ण : डॉ.रा.शं.वाळिंबे, १९७१, आ.१ ली (पृ.२१३)

१५. 'हस्तिनापूर' : म.रं.शिरवाडकर, 'कर्ण आणि अर्जुन', (लेख) १९७२, आ.१ ली.(पृ.६७)

१६. महाभारत : एक मुक्त चिंतन : प्रेमा कंटक , १९६७ (पृ.२९)
'महाभारत : एक मुक्त चिंतन' या ग्रंथास प्रस्तावना लिहितांना विनोबाजीनी मार्मिक मुद्दे उपस्थित केले आहेत.
'या ग्रंथाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. पहिले वैशिष्ट्य किंवा आश्चर्य म्हणा, हे की साधन मार्गात आणि एकांतात प्रवेश करणाऱ्या राधिकेने भारतातील कलहकृत्यांचा सुगावा लावण्याचा नाद धरला आहे !"...हे पुस्तक वाचकांना मनोरंजनपूर्वक धक्का देणारे होईल यात शंका नाही.'

१७.

जातोऽसि धर्मलोपेन ततस्ते बुद्धिरीदृशी
नीचाश्रयान्मत्सरेण द्वेषिणी गुणिनामपि ।
तेनासि बहुशो रूक्षं श्रावितः कुरूसंसदि ॥
(भीष्मपर्व १२२.१२-१३)

महाभारत : एक मुक्त चिंतन : प्रेमा कंटक, १९६७,(पृ.६५)

१८. मराठी साहित्यातील कर्ण : सुशीला पाटील,१९७४, आ.१ ली (पृ.९६)
१९. मराठी साहित्यातील कर्ण : सुशीला पाटील,१९७४, आ.१ ली (पृ.१०३)
२०. महाभारताचे वास्तव दर्शन : अ.दा. आठवले, १९७०, आ. १ ली (पृ.२७१)
२१. नवशक्ती : म.वा.दर्शन (परीक्षणलेख) माधव मनोहर (दि.१६-१-१९७२)

# ॥ कर्ण : नवे आकलन ॥

मराठी प्रतिभावंताचे कर्णाचे आकलन :- ३४, सर्वाधिक निर्मिती :- ३४, शोक नाट्याचा नायक :- ३४, आरंभीचे प्रयत्न :- ३५, टाकलेलं पोर :- ३६, नाटकाची जन्मकथा :- ३६, प्रतिक्रियात्मक नाटक :- ३७, बालहत्येचा प्रश्न व समाज सुधारकाची व्यथा:- ३७, उदात्त कर्ण चित्रण :- ३८, उपेक्षितांची वेदना :- ३९, कर्ण : दलितांचा प्रतिनिधी :- ४०, निसर्ग की लौकिक :- ४०, नाट्यमय प्रसंगाची भर :- ४२, सामाजिक विषमतेला वाचा फोडली :- ४२, पहिला पांडव :- ४३. कथानकाची मांडणी :- ४३, परांजपे यांचे कर्णचित्रण :- ४४, महारथी कर्ण निर्मितीचे प्रयोजन :- ४५, औंधकरांचे स्वतंत्र चिंतन :- ४६, करूणमूर्ती कर्ण :- ४६, प्रतिभेची शलाका :- ४८, कर्णाची अखेर :- ४९, कौंतेय एक भावनाट्य :- ४९, मौलिक भूमिका :- ५०, कलात्मक आविष्कार :- ५०, अपमानित कर्ण :- ५१, कर्णकुंतीच्या मनातील द्वंद्व :- ५२, 'कर्ण-कुंती' भेट :- ५३, स्वतंत्र कल्पकता :- ५४, मूलभूत मानवी जीवनाचे चिंतन :- ५५, भावनात्मक अंग :- ५६, काव्यमय भावाचा शोध :- ५७, एकाकी कर्ण :- ५८, पैलू न पाडलेला हिरा :- ५८, कवचकुंडलदान :- ५९, इरावती कर्वे यांची भूमिका :- ६०, वैफल्याचा प्रतीक कर्ण :- ६०, मदायत्तं तु पौरुषम्। :- ६१, कर्णाचे कर्णपण :- ६१, मी कोण? निरंतर व्यथा :- ६२, महापुरुष कर्ण :- ६२, विरोधी भूमिका :- ६३, पश्चात्तापदग्ध 'राधेय' :- ६३, स्वतंत्र पौराणिक कादंबरी :- ६४, नव्या प्रसंगाची योजना :- ६४, स्वतंत्र निर्मिती :- ६७, मृत्युंजय :- ६८, साद - पडसाद :- ६९, कादंबरीकाराच्या जाणिवा :- ६९, कर्णविषयक चिंतन :- ७०, कर्णाची महाकथा :- ७०, 'मृत्युंजया'तील व्यक्ती :- ७१, आकर्षण आणि अनुकम्पा :- ७३, कलात्मक सूचकता :- ७४, नवे अंकुर :- ७५, रंगशाळा प्रसंग :- ७६, कर्ण आणि दुर्योधन :- ७७, वृषाली-कर्ण-प्रीती :- ७८, कर्ण आणि द्रौपदी :- ७९, कर्णकुंती :- ८१, कर्णातील माणसाचा शोध :- ८२, कवच कुंडलांचे दान :- ८३, विद्यार्थी कर्ण :- ८४, रणजित देसाई यांची 'राधेय' :- ८७, एकाकी कर्ण आणि कृष्ण :- ८८, सूतत्वाची जाणीव :- ९१, कवचकुंडल दान :- ९२, कर्ण आणि कुंती :- ९३, द्रौपदी-स्वयंवर :- ९५, कर्ण आणि नियती :- ९७, स्वेच्छापूर्वक आत्मसमर्पण :- ९८, 'रथचक्रउद्धरण' कुतूहल :- ९९, चिरंजीव मानवी प्रकृत्ती :- ९९, कर्णाच्या जीवनातील अमृतक्षण :- १००, प्रभावी कर्ण :- १०१, नियतीवर कर्णाची मात :- १०२, अखेरचे द्वंद्व :- १०२, नव्या कल्पनेची समीक्षा :- १०४, काव्यरूप कर्ण :- १०५, अधिरथ सूतपुत्र कर्ण :- १०६, समालोचन :- १०८, चिंतनाची जोड :- १०९, सूचक शीर्षके :- ११०, विविध विकसने :-१११, टीपांचे संदर्भ :- ११४.

## मराठी प्रतिभावंतांचे कर्णाचे आकलन :-

मराठी प्रतिभावंतांना कर्णाच्या व्यक्तिरेखेचे विशेष आकर्षण सतत वाटत आले आहे. आर्वाचीन मराठी साहित्याच्या कालखंडाच्या आरंभापासून अगदी आजपर्यंत हे आकर्षण वाटत आलेले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात तर ते विशेष वाढलेले आहे, असे म्हणता येईल. मराठी ललित साहित्यात कर्णविषयक साहित्यकृतींची नुसती संख्या जरी आपण लक्षात घेतली तरी या गोष्टीची जाणीव होते.

## सर्वाधिक निर्मिती :-

'कर्ण' या विषयावर सर्वाधिक मराठी ललित साहित्याची निर्मिती झाली आहे. साहित्यकृतींची कर्णावरील संख्या पंचवीसच्या जवळपास आढळते आणि कर्णाच्या या चिंतनाची पृष्ठसंख्याही फार मोठी आहे. प्रस्तुत प्रकरणात मराठी प्रतिभावंतांनी कर्णाविषयीच्या ललित साहित्याची जी निर्मिती केली आहे ती विचारात घ्यावयाची आहे.

'टाकलेलं पोर' ( के. सी. ठाकरे), पहिला पांडव (शि. म. परांजपे), महारथी कर्ण (वि. ह. औंधकर), कौंतेय (वि. वा. शिरवाडकर), व्यासपर्व (दुर्गा भागवत), कर्ण (संगीतिका) (बा. सी. मर्ढेकर) , महापुरुष (आनंद साधले), युगान्त (इरावती कर्वे), मृत्युंजय (शिवाजी सावंत), सूर्यपुत्र (विजय देशमुख), राधेय (रणजित देसाई), जीवनव्यास (मधु भोसले) इत्यादी साहितत्यकृतींचा या साहित्यात प्रामुख्याने समावेश होतो.

मराठी प्रतिभावंतांनी कलात्मक पातळीवरून जाणून घेतलेली कर्णाची मनःस्थिती, आणि त्यांच्या कर्णविषयक नव्या आकलनाला विशिष्ट कालपरिस्थितीनुसार मिळत गेलेली मती, येथे अभ्यासावयाची आहे. या साहित्यकृतीतून मराठी मनाचे हे नवे आविष्कार शोधले म्हणजे मग महाभारताचे स्थलकाल - व्यक्तिपरत्वे बदलणारे आणि वाढणारे स्वरूपही येते लक्षात येईल आणि प्रबंध सिद्धांताला अधिकच पुष्टी मिळेल.

## शोक-नाट्याचा नायक:-

कर्ण शोकनाट्याचा नायक शोभतो. शोकाच्या भावनेचे सर्वात अधिक व्यापक आणि सखोल असे आवाहन असते. ते आवाहन करण्याचे सामर्थ्य कर्णाच्या जीवनात निश्चितच आहे. कारण कर्णाच्या जीवनात सुदशा आणि दुर्दशा आहे, सुदैव आणि दुर्दैव आहे, संघर्ष आहे, भावभावनांचे कल्लोळ आहेत, सद्गुण आणि दुर्गण आहेत म्हणूनच रसिक मनाला कर्णाचे विशेष आवाहन आणि आकर्षण आहे. महाभारतात अनेक व्यक्तिरेखा आहेत. पण कर्ण हा मराठी

ललित साहित्यिकांना याच दृष्टीने विशेष जवळचा वाटला आहे, असे दिसते. या साहित्यिकांना कर्णाच्या जीवनातील घटना आणि प्रसंगांची मालिका आमच्याही व्यथा आणि वेदनांशी नाते सांगणारी वाटते. 'कौंतेय' असून 'राधेय' म्हणून जीवन जगण्यात दैवाने घडविलेला हा खेळ सगळ्यांच्या मनात कर्णाविषयी सहानुभूती निर्माण करणारा आहे. दातृत्व, जन्मवृत्त, उपेक्षा या गोष्टींचा प्रतीक म्हणून आज कर्ण ओळखला जातो. 'कर्ण' ही नुसती महाभारतातील व्यक्ती न राहता कर्णाची एक पुराणकथा तयार झाली आहे आणि ही पुराणकथा अनेक मराठी लेखकांच्या अनुभवाचा भाग बनली आहे. ललित साहित्यिकांनी ही पुराणकथा रिती करून त्यात आपले अनुभव भरले आहेत. महाभारतातील व्यक्तिरेखांना दुर्गा भागवतांनी पारदर्शक म्हटले आहे. ते कर्णाला तंतोतंत लागू पडते. मराठी साहित्यिकांनी कर्ण या व्यक्तीची आणि कर्णकथेची उद्‌बोधन, रंजन व कलात्मक निर्मिती यासाठी योजना केली आहे. मानवी मनाचे आणि जीवनाचे विविध धागे उलगडण्यासाठी त्यांना कर्णाचा आधार वाटला. पौराणिक तपशिलाचा आणि वास्तवाचा आधार घेऊन भिन्न भिन्न परिस्थितींचे चित्रण करण्यासाठी कर्णाचे व्यक्तित्व त्यांना काव्यविषय म्हणून आस्वाद्य वाटले असले पाहिजे. कर्णाच्या व्यक्तित्वाचा विविध आणि विशिष्ट दृष्टिकोनातून वेध घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या या साहित्यिकांमध्ये असामान्य मान्यवरांप्रमाणेच नवोदित साहित्यिकांचाही समावेश आहे. कर्णाविषयीच्या वैचारिक साहित्याने काही ललित कलाकृतीनां प्रेरणा दिली आणि काही ललित साहित्यकृतींना वैचारिक लेखन-निर्मिती भाग पाडली म्हणूनच कदाचित लेखन वैपुल्याने झाले असले पाहिजे.

**आरंभीचे प्रयत्न :-**

कर्णाविषयी भारतीय वीरदाता कर्ण (का. रं. वैशंपायन), अभिनव कर्णवध नावाचे चतुष्प्रवेशात्मक नाटक (शं. मो. रानडे), महारथी कर्ण (बा. वा. फाटक), महावीर कर्ण (वा. कृ. बोडस) या अर्वाचीन कालखंडातील आरंभीच्या व अगदी सामान्य साहित्यकृती आहेत. पण शाळकरी स्वरुपाच्या व मराठीकरणाच्या प्रवृत्तीतून निर्माण झालेल्या या साहित्याची फारशी दखल घेण्याची येथे आवश्यकता नाही. या काळात 'अपरिणत अवस्थेतील प्रयोग' आणि 'नाट्यम् भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम्।' या उक्तींत सामावलेल्या आशयातून पौराणिक नाटक बाहेर पडू लागले. कारण एवढ्यावर या नाटककारांचे समाधान होईनासे झाले. यावेळी नाटक हे एक मनोरंजनाचे प्रतिष्ठित साधन होऊन बसले होते, पण यापेक्षा एका वेगळ्या दृष्टिकोनातून नाट्यनिर्मिती सुरू होत असतांनाच कर्णाच्या जीवनावरील तीन नाटके [टाकलेलं पोर (१९२८), पहिला पांडव (१९३१) व महारथी कर्ण (१९३४)] जन्माला आली व विशेष गाजली.

वर्तमान परिस्थितीशी संबंध प्रस्थापित करून अद्‌भुत-कल्पनानिर्मित संविधानके योजण्यापेक्षा आपला विशिष्ट हेतू गृहीत धरून पौरणिक कथाभागांना वर्तमानकाळाचा रंग देण्यात येऊ लागला. पुराणकाल आणि वर्तमानकाल यांचा एक नवा अनुबंध या नाटकात प्रस्थापित झाला. उपरोक्त तीन्ही नाटकात वर्तमानात रमलेल्या के. सी. ठाकरे, शि.म. परांजपे, वि. ह. औंधकर या लेखकांनी असाच प्रयत्न केला आहे. केवळ मनोरंजनाचा प्रधान हेतू येथे बाजूला ठेवून वर्तमानपरिस्थितीत प्रबोधन करण्याचा नाटककाराचा हेतू येथे आहे.

पुराणातील, महाभारतातील व्यक्ती घेऊन त्यातूनच आधुनिक व्यक्ती डोळ्यासमोर उभ्या करण्याचा नवा मार्ग खाडिलकरांच्या कीचकवध (१९०१) पासून खुला झालेला होता. सामाजिक आणि राजकीय हेतूने महाभारतकथानकांचा सर्रास उपयोग या कालखंडात करून घेतला जात होता. या प्रवृत्तीतूनच मराठी नाटकात कर्णाच्या व्यक्तित्वाची व जीवनाची पृथगात्म चित्रणे आढळतात.

'नवनिर्मितीसाठी कथानक हे अवश्यमेव नवीन पाहिजे हे म्हणणे केवळ दुराग्रहमूलक आहे. एवंच एकंदर मराठी महाभारतें ही नवनिर्मिती असून ती स्वतंत्र आहेत हे सिद्ध होते.'[१] अशा आशयाचे विचार डॉ. नांदापूरकरांनी आपल्या प्रबंधात मांडले आहेत. या न्यायाने येथे पृथगात्मता आहे म्हणून ही नवनिर्मिती आहे.

**'टाकलेलं पोर' :-**

प्रबोधनकार के. सी. ठाकरे यांनी कर्णकथेवर 'टाकलेलं पोर' हे तीन अंकी पौराणिक नाटक लिहिले. कर्णावरील साहित्यकृतींची शीर्षके मोठी बोलकी आणि सूचक आहेत असे या शीर्षकांवरुन दिसून येते. 'टाकलेलं पोर' हे शीर्षक असेच सूचक आहे. नाटककाराचा कर्णाकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट करणारे आहे. त्यातून आयुष्यभर कर्णाची उपेक्षाच झाली, असे लेखकाला सुचवावयाचे आहे, असे दिसते. 'ख़रा ब्राम्हण' या त्यांच्या नायकानंतर हे नाटक प्रसिद्ध झाले असले तरी त्याचे लेखन त्यांनी तत्पूर्वीच केलेले होते.

**नाटकाची जन्मकथा :-**

या नाटकाची जन्मकथा प्रस्तुत अध्ययनाला मोठी उपकारक आहे. ही लक्षणीय 'जन्मकथा' नाटककाराच्या शब्दात लक्षात घेणे उचित ठरते.

''महाभारत महाकाव्याचा चिकित्सक स्वाध्याय करीत असतांना, त्यातल्या कर्णाच्या भूमिकेने मला चटका लावला होता. तशांतच सन १९३० साली कर्जत (जि. कुलाबा) मुक्कामी महाराष्ट्र नाटकमंडळीचा कै. शिवरामपंत परांजपेकृत 'पहिला पांडव' नामक नाटकाचा प्रयोग पाहण्याची संधी लाभली. कर्णासारख्या उदारचररित

पुरुषोत्तमाचे कथानक आणि शिवरामपंत परंजप्यांसारखा तर्ककुशल रसाळ लेखक, फार मौज अनुभवायला मिळेल, अशा आशेने मी नाटकाला गेलो. पण निराशेने नि संतापाने घरी परत आलो. इतक्या अर्कट 'भटी' वृत्तीने कर्णचरित्राची विटंबना शिवरामपंतांसारख्या स्वाभिमानी नि स्वदेशाभिमानी माणसाला करवली तरी कशी? याचा अजूनहि मला अचंबा वाटत आहे. 'मला कोणीतरी क्षत्रिय म्हणा हो' असे प्रत्येकाला आळवीत रडणारा आणि अभिमन्यूचे भूत पाहताच भेदरुन बोबडी वळलेला कर्ण महाभारतात तरी खास आढळणार नाही. मग असला रडका, भेदरट कर्ण कल्पनेच्या कुंचल्याने रंगविण्यात लेखकाला कोणत्या चळवळीवर काळ्या शाईचे शिंतोडे उडवावयाचे होते, हे महाराष्ट्र नाटक मंडळीच्या धांदरट, बावळट चालकांना जरी समजले नाहीं, तरी जाणत्यांनी त्या टिंगलीचा वा बदनामीचा ठाव तेव्हाच घेतला होता. या बदनामीच्या निषेधार्थ प्रस्तुत नाटिकेंत कर्णाच्या तोंडी मी घातलेले उद्‌गार, खुद्द नाटिकेंत योग्य स्थळ न मिळाल्यामुळे, मी बाजूला काढून ठेवले होते. ते याच ठिकाणी उमटवून ठेवण्याची संधि मी साधीत आहे."[२]

एवढ्या विस्ताराने ह्या प्रास्ताविकातील भागाची येथे नोंद घेण्याचे कारण त्यावरून कर्णजीवनावरील या नाटकाच्या निर्मिती मागील भूमिकेची कल्पना येते, आणि परांजपे यांच्या 'पहिला पांडव' या नाटकावरील ठाकरे यांची तीव्र प्रतिक्रियाही लक्षात येते.

**प्रतिक्रियात्मक नाटक :-**

'टाकलेलं पोर' कर्णविषयीच्या सहानुभूतीतून आणि अनुकम्पेतून जन्माला आलेले नाटक आहे. 'पहिला पांडव' ची प्रतिक्रिया असे काहीसे प्रतिक्रियात्मक स्वरूप या नाटकाला प्राप्त झाले आहे. येथे मुद्दाम कर्णाची बाजू घेतलेली दिसते. एखाद्या व्यक्तिरेखेची बाजू मुद्दाम घेऊन जेव्हा लेखन केले जाते तेंव्हा कलानिर्मितीच्या दृष्टीने ते बाधक ठरते. महाभारतीय कर्णाचे हे नाट्यरूप म्हणूनच फारसे कलात्मक ठरत नाही. तात्कालिक प्रक्रियेतून व प्रतिक्रियेतून हे नाटक स्फुरले आहे. 'पहिला पांडव' विषयी ठाकरे यांनी प्रस्तावनेत एक शंकाही प्रगट केली आहे.[३]

**बालहत्येचा प्रश्न व समाजसुधारकाची व्यथा :-**

"टाकलेलं पोर या नाटकात अपत्यहत्येचा प्रश्न तर प्रधान आहेच आहे, पण त्याहिपेक्षा, मागासलेल्या नि पददलित समाजातील स्वाभिमानी उद्धारकांना आत्मोन्नतीचे शिखर गाठण्यासाठी कसकसल्या सामाजिक विकल्पांना नि अडचणींना तोंड देऊन आपला मार्ग आक्रमावा लागतो याचे दृश्य रंगविण्याचा कर्णाच्या

मूळ कथेनुसार मी प्राथमिक प्रयत्न केला आहे.''[४] नाटककाराने प्रस्तावनेत आपला हा प्राथमिक प्रयत्न असल्याचे मान्य केले आहे. महारथी कर्णाच्या जीवनाच्या पार्श्वभूमीवर बालहत्येचा प्रश्न आणि सामाजिक सुधारकांच्या मार्गातील अडथळे यांचा परामर्श घेणारे हे नाटक आहे हेही स्पष्ट केले आहे.

के. सी. ठाकरेंनी महाभारतातील कर्णाच्या कथानकाची निवड 'अपत्यहत्या' आणि दलितांच्या आत्मोन्नतीचा प्रश्न या दोन समस्यांवर प्रकाश टाकण्यासाठी केली आहे. या दोन प्रश्नांच्या अनुषंगाने महाभारतातील कर्णकथेचा विचार केला तर या दोन्हीही समस्यांवर एकाच वेळी प्रकाशझोत टाकण्यासाठी ही कथा वापरणे संयुक्तिक वाटत नाही. 'कर्ण' दलितांचा प्रतिनिधी मानणे हेच मुळी वादग्रस्त आहे. कारण दुर्योधनासारखा मित्र, अंगराज्य, मानसन्मान लाभलेल्या कर्णाला दलित मानता येईल काय? सेनापती, महारथी म्हणून त्याचा गौरव वेळोवेळी कौरवराज्यात झाला आहे. पण 'सूतपुत्र' म्हणून त्याची पांडवपक्षीयांकडून झालेली अवहेलना लक्षात घेता असे सामान्यत: मानले जाते. ठाकरे यांनी अपत्यहत्त्येच्या पापाविषयी स्त्रियांच्या बाबतीत वैचारिक क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे.[५] या पार्श्वभूमीवर कुंतीला 'कर्ण' या आपल्या पहिल्याच अपत्याचा त्याग करावा लागला याची जाणीव तीव्रतेने नाटककाराला झाली आहे.

ठाकरे यांची ही क्रांतीची भाषा लक्षात घेता या नाटकाला खाडिलकरांच्या नाटकांसारखे जे एक गंभीर विचार-नाट्याचे स्वरूप यायला हवे होते ते येत नाही. अशा प्रभावी विचारनाट्याचा प्रत्यय नाट्याचार्य खाडिलकरांच्या कीचकवध, विद्याहरण इत्यादी नाटकांमधून येतो. महाभारताच्या कथानकाचा सारा तोल सांभाळून खाडिलकरांनी आपले कलात्मक विचारनाट्य फुलविले आहे.

**उदात्त कर्ण चित्रण :-**

द्रोणवधानंतर या नाटकाचे कथानक सुरू होते. अश्वत्थमा या घटनेने कमालीचा अस्वस्थ होऊन दुर्योधनासमक्ष कर्णाला दूषण देऊ लागतो. तेव्हा निष्ठावंत कर्ण उद्‌गारतो, 'भारतीय महायुद्धाचे मुकाबले, मोहाच्या किंचित् झळींनं वितळणाऱ्या सात्त्विक ब्राम्हणी पिंडासाठी खासच नाहीत.'' (अंक १, पृ. ६) क्षत्रीय व ब्राम्हण यातील संघर्ष स्वकालीन समाजव्यवस्थेच्या वैगुण्यातून नाटककाराला येथे जाणवलेला आहे. नाटक महाभारतकालीन कथेवर आधारित आहे. पण नाटककाराची भूमिका स्वत:च्या कालांतील समस्या सूचित करण्याची आहे हे स्पष्ट होते.

येथे कर्णाच्या क्षात्रतेजाला उजळा देण्याचा विशेष प्रयत्न केला आहे. 'कर्णा'ला एक माणूस म्हणून त्याचे जिवंत चित्रण करून बेमालूमपणे स्वत:ला अभिप्रेत असलेले विचार व्यक्त करण्यात नाटककार असमर्थ ठरला आहे. कलात्मक पातळीची

बूज येथे शेवटपर्यंत राखली जात नाही. त्यामुळे कर्णाची व्यक्तिरेखा येथे जिवंत होत नाही, आणि सामाजिक चिंतन येथे अनुभवाचे घटक बनून व्यक्त होत नाहीत, येथे महाभारतातील कथेचा समाजप्रबोधनाच्या प्रेरणेतून वापर केला आहे. 'मृत्युंजय', 'राधेय', 'कौंतेय' या साहित्यकृतीत कर्णाच्या व्यक्तित्वाच्या अंतरंगाला जसा स्पर्श होतो तसा येथे होत नाही. या नाटकातील घटनांची मांडणी कलाविसंगत झाली आहे. या नाटकाच्या पहिल्या अंकात कृष्णकर्ण भेट होते आणि त्यात कर्णाच्या मृत्यू निश्चित होतो. अशुभ भाकीत कळूनही कर्ण यत्किंचितही हलत नाही. उलट कृष्णच दिङ्मूढ होतो. महाभारतात कृष्ण सगळ्यांनाच मार्गदर्शक, व्यवहारज्ञ वाटतो पण येथे कर्ण श्रीकृष्णाला महायुद्धांच चैतन्य कायम राखण्यासाठी 'तू दिङ्मूढ होऊ नकोस' असे विनवितो. कर्णाच्या पराक्रमी वृत्तीला येथे महत्त्व दिले आहे. 'क्षत्रियांचे काय आणि शिपाईगड्याचे काय धारातीर्थातच जीवनाचे सोने होते.' कर्णाच्या या उद्‌गारातून नाटककाराने त्याचे उदात्त चित्र रेखाटण्याचा प्रयत्न येथे केला आहे, त्या अनुरोधानेच कथानकाची उभारणी केलेली आहे हे लक्षात येते. मातृद्रोह, पितृद्रोह, राजद्रोह यांपैकी कोणत्याही प्रकारचा द्रोह करायला हा उदात्त कर्ण तयार नाही. 'कुंतीच्या बालबुद्धीने तुझा त्याग न होता तर कौरव-पांडवांच्या इतिहासाला काही निराळंच वळण लागून या भरत-खंडाच्या भाग्यानं हिमालयाला ठेंगणं करता आलं असतं.' (पृ. ३०) या श्रीकृष्णाच्या उद्‌गारातून कर्णाच्या व्यक्तिमत्त्वाची थोरवी पूर्णपणे व्यक्त झाली आहे.

कृष्ण-कर्ण भेटीत कृष्णाला कर्णाचे कणखर व्यक्तित्त्व प्रत्ययाला येते. 'अधर्म-युद्धाने मिळणारा जय पांडवांनाच लखलाभ असो.' असे कर्णाचे उद्‌गार आहेत. कर्णानें धर्म-अधर्माची चर्चा करावी इतपत त्याची प्रतिमा महाभारतात उजळ नाही. त्याला तो अधिकारही पोहचत नाही. पण ठाकरे यांची सारी सहानुभूती कर्णालाच आहे. म्हणूनच तो कृष्णाला असे स्पष्ट बजावू शकतो. महाभारतात कृष्णाने मोठ्या सूचकतेने अखेरचे अस्त्र म्हणून कर्णाला सुंदर द्रौपदीचे स्मरण करून दिले होते. या नाटकात मोठ्या अनुदारपणाने या गोष्टीचा उल्लेख आहे. त्यातून पांडवांविषयीचा तिरस्कार व्यक्त होतो.[६]

## उपेक्षितांची वेदना :-

वासुदेव भटजींच्या रूपातील कृष्णाशी जेव्हा कर्णाचा संवाद होतो. त्यावेळचे कर्णाचे उद्‌गार म्हणजे उपेक्षितांचे अंतरंग ढवळून काढणारे आहेत. कर्ण म्हणतो 'आत्मविश्वासाच्या मळ्यातच गर्वाचा दवणा दरवळतो. मी आपल्या गर्वाची फेक गगनाला भिडेइतकी उंच भिरकावीन, तेव्हा माझ्या गरीब नू कष्टाळू जात भाईंना थोडासा धीर येऊन, ते आपल्या माणुसकीच्या हक्कासाठी धडपडू लागतील. आजपर्यंत गर्वाचा सारा खजिना तुम्ही वरिष्ठांनी वापरला - आता थोडा तरी

आमच्या हाती लागू द्या की.'[७] विद्रोहाची आणि प्रस्थापितांविरुद्ध बंड पुकारण्याची भाषा नाटककाराने कर्णमुखाने येथे योजिली आहे. येथे दलित साहित्यातील जळजळीत उद्गाराची आठवण होते. पुराणकथेला प्रतिभावंतांच्या प्रतिभेचे हे असे विलास (स्वत:च्या मनातील सामाजिक आशयाने) भरून टाकतात आणि मग खरा कर्ण कोणता असा संभ्रम निर्माण होतो. कर्णाचे हे ज्वालाग्राही उद्गार म्हणजे नाटककाराच्या काळजातील तळमळ आहे उपेक्षितांचे अंतरंग जाणून घेऊन त्यांच्यातील आत्मविश्वास जागृत करण्यासाठी समाजधुरिणांना, दलितांच्या नेत्यांना अतिशयोक्तीचा आधार घ्यावा लागतो. अतिशयोक्त अवाजवी बोलावेच लागते. तेव्हा समाजातील उच्चभ्रूंना जाग आली तर येईल व त्यांची घोरनिद्रा भंग पावू शकेल असे नाटककाराला वाटते. मात्र कलामूल्यांची जाणीव न ठेवता येथे प्रचार केलेला आहे. - बहिर्मुख वृत्तीतून हे प्रबोधन आले आहे.

**कर्ण : दलितांचा प्रतिनिधी :-**

प्रा. नरहर कुरुंदकर आणि प्रिं. अ. दा. आठवले यांनी कर्णाला दलितांचा प्रतिनिधी मानता येत नाही, असे म्हटले आहे. प्रा. नरहर कुरुंदकर 'सूर्यपुत्राच्या निमित्ताने' या लेखात म्हणतात -'....कर्णाकडे पाहतांना सर्व समाजाने उपेक्षा आणि अवहेलना केलेला, भाबडा आणि हळवा जीव या पद्धतीने पाहणे हा आधुनिक लेखकांच्या स्वत:च्या भावनाप्रधान मनाचा खेळ आहे.'[८] प्रा. कुरुंदकरांच्या दृष्टीने खरा शूद्र प्रतिनिधी 'विदुर' ठरतो आणि ते पटण्याजोगे आहे.

'स्वत:च्या समाजाच्या उन्नतीसाठी रक्ताचे पाणी करणारे डॉ. आंबेडकर आणि वैयक्तिक स्थानमानासाठी धडपडणारा कर्ण यांची मुळी तुलनाच होऊ शकत नाही.'[९] असे श्री. आठवले यांनी म्हटलेले आहे. या जाणकारांच्या मतांविषयी मतभेद असण्याचे कारण नाही पण कर्णाच्या जीवनाचा एक पैलू 'कौंतेय' असूनही 'राधेय' म्हणून वावरावे लागले, या उपेक्षेने घडला आहे. म्हणून ललित साहित्यिकाला जर कर्णाच्या जीवनात उपेक्षा जाणवली तर त्यात गैर काही नाही. परमार्थाने न घेता ते मर्यादित अर्थाने स्वीकारता येईल. बऱ्याच साहित्यिकांनी कर्णाच्या जीवनाच्या या अंगाला स्पर्श केला आहे. एकदा कर्ण ही पुराणकथेतील व्यक्ती म्हणून आपण स्वीकारल्यानंतर अनेक कल्पना अशा व्यक्तीवर आरोपित करता येतात. 'कर्ण' येथे निमित्त होतो आणि लेखक आपल्या विचारभावनांचा मुक्त विलास करतो.'[१०]

**निसर्ग की लौकिक :-**

'टाकलेलं पोर' या नाटकात कर्ण-कुंतीच्या भेटीच्या प्रसंगाला महत्त्व प्राप्त होणे स्वाभाविक आहे. कर्ण-कुंती यांच्या भेटीत निर्माण झालेला संघर्ष अपेक्षेप्रमाणे

येथे कमालीचा तीव्र बनतो. असभ्य आणि आक्रस्ताळी भाषा वापरण्यापर्यंत मजल जाते.[११] नाटककाराला तो मोह आवरत नाही.

कर्ण उपरोधिक शब्दात भेटीसाठी आलेल्या कुंतीचे स्वागत करतो. 'या, हा अधिरथ-राधापुत्र कर्ण आपल्याला वंदनं करतो.' या वाक्याने कुंती चरकते. 'म्हणून काय सख्या पाठच्या भावाच्या वधानं तू आपल्या बीजाशी बेइमान होणार?' असे त्याला विचारते. यावर कर्णाने दिलेले उत्तर मोठे लक्षणीय आहे. 'बीजापेक्षा ब्रीदाची किंमत मला विशेष वाटते. बीजाची चौकशी करण्याची मला कधी गरजच पडलेली नाही, आणि मला तिचे महत्त्वही वाटत नाही.' हा संघर्ष असाच तीव्र बनत जातो. वि. वा. शिरवाडकरांनी तर आपले संपूर्ण नाटक या एकाच प्रसंगावर उभारले आहे. एका प्रसंगाचे किती भिन्न तऱ्हेने चित्रण होऊ शकते याचा नमुना म्हणून 'कर्ण-कुंती भेट' हा प्रसंग लक्षात घेण्याजोगा आहे. या प्रसंगाच्या चित्रणासाठी 'मृत्युंजय' आणि 'राधेय' कादंबरीत काही आणखी अनोखे रंग योजिलेले आढळतात. (त्याचा योग्य ठिकाणी त्या त्या साहित्यकृतीच्या संदर्भात विचार केला आहे.) 'टाकलेलं पोर' मधील या संवादाचे वैशिष्ट्य असे की सामाजिक समस्या त्यात गोवलेली आहे. निसर्ग धर्म आणि समाजधर्म यातील संघर्षात कर्णाचा आयुष्यभर तेजोभंग होतो. आणि कुंतीला 'ते दिव्य मातृहृदय' गमावल्याचे दुःख वाटत राहते. 'भ्रूणहत्येपेक्षा लोकमान्यतेची हत्या बरी' असे कर्णाला वाटते. त्याच्या मनाची घालमेळ येथे उत्कटपणे प्रगट झाली आहे. 'निसर्गानं निर्माण केलेली जिज्ञासा पुरविण्यात दुर्लौकिक कसला? आणि लौकिकाची चाड बाळगायची, तर निसर्गाची तरी पर्वा कशाला? मातोश्री : निसर्ग प्रत्ययी असतो, आणि लौकिक परिपाठी असतो, यातले कोणते तरी एक साधते, असे या 'टाकलेल्या पोरा'ला वाटते. एका मूलभूत समस्येला येथे नाटककाराने स्पर्श केला आहे. 'निसर्ग आणि लौकिक यात स्वीकारावयाचे कोणते?' असा तो प्रश्न आहे. 'कर्णायन'मध्ये कुंती निसर्गाला सामोरी गेल्याबद्दल दांडेकरांनी सहानुभूती व्यक्त केलेली आहे. महाभारतातल्या कर्णकुंती-संवादात कर्ण कुंतीला अभयवचन देतो या गोष्टीला महत्त्व आहे, पण मराठी लेखकांनी या प्रसंगाला फुलविले आहे.

'गंगेच्या ओघातल्या निर्दय त्यागापेक्षा गर्भहत्या चालली असती.' असे जेव्हा 'टाकलेलं पोर' मोठे होऊन उपेक्षित जीवनाने होरपळल्यावर म्हणू लागते, तेव्हा रसिकांच्या अंतःकरणाला पीळ पडल्याशिवाय राहत नाही. शिवाजी सावंतांच्या मृत्युंजयमध्येही कर्ण असाच सवाल कुंतीला विचारतो. 'व्याघ्रीसुद्धा आपल्या पहिल्या पिलाला खाऊन टाकते म्हणतात' असे हे प्रतिभावंतांच्या अभिव्यक्तीतील विविध समतोल आहेत. महाभारतातील कर्णाची प्रतिमा आणि या मराठी ललित साहित्यातील

प्रतिमा यात हे असे अंतर पडत जाते. कविगतन्यायात आणि कलानुभवात जेव्हा ते बसते तेव्हा कलात्मक रूप निश्चित धारण करते. हा संवाद असा रंगत असला तरी संपूर्ण नाट्यानुभावात ही कलात्मकतेची जाण 'प्रबोधनकारां'नी येथे ठेवलेली दिसत नाही.

'कुंती' माणसांच्या भयानं माणुसकीला बेमान बनलीस, तरी भूतदयेचा चटका सुद्धा तुझ्या काळजाला बसू नये आं?' या कर्णाच्या प्रश्नाला मातेचे काय उत्तर असणार? असे हे निकराचे प्रसंग आहेत. के. सी. ठाकरे यांनी या कर्णकुंती संवादाची अखेर आपल्या मार्मिक कल्पकतेची जोड देऊन नाट्यपूर्ण प्रसंगाच्या योजनेने केली आहे.

**नाट्यमय प्रसंगाची भर :-**

कर्णकुंती संवाद चालू असतांनाच दुर्योधन गुपचूप मागे येऊन उभा राहतो. शिवाय याचवेळी तेथे कृष्णही येतो. हा नाटककाराने स्वत:च्या कल्पनेने योजिलेला प्रसंग आहे. यावेळचा संवाद यामुळे अर्थपूर्ण होतो.

'लौकिकाला घाबरली तरी प्रेमाला पारखी न झालेली अशी मी कुंती आहे, असे कुंती म्हणते. यावर 'कौरवांच्या मिठाला नृ इमानाला हा कर्ण प्राण गेला तरी बेईमान होणार नाही' असे मागे उभ्या असलेल्या दुर्योधनाला सुखावणारे उद्‌गार कर्ण काढतो. सत्यनिष्ठ राष्ट्रवीर म्हणून कर्णाची जिवंत राहण्याची प्रतिज्ञा ऐकून तृप्त झालेला दुर्योधन म्हणतो -

'कर्णा तुझ्या धन्यतेच्या थोरवी पुढं सूर्याचे तेज सुद्धा फिकं पडेल.'

'कर्णा, तुझ्यावरुन हा जीव ओवाळून टाकावा.'

'तू माझा परमेश्वर आहेस.'

असा एखादाच नाट्यत्म प्रसंग येथे दिसतो.[१२]

**सामाजिक विषमतेला वाचा फोडली :-**

'टाकलेलं पोर' या नाटकाचा खरा रोख विषमतेच्या प्रश्नाला वाचा फोडणे हाच आहे. त्यासाठी कर्णकथा येथे राबविली गेली आहे. कृष्णाच्या उद्‌गारातून हेच सूचित होते.[१३]

ठाकरे उपेक्षितांच्या दु:खांना कर्णाच्या निमित्ताने चित्रित करण्याचा प्रयत्न करीत असले तरी उपेक्षितांच्या अंतरंगाचा सखोल ठसा येथे कलात्मक पातळीवरुन उमटत नाही. कर्णाच्या निमित्ताने उपेक्षितांवरील अन्यायाचे आणि त्यांच्या वेदनेचे बहिर्मुख व प्रगट चिंतन येथे व्यक्त झाले आहे. सामाजिक आशय कर्णकथेत भरण्याच्या या प्रयत्नात नाटककाराने काही हृदयस्पर्शी, मार्मिक प्रसंग नव्याने

घडविले आहेत. कर्णाचा लाडका मुलगा वृषसेन निधन पावल्याचे ऐकून कर्णाला समाधान वाटते. तो म्हणतो ' मी द्रोणाचार्य नाही.' या कर्णाच्या उद्‌गारातून अपत्य स्नेहाने भावविवश झालेल्या द्रोणाचार्यांचे सारे व्यक्तित्त्व प्रगट झाले आहे.

'कर्ण पहिला पांडव आहे हे जर माहीत असते तर मी कृष्णाग्रहाने सुद्धा अधर्म वध केला नसता.' असे अगतिक अर्जुनाचे उद्‌गार कारुण्याने काठोकाठ भरलेले आहेत. नाटकाच्या शेवटी शोकग्रस्त कुंतीचे वर्णन केल्यामुळे या नाटकात अपेक्षित परिमाणकारकता आली आहे.

असे काही कल्पक प्रसंग महाभारतकथानकाला अधिक परिणामकारक करतात. यामुळे महाभारतात नवी भर पडते आणि महाभारत मराठी प्रतिभा आपल्या परीने वाढविते, हे कटाक्षाने जाणवते. महाभारतकथेचा प्रचारासाठी झालेला वापर याचे एक उत्कृष्ठ उदाहरण हे नाटक आहे. प्रत्येक लेखकाच्या व्यक्तित्त्वाचा ठसा त्याच्या लेखन कृतीवर उमटतो यानुसार प्रबोधनकार ठाकरे यांच्या व्यक्तित्वाचा ठसा या नाटकात उमटला आहे.

**पहिला पांडव :-**

कर्णाच्या जीवनाची शोकांतिका चित्रित करण्यासाठी शि. म. परांजपे यांनी 'पहिला पांडव' हे नाटक लिहिले आहे. वसंत देसाई या नाटकाच्या हेतूविषयी म्हणतात 'ज्यांचा राज्यावर हक्क त्यांच्या दुर्दैवानें ते सूतपुत्र ठरून त्यांचा पराक्रमही विफल ठरावा हे असे का, हा एक प्रश्न नाटककाराने भारतवर्षीयांसमोर टाकला आहे.[१४]

या नाटकाच्या दर्जावरून के. सी. ठाकरे यांना हे नाटक शि. म. परांजप्यांच्या नावावर कुणीतरी खपविल्यासारखे वाटते. कर्त्याच्या नावाप्रमाणेच या नाटकाच्या नावाचीही चर्चा झालेली आहे. 'प्रथम या नाटकाचे नाव 'कर्णवध' असे होते पुढे त्याचे नाव 'पहिला पांडव' असे ठरले.[१५]

कुंतीचा पंडूशी विवाह होण्यापूर्वी कर्णाचा जन्म झाला म्हणून 'पहिला पांडव' हे नाव अयोग्य ठरते. तेव्हा या नामचर्चेचा हेतू एवढाच की 'कर्णवध' या नावातून कर्णाची शोकांतिका सूचित होते आणि 'पहिला पांडव' म्हणण्यातून कर्णाचा पांडवपक्षातील अधिकार-अग्रक्रम सूचित होतो. म्हणजे नाटककाराच्या मनात कर्ण पहिला पांडव असूनही कर्णाचा वध झाला, ही तीव्र जाणीव दिसते आणि त्यातूनच या नाटकाला आकार लाभला आहे.

**कथानकाची मांडणी :-**

महाभारतातील कर्णाचे जीवन करूण रसाच्या आविष्काराला अत्यंत पोषक आहे. शि. म. परांजपे यांनी कर्णाची कथा त्या दृष्टीने सादर केली आहे.

'भीष्म-द्रोणा' नंतर भारतीय युद्धातील कौरवपक्षाचा सेनापती कर्ण होतो. मित्र म्हणून दुर्योधनासाठी तो पांडववधाची प्रामुख्याने अर्जुन वधाची प्रतिज्ञा करतो. कुंतीला हे कळल्यावर ती 'कर्णार्जुन युद्ध' टाळण्याचा प्रयत्न करते पण त्यात तिला यश लाभत नाही. शेवटी युद्धात कर्णाचा वध होतो. कुंतीचा शोक अनावर होतो. 'पहिला पांडव' 'महारथी' असूनही कौरवांचा पक्ष त्याने स्वीकारल्यामुळे त्याचा नाश झाला. शि. म. परांजपे अशी ही कर्णाची करूण कथा येथे रेखाटण्याचा प्रयत्न करतात. पण कर्णाच्या स्वभावाचे यथार्थ आकलन न झाल्याने त्यांना नाटककार म्हणून यश लाभले नाही.[१६]

**परांजपे यांचे कर्णचित्रण :-**

कर्ण सेनापती होतो पण दुर्दैव त्याचा पाठलाग करीतच असते. त्यामुळे या युद्धात त्याची अखेर होते हा भाग 'पहिला पांडव' मध्ये येतो. मात्र धीरोदात्त, कर्तव्यकठोर, तत्त्वनिष्ठ या ऐवजी हा कर्ण उतावीळ, न्यूनगंडाने पछाडलेला परांजपे यांनी चित्रित केला आहे.

आपण सूतपुत्र आहोतं पण सेनापतीपद मिळावे यासाठी कोणी आपण क्षत्रिय आहोत असे सिद्ध करणारे आपणास भेटते काय? या विचाराने हा कर्ण व्याकुळ होतो.[१७] सेनापतीपदासाठी हा कर्ण उतावीळ झाला आहे. कर्णाला आकशवाणीच्या आधाराने त्याचे जन्मरहस्य कळते. कुंतीचे शिबिरात आगमन झाल्याने वा स्वतःच्या जन्मरहस्याच्या उलगड्याने त्याला आश्चर्यही वाटत नाही. उलट तो खोडसाळपणाची शंका घेतो. हा कर्ण एवढा दुबळा आणि भित्रा बनतो की तो स्वतःलाही दूषणे देतो.[१८]

तो द्रोणाचार्यांचे रक्ताने भिजलेले धड पाहून दचकतो. द्रोणाचार्यांचा वध पाहून तो म्हणतो 'किती हे रक्त अरेरे.' त्याला अभिमन्यूचे दिसणारे भूत, वृषसेनाला रणांगणावर येऊ नये असे सांगणे, कुंतीविषयी पडणारी स्वप्ने यामुळे कर्णाचे 'कर्णपण' हरपते.

कर्णवधाची ही शोकान्तिका उत्कट होण्यासाठी 'कर्ण-कुंती भेट' नाटककाराने लक्षवेधी बनविली आहे पण संपूर्ण नाटकात कुंतीच्या महनीयतेचा ठसा कुठेच उमटत नाही. कर्णकुंती भेटीच्या प्रसंगी शि. म. परांजपे यांनी या नाटकाच्या दुसऱ्या अंकात केलेले मानवी मनाचे विश्लेषण मोठे मनोवेधक आहे. 'मातृप्रेम की कर्तव्य' या तडाख्यात सापडलेल्या कर्णाची मनःस्थिती, कुंतीच्या मनातील कालवाकालव तीव्रतेने व्यक्त झाली आहे. कुंती म्हणते 'आईच्या अंतःकरणाची कल्पना कृष्णा, तुला नाही बरं!' कर्णाचे चित्रणही कुंती प्रमाणेच जिवंत व लक्षणीय झाले आहे. 'आई, क्षमा कर' म्हणणारा पश्चातापदग्ध कर्ण (पृ. ११२),

राधेबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा, शल्याला आलिंगण देणारा, मृत्यूला न भिणारा हे सारे प्रसंग कर्णाला मोठेपण देणारे आहेत. हा कर्ण मोठा आहे पण दु:स्थिती त्याचा पाठपुरावा करते. 'या माझ्या देहाला या विश्वासघातकी- पृथ्वीने गिळलेले नाही, तोपर्यंत हा कर्ण तुझ्याशी लढणार.' (पृ. १११) एकंदरीत महाभारतातील कर्णापेक्षा परांजपे यांचा हा 'पहिला पांडव' वेगळा आहे. त्यात काही कल्पना कर्णाच्या मनाचे औदार्य व मोठेपणा सूचिक करणाऱ्या असल्यातरी परांज्यांनी रेखाटलेले कर्णाचे नेभळे, विकृत चित्रण महाभारतीय कर्णाच्या तुलनेत आणि कलांतर्गत न्यायात समर्थनीय ठरत नाही. या कर्णचित्रणातून स्वत:च्या मनातील कल्पना राबविण्यापलिकडे फारसे काही व्यक्त होत नाही. मानवी मनाचे आणि जीवनाचे सामर्थ्य महाभारतातील कर्णाच्या जीवन-संघर्षातून जे व्यक्त होते ते येथे प्रत्ययाला येत नाही. याचा अर्थ महाभारतातील कर्णाप्रमाणे शि. म. परांजपे यांचा कर्ण मित्रप्रेम, शौर्य, औदार्य, नीचपणा, दुष्टपणा, इत्यादी गुणदोषांविषयी अजोड ठरत नाही.[१९]

**महारथी कर्ण : निर्मितीचे प्रयोजन:-**

औंधकरांच्या 'महारथी कर्ण' या नाटकात कर्णाच्या जीवनातील शोकनाट्याच्या चित्रणापेक्षा 'कुमारी माता आणि तिचा पुत्र' हे प्रमेय नाटकात मांडावे असा नाटककारांचा प्रधान हेतू दिसतो. ''या निर्दय जगात निरपराध कुमारी मातांना मुक्तकंठाने जनात रडायला सुद्धा वाव नाही, म्हणून निर्ल्लज्जपणानं मृत्यूला कवटाळायला ही कुंती आता उद्युक्त झाली आहे. कुमारी मातेला जवळ करणारा मृत्यूवाचून मायाळू कुणीच नाही, म्हणून 'कर्ण ह्या कुंतीचा पुत्र आहे, अशी सगळ्या कौरवपांडवांच्या शिबिरात कंठरवानं, निर्ल्लज्जपणानं आकांत करीत नितांत मृत्यूला कवटाळणार आणि माझ्या कर्णार्जुनांचं युद्ध थांबवणार!.''[२०] कुंतीने मोठ्या उद्विग्नतेने हे उद्‌गार कृष्णाजवळ काढले ते नाटकाच्या प्रयोजनावर प्रकाश टाकतात. कर्णाजवळ बोलतांना ही कुंती म्हणते, ''बाळा, रूढीच्या निष्ठुर तडाख्यात सापडलेली आपण मायलेकरं आहोत!.' निरपराध कुमारी मातांना आणि तुझ्यासारख्या कुमारी मातांच्या निरपराध लेकरांना समाजात दयेचं स्थान नाही, म्हणून जगात आपले कसे धिंडवडे निघत आहेत, आपापसात एकमेकांचे हे असे गळे कापण्याचे प्रसंग निर्माण होत आहेत ......अशा वेळी कर्णा, दुष्ट रूढी जळो. पण आपल्यासारख्या हतभागी मायलेकरांनी तरी एकमेकांकडं सद्‌यतेनं प्रेमळपणानं जिव्हाळ्यानं पाहायला नको का?''[२१] या कुंतीच्या उद्‌गारातून हाच निर्मितीचा हेतू स्पष्ट होतो.

**औंधकरांचे स्वतंत्र चिंतन :-**

महाभारतातील कर्णकथेच्या चिंतनातून औंधकरांना जे प्रतीत झाले ते त्यांनी 'महारथी कर्ण' मधून व्यक्त केले आहे. कुमारी मातांच्या प्रश्नावर आणि रूढीवर औंधकरांनी आपले लक्ष केंद्रित केले असले तरी ते भावोत्कटतेने कर्णजीवनातील प्रसंगांकडे पाहतात. कालभेदाचा प्रश्न त्यांनी गौण मानला.[२२] 'नाटकें ही प्रामुख्याने मनोरंजनाची साधने आहेत.' हीच औंधकरांची भूमिका येथेही आहे.

कर्णाच्या राज्याभिषेक प्रसंगाने औंधकरांनी या नाटकाची मोठी औचित्यपूर्ण सुरूवात केली आहे. पार्थांचाही पार्थ शोभणारा हा कर्ण शकुनीमामांना स्पष्ट शब्दांत खडसावतो, 'बस करा मामा ही तुमची स्वाभिमानशून्य चतुराई!' नुसत्या कोल्ह्याच्या चतुराईनं सर्वच कार्यभाग साधता, तर जगांत सिंहाची निपजच झाली नसती.'[२३] कर्णाचा शकुनी मामावरील हा हल्ला त्याच्या शौर्याला साजेसा आहे, अधिक उजाळा देणारा आहे. कर्णाच्या जीवनात दुर्योधनाला 'उपकर्ता' म्हणून विशेष स्थान आहे या निमित्ताने येथे सामाजिक विषमतेवर भाष्य येते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात कर्णाच्या व्यक्तिमत्त्वाला सामाजिक विषमतेच्या संदर्भात औंधकरांनी जाणले आहे.[२४] त्यांनी पुढे कर्णाच्या व्यक्तित्त्वाच्या गाभ्याला स्पर्श केल्यामुळे, कर्णाला निव्वळ प्रतिनिधि-स्वरूप प्राप्त होत नाही तर एक 'माणूस' म्हणून जिवंतपण लाभते. 'जर प्रतिकूल परिस्थितीत सावरले तर अनंतकाळ ते हृदयात कोरले जाते.' कर्णाच्या हृदयात दुर्योधन असेच हे स्थान मिळवू शकला. यामागे दुर्योधनाचा हेतू मोठा शुद्धच होता असे नाही, आपल्या शत्रूचा शत्रू म्हणून तो मित्र होऊ शकतो. अशी दुर्योधनकर्णांची मैत्री जुळली आहे. 'जगांत जन्मापेक्षा गुणांवरूनच माणसाची योग्यता ठरली गेली असती, तर कितीतरी यातनांचा नाश झाला असता.' कर्णाच्या निमित्ताने मराठी साहित्यिकांनी एक महत्त्वाचा विचार येथे व्यक्त केला आहे. त्यांनी 'मदायत्तं तु पौरुषम्' हे सूत्र कर्णाच्या जीवनातून शोधले आहे.

**करुणमूर्ती कर्ण :-**

औंधकरांच्या या नाटकात कर्ण आणि कुंती यांच्या हृदयांत चाललेल्या खळबळीचे अंतर्द्वंद्वाचे हृद्य आणि परिणामकारक चित्रण रेखाटलेले आढळते.

कर्णाने 'कर्तव्यनिष्ठा की कुलक्षय?' ह्या द्वंद्वातून कर्तव्यनिष्ठा स्वीकारून आपली सुटका करून घेतली. या 'नाटकात वर्णिलेले कर्णाचे व कुंतीचे चरित्र इतके करूण व हृदयस्पर्शी आहे की, जरी हे पौराणिक नाटक असले तरी, एखाद्या सामाजिक नाटकाइतकेच जिव्हाळ्याचे वाटते.'

येथे भावनाप्रधान, कर्तव्यनिष्ठुर, उदार कर्णाचे स्वभावचित्र आहे तर 'लोकलज्जा की पुत्रप्रेम' या कैचीत सापडलेल्या कुंतीचे स्वभावचित्र येथे आढळते. त्यात खरोखर नीच बुद्धीचा शकुनीमामा वर्णिला आहे.

राधा आणि कुंती यांच्या भेटीचा प्रसंग नाटककाराने नव्याने चित्रित केलेला आहे. त्यांच्या नाजुक भावबंधाचे आगळे दर्शन या प्रसंगातून घडते. औंधकरांनी या नाटकात कुंतीविषयी विशेष सहानुभूती दाखविली आहे.

या नाटकात कर्ण आपली व्यथा राधेजवळ व्यक्त करतो ही गोष्ट वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'आमची मने भावनांनी बेभान होतात म्हणून आम्ही शूर असतो.' हे कर्ण राधेला सांगतो. राधाकर्णसंवाद येथे लक्षणीय व नावीन्यपूर्ण आहे.

जन्मवृत्तान्त सांगण्यासाठी कृष्ण कर्णाला स्मशानात घेऊन जातो ही औंधकरांनी शोधलेली एक नवी कल्पना आहे. त्यातून पुढची भीषणता लेखकाला सूचित करावयाची होती असे दिसते. कृष्ण धीरगंभीर सागराशी कर्णाची तुलना करताना म्हणतो, 'सागर क्वचित खवळतो पण मग साऱ्या जगाला गिळंकृत करतो तसे तर तुमचे होणार नाही ना? कृष्णाने बोलून दाखविलेल्या या शंकेतून कर्णाचे सामर्थ्य व्यक्त होते. कर्णाचे व्यक्तिमत्त्व अधिकच उठावदार होते. 'फक्त सूताहून मी नीच की उच्च आणि तो कसा एवढंच तुमच्या मुखातून ऐकायचं आहे. ही उत्सुकता कर्णाला लागून राहिली आहे. कृष्णाने जन्मरहस्य सांगितल्यावर कर्णापुढे मोठा पेच निर्माण होतो. 'मित्रघात की वंशघात?' काय पत्करावे?'[२५]

कुंतीविषयी कर्णाचा अपसमज होऊ नये म्हणून कृष्ण सांगतो, 'कुंतीने व्यभिचार केला नाही तर .....'अजाणतेपणी नाही....नाही... म्हणत असता, त्या तेजोनिधी सूर्यनारायणाच्या अट्टाहासाला कुंती अनिच्छेने, निरुपायानं बळी पडली आणि तुमच्यासह बिचारीच्या सुखाची राखरांगोळी झाली.'[२५] या कृष्णाच्या उद्‌गारातून कुंतीसंबंधीची अनुकम्पा प्रगट होते. म्हणूनच या नाटकात या प्रसंगाला महत्त्व आहे. कृष्ण शेवटी कर्णाला सार्वभौमत्वाचे प्रलोभन दाखवितो पण कर्णाने यावेळी दिलेले प्रत्युत्तर त्याच्या बाणेदारवृत्तीचे दर्शक आहे.[२६] शब्दाला जागणाऱ्या करारी कर्णाचे चित्र येथे औंधकरांनी अधिकच खुलविले आहे.

तो जन्मदात्या आईलाही आपली वेदना बोलून दाखवितो. कर्ण म्हणतो, ''अरे, आपलीच पिलं आपण खाऊन टाकणारी वाघीण सुद्धा आपल्या पिलांच्या यातनांचा क्षणार्धात अंत करून टाकते. पण माझी जन्मदात्री मात्र अनंत काळ यातना देण्यासाठीच जणूं काय माझा जिवंत त्याग करते.''[२७] महाभारत-कथेतील संघर्षाला आपल्या समर्थ प्रतिभाशक्तीने औंधकरांनी येथे आविष्कृत केले आहे.

कर्णाची असह्य वेदना येथे जाणवते. कर्ण सदोदित द्वंद्वात सापडलेला आहे. त्याच्यासमोर 'मित्रप्रेम की मातृप्रेम' असा पेच निर्माण झाला आहे. शेवटी तो कृष्णाला म्हणतो, 'कृष्णराज, न कळत बरा वाईट जो काही मार्ग मी चाललो आहे तोच अखेरपर्यंत आता मला चालू द्या. आयुष्यारंभ कुठून झाला हे जसं कळलं नव्हतं तसा आता माझ्या चरित्राचा शेवट कुठे होणार हेही मला कळेनासं झालं आहे.' (पृ. ४०) यात कर्णाची व्यथा तीव्र रूप धारण करते. कर्णाचे हे उद्‌गार अस्तित्ववादाच्या तत्त्वज्ञानाची आठवण करून देणारे आहेत. औंधकरांनी आपल्या 'महारथी कर्ण' नाटकात कर्णावर मातृत्त्वाचा अधिकार असणाऱ्या 'राधा आणि कुंती' या दोघींना कल्पनेने एकत्र आणून त्यांच्यांत सुसंवाद घडविला आहे.' या प्रसंगांच्या निर्मितीने मानवी जीवनाचे नवे पैलू प्रकाशात आणण्यात औंधकरांना यश लाभले, शिवाय राधेच्या मनाची थोरवी त्यातून साकार झाली आहे.

'आई न झालेलं पुरवलं. पण आई होऊन आईपण मुकण्याचा प्रसंग येणं अगदी वाईट असतं बघा!'.. कुंतीच्या मनाला दुभंगून टाकणारे हे वंध्या राधेचे उद्‌गार आहेत. नाटककाराची ही नवी कल्पना लालित्यपूर्ण आणि हृदयस्पर्शी आहे.

'आशेच्या तंतूंनी जगताची रंगभूमी रंगलेली आहे. अजाणता अनिच्छेने घडलेल्या या अनीतीचे दुःख फार भयंकर आहे. जाणूनबुजून अनीती केली तर शिक्षा भोगतांना अनुचित काही घडते असे वाटत नाही.' कुंतीच्या व्यथेवर एक मायेची फुंकर घालण्याचा येथे प्रयत्न दिसतो.

**प्रतिभेची शलाका :-**

औंधकरांच्या प्रतिभेने 'राधाकुंती भेट', 'कुंतीच्या अपराधाचे परिमार्जन' या नव्या प्रसंगाच्या निर्मितीबरोबरच एक नवे प्रमेयही येथे मांडले आहे. कर्ण-त्यागाच्या समर्थनाची एक नवी बाजू या निमित्ताने पुढे आलेली आहे.

ही कुंती, कर्णाला म्हणते की मी तुझा जीव घेण्यासाठी तुला गंगेच्या प्रवाहात लोटले नाही तर उलट तुला जगात तारण्यासाठी, अब्रू मिळावी म्हणून तुझा त्याग केला होता.(पृ. ७०) साहित्यिकांचे संवेदनशील मन महाभारतातील एकाच प्रसंगातून कशा भिन्नभिन्न संवेदना आणि सूचना टिपते, याचे हे उत्तम उदाहरण आहे. 'कुमारी मातेचा पोर म्हणून बेअब्रू होण्यापेक्षा सुखाने एखाद्या कुटुंबात तू पाळला जाशील'. त्यागाच्या मुळाशी आईची ही सद्‌भावना होती असे आपल्या प्रतिभेच्या उन्मेषाने औंधकरांनी दर्शविले आहे.

येथे कर्ण पराक्रमी दाखविण्यासाठी श्रीकृष्णानेही त्याच्याशी युद्ध करणे अवघड

मानले आहे. 'टाळी कधी एका हाताने वाजत नसते.' असे म्हणून कृष्ण आपली बाजू मांडतो. महाभारताला अनुसरणाराच शेवटचा प्रसंग आहे. 'अधर्मीयांसाठी अधर्म स्वीकारल्यावाचून गत्यंतर नाही.' या न्यायाने कृष्ण कर्णवध घडवून आणतो.

मृत्युसमयी कर्ण कृष्णाला विचारतो, 'मला पार्थाने खरंच जिंकले कां?' तेव्हा कर्णाविषयी कृष्णाने काढलेले उद्‌गार मननीय आहेत. तो म्हणतो, 'कर्णा, तुला कुणीच जिंकले नाही.... तू अजिंक्य आहेस.' या प्रसंगानंतर माणसाला जीवनाच्या शेवटी लागणारी तत्वज्ञानाची ओढ या कर्णालाही मनुष्य स्वभावानुसार लागते. सांगाडा महाभारताचा आहे पण नवा प्राण ललित लेखक कसा भरू शकतो याचा प्रत्यय येथे येतो.

**कर्णाची अखेर :-**

'महारथी कर्ण' मधील कर्णाचा शेवट लक्षवेधी आहे. कर्ण आपल्या अपयशी मृत्यूची कारणमीमांसा कृष्णाला एक तत्वचिंतक म्हणून विचारतो. तेव्हा कृष्ण सांगतो, - 'गुणाने दुर्गुणाची फळे दिल्याने शेवटी ते दुर्गुणच ठरतात, म्हणून नाश संभवतो. तू कौरवाच्या नादी लागल्यामुळे हे घडून आले.' कर्णाच्या अखेरच्या क्षणी कुंतीच्या मातृत्वाला पाझर फुटतो आणि तीही आपले हृदय मोकळे करते.

'कर्णा!, रूढीच्या वणव्यात सापडलेली निरपराध मायलेकंर आपण, जन्मभर मनातल्या मनात जळून राख झालो. पण आज जनमनाची, लौकिकाची, सारी कांही लाजलज्जा गुंडाळून ठेवते आणि कर्णा, माझ्या लेकरा, म्हणून तुला मुक्तकंठानं साद घालते. कर्णा, माझ्यासारख्या निरपराध कुमारी माता आणि तुझ्यासारखी कुमारी मातांची निरपराध संतती ह्यांना या निष्ठुर जगानं आजवर दया दाखविली नाहीच, आणि भविष्य काळात कधी दया दाखवील की नाही हेही सांगवत नाही.' (पृ. ९१)

औंधकरांनी या नाटकात निरपराध संततीविषयी कणव निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. कर्णाविषयीची खरी जाणीव या भडक, आक्रस्ताळीपणातून होत नाही. त्याच्या व्यक्तित्वाच्या गाभ्याला स्पर्श केल्यानेच हे शक्य होते. नाटककाराचा मात्र कुमारी मातेच्या प्रश्नाकडे येथे कुंतीच्या रूपाने लक्ष वेधण्याचा प्रयत्न आहे. असहाय्य कुमारी माता आणि त्यांची निरपराध संतती यांना समाजात पदोपदी सोसावी लागणारी अप्रतिष्ठा आणि त्यामुळे त्यांच्या मनाची होणारी दयनीय स्थिती; याचे चित्र नव्याने निर्माण करण्याचा प्रयत्न महाभारतातील कर्णकथेच्या माध्यमातून येथे नाटककाराने केला आहे.

**'कौंतेय' : एक भावनाट्य :-**

'कर्णकुंती-भेट' केवळ या एकाच प्रसंगावर वि. वा. शिरवाडकरांचे 'कौंतेय'

हे नाटक आधारित आहे. कर्ण आणि कुंती यांच्यातील उत्कट शोकात्म नाट्य येथे साकार झाले आहे. 'कर्ण आणि कुंती' ज्या तऱ्हेने कविहृदयाच्या शिवरवाडकरांना प्रतीत झाले त्याच तऱ्हेने 'कौंतेय' नाटकात प्रगट झाले आहेत.

महाभारतातील प्रसंग आधाराला घेऊन या प्रसंगाला स्वत:च्या प्रतिभाविलासाने त्यांनी चिरंतन भावनाट्याचे स्वरूप प्राप्त करून दिले आहे. विशाल मानवी जीवनाचे आणि मानवी मनाचे धर्म त्यात मिसळले आहेत. 'कर्णकुंती' भेटीच्या प्रसंगात शिरवाडकरांनी नवा प्राण भरून या नाटकात त्याची उभारणी केली आहे. महाभारतीय कथानकाला ही एक नवी संजीवनी प्राप्त करून दिल्याने महाभारताचे आवाहन वाढते, महाभारत वाढते आणि मराठी प्रतिभावंतांच्या प्रतिभेचा साक्षात्कार घडतो.

**मौलिक भूमिका :-**

'कौंतेय' नाटकाच्या निर्मितीविषयीची आपली अत्यंत मौलिक भूमिका शिरवाडकरांनी या नाटकाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत स्पष्ट केलेली आहे. ती मूळातूनच पाहण्यासारखी आहे. "कर्णाचे जीवन हा महाभारतातील एक अत्यंत नाट्यानुकूल असा विषय आहे. मराठीमध्ये आतापर्यंत तीनचार लहानमोठी नाटके कर्णाच्या चरित्रावर लिहिली गेली आहेत. आज त्यात आणखी एका नाटकाची भर पडत आहे. नाटकाच्या दृष्टीने कोणताही नाट्यपूर्ण विषय कधी जुना होऊ शकत नाही. त्यातील नाट्यातच त्याचे चिरस्थायी नावीन्य भरलेले असते.

'पहिल्या बाजीरावाप्रमाणेच कर्णाच्या चरित्रातील शोकान्त नाट्याचेही गाढ आकर्षण मला कित्येक वर्षांपासून वाटत आले आहे. त्या आकर्षणातून ह्या नाटकाचा जन्म झाला आहे. हे नाटक म्हणजे समग्र 'कर्णपर्व' नव्हे. कर्ण आणि कुंती यांच्यांतील संबंधाचे सूत्र घेऊन त्यावरतीच नाटकाची उभारणी करण्यात आली आहे."[२८] 'कौंतेय' नाटकाच्या उभारणीचे सूत्र आणि सारे मर्म या प्रास्ताविकातून व्यक्त झाले आहे.

'कर्णकुंतीभेटीच्या' प्रसंगाच्या चिंतनातून साकार झालेले शिरवाडकरांचे अनुभवविश्व हीच त्यांची लालित्यपूर्ण नवनिर्मिती महाभारताचे लोकभिमुख, वर्धिष्णू स्वरूप स्पष्ट करणारी आहे.

**कलात्मक आविष्कार :-**

'सूर्यपुत्र' कर्णाची ही नाट्यकथा कलात्म सूचकतेने अवतरली आहे. सूर्य अस्ताला गेला म्हणून कौरव वाचले. 'सूर्य' आणि 'सूर्यपुत्र' दोघेही कौरवांच्याच बाजूचे आहेत. द्रोणवधानंतर कर्णपर्व सुरू होते. कर्णाच्या सेनापती होण्यालाच काही जनांचा विरोध असतो. 'रथाकार सेनापती चालेल काय ?' नाट्याला प्रारंभ

या संघर्षाने झाला आहे. एकच कथानक अनेक प्रतिभावंतांच्या दृष्टीने ठिकठिकाणी तोडून-जोडून वापरले जाते. 'कौंतेय' च्या या प्रारंभाने संघर्षमयतेची जणू खूणगाठ बांधली जाते. दुर्योधन कर्णाचा पाठीराखा बनून भाष्य करतो. नाट्यकथानकाला येथे एकदम कलाटणी मिळते.[२९] दुर्योधन म्हणतो, 'हा लढा तर सत्याचा आणि असत्याचा आहे. संस्कृतीचा आणि रानटीपणाचा आहे.' म्हणूनच या दुर्योधनाला उपेक्षिताचा साथीदार होऊन पांडवांवर विजय मिळवायाचा आहे. 'दुर्योधन अधर्माने कधी वागला नाही.' ही त्याची घमेंडखोर भूमिका येथे आहे.

इतिहास काही का नमूद करेना पण 'कौरवांचा पक्ष हाच सत्याचा पक्ष आहे.'[३०] असे ठामपणे सांगणाऱ्या दुर्योधनाचा अपेक्षाभंग होतो. कर्ण सेनापती जाहीर होताच दुर्योधनाच्या अपेक्षेप्रमाणे त्याचा जयजयकार होत नाही. उलट या निर्णयासंबंधी कुजबुज व्हायला लागते. हा झगडा प्रस्थापित-प्रतिष्ठित आणि अप्रस्थापित-अप्रतिष्ठित यांच्यामधील आहे. कर्णाच्या जीवनातील कारूण्याला नाटकाच्या आरंभापासूनच सुरवात होते. प्रत्येकजण आपला विरोध स्पष्ट शब्दात नोंदवितो. तोही कर्णाच्या कानावर पडत असताना कर्णाच्या पुढील साऱ्या भावनिक उद्रेकाची ही येथे पार्श्वभूमी आहे. कानात रस ओतावा एवढ्या वेदना ते सारे ऐकून कर्णाला झाल्या.[३१]

कर्णावर एकनिष्ठ भक्ती करणाऱ्या 'जांघिल' या नव्या पात्राची नाटकात निर्मिती करून येथे नाटककाराने कर्णाची बाजू सावरली आहे. शिरवाडकरांच्या 'नटसम्राट' नाटकात, 'नटाची ओळख नटालाच असते' असे म्हणून नटसम्राटावर जिवापाड प्रेम करणाऱ्या विठोबा प्रमाणेच 'जांघिल' हे पात्र कर्णभक्त आहे. कर्णालाही न जुमानता जांघिल आवेगाने भर सभेत बोलू लागतो. 'माणसाचं मोल डोक्यावरच्या मुकुटांनी आणि गळातल्या जडजवाहरांनी होत नाही. त्याच्या अंत:करणातल्या माणुसकींनी आणि मनगटांतल्या पराक्रमांनी होतं! आपली राजवस्त्रं उतरवून कर्णाच्या सान्निध्यात एक दिवस राहा म्हणजे कळेल माझ्या मालकाची पात्रता.' (अंक १, प्र.१, पृ. १५). मूळ महाभारतातील कर्णकथेचा हा काव्यात्म व भावोत्कट आविष्कार नाटकभर आढळतो. प्रसंगनिर्मितीतील हे सामर्थ्य प्रतिभाजनित आहे. आखिल मानववेदना या निमित्ताने जिवंत होते.

**अपमानित कर्ण :-**

सूतपुत्रत्वाच्या सभेतील उल्लेखाने अपमानित झालेला 'कर्ण' जांघिलाला कळवळून म्हणतो, 'या राजेरजवाड्यांच्या दरबारात तुझ्यासारख्या शिपायांना बोलण्याचा अधिकार नाही. शिपायांचा अधिकार फक्त रणांगणावर आणि तोहि मरण्यापुरताच.'(पृ. १६) ....अरे! कर्णानं आजवर इतका अपमान सहन केला आहे की, आता कोणीही

त्याच्या नकळत सावरण्याचा प्रयत्न करीत असताना दिसते.

'कर्णाच्याच काय, कुणाच्याही कुळाची जन्माची अशी कुचेष्टा करणं हे पाप आहे रे' (पृ. ३२) 'कर्दमात उमललेलं कमळ आपल्या सौंदर्याच्या व सुगंधाच्या बळाने देवाच्या पायापर्यंत पोहचू शकतं!', (पृ. ३२) अगतिक होऊन परोपरीने ती हे सांगते. बोलण्याच्या ओघात 'आईच्या अंत:करणाची माया इतरांना कळावयाची नाही, असेही म्हणते.' पुन्हा आपले अनवधानाचे अनावर बोल सारवासारव करून मिटविते.

कर्णाविषयीच्या वात्सल्याने तिचे मन आक्रंदून उठते. ती कर्णाला भेटण्याचा निश्चय करते. कुंतीच्या या व्यथेशी समरस होणारे कोणी नाही. उलट भीम आपली कर्णाविषयीची प्रतिक्रिया दाहक शब्दांत व्यक्त करतो.[३४]

जांघिल, वासंतिका यांच्या प्रदीर्घ संवादातून कर्णाला दैव भीषण यातना देत आहे हे समजते. नाही तर त्याचे शत्रूही कर्णावर प्रेमच करणारे आहेत. कर्णाचे काळजाला घरे पाडणारे आणि त्याची सारी व्यथा जिवंत करणारे प्रदीर्घ स्वगत दुसऱ्या अंकात आहे. माधवीशी झालेल्या संभाषणात त्याचा हा तीव्र उद्वेग व्यक्त होतो.[३५] त्यातून कर्णाची सारी व्यथा व्यक्त होते. कुंती कर्णाच्या भेटीसाठी येते त्यावेळी नाटककाराने वासंतिकेच्या तोंडून मोठे सूचक उद्गार वदविले आहेत. 'दैव कधीही पराभूत होत नसते, ते कधीही कोणत्याही रूपाने उभे राहते.' हे वाक्य उच्चारताक्षणी कुंतीचे आगमन होते. जणू देवच कुंतीच्या रूपाने आपला पिच्छा पुरवीत आहे ते येथे नाटककाराने मोठ्या कलात्मकतेने सुचविलेले आहे. मराठी साहित्यिकांची प्रतिभा महाभारताला विविध आकार देण्याचे आणि त्यातील सौंदर्य वाढविण्याचे कार्य अशा तऱ्हेने करते.

कर्णाला भेटीसाठी येणाऱ्या स्त्रीसंबंधी कुतूहल आहे. सहज तो माधवीला म्हणतो, 'इतकी वर्षे अंधारात दडून राहिलेली माझी ती आईही असू शकेल.' (पृ.४८) आणि ते खरे असतेही! या नाट्यात्म प्रसंगातून मनोविश्लेषण प्रभावी होते.

**'कर्ण-कुंती' भेट :-**

कर्ण मानीव माता समजूनसुद्धा कुंतीला पांडवांच्या जिवाचे दान द्यायला तयार आहे, पण कुंती जेव्हा त्याला सत्य पटवून देण्याचा प्रयत्न करते, तेव्हा सत्य अप्रिय असतं म्हणतात पण इतकं विलक्षण, इतकं भीषण असू शकणार नाही. [३६] असे उद्गार कर्णाच्या तोंडून निघतात. त्याचा विश्वास बसत नाही, एवढे विलक्षण भीषण हे सत्य असते. 'साठवलेलं मला रडू दे आई' असे म्हणून कर्ण आपले मन मोकळे करतो. कोणत्याही सर्वसामान्य आई आणि

मुलाच्या भेटीत जे घडेल तेच येथे घडते. शिरवाडकरांच्या प्रतिभेची ही किमया आहे. काळजाला स्पर्श करणारी ही कर्णकुंती भेट झाली आहे. पाहता पाहता कर्ण मात्र 'बंधुद्रोह की मित्रद्रोह' या पेचात सापडतो. या कर्णकुंतीच्या संवादात भावोत्कटता आहे. या नाट्यात्म प्रसंगावर काव्यात्मता आपले प्रभुत्व गाजविते. शिरवाडकरांनी या प्रसंगाच्या निमित्ताने मातृत्वाच्या कल्पनेवर आघात करून एक अप्रिय, वास्तव, भीषण सत्य उजेडात आणले आहे. 'पार्थिव लालसेला धार्मिक हेतूनं शृंगारण्यासाठी मातृप्रेमाचा बडेजाव आहे. कर्णाची येथे व्यक्त झालेली ही व्यथा व्यापक रूप धारण करून साऱ्या उपेक्षितांची व्यथा होते. महाभारतातील कर्णकुंतीभेटीच्या प्रसंगाचा आलेख, नाममात्र तपशील आधाराला घेऊन शिरवाडकरांनी मानवी मनाचे आणि जीवनाचे मूलभूत सखोल चिंतन येथे केले आहे. कर्ण पश्चात्तापदग्ध मनाने कुंतीचे निरागसपण शेवटी मान्य करतो.[३७]

'ज्यांच्या आईबापांचा राजरोस पत्ता जगाला ठाऊक नाही, अशा शेकडो लोकांना दारिद्र्याच्या व उपेक्षेच्या गर्तेतून वाट काढताना ही सगळी संकटं सहन करावी लागतात?'[३८] असा हा प्रश्न विस्तारत जातो. साक्षात आई आपल्यासमोर अश्रू ढाळीत उभी असताना हा विवेक कसा स्फुरला नाही, याचे कर्णाला मागाहून दु:ख होते.

**स्वतंत्र कल्पकता :-**

शिरवाडकरांनी, पश्चात्तापदग्ध, अनावर कर्ण पुन्हा पांडवांच्या छावणीत जाऊन कुंतीला भेटतो, हा स्वतंत्र व कल्पित प्रसंग योजिला आहे. कलात्मक भावनिक पातळीवरून या प्रसंगाकडे पाहिले तर तो पटतो. खूप वर्षानंतर भेटलेल्या आईला कर्ण रागाच्या भरात बोलून जातो, पण ती निघून गेल्यावर त्याला तिची असहाय्यता जाणवते. म्हणून तो दुसऱ्या दिवशी पुन्हा तिची भेट घेतो. नाटककाराने आपल्या भावनाटचाच्या परिणामकारकतेसाठी या न घडलेल्या भेटीच्या प्रसंगाची नव्याने येथे निर्मिती केली आहे. नाट्यांतर्गत लयीत ही पुनर्भेट सामावणारी आहे.

कुंतीच्या महालात जाऊन कर्ण कुंतीला म्हणतो, 'मी आलो.' तेव्हा स्वत:च्या तंद्रीत मग्न असलेल्या कुंतीला क्षणभर आपल्या अंत:करणातील घोषच कानावर पडतो असे वाटते. मनात बिंबलेले प्रत्यक्षात दिसूनही त्यावर विश्वास बसू नये, अशी तिची स्थिती होते. या प्रसंगात कुंतीची मन:स्थिती फार प्रभावी रीतीने साकार झाली आहे.

कर्णाचे दुर्दैवाला शरण जाणारे हे चित्र नाही. म्हणून तो विरोधकांच्या शिबिरात जाऊन आपल्या आईला भेटतो.

'कुरूक्षेत्रावरच्या राजकारणाचं काहीही होवो. माझं हरवलेलं ऐश्वर्य आज

मला पुन्हा परत मिळालं!' 'हेच खरे ऐश्वर्य' शिरवाडकरांनी येथे अभिव्यक्त केले आहे.

खरे निर्व्याज प्रेम हक्क सांगत नाही याचा प्रत्यय या 'कर्णकुंती'च्या भावपूर्ण भेटीत होतो. कर्ण स्वतः होऊन उमद्या मनाने मी अर्जुनाशिवाय अन्य पांडवांना मारणार नाही असे वचन देतो. 'बंधुद्रोह आणि मित्रद्रोह' टाळण्याचा हाच मार्ग या 'कौंतेया'ला अखेरीच उलगडतो. एका नाट्यमय प्रसंगाची योजना शिरवाडकरांनी येथे केली आहे. कर्णकुंती भेटीच्या वेळी नेमका भीम कुंतीच्या महालात येतो, तेव्हा भीमाने केलेली कर्णाची आणि त्याच्या कुळाची निर्भर्त्सना सहन न होऊन तो प्रतिकारासाठी प्रगट होतो. भीम कर्णाचा निर्घृण अपमान करीत असूनही आपले नाते कुंती अस्पष्टच ठेवते.[३९] कर्ण आपल्याच भावांचा पाशात अडकलेल्या विजयाने आणि आईच्या आसवांच्या आठवणीने येथे धास्तावलेला दिसतो. आपल्याला अर्जुनाच्या हातून मरण येते, हे भाग्य मानून त्याने आयुष्याची शेवटी का होईना पण भाग्याची गाठ पडल्याबद्दल उपकर्त्या दुर्योधनाचे ऋण मान्य केले व मगच आपले प्राण सोडले आहेत. प्रत्यक्ष आपली आई आणि भावांच्या सहवासात कर्णाचा झालेला करूण अंत अंतःकरणाला जाऊन भिडतो. 'कौंतेय' या दृष्टीने एक परिणामकारक शोकनाट्य म्हणून यशस्वी झाले आहे. त्यातील कर्णाची व्यक्तिरेखा नव्याने जिवंत व सामर्थ्यसंपन्न झाली आहे.

**मूलभूत मानवी जीवनाचे चिंतन :-**

कर्णकुंतीसंवादाच्या निमित्ताने वि. वा. शिरवाडकरांनी 'कौंतेय' नाटकात मूलभूत मानवी जीवनाचे आणि मनाचे चिंतन केले आहे. कर्ण आणि कुंती यांच्यापुरते मर्यादित हे चिंतन राहत नाही, तर त्याची पाळेमुळे मानवी जीवनात खोलवर रूजलेली आहेत.

कुंतीच्या मनाची कुचंबणा तिच्या अगतिक आणि सावध वृत्तीतून येथे व्यक्त झालेली आहे. 'कर्ण व कुंती' यांच्या मनाची झालेली कोंडी ही सर्वांच्याच भावनांना आवाहन करणारी आहे. पाहता पाहता आरंभीचा दमदार कर्ण शेवटी कमालीचा हळवा बनतो. 'मातृत्त्व कधीही हीन असू शकत नाही!' (पृ. ७२) असे उद्गार काढतो. कर्ण स्वतःला 'कर्मजात सारथ्याच्या खोपटात वाढलेला दरिद्री, बिनबापाचा' (पृ ४७) असे समजतो. शिरवाडकरांनी कर्णाच्या मनातील ही भावनेची तीव्रता वर्तमान परिस्थितीतील सामाजिक वलयाच्या संदर्भात अधिक वाढविली आहे. म्हणून ही कुंती व कर्णाची भेट येथे प्रतीक बनते. असे हे शिरवाडकरांचे अनुभवविश्व पुराणकथेशी आणि व्यक्तींशी बांधले जाऊन येथे जिवंत होते. हे भावविश्व महाभारताच्या नव्या आविष्काराला जन्म देते. नाट्यानुभवाचा कलात्मक एकजिनशीपणा अबाधित राहून हे घडते. म्हणून या चिंतनाला महत्त्व

स्वातंत्र्य ललित लेखकाला आहे. शिरवाडकरांनी 'कर्ण आणि कुंती' या दोन असामान्य व्यक्तींच्या जीवनातील बिकट समस्येमुळे निर्माण झालेल्या प्रसंगाचे चित्रण अत्यंत यशस्वीपणे केले आहे.

भावनिक संघर्षाची, भव्योदात्ततेची, हृदयाचा वेध घेणाऱ्या नाट्याची काव्यानुकूल व्यक्तित्वाच्या शिरवाडकरांना विलक्षण ओढ आहे. त्यांच्या स्वतंत्र प्रतिभेने एक प्रभावी भावनाट्य या कर्णकथेतून साकार केले आहे.

**काव्यमय भावाचा शोध :-**

'दुर्गा भागवत', 'इरावती कर्वे' यांचे महाभारतावर आधारित लेखन लालित्यपूर्ण, चिंतनात्मक, संशोधनात्मक निबंध वजा ललित गद्य आहे. 'इरावती कर्वे' यांच्या लेखनात सामाजिक व मानववंशशास्त्र विषयक चिंतन विशेष जाणवते, तर दुर्गा भागवतांच्या 'व्यासपर्वा'त[४४] झाकाळलेल्या काव्यमय भावाचा शोध घेतला आहे. भारतीय मनाला महाभारताचा फार मोठा आधार आहे. पण या आधाराकडे पाहण्याची प्रत्येकाची दृष्टी स्वतंत्र व वेगळीच आहे. अनेक हातांनी रचलेल्या आणि अनेक कालखंडात विभागलेल्या पण तरीही लालित्याने विनटलेल्या या प्रचंड साहित्यकृतीचा, अभिजात सौंदर्यग्राहकतेच्या, कलात्मकतेच्या व वाङ:मयीन मूल्याच्या, लालित्याच्या निकषाने परामर्श सुद्धा घेतला गेलेला नाही, आस्वाद तर नाहीच नाही. दुर्गा भागवतांनी अभिजात कलात्मक जाणिवेने महाभारताचे आकलन 'व्यासपर्वा' त केले आहे.

तत्त्वज्ञ, पंडित व राजकारणपटू इत्यादींनी आपल्या आवडीच्या जीवनक्षेत्राच्या समर्थनासाठी महाभारताचा अर्थ विविध प्रकारांनी लावला, त्यामुळे संस्कृतीविषयीच्या विचारांचे क्षितिज रूंदावले. संस्कृतीच्या कक्षा वाढल्या. परंतु महाभारतातील काव्यमय भावाचा शोध कलावंताच्या हृदयाने घेण्याचा प्रयत्न मनापासून दुर्गा भागवतांनी केला आहे. याचा प्रत्यय त्यांच्या व्यासपर्वामधील सर्वच लेखांतून येतो. व्यासपर्व हे महाभारतातील व्यक्तींचे काव्यमय, ललितरम्य आकलन आहे.

दुर्गाबाईंना ज्ञानाचे वैदग्ध्य, मानवी व्यवहाराची जटिलता, कथेचा प्रबळ ओघ, विलक्षण आणि विशाल पात्रांचे परिमाण, हे महाभारताचे सामर्थ्य असले तरी महाभारतातील कलाकृतीचे भान ठेवणे अत्यावश्यक आहे असे वाटते. या दृष्टीनेच त्यांनी महाभारतातील पात्रांचे परिमाण, त्यांचे आकार आणि संपूर्ण महाभारत-कथेतील त्यांचे प्रयोजन शोधले आहे. 'एकाच प्रज्ञेच्या स्फुरणातून धर्म, ज्ञान व कलानुसंधान या अद्वितीय ग्रंथात सामावले आहे.'[४५] हे दुर्गा भागवतांनी अचूकपणे हेरलेले आहे. महाभारतातील या कलानुसंधानाचेच दुर्गा भागवतांच्या

कर्ण आणि द्रौपदी यांच्या संबंधाचा उल्लेख कृष्ण करतो, त्यावेळी कोणताही मोह कर्णाला होत नाही. त्यांनी या प्रसंगाच्या निमित्ताने कलात्मक भाष्य केले आहे. 'एकाकी' कर्णाच्या त्यांच्या चित्रणाच्या मुळाशी हीच कलात्मकतेची प्रेरणा आणि बीजे जागोजाग आढळतात. आयुष्यभर कर्ण स्वाभिमानाने वावरला.[४९] दुर्गाबाईंना कुंतीने केलेला कर्णाचा त्याग हा प्रसंग एकूण महाभारतात सर्वांत अधिक भावोत्कट, काव्यमय, आणि कोमल म्हणून जाणवतो. त्यांना सगळ्या विश्वाला द्रवविणारा, कारूण्याने भरलेला हा प्रसंग वाटतो. पारंपरिक नैतिकता व जातीयवादावर येथे त्या प्रकाश टाकतात.[५०] 'कर्ण एकाकी आहे. सुळक्यासारखा उंच होत गेलेला. पण सर्वांच्या वेदनेचे, अभिमानाचें,पराक्रमाचे आणि नेकीचे प्रतीक मात्र कर्ण हा एकच आहे यात शंका नाही.'(पृ.७०) दुर्गाबाईचे मुख्येत्वेकरून कर्णासंबंधी हे आकलन आहे.

**कवचकुंडल दान :-**

कवचकुंडलदानाच्या प्रसंगाकडे कलावंताच्या मनाने त्या पाहत असल्याने त्यांचा अन्वयार्थ कलात्मक संगती लावणारा आहे. त्यांना कर्णाच्या दानात दातृत्वाचा, कीर्तीचा कैफ आढळत नाही. तर 'सर्व वासना, सर्व कटू कर्तव्याच्या भावना, सारे पीळ आणि समर्पणाच्या परिपूर्ती' हे सारे काही त्यात आढळते. कर्ण इंद्राला कवचकुंडलांचे दान न कुरकुरता देतो, याचे रहस्य यातूनच उलगडते.

कर्णाने कवचकुंडलांच्या दानाने स्वतःचा मृत्यू निश्चित केला आणि एकापरीने कुंतीच्या वचनाला तो जागला असे म्हणता येईल. सूतपुत्र गणला गेल्यामुळे कर्णाच्या साऱ्या कोमल भावना जळून गेल्या. त्याला थोडाफार आधार होता तो दुर्योधनाच्या मैत्रीचाच. हीनत्वाच्या संस्कारातून तो कित्येकदा मर्यादा सोडून अपशब्दात बोलतो. शारीरिक आणि मानसिक दोन्हीही प्रकारचा सोशीकपणा कर्णात आढळतो. कदाचित कर्णाला आपले जन्मरहस्य माहीत असावे. अशी शंका लेखिका व्यक्त करते.[५१] दुर्गा भागवतांनी एक कलात्मक सांधा येथे जुळविला आहे. तो म्हणजे कर्णाच्या एकाकीपणाचा दुवा, कुंतीच्या एकाकीपणाशी जोडला आहे. तिच्या एकाकीपणाचा भग्न वारसा कर्णाकडे काय तो आला असे त्या म्हणतात. कर्णाच्या मृत्यूने कर्णाला मोठे बनविले, यशस्वी जीवन दिले हे दुर्गाबाईंचे नवे चिंतन आहे.

महाभारतीय कर्णाचे चित्र आणि दुर्गा भागवतांचा एकाकी कर्ण यांच्यात एक प्रकारचा दुरावा निर्माण झाला आहे. कारण दुर्गा भागवत या एकाकी कर्णाकडे सहानुभूतीने पाहतात. नियतीच्या आघाताने भंगलेल्या, दुर्दैवी कर्णाची करूण कहाणी समजून घेतात व त्याची कलात्मक संगती लावण्याचा प्रयत्न करतात. ललित कलाकृतीचा घाट शोधण्याच्या या प्रयत्नातून त्यांना महाभारताचे

हे नवे आकलन झाले आहे. निर्लेप मनाने दुर्गा भागवतांना कर्ण जसा जाणवतो, तसाच त्या येथे अभिव्यक्त करतात.

**इरावती कर्वे यांची भूमिका :-**

'मो कोण?' या युगान्त मधील लेखात इरावती कर्वे यांनी कर्णाविषयी लक्षणीय चिंतन केले आहे. इरावती कर्वे या समाजशास्त्रज्ञ विदुषीचे महाभारत-विषयक चिंतन मूलगामी व विचारप्रवर्तक आहे. त्यांचे कर्णविषयीचे आकलन समजून घेताना त्यांची महाभारताकडे पाहण्याची भूमिका येथे समजून घेतली पाहिजे. रणजित देसाई यांनी युगान्तमधील या लेखातूनच आपल्याला खरा कर्ण सापडला आहे, असे म्हटले आहे. 'राधेय' कार रणजित देसाई यांच्या या उद्‌गारावरून 'युगान्त' मध्ये कलानिर्मितीची बीजे साठवलेली आहेत आणि साहित्यिकांना त्यातून प्रेरणा मिळाली आहे हे स्पष्ट होते.

इरावती कर्वे आपले लेखन इतरांना जास्तीत जास्त कळावे या भावनेने सुबोध करतात. महाभारतातील घटना-प्रसंग आणि व्यक्तींत स्वत:ला जे उत्कटत्वाने जाणवले ते सांगण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न आहे.[५२] आपल्या नव्या संशोधनाविषयीची त्यांची आग्रही भूमिका नाही. [५३] अखेरचे सत्य आपणच शोधल्याचा त्यांचा आविर्भावही नाही. मात्र आपले हें लेखन अनेकांना महाभारताचे चिंतन करायला भाग पाडील याची त्यांना खात्री आहे. म्हणूनच आत्मविश्वासाने त्या म्हणतात, 'बाईचे विवेचन चुकले, 'हे अभ्यास संशोधनाशिवाय इतरांना म्हणता येणार नाही. फार तर तूर्त पटत नाही, एवढेच म्हणावे लागेल.[५४]

**वैफल्याचा प्रतीक कर्ण :-**

'मी कोण?' या लेखाच्या सुरवातीला त्यांनी वैफल्य हा मानवी जीवनाचा स्थायीभाव आहे हे सत्य महाभारतात फार मोठ्या विदारक रीतीने दाखविले आहे.' असे म्हटले आहे.

महाभारतातील प्रत्येक व्यक्ती पराजित व निराश आहे. पण इतर व्यक्तींच्या वाट्याला निदान काही वेळा तरी जय आला आहे. विदुराची स्थिती कर्णापेक्षा वेगळी नाही पण विदुर वेळीच सावध झाल्याने सावरला गेला. इरावती कर्वे यांना 'सीता म्हणजे मूर्तिमंत विरहाचे प्रतीक', तसा कर्ण हा मानवी शरीर धारण केलेला मूर्तिमंत वैफल्याचा प्रतीक आहे असे वाटते.

'मी कोण?' म्हणून स्वत:चा शोध घेणाऱ्या कर्णाला आरंभी आपला शोध लागत नाही, आणि जेव्हा शोध लागतो तेव्हा त्याचा काही उपयोग नसतो. इरावती कर्वे कर्ण आणि विदुराची तुलना करताना म्हणतात, 'निदान विदुराला समाजात तरी स्थान होते. पण कर्णाला तर कुठेच नव्हते.' सामाजिक

नवी संगती लावण्याचा त्यांचा येथे प्रयत्न आहे. उदाहरण म्हणून एका घटनेचा उल्लेख करता येईल. 'धर्माला न मारण्यात दुर्योधनाचे अहित होते. धर्म मरता किंवा त्याहीपेक्षा कैद होता तर युद्धाचा निकाल दुर्योधनाच्या बाजूने लागण्याचा फार संभव होता. पण स्वत:च्या मोठेपणात कर्ण दुर्योधनाचे हित विसरला.' इरावती कर्वे यांचे हे संपूर्णपणे नवे प्रतिपादन असून त्यांच्या स्वतंत्र दृष्टीचा साक्षात्कार येथे घडतो. महाभारताचा नव्याने अन्वयार्थ लावणारी ही दृष्टीच महाभारताच्या वाढीला कारणीभूत आहे. अशा चिकित्सक, कलात्मक दृष्टिकोन बाळगून लिहिणाऱ्या लेखकांच्यामध्ये नवा आत्मविश्वासही दिसतो. दुर्गा भागवतांच्यासारखा महाभारताच्या कलात्मक रूपाचा शोध घेण्यापेक्षा इरावती कर्वे यांचा सांस्कृतिक संचिताचा शोध घेण्याकडे कल आहे.

## मी कोण ? : निरंतर व्यथा :-

इरावती कर्वे यांना कर्ण हा दुर्योधनाचा मित्र, निर्लोभी, अकारण भांडण न घेणारा असामान्य व्यक्तिमत्वाचा असा वाटतो. 'मी कोण' हा प्रश्न कर्णाला आयुष्यभर सतावीत होता आणि या प्रश्नाचा त्याला स्वत:ला संपूर्ण उलगडा न होताच तो मेला. जन्मत:च तो आपले हक्काचे सामाजिक स्थान गमावून बसला. कर्णाचा जन्म हे जसे कुंतीने जन्मभर पोटात बाळगलेले दु:ख होते, तसेच 'मी कोण' ही कर्णाच्या अंत:करणात निरंतर बोचणारी व्यथा होती. यात उभयतांच्या जीवांचा दैवदुर्विलास होता. कर्ण जन्माने शूर, क्षत्रिय राजपदाचा हक्कदार, कवचकुंडलांमुळे अजिंक्य होता. पण मातेच्या एका प्रमादामुळे या सर्वांपासून त्याला वंचित व्हावे लागले, हीच त्याच्या आयुष्याची शोकात्मिका आहे. त्याच्या हक्काचे स्थान मिळण्याची संधी त्याला इतक्या उशिरा देण्यात आली की त्याला ती स्वीकारणे अशक्य होते. कर्णाच्या 'मी कोण ?' या व्यथेतूनच 'कवचकुंडलां' सारख्या सर्वस्वाच्या दानाच्या औदार्याचा जन्म झाला, असे इरावती कर्वे यांनी ध्वनित केले आहे. मानवी मनातील तरल भाव आणि सुक्ष्म स्पंदन टिपण्याच्या येथे प्रयत्न आहे. महाभारतानुसारी लेखकांनी कीर्तीसाठीच कर्ण कवचकुंडलांचे दान देतो, असे म्हटले आहे. इरावती कर्वे यांच्या या मौलिक आकलनाने महाभारताला नवे धुमारे फुटतात. अंतर्मुख होऊन केलेले त्यांचे हे चिंतन महाभारतात भर टाकणारे आहे. 'युगांत' वरील आपल्या परीक्षणलेखात बा.रं. सुंठणकरांनी या लेखाविषयी व्यक्त केलेला अभिप्राय पटण्याजोगा आहे. ते म्हणतात, 'कर्णाच्या जीवनाची शोकात्मिका 'मी कोण' या दोन शब्दांत फार सुंदर आणि परिणामकारक रीतीने व्यक्त झाली आहे.'[५६]

## महापुरुष 'कर्ण' :-

आनंद साधले यांची 'महापुरुष' ही कर्णाच्या जीवनावरील एक स्वतंत्र

पौराणिक कांदबरी आहे. आनंद साधले यांची महाभारतविषयक भूमिका 'हा जय नावाचा इतिहास आहे' या स्फुट लेखसंग्रहातून व्यक्त झाली आहे. त्यांच्या 'महापुरुष' या कांदबरीची बीजे आणि त्यांचे कर्णविषयक नवे चिंतनही याच संग्रहातील दोन लेखांत सामावलेले आहे, याची कबुली स्वतः आनंद साधले यांनीच महापुरुषाच्या प्रस्तावनेत दिली आहे.[५७]

**विरोधी भूमिका :-**

महाभारतात पांडवांचा पक्ष हा सत्पक्ष मानलेला आहे. आनंद साधले यांनी परंपरावादी विचारसरणीशी विरोधी भूमिका आपल्या महाभारतावरील लेखनात घेतली आहे. त्यांची ही भूमिका परंपरा मोडणारी व एकसुरी झाली आहे.

आनंद साधले यांच्या लेखनात महाभारतातील अनेक घटनांची व प्रश्नांची चर्चा आजच्या समाजजीवनाच्या संदर्भात करण्याची प्रवृत्ती आढळते. परंपरागत समजुतीला धक्का देणारे हे सारे लेखन असल्याने ते वादविषय होणे स्वाभाविक आहे.

या कांदबरीच्या शीर्षकानुसार आपला कथानायक 'महापुरुष' होता हे सिद्ध करण्यासाठी त्याची अन्य व्यक्तीशी तुलना करून त्यांना कनिष्ठ लेखावे लागले आहे. कर्णाचे उदात्तीकरण करावे लागले आहे. म्हणूनच आनंद साधले यांना महाभारतातील वास्तव व आजची परिस्थिती याची एकाच वेळी सांगड घालणे अवघड झाले आहे. आनंद साधले यांनी अनौरस संतती, कुमारी माता, जन्मावर आधारित श्रेष्ठत्व आणि कनिष्ठत्व इत्यादी विषयांवर कर्णकथेच्या निमित्ताने आपल्या आवडत्या मतांचा पुरस्कार 'महापुरुष' मध्ये केला आहे. त्यांना तर्कनिष्ठ वैचारिकता आणि कादंबरीतील भावगर्भता यांची नीट सांगड घालता आली नाही. त्यामुळे एकात्म अनुभवाचा प्रत्यय येथे येत नाही. अंतर्मुख होऊन केलेल्या चिंतनाची जाणीव न होता बहिर्मुख वृत्तीतून प्रगट केलेल्या विचारांची येथे जाणीव होते. आनंद साधले यांची भूमिका कलावंतापेक्षा विचारवंत सुधारकाचीच आहे. महापुरुष कादंबरीच्या प्रस्तावनेतून आणि 'हा जय नावाचा इतिहास आहे.' या लेखसंग्रहातून याचा प्रत्यय येतो. त्यांची भौतिकवादी, व्यवहारवादी चिंतकाची भूमिका आहे.

**'पश्चातापदग्ध' 'राधेय':-**

आनंद साधले यांनी 'हा जय नावाचा इतिहास आहे' या लेखसंग्रहात पश्चातापदग्ध कर्णाचे चित्र रेखाटले आहे. 'मी राधेय आहे, मी सूतपुत्र आहे' हे मोठ्या अभिमानाने 'कर्ण कुंतीला सांगतो. आपल्या सूतपुत्रत्वाने तो खचून न जाता उभारी धरतो. श्रीकृष्ण, भीष्म आणि त्यानंतर कर्ण अशा क्रमाने महाभारतातील व्यक्तिरेखा त्यांना आदरणीय वाटतात. साधले शूरत्वाच्या बाबतीत अर्जुनापेक्षाही

कर्णालाच अधिक मानतात. घोषयात्रा आणि उत्तरगोग्रहण हे प्रसंग सर्रास सामाविष्ट केले जात असल्याने साधले यांना ते प्रसंग आधार देऊनच प्रक्षिप्त मानावे लागतील. त्यांचा कर्णाविषयीचा दृष्टिकोन मात्र यातून स्पष्ट होतो. उपेक्षितांचे अंतरंग भौतिक दृष्टीतून जाणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. कर्णाने सारे यश प्रतिकूल परिस्थितीत मिळविले असल्यामुळे त्याला विशेष महत्त्व आहे.[५८] कर्णाला मोठेपण देण्याच्या भरात, राजनीतिज्ञ, व्यवहारकुशल, आदर्श पुरुष मानणाऱ्या कृष्णाला आणि भीष्माचार्यालाही ते कमी लेखतात.[५९] मात्र 'द्रौपदीला नग्न करण्याची कर्णाने दिलेली आज्ञा हाच तो कलंक' असे म्हणून त्यांनी कर्णाला हे गालबोट लागले आहे, असे म्हटले आहे. 'सूतपुत्र' व 'राधेय' म्हणून वावरणाऱ्या कर्णाच्या जीवनात 'अधिरथ-राधा' यांना महत्त्वाचे स्थान आहे.

कर्णाच्या हातून द्रौपदीची विटंबना झाली. पण या घटनेचा त्याला स्वत:ला खेद वाटतो म्हणून तो पश्चातापाने जळतो. पश्चातापाने शुद्धी लाभते असे मानून साधले कर्णाचे समर्थन करण्याचा प्रयत्न करतात. 'हा जय नावाचा इतिहास आहे' या पुस्तकातील लेखातून त्यांचा कर्णविषयक हा दृष्टिकोन व्यक्त झाला आहे. त्याचेच पडसाद त्यांच्या नंतरच्या 'महापुरुष' या कादंबरीत उमटले आहेत.

**स्वतंत्र पौराणिक कादंबरी :-**

श्री. आनंद साधले यांना जाणवलेला कर्ण त्यांनी 'महापुरुष' या 'स्वतंत्र पौराणिक कादंबरी'तून साकार केला आहे. त्याबाबत साधले यांची भूमिका पुरेशी स्पष्ट व नम्र आहे. ते म्हणतात, 'कादंबरी ही मूलत: ललितकृती हवी याची जशी मला जाण आहे. तशीच ललित कलाप्रकार म्हणून माझ्या अनधिकाराचीहि मला जाण आहे.' [६०] साहित्यकृती म्हणून 'महापुरुष'चा विचार करतांना कादंबरीकाराच्या या निवेदनाला येथे स्थान नाही पण कादंबरीचे घटना व स्वरूप उलगडण्यासाठी त्याची निश्चित मदत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची, ही कादंबरी लिहिताना ते आठवण काढतात आणि आचार्य अत्र्यांच्या नवयुगाच्या 'डॉ. आंबेडकर विशेषांकाशी' संबंध प्रस्थापित करतात ही गोष्ट सूचक आहे. 'महापुरुष' कादंबरीच्या प्रस्तावनेत शेवटी कर्णाविषयीचा आदर व्यक्त होतो.[६१] कर्ण त्यांना तेजोनिधी भासतो. तो आपल्या असामान्य कर्तृत्वाने भूतकाळाचा विचार न करता वर्तमानकाळ जगणारा आणि उज्ज्वल भविष्यकाळ निर्माण करणारा आहे. स्वत:च्या व्यथांनी कुंठित न होता व्यथा निवारणारा हा महापुरुष त्यांना गवसला.[६२]

**नव्या प्रसंगाची योजना :-**

आनंद साधले यांनी महापुरुष कादंबरीत 'राधा आणि अधिरथ' या विनापत्य जोडप्याच्या मन:स्थितीचे मनसोक्त चित्रण केले आहे.

कर्णत्यागाचा प्रसंगही संभवनीयतेच्या पातळीवर आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. कर्णाला सुवर्णाच्या टोपलीत घालून गंगाकाठी ठेवले होते, ही नवी कल्पना या कादंबरीत मांडली आहे. राधा अजाणता कुंतीची निर्भर्त्सना करते, हे एक नवे नाट्य यशस्वीरीत्या रंगविले आहे. 'मुले काळजाच्या उबेवर जगतात.'[६३] हे राधेला उमगलेले तत्त्वज्ञान कुंतीला नकळत दूषण देणारे आहे. कर्णाची व्यक्तिरेखा येथे केंद्रीभूत आहे, म्हणून साधले यांनी कर्णाची बाजू उचलून धरण्याचा प्रयत्न केला आहे. कर्ण कौरवांच्या बाजूने उभा राहिला, म्हणून पांडव त्याचा द्वेष करू लागले असे वेगळे चित्र साधले रेखाटतात. या कर्णाला सूतत्वाची प्रखर जाणीव आहे. सतत होणाऱ्या संघर्षाला तोंड देण्याची त्याची तयारी आहे. त्याने 'पुरुषार्थ' हाच आपला मित्र मानला आहे.

कर्ण आणि वसुंधरा यांची भावोत्कट कथा येथे रंगविली आहे. एवढेच नव्हे तर वसुंधरेला कर्णाखालोखाल महत्त्वाचे स्थान कादंबरीत प्राप्त झाले आहे. वसुंधरा कर्णाच्या भावजीवनाशी एकरूप झाली आहे. कर्णाची सुखदुःखे तिला समजतात. ती स्वतःच द्रौपदीची सवत म्हणून मागणी करते. पण स्वयंवरात तिने आपल्या पतीचा अपमान केल्याचे समजताच ती चवताळून उठते.[६४] तिच्या कृती उक्तीतून कर्णाविषयी आत्मीयता निर्माण करण्याचा कादंबरीकाराचा येथे प्रयत्न आहे. कर्णाचे व्यक्तित्व उजळण्यासाठी वसुंधरेला महत्त्व प्राप्त झाले आहे. 'मृत्युंजय' कार सावंतांनीही कर्णाच्या पत्नीचे (वृषाली) किंवा कर्णाचा भाऊ 'शोण' याचे पात्रचित्रण याच हेतूने केले आहे. त्यांच्या या चित्रणांत मात्र कलात्मक संयम जाणवतो.

शकुनीमामांनी मांडलेल्या जुगारात पांडव हरतात तेव्हा आपल्या सूडाच्या भावनेचे समाधान झाले या थाटात हा 'महापुरुष' बोलतो. पण 'राधेय' मधील कर्ण या जुगाराच्या प्रसंगाविषयी खंत आणि मनस्ताप व्यक्त करतो. कोणाही पराक्रमी महापुरुषाने द्यूताच्या कपटाने व्यथित होणेच स्वाभाविक आहे, पण आनंद साधले यांनी कर्णाचे चित्रण येथे 'महापुरुषाला' न शोभणारे केले आहे. 'दुर्योधनाच्या खास गोटात सारे ठोंबे लोक होते. त्यांत ज्ञानी असा कर्णच होता.' (पृ. १०९) असे जरी कर्णाविषयी त्यांनी मानले असले तरी हाच कर्ण द्रौपदीची विटंबना करतो. पण कर्ण पश्चातापाने शुद्धी या न्यायाने घडलेल्या घटनेविषयी हळहळ व्यक्त करतो.[६५] कर्ण वसुंधरेशी बोलताना द्रौपदीच्या स्तुतीची परिसीमा होते. जणू तो द्रौपदीचा पाठीराखा बनतो.[६६] कर्ण 'दुर्योधनाला आमरण स्नेह दिला.' हे वचन 'वज्रलेप' मानतो. रणाची रंगत जयापेक्षाही झुंजीत मानणारा कर्ण हा 'महापुरुष' म्हणून शोभून दिसतो. पण भीष्माचार्य आणि कर्ण यांच्यात युद्धाच्यावेळी मतभेद होतो त्यातून कर्णाची - डॉ. वाळिंबे म्हणतात त्याप्रमाणे

- बेजबाबदार वृत्तीच दिसून येते. 'मी पराक्रम करीन आणि श्रेय तुम्हाला मिळेल म्हणून मी तुमच्या हाताखाली लढणार नाही. (पृ. १३९) असे कर्ण ठरवितो. पितामह भीष्मांशी त्याची ही अशी एवढी तेढ का निर्माण झाली? या गोष्टीच्या चिंतनाला येथे विशेष अवसर मिळत नाही. वस्तुतः कर्णाला 'अर्धरथी' म्हणण्यात भीष्माचार्यांचा पांडवपक्षपात सूचित होतो. पण वैचारिक प्रश्नांवरच साधले आपले लक्ष केंद्रित करतात.

'महापुरुष' कादंबरीत कर्णकुंतीच्या संवादाला विशेष रंग भरत नाही. त्यातील भावनाट्याला अवसर मिळत नाही. 'पाच शब्द बोलून विचार पाच शब्द पुढे नेला पाहिजे.' असे वैचारिक भाष्य 'साधले' येथे करतात. 'जोपासण्याच्या मायेने उदरात भार धरला तर त्या भाराला गर्भ म्हणतात अन्यथा ते अपचनासारखे मानावयाचे.'

कुंती जेव्हा कर्णाला 'पावलातील साम्य' लक्षात आणून देण्याचा प्रयत्न करते, त्यावेळी दिलेले उत्तर मोठे मार्मिक आहे. 'पाय...मी ओळखीत नाही - मी हृदय ओळखतो.' कोणत्याही प्रकारे कुंतीला मातेचा आदर द्यायला वा तिची असहाय्यता जाणून घ्यायला कर्ण येथे उत्सुक नाही. कुमारी माता हा वदतो व्याघात आहे याच घमेंडीत तो आईशी वागतो.[६७] शिरवाडकरांनी 'कौंतेय' नाटकात 'कर्ण-कुंती' भेटीच्या प्रसंगाचा कलात्मक आविष्कार केला आहे तो प्रसंग फुलविला आहे. येथे कर्ण निष्ठुर आहे.

'कवचकुंडलाचे दान' या प्रसंगी मात्र कर्णाची भव्योदात्त भूमिका साधले यानी चित्रित केली आहे. कर्ण म्हणतो, 'वीर लढतात ते कवचकुंडले, खड्ग, धनुष्यबाण यांनी लढत नाहीत, ते काळजाने लढतात, काळजाने.'[६८]

कर्णाच्या गुणाविष्कारासाठी त्यांनी कादंबरीत चित्रित केलेला एक प्रसंग विशेष उल्लेखनीय आहे. अश्वसेन हा खांडववनप्रस्थात राज्य असलेल्या नाग लोकांच्यापैकी एक असून बाणाद्वारे अर्जुनावर विष प्रयोग करण्याची सूचना तो कर्णाजवळ मांडतो, त्यावेळी कर्णाने दिलेले, 'वेड्या माणसा, मी योद्धा आहे, मारेकरी नव्हे, मला संग्राम करावयाचा आहे. मनुष्य हत्या नव्हे.' (पृ. १८३) हे उत्तर त्याच्या व्यक्तिमत्त्वाला नवा उजळा देणारे आहे. असेच वसुंधरेचे पतीविषयीचे उद्‌गारही आत्मविश्वासाचे द्योतक आहेत.[६९] कर्ण अर्जुनाशी झालेल्या अखेरच्या युद्धातही उदात्तमूल्यांची आठवण ठेवतो.

कर्ण निर्वाणीच्यावेळी अर्जुनाला म्हणतो, 'तू भ्याडाप्रमाणे मला वधिलेस तर मी मृत्यूत मरण जिंकीन' ... 'पराभवात जय पावेन', यातू कर्णाची उदात्त भूमिका सूचित झाली आहे. म्हणून या कादंबरीत वसुंधरेला कर्णाच्या जीवनात

महत्त्वाचे स्थान लाभते. त्याच्या जीवनरूपी रथाची सारथी झालेली ही वसुंधरा अखेरच्या क्षणी त्याला आठवते. या कादंबरीतील हा भावोत्कट प्रसंग विशेष लक्षणीय आहे.

महाभारतातील कर्णकथेतून निर्माण होणाऱ्या या विविध प्रसंगात साधले यांनी स्वतःच्या आकलनानुसार जे रंग भरलेले आहेत त्यातून कर्णकथा वाढते आणि पर्यायाने महाभारत वाढत जाते. उदाहरणार्थ कर्णाच्या वधाचे वर्णन साधले यांनी 'अर्जुनाचे क्षुद्रकृत्य दिसावयास नको म्हणून सूर्याने डोळे मिटले.' (पृ. २२२) या शब्दात केले आहे. या वर्णनातून साधले यांना कर्णाचा वध हे महापुरुषाचे महानिर्वाण म्हणून जाणवले. पण येथे अर्जुनाचा अधिक्षेप झाला याचे कारण साधले यांनी आपले लक्ष कर्णावर केंद्रित केलेले आहे.

कर्ण आणि वसुंधरा यांच्या प्रणयकथेचे 'रूप' 'महापुरुष' कादंबरीला प्राप्त होते.[७०] अर्जुन कर्णाच्या चकमकीत कर्ण अर्जुनाला महापुरुषाला न शोभणारे बोलतो. याचा अर्थ कर्णाच्या व्यक्तिमत्त्वाने भारावून जाऊन आनंद साधले यांनी कर्ण आणि दुर्योधन यांच्या पक्षाचे समर्थन केले आहे.[७१]

**स्व-तंत्र निर्मिती :-**

कर्णाच्या जीवनाचे श्री. साधले यांना स्वतःला झालेले दर्शन व आकलन त्यांनी या कादंबरीतून निर्भयपणाने घडविलेले आहे. या कर्णचित्राच्या मुळाशी त्यांचा स्वतःच्या असा एक विचार आहे 'एका संवेदनाशील रसिक मनाचा तो सहजोद्रेक आहे.' महाभारतातील कर्णकथेच्या निमित्ताने आनंद साधले यांनी आपल्या अंतःप्रवृत्तींना आणि उत्कट मनोवृत्तींना व्यक्त केले आहे. त्यांच्या मनाला जे वाटले-पटले ते त्यांनी या कादंबरीतून प्रगट केले. त्यांनी म्हटल्याप्रमाणे ही एक 'स्व - तंत्र पौराणिक कादंबरी' आहे. महाभारताच्या आधार हा ज्ञात पुराणकथेपुरताच आहे. कथानकाची जडण घडण संपूर्णपणे कर्णाला केंद्रीभूत ठेवून नव्याने केली आहे. अशा या रचनेतून महाभारताच्या एक नवा अविष्कार पहावयाला मिळतो. माणसाची मूलभूत वृत्ती दुःखाला सतत सामोरी जाणारी आहे. दुःखाची किंवा शोकाची भावना मूलभूत असल्यामुळे कर्णाची व्यक्तिरेखा आपल्याला आकर्षून घेते. कारण कर्णाच्या जीवनात नियतीने, वेदनेने अडथळे निर्माण केले आहेत. त्यात चढउतार आहेत. येथे साधले यांनी व्यवहारवादी दृष्टिकोनातून कर्णाच्या जीवनातील घटनांचेच वर्णन केले आहे. नव्या सामाजिक भौतिक जाणिवेतून प्राचीन महाभारतातील घटनांकडे पाहिले आहे. महाभारतातील कर्णाची ही पुराणकथा ज्ञात सत्यासह आधाराला घेऊन त्यात स्वतःला अभिप्रेत असलेला नवा सामाजिक आशय भरण्याचा प्रयत्न केला आहे. महाभारताचा नवा आविष्कार म्हणून अशा

प्रयत्नांकडे पाहिले आहे. पण महाभारतातील कर्णाच्या कथेवर लिहितांना किमान काही पथ्ये पाळली जाणे आवश्यक आहे. ललित लेखनालाही ती उपकारकच ठरत असतात. पण आनंद साधले महाभारताचा तोंडावळा आणि तपशील या साहित्यात कायम ठेवीत नाहीत म्हणून अ.दा. आठवले यांनी त्यांच्यावर परखड टीका केली आहे.[७२] अ.दा. आठवले महाभारताकडे इतिहास म्हणून पाहतात. त्यात बदल केलेले त्यांना चालत नाहीत तर आनंद साधले कर्णकथेतून आजकालचा इतिहास पाहतात.

'महापुरुष' या कादंबरीच्या नावाप्रमाणे आनंद साधले यानी कर्णाला मोठेपण बहाल करतांना इतर व्यक्तींना दूषण दिले आहे. ही गोष्ट कलानिर्मितीच्या दृष्टीनेही विघातकच आहे. म्हणूनच या कादंबरीतील संघर्ष प्रभावी व भावोत्कट होत नाही. भीष्म पक्षपाती व ढोंगी होता, अर्जुन युधिष्ठिराच्या आध्यात्मिक तत्वज्ञानामुळे भेकड झाला होता, तर स्वत: युधिष्ठिर अध्यात्म आणि व्यवहार यात गल्लत करणारा होता. कुंती स्वार्थी विषयासक्त व चारित्र्यहीन स्त्री होती. अशा विकृत स्वरूपात या व्यक्ती साधले यांनी चित्रित केल्या आहेत. त्यामुळे अ. दा. आठवले यांच्यासारख्या महाभारतनिष्ठ लेखकाला साधले यांची भूमिका पटत नाही. यामुळे त्यांच्या परंपरागत-ज्ञात जाणिवेला धक्का पोहचतो. स्वत:च्या वैचारिक भूमिकेसाठी महाभारत कथानकाला नवा आकार दिलेला त्यांना समर्थनीय वाटत नाही. पौराणिक वास्तव अबाधित ठेवून पौराणिक ललित साहित्याची स्वतंत्र नवनिर्मिती ललित साहित्यिकाने करायला हरकत नाही; पण या मर्यादा पाळल्या जाणे आवश्यक आहे. पण ही विवाद्यता मान्य करूनही आपल्या स्वतंत्र विचारांनी प्रभावित होऊन साधले यांनी 'द्यूत', 'वस्त्रहरण' आणि 'कर्णवध' हे प्रसंग नव्या अनुभूतीने दर्शन घडविणारे चित्रित केले आहेत.

**मृत्युंजय :-**

श्री. शिवाजी सावंत यांनी कर्णाच्या जीवनावर मृत्युंजय[७३] ही कादंबरी परिश्रमपूर्वक लिहिली आहे. त्यांनी महाभारतीय पौराणिक वास्तवाशी आणि कर्णाच्या भावविश्वाशी समरस होऊन कर्णकथेच्या लालित्यपूर्ण आविष्कार या भावकथेतून केला आहे. कर्णावरील मराठी ललित साहित्याचा साकल्याने विचार करतांना या कादंबरीचा एक लक्षणीय व गाजलेली साहित्यकृती म्हणून उल्लेख करावा लागतो.

कर्णाच्या जीवनसंग्राम चित्रित करणारी ही कादंबरी वा:ङ्मयीन मूल्यांची जाण ठेवून लिहिलेली आहे. भाऊसाहेब खांडेकरांच्या गाजलेल्या 'ययाति' नंतर पौराणिक कलाकृतीने भान मराठी कादंबरीकारात विशेष दिसून येते.

## साद-पडसाद :-

कोणत्याही लेखनकृतीचे निर्मितीनंतर साडपडसाद उमटतातच, रसिकप्रियता मिळविणारी ही कादंबरी अ. दा. आठवले यांच्यासारख्या महाभारतनिष्ठांच्या टीकेसही पात्र झाली. 'मृत्युंजय' कादंबरीत सावंतांनी 'अर्जुनाला सामान्य असे चित्रित केले आहे. द्रौणाचार्यांनी कर्णाला आपल्या वर्गात न घेता कृपाचार्यांच्या सामान्य वर्गात घातले. अश्वत्थामा कर्णाचा जिवलग मित्र होता. कौरवपांडवातील वैर पेटविण्यास कर्ण मुळीच जबाबदार नव्हता. कर्णाचा मूळ स्वभाव शांततापूर्ण होता, कृष्णाला कर्णाविषयी आंतरिक ओढ वाटत होती. सावंतांनी या कादंबरीत नव्याने हे सारे समाविष्ट केले आहे. एक ललितसाहित्यकृती म्हणून 'मृत्युंजय' कादंबरीचा विचार केला तर पौराणिक वास्तवाला सजीव करणारी, कर्णकहाणीतील नवे भावनाट्य आणि विचारनाट्य फुलविणारी ती प्रदीर्घ कथा आहे हे जाणवते. महाभारतातील कर्णकथेचा एक नवा अविष्कार 'मृत्युंजय' कादंबरीत आहे. महाभारताला सतत वाढ आहे, ते एक वाढणारे महाकाव्य आहे, स्थलकाल परिस्थिती आणि व्यक्तीनुरूप हे महाभारत सतत वाढतच राहणार आहे. 'मृत्युंजय' कादंबरीसारख्या प्रतिभाजनित नव्या अविष्कारांनीही वाढ महाभारतात केली आहे. शिवाजी सावंतांनी आपली भूमिका 'सोबत' मधील एका लेखात समर्पक शब्दात मांडली आहे. 'मानवी मन, जीवसृष्टी, निसर्ग' यांचेच प्रगटन ललित लेखक कोणत्याही निमित्ताने करीत असतो. साहित्य म्हणून माणसेच हे प्रगटन वाचीत असतात. [७४] सावंतांच्या या मतातून कलात्मक सत्याची आणि वाङ्‌मयीन रहस्याची उकल होते. त्यांनी साहित्यिकाला होणाऱ्या विरोधाची जाणीव ठेवूनच आपली कलावंताची भूमिका येथे विशद केली आहे. 'मृत्युंजय' कादंबरीचे विवेचन करतांना या भूमिकेला महत्त्व प्राप्त होते.

## कादंबरीकाराच्या जाणिवा :-

'मृत्युंजय' ही कर्णाच्या भावजीवनाची प्रदीर्घ कथा आहे. सावंतांना महाभारत हा अक्षम्य हेळसांड झालेला इतिहास वाटतो.[७५] महाभारत हे चैतन्याचे आगर आहे या साक्षात्काराने शिवाजी सावंत महाभारताच्या चिंतनाकडे वळले. त्यातूनच मृत्युंजय साकार झाली आहे.[७६] महाभारतातील व्यक्तिरेखा पौराणिक कालखंडातील असल्यामुळे अद्‌भुताने भारलेल्या आहेत. म्हणून त्यांच्या जीवन-चरित्राचे अचूक धागे हस्तगत करणे त्यांना प्रारंभी थोडे अवघड वाटले. याशिवाय खंडकाव्य, नाटक, कादंबरी अशा क्रमाने कर्णकथेची गुंफण करण्याच्या विचार सावंतांनी केला. 'पण काव्य किंवा नाटक काय आखून दिलेल्या मर्यादित जागेत रेखीव मंडलच तिथं घ्यावी लागतात.' हे लक्षात घेऊन सावंतांनी कर्ण जीवनरुपी राजवस्त्राच्या धाग्यांचा उलगडा करण्यासाठी कादंबरीचे विस्तृत क्षेत्र निवडले. महाभारतातील

वास्तवाचे चित्रण आणि कर्णाच्या व्यापक जीवनाचे चित्रण करण्यासाठी कादंबरी या वाङ्:मय प्रकाराचा घाट त्यांना सर्वतोपरी उपकारक ठरला आहे.

**कर्णविषयक चिंतन :-**

कर्ण हा खरोखरच कादंबरीचा केंद्रबिंदू होऊ शकतो काय? असा हा एक मार्मिक प्रश्न 'मृत्युंजय' कारांच्या मनात निर्माण झाला. त्याच्या उत्तरातच या कादंबरीचे यश सामावलेले आहे. सावंतांनी कर्णाचे सद्गुण, त्याच्या जीवनातील समर प्रसंग, त्याची झालेली उपेक्षा या सर्व गोष्टीचे सखोल चिंतन केले आहे. आपल्या मनाशी कोणतीही निश्चित खूणगाठ बांधून ते कर्णाला सामाजिक प्रवृत्तीचा प्रतिनिधी करीत नाहीत किंवा दृष्टान्त म्हणूनही त्याचा वापर करीत नाहीत. त्यांना कर्ण हा एक जीवनभर पिचलेला महायोद्धा वाटतो. कर्णासाठी कृष्णाने गूढ माघार स्वीकारली. कृष्ण शिष्टाईच्या वेळी त्याला मानाने राजरथात बसवून घेतले. या गोष्टींचे रहस्य शोधतांना कर्णाची महती त्यांच्या नजरेत भरली. 'श्रीकृष्ण फक्त एका कर्णाच्याच मृतदेहाला अग्निसंस्कार देतो.' या घटनेचाही एक नवा अन्वयार्थ त्यांना उमगतो आणि एकूण महाभारतात कर्णाला 'सघन' स्थान आहे हे त्यांच्या लक्षात येते. तेच या कादंबरीत टिपण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. त्यासाठी कर्णाच्या व्यक्तित्वाची उत्तुंग शिखरे त्यांना शोधावी लागली. दुर्गा भागवतांनी 'व्यासपर्वा' त 'द्रौपदीच्या सुप्त मनात कर्णाला स्थान आहे.' असे म्हटले आहे. दुर्गाबाईंनी व्यक्त केलेल्या या गोष्टीचे सावंतांनी चिंतन केले.

कृष्ण-परशुराम या दैवी पुरुषांच्या सहवासात हा कर्ण वावरला. केवळ नियतीने घेरल्यामुळे तो कौरवात मिसळला तरीही तो पहिला 'कौंतेय', 'सूर्यपुत्र' आहे हे जाणवले. कृष्ण आणि कर्ण एकाच तात्त्विक भूमिकेच्या पौरुष-चैतन्याच्या आणि वर्ण-निर्भयतेच्या दोन बाजू आहेत ही एक महत्त्वाची नवी जाणीव त्यांना या कादंबरीत झालेली आहेत. कृष्ण, अश्वत्थामा, वृषाली, शोण यांच्या चित्रणातून हे स्पष्ट होते. ते 'मृत्युंजय' कर्णाचे चित्र रेखाटतांना त्याच्या जीवनातील संघर्षाचे व मनाचे कलात्मक दर्शन या कादंबरीतून घडवितात. येथे कर्णाचे उदात्त चित्र साकार होते. कर्णाचे जीवन सतत शर्थीच्या झुंजीने भरले आहेत. त्याच्या जीवनातील अंतिम क्षणच त्याला शोकात्मिकेचा नायक करतात हे त्यांना जाणवले आहे.

**कर्णाची महाकथा :-**

'मृत्युंजय' कादंबरीला एखाद्या गद्य महाकाव्याचे किंवा महाकथेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या महाकथेतून सावंतांनी महाभारतकालीन संस्कृती, वातावरण आपल्या स्वतंत्र प्रतिभेने व प्रज्ञेने चित्रित केले आहे. तत्कालीन समाजजीवन , रूढी, चालीरीती, समजुती, राजकीय जीवन, युद्धनीती इत्यादी गोष्टी जिवंतपणे

साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. कर्णाच्या व्यक्तिरेखेला उजाळा देणाऱ्या प्रसंगाचा शोध घेऊन त्याची नवी कलात्मक मांडणी केली आहे. उदाहरणार्थ द्यूतक्रीडेनंतरची राजसभेतील कर्णाची भूमिका, द्रौपदीची विटंबना होत असतांना कर्णाची भूमिका, या प्रसंगातून सावंतांना कर्णाच्या मनातील संघर्षाचे विस्तृत चित्रण करता आले. शिवाय पात्रमुखी निवेदन पद्धतीमुळे वाचकांच्या मनात कर्णाची स्वत: सांगितलेली करूण कहाणी ऐकून सहानुभूती निर्माण करता आली.

'रंगागारातील चढाओढ', 'कर्ण-कुंती भेट', 'कर्ण-श्रीकृष्ण भेट', 'कर्णार्जुन-युद्ध' हे कर्णाच्या जीवनातीरल नाट्यपूर्ण प्रसंग विशेष रंगतदार करण्याचे श्रेय शिवाजीराव सावंतांचे आहे. महाभारतकथेला नवे लेणे चढविल्यासारखेच हे नवे भावनेचे रंग आणि त्यातून होणारी नवसौंदर्याची ही निर्मिती आहे.

सावंतांना श्रीकृष्णाची पडछाया म्हणून कर्ण संपूर्ण महाभारत कथेत वावरतांना जाणवतो. पण 'निळ्या कृष्णाची ती काली पडछाया आहे.' ती पडछाया शेवटी आपल्या तळपायाच्या खाली आणण्यासाठी श्रीकृष्णाला अर्जुनाचा पलिता करून स्वत:च्या माथ्यावर धरावा लागला आहे. यात अर्जुन आणि कर्ण या दोघांच्याही व्यक्तित्वावर नवा प्रकाश सावंतांनी टाकला आहे.

'अनिवार्य नियतीचं गरगर फिरणं, जीवानं हिमालया एवढ्या महान संयमानं सहन करीत जगायचं असतं आणि तेही हसत हसत.' हेच तत्त्वज्ञान हा कर्ण सांगत आहे. त्याच्या जीवनाचा हाच एक हुंकार आहे. येथे जाणीवपूर्वक कर्णाच्या उदात्तीकरणाचा अंतर्गत न्यायाशी सुसंगत असा हा प्रयत्न आहे. सावंत कर्णाच्या व्यक्तित्वाने भारावून जाऊन लिहितात. अंत:प्रेरणेने ऊस्फूर्त लेखनच ललित साहित्यात मानाचे स्थान मिळविते; याचा प्रयत्न ही कादंबरी आहे. 'जो जो कुणी जीवनात कुठं ना कुठं एकदा जरी पिचला असेल त्यालाच कर्णाच्या जीवनाचं हे मर्म प्रकर्षानं जाणवेल!' इतकंच काय जो कोणी जीवनात कधीही पिचला नसेल त्यालाही पिचण्यात काय जीवन असतं हे कर्णाकडे पाहिल्यानंतर कळेल. या ठिकाणी ललित लेखकाचा आत्मविश्वास प्रगट झाला आहे. शिवाजी सावंतांना कर्णाचा 'अबोला' हा एक बोलका संदेश वाटतो. कर्णाच्या एकाकी जीवनाच्या आलेखावरून ते म्हणतात, 'त्याच्या यातनामय, वंचित आणि उपेक्षित मनाचे कंगोरे हे पांडवांच्या विजयाचे डांगोरेही ठायी ठायी फिके पाडतात, मृत्यूच्या महाद्वारात सुद्धा, जीवनाचा एवढा धुंद एकट्या आणि एकट्या कृष्णानंच अनुभवला आहे.' म्हणूनच सावंतांनी या भावकथेला 'मृत्युंजय' नाव दिले आहे.

**'मृत्युंजया'तील व्यक्ती :-**

कर्णाच्या संदर्भात महाभारतातील दुर्योधन, कृष्ण, कुंती, अर्जुन इत्यादी

काही व्यक्तींना विशेष स्थान द्यावे लागते. कर्णावरील साहित्यात ते मिळाले आहे. पण या व्यक्तींच्या आगळ्या चित्रणाबरोबरच सावंतांनी आपल्या प्रतिभेच्या कुंचल्याने काही नव्या व्यक्तींच्या मूर्तीही येथे रंगविलेल्या आहेत, त्यांना कर्णाच्या सहवासात नवे अर्थ प्राप्त करून दिले आहेत. त्यात अश्वत्थामा, राधा, अधिरथ, शोण, वृषाली, वृषसेन, शकुनी इत्यांदीचा समावेश होतो. मृत्युंजय कादंबरीतील या व्यक्तिरेखा महाभारतातील व्यक्तिचित्रांचा नवा विलास आहे, असे म्हणता येईल. त्यामुळे व्यक्तिचित्रांना नवे रूप लाभते. नव्या चिंतनाची जोड मिळते. या अर्थानेच महाभारतात मौलिक भर पडते, वाढ होते. प्रतिभावंतांच्या पुनर्मंथनाने ही वाढ झाली आहे.

सावंतांनी कर्णाच्या भोवती वावरणाऱ्या या व्यक्तींच्या चित्रणातून कर्णाविषयी आदरनिर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. पण प्रत्यक्षात निर्माण होते ती कर्णाविषयीची सहानुभूतीच.

जीवनभर जिची कुचंबणा आणि कोंडी झाली त्या कुंतीविषयीही त्यांना अनुकम्पा वाटते. जगानं अनेकदा लाथाडलेल्या कर्णाच्या विशाल मनावरच्या सखोल जखमांवर निर्भेळ प्रेमाची हळुवार फुंकर घालणारी 'वृषाली' हा कर्णाचा विसावा आहे, मायेची पाखर आहे. वृषालीच्या सहवासात त्याला दिलासा मिळतो. तिचा त्याला आधार वाटतो. कर्णाचे कौंटुबिक भावविश्व येथे नव्याने उमलले आहे. कर्णाच्या तेज:पुंज व्यक्तिमत्त्वाच्या सहवासात वृषालीची व्यक्तिरेखा नव्यानेच उजळली आहे. या कादंबरीत वृषाली, गो. नी. दांडेकरांच्या 'वसुंधरे' प्रमाणेच महत्त्वाचे स्थान मिळविते. सावंतांनी 'शोणा'ची कर्णाच्या धाकट्या भावाची-कादंबरीत केलेली योजना कर्णाच्या व्यक्तिमत्वाला पूरक म्हणून आवश्यक आहे. शोणाचे आत्मनिवेदन कर्णाच्या प्रभावी आणि उत्कट चित्रणासाठी उपकारक ठरले आहे. सावंताची ही अपूर्व निर्मिती येथे लक्षात येते. एकूण पात्रमुखी आत्मनिवेदन पद्धती येथे व्यक्तींचे अंतरंग खोलवर उलगडून दाखविण्यासाठी यशस्वी ठरली आहे. शोण कर्णाचा एक महत्त्वाचा आधार येथे झाला आहे. कर्ण, राधा आणि अधिरथाच्या कुटुंबात समरस झाला याची कल्पना शोणाच्या चित्रणातून येते. कर्ण आणि शोण यांच्यातील बंधुप्रेम उत्कट व हृद्य आहे. 'राम-लक्ष्मण' यांच्या बंधुप्रेमाची आठवण व्हावी इतका जिव्हाळा त्यात ओतला आहे. शिवाजी सावंत आपल्या प्रतिभेच्या स्पर्शाने व्यक्तींना नवा उजळा येथे प्राप्त करून देऊन कर्णकथेचा नवा अविष्कार करतात.

मृत्युंजय कादंबरीत कृष्ण, दुर्योधन, कुंती, वृषाली, शोण अश्वत्थामा यांच्या दृष्टिकोनातून कर्ण चित्रित होतो. या व्यक्तींवर कर्ण मनापासून प्रेम करतो, वैर धरतो. शोणासारख्या मानलेल्या भावासाठी 'सहोदरां'च्या वधाची प्रतिज्ञा करतो.

शोणाच्या निर्मितीमुळेच कादंबरीत एक तीव्र संघर्ष आणि कर्णाच्या मनातील विविध भावनांची स्पंदने साकार झाली आहेत. 'प्रेम हे केवळ रक्तावर अवलंबून नाही तर सखोल भावनेवर ते अवलंबून असते.' 'कौरवांच्या पक्षाला न्याय कर्णाचं रूप घेऊन आला आहे.' कर्ण आणि शोण यांच्या नव्या नात्यातून कर्णाच्या व्यक्तित्वाला उंची प्राप्त करून दिली आहे. मानवी जीवनाचे नवे चिंतन साकार केले आहे.

अशाच प्रकारे सावंतांनी अश्वत्थामा आणि कर्ण यांची मैत्री नव्याने रंगविली आहे. द्रौण-कर्ण संबंध लक्षात घेता द्रोणाचा मुलगा अश्वत्थामा आणि कर्ण यांची अशी मैत्री जमेल असे वाटत नाही पण आपल्या स्वतंत्र कल्पनेने सावंतांनी ही मैत्री वर्णन केली आहे. उदात्त-तत्त्वज्ञ आणि सन्मित्र म्हणून अश्वत्थामा येथे दिसतो. तो कर्णाचा मार्गदर्शकही आहे. कर्णाच्या राजकीय आणि सामाजिक जीवनातील एक विश्रामस्थान अश्वत्थामा बनला आहे. अश्वत्थामा व्यापक बुद्धीचा तत्त्वचिंतक असूनही अव्यवहारी आहे. आध्यात्मिक प्रतिकाराची झेप त्याच्याजवळ नाही. आध्यात्मिक मनोधारणा व शाश्वत तत्त्वावर त्याची श्रद्धा असूनही तो ढासळतो. त्याची श्रद्धा भंग पावते. अश्वत्थामा एक तडफडणारी चिरंतन मानवता आहे. सावंतांनी दुर्योधन, कर्णाला मित्र करून घेण्यात यशस्वी ठरला, हे ठळकपणे लक्षात आणून दिले आहे. जीवनातील सर्व राजकीय डावपेच जरी दुर्योधन हुकला असला तरी कर्णाला पद्धतशीरपणे घेरण्याचा एकच पण हुंकमी आणि मर्मभेदी डाव त्याने अचूक साधला आहे. एवढेच नव्हे तर प्रत्येक वेळी कर्णाचा योग्य वापर त्याने करून घेतला आहे.

दुर्योधनाप्रमाणेच कृष्ण, भीष्म यांच्या व्यक्तिरेखाही कर्णाच्या संदर्भातच या कांदबरीत चित्रित केल्या आहेत. तात्पर्य, कर्णाभोवतीच्या सर्वच व्यक्तिरेखा एका डोळस जाणिवेने मृत्युंजय मध्ये साकार झाल्या आहेत. द्रौपदीला येथे फारसे महत्त्व मिळत नाही. कारण त्यांना कर्णाच्या भूमिकेला उठाव देण्यासाठी द्रौपदीच्या व्यक्तिचित्राला वाव देता आला नाही. कर्णाच्या व्यक्तिरेखेने कालोचित आवाहन सतत राहणार असे दिसते ते सामर्थ्य त्याच्या जीवनकथेत आहे. म्हणूनच कर्ण अनेक साहित्यिकांच्या अंतर्मनचिंतनाचा विषय झाला आहे.

**आकर्षण आणि अनुकम्पा :-**

मराठी साहित्यिकांना कर्णाविषयी एक विलक्षण आकर्षण आणि अनुकम्पा आहे. शिवाजी सावंत एक अलौकिक व्यक्तिरेखा म्हणूनच कर्णाचे चित्र रेखटतात. त्यामुळे कर्णाची सूर्यभक्ती, त्याला जन्मतः लाभलेली कवचकुंडले, गंगेची भक्ती, दानशूरत्व इत्यादी गोष्टीविषयी सतत पुनः पुनः उल्लेख येतात. कवचकुंडलधारी कर्ण तर या कादंबरीतील प्रत्येक व्यक्तीच्या कुतूहलाचा आणि विशेष आकर्षणाचा

विषय झाला आहे. अद्‌भुतता आणि कल्पकतेला संभवनीय करण्याच्या भरीस सावंत पडत नाहीत म्हणून पौराणिक वातावरणाची अत्यंत यशस्वी निर्मिती त्यांना करता आली.

सावंतांनी 'कर्णाचं जीवन म्हणजे एक लक्तर होत' हा समज दूर करून 'ते लक्तर नव्हतं तर ते जरीकाठांचं एक तलम राजवस्त्र होतं.' हे दाखवण्याचा प्रयत्न मृत्युंजय कादंबरीत केला आहे. सावंतांनी कर्णकथेतील सगळे सामर्थ्य व्यक्त करण्याचा प्रयत्न कर्णाची कथा ही एक सत्यकथा समजून येथे केला आहे. विविध भावभावनांचा थरारून सोडणारा एक संग्राम या कादंबरीत आहे. गदगदा हलवून सोडणारी, डोळे आणि कान उघडे ठेवून प्रचीतीचे सुख भोगायला लावणारी अशी ती नावीन्यपूर्ण कर्णकथा आहे.

सावंतांनी अनेक प्रसंगांची निर्मिती नव्याने येथे केली आहे. कर्णाच्या जीवनाशी आणि पौराणिक वास्तवाशी सुसंगती त्यात आहे. उदाहरणार्थ कर्णाला बालपणापासून गंगेच्या पाण्याची ओढ आहे. राधा त्याला सुरक्षिततेसाठी वारंवार बजावते तरीही कर्ण चोरून जातोच. कर्णाला गंगेप्रमाणेच सूर्यबिंबाचीही ओढ आहे. सावंतांनी महाभारतातील या गोष्टींना येथे अधिक विकसित केले आहे. कर्णाचा गंगेकडील व सूर्याकडील ओढा लक्षात घेऊन येथे त्याची तीव्रता वाढविली. कर्णाच्या या कथेत त्याचा मोठा कलात्मक वापर केला आहे. या कादंबरीतील 'शोण' सूर्यबिंबाला पाहून कर्णमुखाची आठवण होत असल्याचे म्हणतो, तेव्हा या कलात्मक सुसंगतीचा प्रत्यय येतो.

**कलात्मक सूचकता :-**

भगदत्त आणि कर्ण यांच्या संवादात एक मोठी सूचक गोष्ट वर्णन केली आहे. 'कावळीच्या घरट्यात कोकीळ वाढतो, या कल्पनेचे सुरवातीला कर्णाला आश्चर्य वाटते. पण लगेच 'कोकिळ' कोकिळ म्हणूनच वाढतो.' या कल्पनेने समाधानही वाटते. यातील नाट्य-छलित लक्षणीय आहे. कर्णही असाच कोकिळेसारखा दुसऱ्याच्या घरट्यात वाढला आहे.

लहानमुलांच्या खोट्या खेळातसुद्धा कर्णाकडे राजेपण येते, यात कमालीची सूचकता आहे. पुढील भाकीताची कल्पना यावरून येते. विद्या संपादनासाठी कर्ण निघतो, तेव्हा शोणाला त्याचा विरह असह्य होतो. 'शामची आई' या कादंबरीतील शिक्षणासाठी सर्वांचा निरोप घेणाऱ्या शामची आठवण यावेळी होते. असे हे प्रसंग सावंतांनी महाभारतात नसूनही नव्याने निर्माण केले आणि त्यांनी मानवी भावभावनांच्या विविध तरंगावर प्रकाश टाकून महाभारताला नवा आकार प्राप्त करून दिला आहे.

कर्णाला क्षत्रिय नाही म्हणून द्रोणाचार्य विद्या शिकविण्याचे नाकारतात, तेव्हा 'मी क्षत्रिय नाही काय? नसल्यास होऊ शकणार नाही काय?' (पृ.३९) असा प्रश्न कर्ण विचारतो, तेव्हा सावंतांनी द्रोणाचार्यांच्या असहाय्य अवस्थेचे मोठे मार्मिक वर्णन केले आहे. 'गरुडालासुद्धा भक्ष्यासाठी कावळ्यासारख्या जमिनीवर फेऱ्या माराव्या लागतात.' (पृ.३०) ही प्रतिमा मोठी सूचक आहे. द्रोणाचार्यांची असहाय्यता त्यात पुरतेपणी प्रकट झाली आहे. 'एकासारखा दुसरा नाही आणि दिसला तरी असत नाही.' हे महाभारतातील व्यक्तींचे वैशिष्ट्य सावंतांनी कायम ठेवूनच आपले व्यक्तिदर्शन घडविले आहे.[७७]

**'नवे अंकुर' :-**

जाती, वर्णापेक्षा 'शिष्याच्या अंगात विद्येबद्दल किती आत्मीयता आहे याला खरे महत्त्व आहे.' हे शिवाजी सावंतांनी केलेले भाष्य वर्तमानकालाच्या संदर्भात किती महत्त्वाचे आहे. साहित्यिक स्वत:च्या काळात जीवन जगतो, तो काळ कधीच विसरू शकत नाही. तो काळ असा मधूनमधून डोकावल्याखेरीज राहत नाही. या वर्तमानाच्या संदर्भामुळे येथे महाभारताला नवे नवे अंकुर फुटतात. विचारांची नवी दिशा महाभारतातील कथानकांच्या, व्यक्तींच्या आधाराने व्यक्त होते, शोधली जाते. या नव्या दृष्टिकोनातून महाभारतावर आधारित ललित साहित्याकडे पाहिले म्हणजे मग महाभारतनिष्ठ पारंपारिक भूमिकेतून या साहित्यावर घेतले जाणारे आक्षेप फारसे टिकत नाहीत. साहित्यिकाची ललित साहित्याच्या निर्मितीची भूमिका येथे महत्त्वाची म्हणून लक्षात घेतली पाहिजे.

'मी एक हाडाचा शिष्य होईन. विद्येसाठी विद्या घेईन, मी निर्धार करून टाकला.' (पृ.३८) या कर्णाच्या उद्‌गारातून व्यक्त होणारी खंत कोणत्याही सामान्य उपेक्षित विद्यार्थ्याचीच आहे. 'तहानलेल्या माणसाला समुद्रात असून पाण्याचा एक थेंब सुद्धा मिळत नाही.' (पृ.६०) या उद्‌गारात कर्णाची ज्ञानलालसा आणि एकटेपणाची जाणीव दिसून येते. एक विद्यार्थी म्हणून कर्णाची ही व्यथा वाचकांच्या अंत:करणाला जाऊन भिडते. 'मला काहीच दिसत नाही.' दिसेनासे झालेल्या अवस्थेतील कर्णाने द्रोणाचार्यांना दिलेले हे उत्तर मर्मभेदक आहे. विद्यार्थ्यांच्या दु:खाची ही जाणीव महाभारतकथेत सावंतांनी गोवली आहे. महाभारताच्या आशयातही काळानुसार पडणारी महत्त्वाची भर आहे. शेवटी 'मृत्युंजय' मधील कर्ण सूर्यदेवालाच गुरूदेव मानतो आणि 'सर्वांगतप्त' हाच त्यांचा आशीर्वाद लाभतो. द्रोणाचार्यांकडून कर्णाला प्रतिसाद न मिळाल्याने कर्णाची स्थिती शोभनीय होते. 'चांगली सहा वर्षे त्यांनी उपेक्षेच्या अग्नीत माझ्या कोवळ्या मनाचे अंकुर अक्षरश: जाळून टाकले होते.' (पृ.६३) असे कर्ण कळवळून म्हणतो. शेवटी जिद्दीने रंगशाळेत आपला पराक्रम दाखविण्यासाठी सिद्ध होतो. या प्रसंगाचे 'मृत्युंजय' कादंबरीतील

वर्णन या ठिकाणी लक्षात घेण्याजोगे आहे.

**रंगशाळा प्रसंग :-**

महाभारतातील विविध प्रसंगाची गुंफण, आणि उलगडा साहित्यिकांनी आपल्या पृथगात्म अनुभूतीने केला आहे. एकाच प्रसंगाच्या चित्रणात नाना तऱ्हा व अभिव्यक्तींच्या भिन्नभिन्न पद्धती आढळतात. त्या दृष्टीने या कादंबरीतील रंगशाळा-प्रसंग आपले लक्ष वेधून घेणारा आहे. रंगशाळाप्रसंगाच्या दिवशीच नेमके बिचाऱ्या कर्णाला सूर्यदर्शन घडत नाही. शोण, कर्णाला थोपवितो, कारण त्यालाही कर्णकुंडले निस्तेज झालेली दिसतात. यातून पुढे घडणाऱ्या दुःखद प्रसंगाची सूचना मिळते. या कल्पनेतूनच. सावंतांच्या प्रतिभेचा स्पर्श जाणवतो. या सगळ्यांचा परिणाम म्हणजे सामर्थ्यवान व पराक्रमी असूनही कर्णाला कासावीस व्हावे लागते. 'पंख तुटलेल्या असाहाय्य पाखरांसारखं त्याच मन तडफड करु लागलं.'[७८] पण शेवटी एकतर विजय संपादन करू किंवा मरण तरी पत्करू या विचाराने कर्ण तयार होतो. पण कर्णाचे हे आव्हान कृपाचार्य 'समान कुलातच द्वंद होऊ शकते' असे म्हणून उडवून लावतात. दुर्योधन पराक्रमाची ही चेष्टा पाहून हेलावतो,[७९] आणि कर्णाला 'अंगराज' म्हणून राज्याभिषेक झाल्याचे जाहीर करतो. दुर्योधनाने कर्णाला 'अंगराज' करुनही ती रंगसभा सारथ्याचा पुत्र म्हणून हिणविते. त्याचे कर्णाला अतिशय वाईट वाटते. उद्वेगाने तो सूर्यदेवाला उद्देशून म्हणतो, 'गुरुदेव, तुम्ही वर जळत असतांना माझी ही घोर विटंबना चालली आहे. कशाला मी सारथी झालो? सारथी झालो हा काय माझा दोष आहे? जन्म हा जन्माला येणाऱ्याच्या इच्छेप्रमाणे कधीतरी मिळाला आहे काय?' (पृ.८२) या ठिकाणी वर्तमान परिस्थितीत वावरणाऱ्या उपेक्षितांची वेदना आणि अंतरंग तीव्र स्वरुपात साकार झाले आहे. महाभारत कथेतून मानवी मनाचे धागे हे असे उलगडतात. याचवेळी कुंतीला मूर्च्छा येते. कर्ण आणि कुंती या संबंधावर मोठ्या खुबीने येथे प्रकाश पडतो. अज्ञाताची संगती लागते.

'दुर्योधनाने आपली बाजू सावरली.' याची केवढी कृतज्ञता कर्णाजवळ आहे.[८०] एखाद्या उपेक्षिताला नेमक्या वेळी आधार दिला तर ते तो कधी जन्मात विसरत नाही. जीवनातील या सत्याचे दर्शन येथे घडते. सारथ्याच्याच भाषेत हे भीषण सत्य शिवाजी सावंतांनी व्यक्त केले आहे.[८१] 'योगायोगच मानवाचं जीवन घडवीत असतात, मनुष्य केवळ त्याचं श्रेय उपटीत असतो.' कर्णाच्या जीवनकहाणीत या तत्त्वाचा साक्षात्कार सावंतांना होतो. येथे चंडोलाच्या कोवळ्या पिलांचा योजिलेला दृष्टान्त मार्मिक व सूचक आहे. त्यात चंडोलाच्या पिलांचा रुपात कर्णच दिसतो. सूर्याची किरणं पंडूच्या पाठीवर पडत असल्याचे पाहून कुंती

वरमाला घालते. (पृ.११८) कुंतीचा विवाह पंडूशी होतो पण त्याचे सूर्याशी असलेले नाते सावंत मोठ्या खुबीने पण काहीसे दूरान्वयाने का होईना पण सूचित करतात. पण पंडू शापित होतो, तेव्हा कुंतीच्या मनात विचार डोकावून जातो, 'भवितव्य जर कळले असते तर कर्णाला घेऊन कुठेही गेले असते!' येथे कुंतीच्या दृष्टीतून कुंती कर्णाकडे पाहते. तिला सगळे ठाऊक आहे म्हणून ती म्हणते, 'प्रत्यक्ष सूर्यपूत्र असून हे काजवे भुंकताहेत.' ही तीव्र जाणीव कुंतीला असूनही हतबल होऊन ती कर्णाचा अपमान उघड्या डोळ्यांनी सहन करते. कुंती म्हणते, 'मी माझं जीवन काळाच्या हाती सोपविलं आहे रे! आणि तुझं जीवन तुझ्या पित्याच्या हाती सोपविल आहे रे!'(पृ.१४९) हे निराशेचे उद्‌गार काढणेच तिच्या नशिबी आहे. सावंतांनी ही रंगशाळाप्रसंगीची विविध भावनांची आंदोलने उत्कटेने चित्रित केली आहेत.

### कर्ण आणि दुर्योधन :-

कर्ण अंगदेशाचा राजा झाला तरी तो सावध होता. केवळ मित्रकर्तव्य आणि दुर्योधनाचा आग्रह यामुळे त्याने राज्यपद स्वीकारले, अन्यथा चंपानगरीला परत जाण्याचीही त्याची मनोमन तयारी होती, असे चित्रण या कादंबरीत केले आहे.[८२] 'मृत्युंजय' मधील कर्ण स्वाभिमानी आहे.[८३] शेवटी दुर्योधनाला कर्णाची समजूत घालावी लागते. तो कळवळून म्हणतो, 'कर्णा, तुझ्या जोरावर तर मी त्या पांडवांना तोंड देण्यासाठी भक्कमपणानं उभा आहे. तूच जर आता तोंड फिरवलंस तर मला नगरात तोंड दाखवायला सुद्धा जागा राहणार नाही.' 'कुरूंचा युवराज दिवाभीतासारखा जीव मुठीत घेऊन फिरतांना तुला पाहायचा आहे की काय? तू हस्तिनापूर सोडून निघून गेलास तर हे पांडव मला जगणेसुद्धा अशक्य करुन टाकतील.' दुर्योधनासाठी कर्णाने पांडवद्रोह पत्करला, आपले जीवन वेचले असे येथे कादंबरीकाराने सूचित केले आहे.

एखाद्या प्रणयप्रधान कादंबरीत नायकनायिकेच्या प्रथम परिचयाच्या प्रसंगाप्रमाणेच कर्ण आणि वृषाली यांची भेट होते. कर्ण पाण्यात बुडणाऱ्या वृषालीला वाचवितो. या प्रसंगांच्या निमित्ताने कादंबरीकाराने केलेले भाष्य लक्षात घेण्याजोगे आहे.[८४] सावंतांनी कर्ण आणि दुर्योधन यांच्यातील सख्य चित्रित करण्यासाठी एक सूचक प्रसंग येथे योजिलेला आहे. कर्णासाठी त्याचा मित्र म्हणून दुर्योधनच 'वृषाली' ही वधू सुचवितो. वैयक्तिक सुखदुःखाच्या पातळीवर मित्र एकमेकांचे हित पाहत असतात, हे यातून स्पष्ट झाले आहे. यात मानवी मनाचे रहस्य जाणून घेऊन कादंबरीकाराने आविष्कृत केले आहे. विवाहाच्या वेळी वृषाली कुंतीने दिलेला निळा शालू परिधान करते. या प्रसंगी आसवं ढाळणाऱ्या कुंतीचे चित्र मोठे

हृदयस्पर्शी झाले आहे. कर्णाचा मात्र सगळा ओढा 'राधे' कडेच आहे. कर्णाचे पाय राजमाता कुंतीसारखे आहेत, हे युधिष्ठिराच्या लक्षात येते. पण कर्णाला राधेचाच ओढा आहे. दुर्योधनाचा खरा आधार कर्ण आहे. तो कर्णाला 'एक अभेद्य ढाल', 'तेजाची खाण', 'धगधगीत निखारा', 'सुरक्षा-पेटी' मानतो. कर्ण आणि दुर्योधनाच्या मैत्रीतूनच कौरव पक्षाला खरे बळ प्राप्त झाले आहे. 'जोपर्यंत कर्ण जिवंत आहे तोपर्यंत दुर्योधन अजिंक्य आहे.' (पृ. १९०) या ठिकाणी कर्णाविषयीचा विश्वास प्रगट झाला आहे. 'राजा दुर्योधन हे कर्णाच्या म्यानात ठेवलेलं कुरूचं भक्कम खड्ग आहे.' हे कर्णही ओळखून होता. द्रौपदीस्वयंवराच्या वेळी अपमान झालेल्या कर्णाची बाजू मांडण्यास दुर्योधन पुढे येणार एवढ्यात अर्जुन पण जिंकण्यासाठी पुढे येतो. अशी कौशल्यपूर्ण प्रसंगयोजना येथे केली आहे. त्यामुळे कर्ण आणि दुर्योधन यांच्या मैत्रीच्या नात्याला गती मिळते. कर्ण वीरश्री, अपमान, पुत्र (सुदामन्) वियोग या भिन्न भावनेच्या फेऱ्यात येथे सापडला आहे.

'समाजाच्या संकेतापुढे व्यक्तीचं जीवन, ध्येय, आशा, आकांक्षा सर्व सर्व काही कवडी मोलाचंच नाही काय?' हे शिवाजी सावंतांचे लक्षणीय भाष्य आहे. कर्णकथेचा एक नवा अन्वयार्थ हा आहे. कर्णाच्या वाट्याला कोणते दुःख आले होते, हे कादंबरीकाराने अचूकपणे हेरले आहे. साहित्यिक जेव्हा महाभारतकथेतून असे अन्वयार्थ शोधतात, तेव्हा या नव्या संदर्भात कथेच्या कक्षा रुंदावतात. हे नवे चिंतन महाभारताची वाढ करते.

**'वृषाली-कर्ण'-प्रीती :-**

या कादंबरीतील पात्रमुखी निवेदनपद्धतीमुळे कर्णाची पत्नी वृषाली हिला आपल्या उत्कट भावना व्यक्त करता आल्या. हे कर्णाविषयी आपल्या मनातील आदर वाढविण्यास वृषालीच्या कर्णावरील प्रेमाची अभिव्यक्ती येथे उपयोगी पडली आहे. वृषालीचे कर्णावर निःसीम प्रेम आहे. वृषालीच्या मुखाने कर्णाचे विशाल मन, औदार्य व सौंदर्य अधिक खुलून दिसते, कर्णाचा अव्हेर करणाऱ्या द्रौपदीवर प्रथम वृषाली रागावते. पण नंतर तिला द्रौपदीची कीव करावीशी वाटते. कारण 'आपल्या हाताशी आलेला अमृताचा कुंभ त्या अविचारी स्त्रीनं कुलाच्या घमेंडीनं पायानं ठोकरला होता. मुकुटात बसवावं असं सुगंधी पुष्प तिनं पायदळी तुडविलं होत.!' (पृ.२३३) हे निवेदन फक्त वृषालीलाच करता येण्याजोगे आहे. कर्णही वृषालीवर अलोट प्रेम करतो-' .....वृषाली मला पत्नी म्हणून लाभणार असेल तर मी सूतपूत्र म्हणून एकच का दहाजन्म सुद्धा पत्करीन.' (पृ.२३६) असे हे 'वृषाली-कर्ण' प्रीतीचे बहारदार वर्णन सावंतांनी स्वतंत्र कल्पनाशक्तीने साकार केले आहे. साहित्यिकांच्या प्रतिभेची ही सारी अभिनय किमया आहे. असे

रम्य परस्पर प्रणयाराधनाचे चित्र महाभारतात नाही ते 'मृत्युंजय' सारख्या कादंबरीतच येऊ शकते. त्यामुळे व्यक्तींच्या विविध भावछटांना नवी रंगत आणण्याची किमया लेखक, कलावंत करू शकतो हे स्पष्ट होते. कर्ण सद्गुणसंपन्न असूनही दुर्दैवीच ठरला. 'दुर्योधनाच्या कल्पनेला पाठिंबा देणं हे कर्णाचं जिवितकार्य आहे.' (पृ. २४८) पण 'दुर्दैवाला जवळ करण्याएवढं विशाल हृदय सज्जनांजवळच असतं.' असे वृषाली आपल्या पतीला उद्देशून म्हणते. तिच्या या उद्गारातून कर्णाच्या व्यक्तिमत्त्वाला उदात्ततेचा स्पर्श झाला आहे. कुंती आणि वृषाली यांच्या संभाषणातून 'कर्ण-वृषाली' प्रेमाची प्रचीती येते. कादंबरीकाराच्या कल्पनाशक्तीच्या प्रभावाने हे घडते. वृषाली आपल्या भावी मुलाचे नाव 'कुंडलसेन' किंवा 'कवचधर' ठेवण्यास सूचविते पण कुंतीला सगळे सहस्य ठाऊक असल्यामुळे ती तुझा मुलगा कवचकुंडलधारी होणार नाही; असे खात्रीपूर्वक सांगते. वृषाली कर्णावरील प्रेमापोटी ही स्वप्ने रचीत असते हे येथे स्पष्ट होते.

**कर्ण आणि द्रौपदी :-**

'मृत्युंजय' कादंबरीतील कर्ण आणि द्रौपदी या व्यक्तींविषयी विचार केला तर सावंतांनी आपले सगळे लक्ष कर्णावरच केंद्रित केल्यामुळे द्रोपदीच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन ठळकपणे येथे घडविले नाही, हे लक्षात येते. कर्णाच्या चांगुलपणाला पूरक म्हणूनच या कादंबरीत अन्य व्यक्तींना स्थान लाभले आहे. मयसभेतील चमत्कारिक योजनेमुळे दुर्योधन जमीन समजून पाण्यात पडतो व द्रौपदी त्याला हिणविण्यासाठी कुत्सितपणाने बोलते, तेव्हां कर्णाला तिची किळस वाटते, तो म्हणतो - 'तिच्या शरिराला सुगंध असेल, पण मनातून असल्या दुर्गंधाशिवाय कधी काय दिसलं ?' ही कर्णाची प्रतिक्रिया द्रौपदीस्वयंवरापासून होत आलेल्या अपमानानेच उफाळून येते. त्याचा सगळा राग द्रौपदीवस्त्रहरणप्रसंगी व्यक्त झाला. सावंतांनी कर्णाच्या दुष्कृत्यावर पांघरूण घालतांना हा युक्तिवाद केला आहे. कर्णाच्या अंतरंगात शिरून त्याच्या भावनांशी समरस झाल्यामुळे हा उलगडा सावंतांना येथे करता आला. हे येथे लक्षात घेतले म्हणजे साहित्यिकांनी महाभारतात टाकलेली नवी भर प्रत्ययाला येते. पण अश्वत्थाम्यासारख्या नराधमाला क्षमा करणाऱ्या द्रौपदीच्या मानाने कर्णाचे औदार्य येथे थिटे पडते. येथे कर्णाच्या मनात सूडाची क्षुद्र भावना पेटली आहे. हे पारंपरिक दृष्टीने समर्थनीय ठरू शकत नाही. कर्णाने दुर्योधनाशी नाते जोडले, त्यातून हे पुढचे सगळे घडत गेले आहे. दुर्योधनाला सावरणाऱ्या कर्णाची स्थिती ही शोचनीय झालेली आहे.[८५] द्यूतात जिंकल्या गेलेल्या द्रौपदीची विटंबना चालू असतांना कर्णाच्या मनात त्याच्यातील 'सारथी' आणि 'सूर्यशिष्य' असे एक भयंकर द्वंद्व सुरू होते.[८६] एक स्वतंत्र निर्मिती म्हणून या प्रसंगाकडे पाहिले म्हणजे कादंबरीचे स्वतंत्र प्रसंग निर्मितीचे वैशिष्ट्य लक्षात

येते. कर्णाची यावेळची मन:स्थिती द्विधा आहे.[८७] कदाचित 'सूर्यपुत्रापासून मला संरक्षण नको', असेही द्रौपदी म्हणेल. नाहीतर जरासंधासारखे दु:शासनाशी कर्णाचे युद्ध जुंपणार होते, पण हे घडायचे नव्हते. कर्णाच्या मनातील सद्भाव याही प्रसंगी प्रगट करून त्याच्या दुर्गुणांवर पांघरूण घालण्याचा कादंबरीकाराचा प्रयत्न येथे सफल झाला आहे. जणुकाही कर्ण द्रौपदीला साहाय्य देणार होता. पण तेवढ्यात कृष्ण साहाय्य करतो, असा हा प्रसंग आहे...असाच एक प्रसंग मयसभेतील आहे. मयसभेत कर्णाला पाहून द्रौपदीच्या मनात एक विचार डोकावून जातो. '....हिरण्मयी, या कवच कुंडलाचं पत्नीत्व दैवी आलं असत तर किती कारंजी फुलली असती माझ्या जीवनाच्या उद्यानात' (पृ.३३०) कादंबरीचा केंद्रबिंदू कर्ण आहे, म्हणून अनेक बाजूंनी त्याच्या व्यक्तित्वाला फुलविण्याचा, उठावदार करण्याचा हा प्रयत्न आहे. द्रौपदीच्या व्यक्तित्वात मुळात अशी प्रेरणा आढळत नाही. पण या कादंबरीतील द्रौपदीच्या या उद्गाराने वृषालीला धन्यता वाटते. याचा अर्थ वृषाली मोठ्या मनाची व पतीची अस्मिता जपणारी आहे. याहीपेक्षा कर्णाच्या मनाचे मनोज्ञ दर्शन एवढा उफाळलेला हा कर्ण असूनही पुन्हा 'पांचाली क्षमा कर' असे जेव्हा म्हणतो तेव्हा त्या प्रसंगातून घडते. याठिकाणी सावंतांच्या प्रतिमाविश्वाला बहर येतो. समईच्या ज्योतीतून भासणाऱ्या द्रौपदीशी कर्णाचा हा संवाद कल्पिलेला आहे. त्या भासाने द्रौपदी व कर्ण आपापल्या मनातील वेदना बोलून दाखवितात.

'मातेच्या आशेचं पालन करणारा पती जेव्हा आपल्या पत्नीला, आपल्या बंधुंची पत्नी करतो, तेव्हा, त्या जेष्ठ पतीला साथ करणारी स्त्री कुलटा कशी ठरते?' (पृ. ३३२) द्रौपदीचे हे मनोगत शिवाजी सावंतांच्या प्रतिभेचा एक नवा अविष्कार आहे. कर्णाला ही जाणीव होते, तेव्हा तो कळवळून म्हणतो 'नाही पांचाली, तू कुलटा नाही, तू पतिव्रता आहेस वृषाली इतकीच तू पवित्र आहेस.'... (पृ. ३३२) सावंतांनी कर्ण आणि द्रौपदी यांच्या मनोविश्वात प्रवेश करून विविध सूक्ष्म भावनांची आंदोलने येथे प्रगट केली आहेत. कर्णाच्या मनातील सद्भावना आणि सौजन्य या प्रसंगातून समर्थपणे व्यक्त होते. पांचालीला असे बोलल्याचे दु:ख कर्णाला होते, हे त्याने स्वत:चे अध:पतन मानले आहे. त्यातूनच कर्णाचे पांडवांशी अखंड वैर उद्भवले. असाच आणखी एक प्रसंग आहे, परत निघालेल्या कृष्णाला थांबवून कर्ण म्हणतो, "....पाच पतींची पत्नी असूनही पतिव्रत्याच्या पवित्र कळसावर पोहचलेल्या त्या एकमेव आर्येला...पांचालीला....सांग की....की शक्य असल्यास या कर्णाला क्षमा कर." (पृ.५०३) उपरती झालेल्या कर्ण दाखविल्यामुळे कर्णाचे खरोखर उदात्तीकरण येथे झाले आहे. 'महाभारतात' हा आपल्या पश्चात्तापाने पापक्षालन करून घेणारा कर्ण नाही. पण आपल्या हातून द्रौपदी दुखावली गेली, हे 'मृत्युंजय' मधील कर्णाचे एक शल्य आहे. या कर्णाचे मन निर्मळ आहे, पण एक अतिरेकी कृत्य त्याच्या हातून घडले, 'बाण

हातचा सुटला', असे सावंतांनी सूचित केले आहे. या भावकथेतून कर्णाला 'माणूस' म्हणून चित्रित करण्याचा प्रयत्न स्पष्ट होतो.

**'कर्णकुंती' :-**

'कर्णकुंती' यांच्या भेटीचा एक चित्तथरारक प्रसंग 'मृत्युंजय' मध्ये वर्णिला आहे. कर्णाला कुंतीची कठोरता या प्रसंगी विशेष जाणवते. तो वाघिणीपेक्षाही निर्दयपणाचे कुंतीचे कृत्य आहे असे सांगतो.[८८] कर्णाला कुंतीची पर्वा नव्हती. तो म्हणतो, 'नाळही न कापता तोडलेलं बाळ आपल्या पुत्रांचा काळ होतं हे पाहून मुकाट अश्रू ढाळ.' जन्म न देताही त्याच्यावर सुसंस्कार करणाऱ्या राधेची कृतज्ञतापूर्वक त्याला अधिक जाणीव आहे. म्हणूनच कर्ण कुंतीला तुटकपणाने बोलतो. कुंती आपली आई आहे हे समजूनही 'सेनापती, पांडवांच्या मातेच्या मिठीत कसा शिरू शकणार?' ही त्याची अडचण आहे. आई आणि मुलगा बऱ्याच काळानंतर एकत्र येतात या पार्श्वभूमीवर भावोत्कट प्रसंगांची निर्मिती करणाऱ्या या कादंबरीकाराने कर्णकुंती यांच्या भेटीच्या प्रसंग मोठ्या संयमाने वर्णिला आहे. वस्तुत: कर्णाच्या उदात्त मनाचा प्रत्यय याही ठिकाणी अपेक्षित आहे. 'मृत्युंजय' कादंबरीत कर्णाच्या मनाचा मोठेपण सर्वत्र वर्णन केला आहे. त्या पार्श्वभूमीवर येथेही शेवटी कर्ण निवळतो आणि 'पांडवांच जगणं हे माझ्या मरणाच्या पायावरच उभं राहणार असेल, तर तो पायथ्याचा पाषाण होणं ही मी आनंदाने मान्य करतो,' (पृ.५११) असे म्हणतो.

शिरवाडकरांच्या 'कौंतेय' मध्ये अत्यंत तीव्र संघर्ष आई आणि मुलात होऊनही शेवटी कर्ण कुंतीला भेटतो असे वर्णन केले आहे. शेवटी येथेही कर्ण न राहवून कुंतीला आई म्हणून भेटतो. वाचकांच्या मनात कर्णकुंती यांच्या भेटीच्या पर्यवसानाविषयी सुरवातीला उत्कंठा निर्माण करुन मग त्यांच्या शिगोशिग भेटीचे वर्णन येते. कुंतीशी असलेल्या नात्याचा उलगडा होऊनही कर्ण त्याविषयी कोठेही वाच्यता करीत नाही, कारण त्यामुळे कौरवपांडवांचे युद्ध व्हावयाचे थांबले असते, असे त्याला वाटते.

हस्तिनापुरात महायोद्धांसाठी घडविलेले हस्तभूषण राजमाता कुंतीच्या हातून नेमके कर्णाच्या पायावरच पडते, हा एक कल्पक आणि सूचक प्रसंग आहे. या बोलक्या प्रसंगातून प्रतिभावंताच्या नवनिर्मितीची कल्पना येते. (पृ. २७४) असाच आणखी एक प्रसंग आहे. राजवस्तूत चित्रित केलेल्या चित्रांमध्ये कर्णाचे उपास्र दैवत असलेल्या सूर्यदेवांचे चित्र नाही. ही गोष्ट त्याची सूर्यभक्ती व्यक्त करणारी आहे. कर्णाला चित्रमालिकेत सूर्यदेवांची अनुपस्थिती खटकते. त्याचप्रमाणे कुंतीच्या आग्रहावरुन कर्ण त्यागाच्या प्रसंगाचे अतिशय हृद्य चित्र रेखाटून लावण्यात आले होते. यावेळचे कादंबरीतील वर्णन अतिशय हृदयस्पर्शी झाले आहे. त्यातील

कल्पनाही लक्षात घेण्याजोगी आहे. सूर्यदेवांचे किरण पेटीपर्यंत पोहचले आहेत. त्या पेटीत काय आहे? या प्रश्नाचे उत्तर दुर्वासच देऊ शकतील, असे कुंतीकडून ऐकल्यावर कर्ण दुर्वासासंबंधी विचारतो. या घटनेची वाचकांना पूर्वकल्पना असल्याने या प्रसंगातील नाटयाची थरारक अनुभूती पुन्हा येते. अशा प्रसंगांच्या निमित्ताने 'कर्ण-कुंती' यांच्या संबंधावर हळुवार पण मोठ्या सूचकतेने प्रकाशझोत टाकण्याचा कादंबरीकाराचा कल्पक प्रयत्न येथे यशस्वी झाला आहे. हे प्रसंग महाभारताला फुटलेले धुमारे आहेत.

**कर्णातील 'माणसा'चा शोध :-**

शिवाजी सावंतांनी 'मृत्युंजय' कादंबरीत कर्णातील माणसाचा शोध मनापासून घेतला आहे. क्षत्रियांचे तेज असलेला पराक्रमी कर्ण, भावकोवळा कर्ण, विद्यार्थी दशेतील कर्ण, कौरवपांडवांच्या सहवासातील कर्ण, एकाकी कर्ण अशी ही कर्णाची विविध रूपे प्रसंगपरत्वे येथे साकार केली आहेत. कर्णाकडे 'माणूस' म्हणून पाहतांना महाभारताकडे पाहण्याचे भान साहित्यिकांना रहात नाही. हे बहुतेक सगळ्याच ललित साहित्यात घडते. कारण त्यांची स्वत:ला जाणवलेला व्यक्तीचा विशिष्ट आकृतिबंध अभिव्यक्त करण्याची प्रामाणिक धडपड असते. त्याने मूळ कथेचा केवळ सांगाडा उचललेला असतो आणि आपल्या स्वतंत्र प्रतिभाशक्तीने त्या सांगाड्यात तो नवा प्राण भरीत असतो. सावंतांच्या या कर्णालाही याच भूमिकेतून आपल्याला समजून घ्यावे लागते. ललित साहित्याचे वेगळेपण लक्षात घेतले म्हणजे 'मृत्युंजय' मधील या कर्णाची व्यथा वेगळीच आहे हे लक्षात येते. 'प्रत्येक व्यक्ती म्हणजे वेगवेगळ्या विचारांचं, कल्पनांच आणि भावभावनांच अतिशय गूढ असं स्वतंत्र विश्वच असतं.' (पृ. ३०२) हे कौरवांना नीट कळत नाही. कर्ण जवळ असूनही आपण दूर राहिलो ही खंत व्यक्त करतो.[८९] शकुनीमामांच्या राजकारणाच्या नावाखाली चाललेल्या कपटकारस्थानाची दुर्गंधी येताच कर्ण तीव्र विरोध करतो. 'मामा, स्वत:ला सुबलराज म्हणवून घेता.' ज्या हातात खड्ग घेऊन शत्रूला समरांगणात खडे चारावेत त्याच हातात त्या कवड्या घेऊन तुम्ही दैवाचा फास पांडवांच्या कंठाभोवती टाकू पहाताहात. हे आपल्याला शोभादायक नाही. (पृ. २९४) या उद्गारातून कर्णाची न्यायाची चाड प्रगट होते. द्यूताला कर्णाचा विरोध आहे त्याला आडमार्ग पटत नाहीत. भरसभेत कर्ण सांगतो,... 'पांडवांशी वैर वाढवून कुरुंच कल्याण होणार नाही, या पितामहाच्या कल्पनेशी मी सहमत आहे.' कारण 'वैर हा जीवनाचा मंत्र होऊ शकत नाही.' हे 'मृत्युंजय' कर्णाच्या मनातील चिंतन आहे, सावंतांनी कर्णमुखाने हे तेजस्वी तत्वज्ञान विशद केले आहे. कर्णाचा विश्वास समरांगणातील निर्णयावर आहे हेच यातून सूचित होते. ते कर्णाच्या वीरवृत्तीला शोभून दिसणारेच आहे. दुर्योधन कर्णाच्या सल्ल्याने

पूर्णपणे वागतो, हे मत रूढ आहे. पण प्रत्यक्षात कर्ण-दुर्योधन या दोन व्यक्तिमत्त्वांमध्ये महदंतर होते हे सावंतांनी मार्मिकपणे दाखविले आहे. पांडव वनवासी झाल्याचे ऐकून कर्णाच्या मनात वेदनेची एक नवी कळ उमटते. त्याची ही वृत्ती लक्षात घेऊन 'शत्रूवर दया दाखविणं हा तुझा जन्मजात स्वभाव विशेष आहे. (पृ. ३३४) असे उद्गार त्याचा मित्र अश्वत्थामा काढतो.

कर्णाला पुष्कळदा दुर्योधनाचा स्वभाव बदलावा असेही वाटे. 'पण स्वभाव म्हणजे काही कुणालाही आणि केव्हाही बदलता येईल असा रथाचा घोडा थोडाच आहे.' (पृ. ३३७) यात कर्णाची इच्छा कळते, त्याच्या स्वभावाचे दर्शन घडते आणि या कामी त्याचा नाईलाजही दिसून येतो. कौरव-पांडव यांचे वैर एकट्या कर्णामुळेच जन्मले नाही तर सगळेच त्याला कारणीभूत आहेत. सर्वांच्यामुळे जन्मले ही सावंतांनी आपली रास्त भूमिका येथे मांडली आहे. ही लेखकाची भूमिका या कादंबरीत स्पष्ट होते. कर्णाने स्वत: या गोष्टीची व आपल्या वागण्याची कबुली दिली आहे.[१०] कादंबरीकाराने कर्णाला पुष्कळदा सावरुन धरण्याचा प्रयत्न केला आहे. कर्णाने उपेक्षित जिणे आपल्या वाटेला येईल हे गृहीत धरून तिरस्कारयुक्त भाव व्यक्त केले आहेत. ते सात्त्विक मनोवृत्तीच्या माणसाला न शोभणारे आहेत. कर्णाचे हे उद्गार त्याच्या उदात्त चित्रणाला फारसे पोषक ठरु शकत नाहीत. जग वाईटच म्हणते म्हणून वाईट आचरण अंगीकारुन चालणार नाही. भावसुजन अंत:करणात या विचारांना थारा असता उपयोगाचे नाही.[११] दुर्योधनाला वीरोचित उपदेश देणारा कर्ण हेच खरे पराक्रमी, सामर्थ्यशाली कर्णाचे चित्र येथे सावंतांना अभिप्रेत आहे.[१२] कर्ण अधिक मानवी वाटतो. इहतत्त्वांना त्याच्या जीवनात जे विशेष महत्त्व आहे ते येथे जाणवते. सामान्य माणसाच्या मनातील भाव या विविध प्रसंगातून कर्णाच्या ठायी प्रगट झाले आहेत.

कर्णाच्या दिग्विजयाचे किंवा कर्णाच्या शौर्याचे, शोण मुखाने आलेले वर्णन व तपशील कादंबरीत वातावरण निर्मितीला उपकारक ठरले आहे. त्यामुळे कादंबरीकाराला कर्णाचा 'अथांगमनाचा एक अद्वितीय योद्धा' म्हणून गौरव करता आला आहे. स्वतंत्र प्रसंग निर्मिती आणि कल्पकतेचा विलास यातून कुरूंची प्रतिम्रा सांभाळणारा, दुर्योधनाच्या गुरालाही शरणागती पत्करावयास लावणारा, पाण्यातील गाय आणि पाडस यांची गाठ घालू पाहणारा, अर्जुनाच्या रक्ताने पाय धुण्याची प्रतिज्ञा करणारा, माणसाचे जीवन कर्तृत्वावरच अवलंबून असते असे मानणारा हा 'मृत्युंजय' कर्ण विशेष लक्षणीय आहे.

**कवचकुंडलाचे दान :-**

इंद्र, कवचकुंडल मागायला येतो तेव्हा दान देणे न देणे हा प्रश्न तर 'मृत्युंजय' मधील कर्णाच्या मनात निर्माण होत नाही उलट ही कवचकुंडले देतांना

कशी व कोठून कापून द्यायची असा प्रश्न पडतो. इंद्र याचनेसाठी येतो याचे कर्णाला आश्चर्य वाटते.''देवराज इंद्र' या कर्णासारख्या सामान्य सूतपुत्राच्या दारात आपण!' (पृ. ४५०) इंद्रावरही याचक होण्याची वेळ आली यातच कीर्ती मिळविणाऱ्या दानशूर कर्णाला समाधान लाभते. सावंत काव्यत्म प्रतिमेच्या साहाय्याने कर्णाच्या जीवनातील दातृत्वाच्या उत्कर्षबिंदूचे वर्णन करतात, या प्रतिमांनीही महाभारतातील आशयाला नवा आकार आणि संदर्भ प्राप्त झाला आहे. उदाहरणार्थ अंजीर कापतांना आतला गर्भ उघडा पडावा तसं कुंडलदान देतांना कर्णाचं झाल. कर्णाच्या दानामागे हेतू होता, या गोष्टीची आठवण सुद्धा, या प्रसंगाच्या दर्शनाने येथे होत नाही, कारण कादंबरीकाराच्या मनातही सहेतुक दानाची कल्पना नाही. म्हणून येते कवचकुंडलदान ही कर्णाची चूक होती की स्वार्थ होता हा प्रश्नच उद्‌भवत नाही. कवचकुंडल विरहित विरूप झालेल्या कर्णाचे अत्यंत करुण व हृदयस्पर्शी चित्र येथे रेखाटले आहे.[१३] या प्रसंगाला एक वेगळीच कलाटणी सावंत देतात. आपल्याला पाहून इतरांच्या हृदयाला यातना नको म्हणून कर्ण स्वत:ला सुरूप करण्याची विनंती करतो ही कल्पना नवी आहे. कर्णाच्या या किमान मागणीतसुद्धा निरपेक्षवृत्ती आहे म्हणून ती पटण्याजोगी आहे. त्यात कोणताही स्वार्थ नाही. अशा नवनिर्मितीने व्यक्ती नवे रूप घेते. या व्यक्तींच्या कृतीउक्तीमागील कार्यकारण भाव प्रगट होतो व नवे संगतवार व्यक्तिचित्र उभे राहते आणि नवा अविष्कार घडतो. कवचकुंडलदाना नंतर दुर्योधन आणि कर्ण यांच्यात झालेला संवाद या दृष्टीने लक्षात घेण्याजोगा आहे. एखाद्या जखमी वाघासारखा दुर्योधन कर्णाला म्हणतो, 'माझ्या सर्व आशा-आकांक्षावर तू पाणी ओतलं आहेस.' कर्णही तेवढेच आश्वासक उत्तर देतो, 'कवचकुंडलावर माझा पराक्रम अवलंबून होता असं तूला वाटतं की काय?' अवसानपूर्वक हे बोलल्यानंतर कर्ण कसा सामान्य माणसारखा मनाने खचतोच. एखादी घटना उत्साहाच्या भरात माणसाकडून घडते पण नंतरतो अंर्तमुख होऊन विचार करतो, तसे हे कर्णाचे मन त्याला अस्वस्थ करते. कर्णाचे माणूसपण यावेळच्या कृतीउक्तीतून क्षणाक्षणाला प्रगट होते.[१४] कर्णाचे आपल्या मोठेपणाच्या कीर्तीसाठी हे 'सीमादान' केले होते, खरोखरच ही दानाची सीमा होती. पण ते दुर्योधनाच्या राजकारणी मनाला समजणे अवघड होते. निदान दुर्योधनासाठी कां होईना ब्रम्हास्त्र प्राप्ती त्याच्या दृष्टीने महत्त्वाची होती. कर्ण तेवढ्यासाठी सामान्य विद्यार्थ्याची व्रती भूमिका स्वीकारतो.

**विद्यार्थी कर्ण :-**

एकदा अपमान केलेल्या द्रौणाचार्यांसमोर पुन्हा विद्यार्थी म्हणून जाण्यात अर्थ नव्हता, हे कर्णाने ताडले होते. तरीही तो मोठ्या आत्मविश्वासाने दुर्योधनासाठी केवळ आपल्यावर उपकार करणाऱ्या मित्रासाठी व्यवहाराच्या कठीण काळ्या पाषाणावर

उभा राहून निर्णय घेतो.[९५]

'स्वत:साठी जगतो तो माणूस कसला?' असे म्हणणारा हा मानी कर्ण 'आपण जगावं-मानानं जगावं आणि इतरांना जगवावं हीच माझी खरी विचारसरणी....' असे म्हणतो. 'शांततापूर्ण सहअस्तित्व हा माझा मूळ स्वभाव होता...पण' असे हा कर्ण स्वत: सांगतो. यावरुन एकंदरीत कर्णाला जे घडते आहे त्याची मनोमनी खंत आहे, असे दिसते. तो काहीशा नाइलाजाने आपल्या जीवनाची दिशा दुर्योधनाच्या गत उपकाराला स्मरून ठरवितो. सावंतांनी नव्या 'शांततापूर्ण सहजीवनासारख्या' जीवनमूल्याला येथे कर्णाच्या मुखाने व्यक्त केले आहे. महाभारतात मराठी प्रतिभेनेही काही नवी भर घातली आहे हे या उदाहरणातून स्पष्ट होते.

कर्ण व द्रोणाचार्य यांच्या संवादातून या सूतपुत्राची उपेक्षा झाली आहे.[९६] कर्ण उसळून द्रोणाचार्यांना जे म्हणतो, त्यातून त्याचा प्रखर आत्मविश्वास दिसतो. 'जन्माला येणं हे दैवाच्या हाती आहे पण पुरुषार्थ माझ्या दंडात आहे, दंडात! मला तुमच्या ब्रम्हास्त्राची मुळीच आवश्यकता नाही, आणि भासलीच तर मी ते एक सूतपुत्र म्हणूनच मिळवीन. स्वतंत्रपणे! तुमच्याशिवाय.'(पृ.४०३) आपल्या काळाच्या संदर्भात सावंतांनी केलेले हे भाष्य म्हणजे महाभारत कथेला हा नवा जीवंतपणा प्राप्त करुन देणारे संजीवन आहे. जीवनावरचा विश्वास उडविणारा, अंध:कार कर्णासारखा अनेक उपेक्षितांना घेरणारा व तीव्रतेने जाणवणारा आहे. अपमानित झालेल्या कर्णाची व्यथा कमालीची तीव्र बनून आज ललित साहित्यातून व्यक्त होतांना दिसते, याचे कारण मराठी ललित लेखकांच्या प्रतिभेला कर्णाच्या पावलोपावली होणाऱ्या उपेक्षेची खंत वाटते. त्यात खरे माणसाला आव्हान आहे असे वाटते. म्हणून मोठ्या आत्मीयतेने ते कर्णाच्या जीवनातील ही व्यथा बोलकी करतात.

'अपमान एकदा जरी सहन केला तरी जीवन संपते.' या निमित्ताने सावंतांनी जीवनावर केलेले हे असे भाष्य पाहिले म्हणजे महाभारताला नवे धुमारे फुटले आहेत, असे वाटते. कर्ण म्हणतो, 'जीवन म्हणजे केवळ एक वणवा आहे...कुणीतरी पेटवलेला, कसातरी पेटणारा, कुणाला तरी जाळून काढणारा, आणि केव्हा तरी आपोआप विझणारा.' (पृ.४६४) कर्णाची ही जीवनविषयक अनुभूती सामान्य माणसाला मुळीच परकी नाही.

हताश न होता जिवाची राख केली तरी चालेल या भावनेने कर्ण परशुरामाकडे जातो. सत्यप्रिय कर्ण धडधडीत खोटे बोलतो तेही कळवळून सांगतो. त्याला शिष्य म्हणून स्वीकारणारा परशुराम येथे आधुनिक परिभाषेत आपले विचार मांडतो. सामर्थ्याचा अर्थ दुर्बलांचे संरक्षण असाच त्यांनी लावलेला आहे.[९७]

कर्णाचे आश्रमातील जीवन, महेंद्र पर्वतावरील आठवणी यातून विविध मानवी भावभावनांचा उलगडा होतो. अतिशय हृद्य चित्रण या भावनांचे येथे केले आहे आपल्या कल्पनाशक्तीने महाभारतातील हा मुग्ध प्रदेश कांदबरीकाराने भरून काढला आहे. कर्णाच्या जीवनातील समस्यांचे पलिते त्याला अधिकच घेरू लागतात. त्याच्या हातून 'शुभदा' गाईची हत्या होते. 'अलकानेही मांडी पोखरुन त्याच्या भवितव्यालाच जणू छिद्र पाडलं....' रक्ताळलेल्या मांडीपेक्षा कर्णाचे मन अधिक रक्ताळलेले होते याची कारुण्यपूर्ण जाणीव होते. मृत्यूच्या भयानेही कधी विव्हळ न होणारा कर्ण परशुरामाला सत्याचा उलगडा झाला हे कळल्यानंतर, काळजाला भिडणारे दुःख व्यक्त करतो.[९८]

मृत्युंजय कादंबरीत 'संकटाशिवाय, प्रतिकूलतेशिवाय कोणाच्याही पराक्रमाची कसोटी लागत नाही, हे कर्णाच्या जीवनगाथेचे सार व्यक्त झाले आहे. सामाजिक संकेताच्या क्रौर्याची ही कथा आहे. कृष्णाला कर्णाने हीच वेदना बोलून दाखविली. 'मी कौंतेय आहे तर कुंतीदेवीपासून दूर कसा? पांडव आहे तर पांडवांपासून अलग कसा? सूर्यपूत्र आहे तर अंधाराच्या साम्राज्यातच पडत रूतलेला कसा?' (पृ. ४९७) यावरून कर्णाची व्यथा अत्यंत टोकदार तीव्र स्वरुप धारण करून या कादंबरीत अवतरते, हे स्पष्ट होईल.

कलावंताचे स्वत्व साहित्यकृतीला सत्त्व प्राप्त करून देत असते. शिवाजी सावंत आपल्या मनात रुजलेले राजकीय चिंतन या युद्धाच्या संदर्भात कृष्णाच्या मुखाने व्यक्त करतात.[९९] नव्या जीवनमूल्यांच्या अनुरोधाने नव्याने महाभारतातील घटना, प्रसंग आणि व्यक्तींची येथे संगती लाभते.

कृष्णसुद्धा कर्णाचे मतपरिवर्तन करू शकला नाही. संस्काराने घडवलेले जीवन आणि नियतीने दाखविलेली दिशा सदैव चोखाळण्याचा या कर्णाचा घोर निश्चय आहे. १०० कर्णाने 'माझ्या आत्मार्पणावर पांडवांची बीज अंकुरावीत, फोफवावीत असाच नियतीचा उद्देश' ओळखला आहे. म्हणून कर्ण मरण पत्करतो पण स्वत्व सोडीत नाही.

एक जिवंत माणूस म्हणून कर्ण आल्या प्रसंगाला तोंड देतो. स्वतः तोच भीष्माचे नाव सेनापती म्हणून जाहीर करतो व त्याच्या मुखाने 'महारथ्यांचा ही महारथी' ठरतो. सावंतांनी नवे प्रसंग निर्माण करून कर्णकथेत नवा प्राण भरला आहे. वृषाली आणि कर्ण यांच्यात तो सूतपूत्र नाही हे समजल्यानंतरचा संवाद येथे चित्रित केला आहे. इंद्राला कवचकुंडले दिली म्हणून वृषालीला रक्ताचा तिलक (टिळा) देता आला याचे समाधान वाटत असलेला कर्ण म्हणतो, 'वृषाली सारखी पत्नी लाभणार असेल तर एकच काय शतजन्मही मी सूतपूत्र म्हणून स्वीकारीन.' यात कर्णाच्या स्वभावाची सारी महनीयता सामावलेली आहे.

अखेरच्या युद्धाच्या वेळी कर्ण, इंद्राने दिलेल्या 'वैजयंती शक्तीचे' दान 'जीवनदान' म्हणूनच करतो अशी एक वेगळीच कल्पना येथे मांडली आहे. घटोत्कचवधासाठी दुर्योधन ती शक्ती वापरण्यास कर्णाला भाग पाडतो. सावंतांनी अगदी वेगळ्या तऱ्हेने हा कथानकाचा दुवा साधला आहे.

युद्धात पडणाऱ्या प्रत्येकासाठी कर्ण हळहळतो. 'सूर्यकेंद्राशी ... जाणिवेच्या सूक्ष्म धाग्यांनी निगडित असलेला त्याचा उच्चात्मा आणि भोवतालच्या सामाजिक जगाशी दैनंदिन निगडित असलेले शरीर आणि मन' (पृ. ५६३) हे त्याच्या जीवनाचे दोन भाग गृहीत धरुन अद्भुत व वास्तव या दोन्हीही पातळ्यांवरुन कर्णाचे चित्र समर्थपणे रेखाटले आहे.

कर्ण मृत्युमुखी पडतो तेव्हा त्याचे हात कृष्णाला जोडलेले असतात. याचा अर्थ कृष्णाच्या तत्त्वज्ञानाचे मोल कर्णाला पुरतेपणी पटले होते, हाच होतो. कादंबरीच्या शेवटीही असाच एक प्रसंग अतिशयोक्त रूपात उभा केलेला आहे. दातृत्वाचा जणू कळसच म्हणून आपला रक्ताने माखलेला सोन्याचा दात आपल्या अश्रूत धुऊन तो अशावेळी उपस्थित झालेल्या एका याचकाला देतो. कर्णानंतर वृषाली सती जाते. ही घटना मनाला चटका लावणारी असून कर्णाला उदात्त करणारी आहे.

शिवाजी सावंतांनी 'मृत्युंजय' कादंबरीत महाभारतातील कर्णाच्या व्यक्तिरेखेचे जिवंत आणि प्रत्ययकारी चित्रण नव्या काळाच्या संदर्भात कलात्मक मूल्यांचे भान राखून केले आहे. सावंतांच्या 'मृत्युंजय' कादंबरीने महाभारतातील कर्णाची व्यक्तिरेखा आणि कथा समरसतेने प्रभावीपणे रेखाटली आहे.

**रणजित देसाई यांची 'राधेय' :-**

कर्णाच्या निमित्ताने मनावर कलात्मकतेने प्रकाशझोत टाकणारी रणजित देसाई यांची 'राधेय' कादंबरी प्रस्तुत संदर्भात विशेष लक्षात घेण्याजोगी आहे. कादंबरीलेखनामागील त्यांची भूमिका, त्यांनी स्वच्छ शब्दात मांडली असून पौराणिक साहित्यासंबंधी आपल्याला नवे चिंतन करायला लावणारी आहे.[१०१]

महाभारतातील कर्णाची करूण कहाणी गत-घटना प्रथम सांगण्याच्या नव्या तंत्राचा अवलंब करून 'राधेय' कादंबरीत रणजित देसाई यांनी सांगितली आहे. गो. नी. दांडेकरांनी जेथे 'कर्णायन' चा शेवट केला आहे, त्याच प्रसंगापासून 'राधेय' कादंबरीची सुरवात होते. साहित्यिकांच्या जाणिवा आणि व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये यानुसार कथानकाची गुंफण होते. महाभारतातील कर्णकथेची ही एक नवी मांडणी आहे. घटना प्रसंगांना गौण प्रधान भाव देण्यात साहित्यिकांचा दृष्टिकोन वेगवेगळा असू शकतो. 'राधेय' कादंबरीच्या अगदी सुरवातीला भारतीय

युद्धातील मृतांना तिलांजली देण्याचा हा प्रसंग असून वाचकांच्या मनात कर्णाविषयी आत्मीयता निर्माण करण्यास तो उपकारक ठरला आहे. 'राधेय' कर्णाचे दु:ख कादंबरीकाराला तीव्रतेने जाणवले. येथे कादंबरीकार कर्णाच्या दु:खाशी एकरूप झाला आहे. त्याच्या दु:खात आणि जीवनात तो गुंतला आहे. एका कलात्मक प्रसंगनिर्मितीचा प्रत्यय येथे येतो.

कुरुक्षेत्राच्या उदास आणि उजाड युद्धभूमीच्या पार्श्वभूमीवर युधिष्ठिर आप्तांना तिलांजली देत आहे. कृष्णाने सूचवूनही तो 'राधेया' ला तिलांजली देण्याचे नाकारतो. शेवटी आजवर दडवून ठेवलेले 'कर्ण आपला भाऊ आहे' हे कटु सत्य समजताच त्याला फार मोठा धक्का बसतो आणि तो कोसळतो. अर्जुन, कुंती सगळेच दु:खात बुडतात, सगळ्यांना अनावर शोक होतो. अर्जुन कृष्णाला कळवळून म्हणतो, 'तूच असा आमच्या अधोगतीला कारणीभूत होशील असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. धिक्कार असो.' अर्जुनाचा हा सात्त्विक क्षोभ येथे दु:खाच्या उद्वेगाने समर्थनीय ठरतो.

द्रौपदीच्या मनाची व्यथित अवस्था 'हवं ते हरवणं हे आमच्या दैवी सदैव लिहिलं आहे का रे?' या उद्‌गारातून सूचित होते. द्रौपदीच्या मनातील कर्णविषयीचे आकर्षण या एकाच वाक्यातून पुरेपणी व्यक्त झाले आहे.

कर्णाविषयीची सगळी वादळे शांत करण्यासाठी 'रणजित देसाई' यांनी योजलेले येथे यशस्वी ठरले आहे. रसिकांनी एकाग्र व्हावे एवढी एकाग्रता कर्णाच्या व्यक्तिचित्रणात कादंबरीकाराने ओतली आहे. सूर्याची उपासना, याचकांची तृप्ती, गंगेचा ओढा, अश्वत्थामा, कृष्ण, दुर्योधन यांच्याशी मैत्री इत्यादी गोष्टींना कर्णाच्या जीवनात असलेले महत्त्व लक्षात घेऊन या गोष्टी देसाईंनी समरसतेने वर्णिल्या आहेत.

**एकाकी कर्ण आणि कृष्ण :-**

कर्ण आणि कृष्ण यांच्यातील जिवाभावाची मैत्री प्रथमच एवढ्या तन्मयतेने साहित्यात व्यक्त झाली आहे. त्यामुळे परस्परांच्या सुखदु:खांना मोकळी वाट मिळाली आहे. 'मृत्युंजय' कादंबरीतील कर्णाला जेवढे कवचकुंडलाचे भूषण आणि आकर्षण आहे तेवढे रणजित देसाई यांच्या राधेय मधील कर्णाला नाही.[१०२] या कर्णाची कवचकुंडलांशी एक निराळीच खंत निगडित आहे. राधेय कादंबरीतील हा कर्ण भावुक मनोवृत्तीचा आहे. आपल्या मनातील जाणिवा महाभारत कथेच्या आधाराने रणजित देसाई येथे व्यक्त करतात. यातूनच कर्ण आणि कृष्ण यांच्या जीवनातील विलक्षण साम्य आणि जवळीक त्यांना जाणवली आहे.[१०३] येथे कृष्णापेक्षा कर्णाची व्यथा अधिक तीव्र बनते. राधेय कादंबरीतील कर्ण पोरका आणि एकाकी चित्रित झाला आहे. रणजित देसाई यांच्या चिंतनशील व्यक्तिमत्त्वाशी हा पोरकेपणा,

एकाकीपणा सुसंगत आहे. त्यांच्या साहित्यातील व्यक्तींच्या चित्रणातून हे आढळते.

तप:पुनी, गुणसंपन्न कर्णाला आपल्या सूतकुलाचा यत्किंचितही विसर पडत नाही. सारथ्यकौशल्य ही कृष्णाच्या दृष्टीने एक कला असली तरी कर्णाला त्याचे ते एक नित्यकर्म वाटते. कर्णासारखीच कृष्णाचीही मन:स्थिती येथे चित्रित केली आहे. तोही एकाकी आणि अंतर्मुख होऊन स्वत: विषयीचे चिंतन करतो. कृष्णाजवळ असलेला पावा वृषसेन पाहतो आणि तो कृष्णाला 'पावा वाजवून दाखव,' म्हणून हट्ट धरुन बसतो तेव्हा 'एकाकीपणा घालविण्यासाठी बासरीला अजाणता गोड सूर लागले,' असे तो म्हणतो, याचा अर्थ कर्णासारखाच कृष्णही आपले एकाकीपण आणि दु:ख बोलून दाखवितो. कृष्ण बासरीच्या प्रतीकातून एक व्यापक आशय व्यक्त करतो. तो वृषसेनाच्या बासरी वाजवून दाखविण्याच्या बालहट्टाच्या निमित्ताने म्हणतो, 'बासरीत गोडवा नसतो, सावधपणे मारलेल्या फुंकरीत गोडवा असतो. छिद्रांना हळूवार बोटांनी पेलावे लागते.'

कर्ण आणि कृष्णाप्रमाणे दुर्योधनाचे व्यक्तिमत्त्वसुद्धा व्यथेने, एकाकीपणाने भरलेले आहे. कदाचित म्हणूनच त्याची व्यथा समजून घेऊन त्याला आजन्म साथ देणारा दुसरा एकाकी, पोरका कर्ण येथे चित्रित केला आहे. कादंबरीकाराच्या मनात रुजलेली एकाकीपणाची भावना विविध काल्पनिक प्रसंगांच्या योजनेतून आणि कादंबरीतील व्यक्तिरेखांच्या चित्रणातून रणजित देसाई यांनी साकार केली आहे. उदाहरणार्थ मयसभा प्रसंगाच्या वर्णनातूनही याच एकाकीपणाची सूचना मिळते. 'हे जीवन हीच एक मयसभा नाही का? स्नेहाचा ओलावा शोधायला जावं तिथं स्नेहाऐवजी कटुता पदरात पडावी, ज्याला मित्र मानावा तोच वैरी बनावा, वरासाठी तपश्चर्या करावी आणि पदरात शाप पडावेत. भाग्याचा दिवस समजावा आणि तोच अंत ठरावा.' कर्णाच्या या चिंतनातून त्याच्या एकाकीपणाची आणि त्यातून निर्माण झालेल्या वैफल्याची खात्री पटते.

हे कर्णाचे 'राधेय' कादंबरीतून साकार होणारे चित्र महाभारतातील कर्णाच्या व्यक्तित्वाच्या चिंतानातून स्फुरले आहे. 'राधेय' मधील कर्ण दुर्योधन, दु:शासन, शकुनीमामा यांच्या कृत्यात सहभागी होत नाही. चांडाळ चौकडीत तो सामाविष्ट होत नाही.[१०४] द्यूताच्या प्रसंगी मूळ कथेनुसार पांडव आपले सर्वस्व गमावतात. कर्णाची सूडाची भावना उफाळून येते. तो याप्रसंगी द्रौपदीसंबंधी अनुदार उद्‌गार काढतो. 'राधेय' कादंबरीत कर्णाविषयीची अपरंपार सहानुभूती कादंबरीकाराला असल्याने संपूर्ण प्रसंगचत्रिण नव्या दृष्टीने होते.

अधिरथाला द्यूत खेळण्याच्या प्रसंगात कर्णही सहभागी झाला याचे मनस्वी दु:ख होते. एरव्ही सर्वत्र अबोल राहिलेला हा 'माणूस' येथे बोलू लागतो.

उपरोधाने तो कर्णाला म्हणतो, 'कर्णा, ते फासे आण, मला त्यांच दर्शन घ्यायच.' 'परमेश्वरापेक्षाही मोठे आहेत ते, आता या भूमंडळात तेवढाच पराक्रम उरला आहे.' एवढेच नाही तर दुर्योधनसुद्धा या कृत्याला तुझ्याच साथीने उद्युक्त झाला, असा अधिरथाचा कर्णावर आरोप आहे. आपल्या पालक पित्याच्या भावनेची कर्णाला तीव्र जाणीव होते आणि तो सगळे सोडून चंपानगरीला निघून जाण्याची इच्छा व्यक्त करतो. आपली लढाऊ वृत्ती प्रकट करतो. तो दुर्योधनाला म्हणतो, 'शकुनीच्या हस्तलाघवाने राज्य सांभाळली जात नाहीत.' 'राधेय' की शकुनी?' हा एक नवीनच पेच या कादंबरीत देसाईंनी आपल्या प्रतिभेने निर्माण केला आहे.

या कादंबरीत महाभारतातील कर्णाच्या जीवनातील परिचित घटनांना नवा अन्वायार्थ लाभला आहे. रणजित देसाई यांच्या प्रतिभेचा तो अविष्कार आहे. येथे प्रत्येक वेळी कर्णाची भूमिका वेगळी दिसून येते. त्यामुळे कर्णाचे दोष येथे गुणरूप पावतात. तसे घडविण्याचा कादंबरीकाराचा येथे प्रयत्न आहे. कर्ण आपल्या प्रत्येक कृतीविषयीची मानसिक व लौकिक पातळीवरील भूमिका येथे स्पष्ट करतो. रणजित देसाई कर्णाच्या प्रत्येक प्रसंगातील वर्तनाचा, कृती उक्तीचा नवा उलगडा करतात. उदाहरणार्थ गंधर्वयुद्धात कर्णाला वृषाली आठवते, अंगदेशाचे राज्य कर्ण स्वत:च्या पराक्रमाने मिळवितो. दास असलेल्या पांडवांनी धन्यांचे रक्षण विशिष्ट प्रसंगी केले तर त्यात औचित्य आहे, चित्ररथ व अर्जुन यांच्या स्नेहाने दुर्योधनाची मुक्तता झाली. अशा या नव्या प्रसंग चित्रणातून व नव्या कल्पनासृष्टीतून रणजित देसाई यांनी कर्णाच्या व्यक्तित्वाला यशस्वीपणे साकार केले आहे. साध्या व नित्य परिचित प्रसंगांना बोलके आणि जिवंत करण्यात रणजित देसाई यांच्या सिद्धहस्त लेखणीने यश मिळविले आहे. कृष्ण आणि कर्ण यांच्या संबंधावर प्रकाश टाकणारा पुढील एक प्रसंग येथे लक्षात घेण्याजोगा आहे.

कर्ण कृष्णाचा निरोप घेत असतांना घडलेला हा प्रसंग आहे. रथ सावलीत उभा करण्याच्या संदर्भात त्यांच्यात संवाद होतो, तेव्हा कर्ण म्हणतो, 'महाराज, छाया लाभणं दैवी असावं लागतं. तो अर्जुन इंद्रभक्त ना? त्याला जीवनात आपल्या कृपेची सावली लाभली. मी सूर्यभक्त, तेजात होरपळून जाणं, दाहात सदैव उभं रहाणं, एकाकी हेच मांझं जीवन, त्यात सावली अवतरेल कशाला?' त्याच्या जीवनात झालेली परवड आणि उपेक्षा त्याच्या या उद्‌गारातून व्यक्त होते. शेवटी कृष्णाजवळ कर्णाचे मागणे एवढेच आहे की 'युद्धभूमीवर अर्जुनाचं सारथ्य करीत जेव्हा आपण सामोरे याल तेव्हा धनुष्याची प्रत्यंचा बळ रहावं.'

जीवन निष्कलंक रहावं. मृत्यू वीरोचित यावा. आप्तस्वकीयांचा मृत्यू माझ्या हातून घडू नये.' कर्णाच्या या मागण्यातून त्याचे निर्मळ मन आणि कृष्णावरील विशुद्ध प्रेम येथे व्यक्त होते. कृष्णाच्याही गाला वरून अश्रू ओघळावेत असा कर्ण-कृष्ण निरोपाचा उत्कट प्रसंग रणजित देसाई यांनी समरसतेने रंगविला आहे. कर्ण आणि कृष्णाचे सौहार्द परिपूर्ण असे हे उत्कट नाते आहे. 'नियतीच्या लाटांवर वाहण्या खेरीज पोरके पोर दुसरे काय करणार?' (पृ. ११९) कर्णाला शेवटी उजाड, एकाकी जीवन लाभले. 'मातेचे दर्शन घडूनही कर्ण पोरका राहिला.' मृत्यूखेरीज कर्णाला कोणीच कां आपलं म्हणणार नाही? (पृ. २०७) कर्णाचे हे प्रश्न निरुत्तर करणारे आहेत. नदीत तरंगणाऱ्या एकाकी नावे सारखेच या सूर्यपुत्राच्या प्राक्तनातही एकाकीपणच लिहिले होते. याच एकाकी कर्णाचे चित्र 'राधेय' कादंबरीत प्रत्ययकारी रेखाटले आहे. हे चित्र म्हणजे महाभारतातील कर्णाच्या व्यक्तीचे नवे आकलन आहे.

**सूतत्वाची जाणीव :-**

या 'राधेया'ला स्वतःच्या सुतकुलाचे शल्य सतत मनामध्ये बोचते. कारण तो स्वतः त्याचे आप्त यांना आपल्या सूतत्वामुळे होणाऱ्या असह्य उपेक्षेला आणि अपमानाला सतत तोंड द्यावे लागते. याचे प्रभावी चित्रण रणजित देसाई यांनी रेखाटले आहे. त्यांची ही जाणीव नवी आहे आणि त्यामुळे महाभारतातही नवी भर पडली आहे.

'सूतपुत्रांना एकाग्रता लाभत नाही' असे म्हणून द्रोणाचार्यांनी अपमानित केलेला कर्ण मनोमनी दुखावला आहे. त्याच्या मनातील या सुप्त दुःखाला रणजित देसाई यांनी अचुकपणे आपल्या प्रतिभेने टिपले आहे.

कर्ण, वृषसेनाला शरसंधान शिकविण्याच्या निमित्ताने मर्मभेदक बोलतो, 'सूतपुत्रांना गुरुकृपा कधी लाभत नाही.' मोठ्या आत्मविश्वासाने कर्ण म्हणतो, 'सूतपुत्रांच्या तपश्चर्येच्याच द्वारे ज्ञानाची कवाडे उघडली जातात.' (पृ. ५६) एका कटु सत्याला येथे साकार करून महाभारताच्या या प्रसंगात कादंबरीकाराने नवा प्राण भरलेला आहे. प्रत्यक्षात जाणवणारी सुखदुःखे येथे कलात्म पातळीवरुन व्यक्त होतांना आढळतात. जे दुःख कर्णाला भोगावे लागले ते याच स्वरुपाचे आहे. 'गुरुसेवेसाठी पाळलेल्या संयमातून शाप त्याच्या नशिबी आले.' एकलव्याच्या जीवनातील घटनेचा संदर्भही येथे घेतला आहे. 'एकलव्याला विद्या मिळाली नाही पण मानलेल्या गुरुभक्तीमुळे आपल्या अंगठ्याला मुकावे लागले.' (पृ. २६) अपेक्षाभंगाचे दुःख आणि त्यातून जन्मणारी चिरंजीव वेदना येथे साकार होते. कर्णाची, वृषसेन या त्याच्या पुत्राकडून फार मोठी अपेक्षा आहे. वृषसेनाने परावलंबी न होता स्वतःच्या बाहुबलावर विद्या प्राप्त करून घ्यावी हा कर्णाचा आग्रह आहे, द्रोणाचार्यांचे

धर्नुविद्येतील नैपुण्य सांगणारी जी एक कथा आहे, त्यावरील कर्णाचे भाष्यही या दृष्टीने लक्षणीय आहे.[१०५] महाभारतातील कर्णकथेशी सुसंगत आणि त्यातील रसाला पोषक असे नवे प्रसंग रणजित देसाई यांनी आपल्या राधेय कादंबरीत कल्पून मूळ कथानकात नवे रंग भरले आहेत. येथे कर्णाविषयीची सहानुभूती आणखी दृढ करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. महाभारताच्या कथानकाचा वर्तमानाशी संबंध प्रस्थापित करण्याचा येथे प्रयत्न आहे.

**कवचकुंडलदान :-**

'मरणोत्तर लाभणारी कीर्ती कर्णाला मोलाची वाटते.' (पृ. १५४) म्हणून सूर्यदेवतेने बजावून सुद्धा कर्ण कवचकुंडल दानापासून परावृत्त होत नाही. कर्णाच्या कवचकुंडलदानाच्या प्रसंगात रणजित देसाई नवा बदल करतात. या बदलातून त्यांची कर्णाविषयीची सहानुभूती स्पष्ट होते. देवाच्या प्रेरणेनेच कर्ण कवचकुंडल दानानंतर इंद्रापासून अमोघ शक्ती मागून घेतो. अन्यथा कोणापासून काही मागण्याची या कर्णाची मुळी इच्छाच नाही, म्हणजे याचनेचा कलंक येथे देवाच्या आज्ञेनेच स्वीकारल्यामुळे तो चंद्राचा कलंक झाला आहे. या प्रसंगाला एक नवे विकासाचे परिणाम त्यांनी प्राप्त करून दिले आहे.

'याचनेची क्षुद्रता आज जाणवली. देवेंद्राला दरिद्री ब्राम्हणाचे रूप घ्यावे लागले.' यामध्येच कर्णाला खरे समाधान लाभते.

कर्णावर आपले संपूर्ण लक्ष केंद्रित करणारी ही कादंबरी असल्यामुळे त्याला उजळा मिळावा अशाच हेतूने प्रसंगांची येथे मांडणी केली आहे. दान मागतांना 'हे देवा' तुम्ही मलाच कां मागितलं नाही?' असे कर्ण म्हणतो. म्हणजे कवचकुंडलंच काय पण स्वतःलाही दान देण्याइतपत या कर्णाची दानत आहे. वृषाली या दानाने घाबरते. कर्ण तिला धीर देतांना म्हणतो 'वसू, माणसांनी आपल्या बाहुबलाने पराक्रम सिद्ध करावा. त्यासाठी दैवी लाभांचा आश्रय घेऊ नये.' या कर्णाच्या उद्गारात केवढा आत्मविश्वास साठवलेला आहे. महाभारतातील व्यक्तिचित्रांची ही नवनिर्मिती आहे. 'विजयानंच पराक्रम सिद्ध होत नसतात. पराजय सोसण्यातही पराक्रम असतो.' असे म्हणणारा हा कर्ण आहे.

कर्णाला विश्वासात घेऊन त्याचे जन्मरहस्य कृष्ण सांगतो. तू ज्येष्ठ आणि श्रेष्ठ पांडव असूनही आज आपले स्थान हरपून बसला आहेस. कृष्णाच्या मनाप्रमाणे जरी येथे कर्णाला वागता आले नाही, तरीही कृष्णाचे दातृत्व आपल्यापेक्षा श्रेष्ठ असल्याचे त्याच्या लक्षांत आले. कृष्णाने कंसाचा व जरासंधाचा पराभव करून देखील त्या राज्यापासून तो स्वतः अलिप्त राहिला. या चित्रणातून देसाई यांनी कर्णाच्या दातृत्वाला एक नवा पैलू प्राप्त करून दिला आहे.

कर्ण आपले जन्मरहस्य युधिष्ठिराला सांगू नये अशी कृष्णाला विनंती करतो. याचे कारण तो जुगारी व धर्मनिष्ठ बंधू आहे. त्याला हे बंधुत्वाचे नाते कळल्यावर तो सर्वांसह वनवासाला निघून जाईल, याची त्याला भीती वाटते. या प्रसंगातून कर्णाच्या मनातील बंधुभाव प्रकट झाला आहे. कर्णाच्या व्यक्तित्वाला त्याच्या दातृत्वाप्रमाणेच उदात्ततेचा स्पर्श येथे झालेला आहे.

**कर्ण आणि कुंती :-**

कर्ण आणि कुंती यांच्या भेटीच्या प्रसंगी कर्ण मुद्दाम कुंतीला 'अर्जुनजननी' संबोधतो. त्यामागे त्याची एक ठाम भूमिका आहे. तो म्हणतो की 'जे नाते आईला सहन झालं नाही ते उच्चारायचे कशासाठी?' कुंतीला कमालीचे अस्वस्थ करणारा कर्णाचा हा प्रश्न आहे. पितृकुलाच्या नावासाठी आपण हे सारे केले, अशी कुंतीची भूमिका आहे. 'पान्हा आटला म्हणून कर्णाला पोरके केले असे नव्हे.'

कर्णकुंती यांच्या संवादातून कर्णाच्या एकाकीपणाची भावना पुन्हा एकदा व्यक्त झाली आहे. पण कर्णाला, भीमार्जुनाचे बळ कुंतीच्या अतूट नात्यातच आहे, हे या भेटीत लक्षात येते. कुंतीच्या भेटीने मोहरलेला कर्ण म्हणतो, 'माते' माझ्या उजाड एकाकी जीवनात अवतरलेली ही एक मिठी मला शेकडो मरणांना सामोरे जायचे बळ देईल.' (पृ. २००) कुंतीला आपल्या घरीच राहण्याची विनंती मायेने तिचा पुत्र कर्ण करतो, पण त्यात अर्थ नाही, हे दोघांनाही कळून चुकले आहे. या भेटीत कर्णाच्या अध:पाताचे क्षण सावरण्याचा, तोलून धरण्याचा कादंबरीकाराचा प्रयत्न आहे. मी अपमानाने झालेला अंगारातून द्रौपदीच्या 'वस्त्रहरणा'चा सल्ला दिला आहे. कर्णाने हे प्रांजलपणे मान्य केले आहे. त्याचे हे वर्तन मनुष्यस्वभावाला अनुसरून आहे. तो म्हणतो, 'अपमानाचे शल्य मनात सतत सलत राहून योग्यवेळी ते उफाळून आले म्हणून मी सूडाला उद्युक्त झालो.' यात कर्णाचे 'माणूसपण' आहे. व्यक्तींच्या अंतरंगात शिरून घडलेल्या प्रसंगाचा उलगडा येथे केला आहे. त्यामुळे व्यक्तीची नुसती वर्णने नसून त्यांच्या मनाचे-स्वभावाचे कलात्मक पातळी लाभणारे विश्लेषण आहे. हे विश्लेषण महाभारतकथेच्या चिंतनात मौलिक भर टाकणारे आहे. महाभारताला अनेक अंगांनी वाढविणारे आहे. तरीही त्याचे या प्रसंगीचे वर्तन समर्थनीय ठरत नाही. त्याचा भावनिक उलगडा करण्याचा आणि त्यातून मानवी प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्याचा रणजित देसाई यांचा प्रयत्न येथे यशस्वी झाला आहे. असे प्रसंग 'राधेय' मध्ये पुष्कळच आहेत. त्याचे हे कृत्य मात्र समर्थनीय ठरत नाही.

- कर्णाचा अहंकार डिवचला गेला तरी त्याला वस्त्रहरण हे योग्य प्रत्युत्तर होऊ शकत नाही. कर्णाच्या ठिकाणी क्षमाशीलतेचा व तडजोडीच्या वृत्तीचा अभाव

होता हेच दिसून येते. महाभारताच्या तुलनेत हे स्पष्ट होत असले तरी रणजित देसाई यांनी अतिशय मार्मिकपणे द्रौपदीचे मन, कुंतीच्या उद्‌गारातून सूचित केले आहे. 'कुंती म्हणते, 'स्त्री मत्सर कसा व्यक्त होतो, हे तुला तरी कसं कळणार?' या ठिकाणी कर्णकथेला नवा पैलू प्राप्त होतो. कलात्मकतेचा स्पर्श लाभतो. एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीच्या मनातील रहस्य ओळखू शकते हे रणजित देसाई यांनी अचूकपणे हेरले आहे. महाभारतातील घटना या कादंबरीकाराच्या जाणिवेचे नवे रूप धारण करते.

कर्णकुंती भेटीचे पर्यवसान शोकात होते. कर्ण आईला शेवटची मागणी करतो, ती केवळ दोन अश्रूंची. 'दुर्योधन - वृषाली यांच्या अश्रूतही स्वार्थ असेल तू मात्र शेवटी माझ्यासाठी निखळ दोन अश्रू ढाळ.' कारण या दोन अश्रूंवरच स्वर्गाची वाटचाल करता येईल असे तो म्हणतो. कर्णकुंती भेट हृदयस्पर्शी झाली आहे. कर्णाच्या विश्वास येथे व्यक्त होतो. कर्ण कुंतीला आपले निळे उत्तरीय भेट देतो. या निळ्या उत्तरीयाचा पुढे कर्ण अर्जुन युद्ध प्रसंगी मोठा चपखल व कलात्मक वापर देसाईंनी केला आहे. अर्जुन आणि कर्ण यांच्या निकराच्या युद्धात अर्जुनाने परिधान केलेले हे निळे उत्तरीय कर्णाला त्याच्या बंधुभावाचे स्मरण करून देते. हा एक नवा कल्पित प्रसंग आहे. 'मातेच दर्शन घडूनही कर्ण पोरका राहिला.' मृत्यूखेरीज कर्णाला कोणीच कां आपलं म्हणणार नाही? (पृ. २०७) अंत:करणाला जाऊन भिडणारे हे रणजित देसाई यांनी केलेले भाष्य कर्णाच्या जीवनातील कारुण्य प्रभावीपणे व्यक्त करते. शेवटी कृतार्थ मृत्यू गाठणे एवढेच कर्णाला आता शिल्लक राहते. अशा भावोत्कट प्रसंगांची विपुल निर्मिती या कादंबरीत आहे. महाभारतात ज्या राधेविषयी मौन आहे तिचे चित्र फारसे स्पष्ट होत नाही. त्या 'राधाई' ला सुद्धा रणजित देसाई यांनी एक महत्त्व प्राप्त करून दिले आहे. ही 'राधाई' कर्णाच्या संरक्षणाची याचना तो एक पाळलेला पुत्र असूनही करते. मात्र तिच्या मनाचे औदार्य व्यक्त होते. याचा परिणाम म्हणजे कुंतीच्या याचनेला एक नवे परिमाण प्राप्त होते. 'जे दान देत असता दु:ख होतं, ते दान कितीही श्रेष्ठ असलं तरी याचकाने ते स्विकारू नये, असं कर्ण नेहमी सांगतो. तू आमच्यासाठी कष्टी होऊ नकोस. कर्णाची समजूत घालतांना 'राधाई' त्याला सांगते. यात तिच्या मनाची थोरवी दिसून येते. युद्धासाठी सेनापती कर्णाला निरोप देतांना झालेला राधा - कर्ण यांचा संवाद काळजाचा ठाव घेणारा आहे. शेवटी ही 'राधाई' नदीत आपले जीवन संपविण्यासाठी निघून जाते. महाभारतात गौणत्व लाभलेल्या या व्यक्तिरेखा रणजित देसाई यांनी कमालीच्या भावोत्कट पातळीवरुन साकार केल्या आहेत. 'राधाई' चे भावविश्व याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. या चित्रणातून मानवी मूल्यांवर नवा प्रकाश टाकला आहे. महाभारतातील कथेचा गाभा येथे प्रथम नव्याने

उजळला जातो.

**द्रौपदी स्वयंवर :-**

'द्रौपदी स्वयंवरा' च्या वेळी 'कावळ्याने राजहंसीकडे पाहू नये' या तीव्र शब्दात द्रौपदी कर्णाचा अपमान करते. तो त्याला निमूटपणे सोसावा लागतो. मानभंग झालेल्या कर्णाची शोचनीय मन:स्थिती देसाईंनी त्यांची कीव यावी एवढ्या उत्कटतेने चित्रित केली आहे. यावर कर्णाची पत्नी वृषाली प्रेमभराने उसळून आपली तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करते.[१०६] त्यातून कर्णावरील तिची भक्ती आणि प्रीती व्यक्त होते. द्रौपदीशी एक समसमांतर व्यक्तिरेखा म्हणून वृषाली उभी रहाते. तिचे निर्मत्सरी मन कर्णाच्या व्यक्तित्वाला उजळा देते.

चित्रांगदाची राजकन्या हरण करून पराक्रम गाजविणाऱ्या कर्णाला वृषालीच्या प्रेमात भावनिक आधार वाटतो. त्यामुळे त्याच्या मनाला पुन्हा उभारी येते.[१०७]

खाडिलकर यांच्या 'कीचका' प्रमाणेच रणजित देसाई यांचा कर्णसुद्धा द्रौपदीकडे कामांध मनोवृत्तीने पाहत नाही. उलट कुलाचा आणि रुपाचा वृथा अभिमान बाळगणारी स्त्री म्हणून तो तिचा धिक्कार करतो. कर्णाचे हे रूप रणजित देसाई यांना कर्णाविषयीच्या आत्मीयतेतून दिसले आहे. वृषालीला मनोमनी सुखावणारे हे तिच्या पतीचे उद्‌गार कर्णाविषयी तिला वाटत असलेला अभिमान द्विगुणित करणारे आहे.

'अपमान सोसणं याच नाव अंगराज.' असे हे कर्णाचे भावरम्य चित्र 'राधेय' कादंबरीत रेखाटलेले आहे. वस्तुत: 'ज्या घरात, परंपरेत सुसंस्कार येतात, चारित्र्य, नीती आणि व्यवहार यांची अखंड सांगड पिढ्यान् पिढ्या घातलेली असते, ते घराणं कुलवंत, करायचा झालाच तर त्यांनाच कुलाचा उच्चार करण्याचा अधिकार' या कसोटीवर किती लोक कुळाचा उच्चार करतील? असा परखड प्रश्न या कर्णाचा आहे. हा सवाल आजच्या परिस्थितीचे अंतर्मुख होऊन चिंतन करायला भाग पाडणारा आहे. महाभारत लोकधर्मी आहे आणि नव्या समाजाशीसुद्धा त्याचे अतूट नाते आहे, हे यावरून दिसते. म्हणूनच नव्या लेखकांनी महाभारताला आपल्या परीने वाढविले आहे हे येथे स्पष्ट होते.

द्रौपदी आपल्या स्वयंवर प्रसंगानंतर पुन्हा राजसूय यज्ञाच्या प्रसंगी कर्णाचा अपमान करते. पण या प्रसंगाला देसाई नवीन कलाटणी देतात. द्रौपदी वाढण्याचे काम करीत असताना नकळत कर्णाची दृष्टी द्रौपदीवर जाते तेव्हा द्रौपदी 'याचकाने दात्याकडे पाहू नये असे म्हणते. या परस्परांच्या संभाषणात कर्ण तिची सरळच कानउघाडणी करतो.

'अतिथीचा अपमान, पदर तुझा ढळला असूनही तू कां केलास?' एवढ्यावरच

तो थांबत नाही तर आणखी जहाल बोलतो. 'तो पती लाभला नाही याचा पश्चाताप तुला होतो ना?' आपल्या कादंबरीच्या नायकाला - कर्णाला - मोठे ठरविण्याच्या भरात द्रौपदीला येथे खाली पहायला लावले आहे. कर्ण आणि द्रौपदी यांच्यात कर्णाविषयी द्रौपदीच्या मनात सुप्त प्रेमाचा धागा होता असे येथे सूचित केले आहे. साहित्यिकांनी फुलविलेल्या या नव्या कल्पना आहेत याचा प्रत्यय याही ठिकाणी येतो.

द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगीही हीच वृत्ती आढळते. 'अनेक पती असलेली एकवस्त्रा की विवस्त्रा बनते हा प्रश्न नाही.' (पृ. ११०) 'राजहंसी कशी असते, ते आज सूतपूत्राला पहायचं आहे.' असे म्हणून कर्ण द्रौपदीला विवस्त्र करण्याची आज्ञा करतो. (पृ. १११) द्रौपदीने पूर्वी केलेल्या अपमानांचा हा सूड उगविण्याचा कर्णाचा प्रयत्न येथे दिसतो. कर्ण क्षमाशीलवृत्तीचा नाही तर तो सूड घेणारा आहे. हे कादंबरीकाराला अभिप्रेत नसतांनाही येथे सूचित झाले आहे. पण लगेच देसाईंच्या हे लक्षात येऊन या वेळच्या कर्णाच्या मन:स्थितीचे वर्णन विस्ताराने केले आहे.[१०८] माणसाचा स्वभाव परिवर्तनशील लवचिक असतो, त्यात बदल होऊ शकतो, म्हणून स्थिरत्व गृहीत धरणे बरोबर होणार नाही. रणजित देसाई यांनी हेच कर्णाविषयी येथे गृहीत धरले आहे. वस्त्रहरण करायला लावणारा कर्णाच्या मनाचा पारा नंतर पार उतरला आणि आपल्या कृत्याविषयी त्याला पश्चाताप झाला. पश्चात्तापाने शुद्धी हा मार्ग अवलंबून कर्ण पुन्हा शुद्ध अंत:करणाचा होतो. हे सिद्ध करण्याचा ललित साहित्यिकाचा प्रयत्न येथे मानवी स्वभावानुसार पटू शकतो. कृष्णाचे सभेत आगमन होते आणि तो द्रौपदी दासी नसून प्रजाजन असल्याचा युक्तिवाद करतो. धृतराष्ट्रही द्रौपदीला दोन वर मागण्यास सांगतो आणि वातावरण बरेच निवळते, शांत होते.

यावेळी कर्णाला द्रौपदीची खरी महती कळते. सभागृह संपूर्ण रिकामे होते आणि शेवटी सभेत 'एकाकी' कर्ण उरतो. त्याची ही एकाकी अवस्था रणजित देसाईनी मोठ्या कलात्मकपणे चित्रित केली आहे.[१०९]

त्याला द्रौपदीचा कुरळा केस उधळलेल्या फाशात आढळतो. 'अपमानाच्या संतापात विवेक एवढा ढळावा!.' कर्ण या विचारात गढून जातो. त्याला प्रश्न पडतो, 'वासना जर मुळाशी नाही तर मग द्रौपदीला विवस्त्र करणं पहाणं हे कसं शक्य आहे?' (पृ. १२४-१२५) एकूण घडलेल्या आपल्या कृतीने कर्ण पश्चातापदग्ध झाला आहे. मूळ महाभारतकथेत ही कर्णाची मन:स्थिती आलेली नाही, ती येथे रणजित देसाई विस्ताराने चित्रित करतात. घरी परतल्यावर वृषाली जेव्हा द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगाबद्दल विचारते, तेव्हा द्रौपदीचे वस्त्रहरण करायची आज्ञा ज्या कर्णाने दिली, तो पुन्हा म्हणतो... वस्त्रहरण 'झाले नाही, सुदैवाने

टळले ...आमच्या सुदैवाने, तिच्या नव्हे.' कृष्णामुळे अनर्थ टळला आपल्या हातून पातक घडले नाही, याचे त्याला समाधान आहे. अनावृत्त स्त्रीला पाहण्याच्या अधिकार फक्त पती आणि पुत्र या दोघांचाच. आपल्या हातून हे पाप घडले हे त्याच्या नंतर लक्षात येते. एवढ्यावर कर्णाची उपरती थांबत नाही, तर तो वस्त्रहरण झाल्याच्या कल्पनेने शहारून म्हणतो, 'तसं घडलं असतं तर तुझ्या माथी वैधव्य आलं असतं. मला आत्मघाताखेरीज दुसरा मार्ग राहिला नसता.' अशा या पश्चातापदग्ध कर्णाची प्रतिमा रणजित देसाई यांच्या प्रतिभेतील आहे. स्वत:च्या दुष्कृत्याविषयी पश्चातापाने होरपळणे, आत्मघाताचा विचार मनात येणे हे सामान्य माणसाच्या मनातील द्वंद्व येथे यशस्वीपणे साकार झाले आहे. रणजित देसाईंचा कर्ण पश्चातापाने शुद्ध होऊ पाहतो. एकदा कर्णाकडे सहानुभूतीने पाहण्याची भूमिका अंगिकारल्यावर कर्णाचे रेखाटलेले हे चित्र अंर्तबाह्य सुसंगत वाटते. त्यात मानवी विचार आणि विकार चित्रित झाले आहेत.

कर्णाच्या जीवनाचा आलेख एका रुपकाच्या आधाराने रणजित देसाई यांनी चांगला रेखाटला आहे. 'नाहीतरी जीवन या नावेसारखच असतं. जीवन प्रवाहावर केव्हांतरी एक नाव सोडली जाते. ऋणानुबंधाची दोन दुबळी वल्ही हाती दिली जातात. अंहकराचे शीड उभारलेले असते. पण तेवढ्यावर थोडाच पैलतीर गाठला जातो? अनुकूल दैवाचे वारे लाभले तरच पैलतीर गाठता येतो. नाहीतर प्रवाह पतित होऊन येईल त्या लाटेवर डोलत राहण्याखेरीज काहीही उरत नाही.[११०] ही अशी देसाईंची प्रसंगोत्पात्त स्वतंत्र भाष्ये पानोपानी विखुरलेली आहेत. महाभारतीय कर्णकथेच्या निमित्ताने त्यांनी केलेले चिंतन, घटनाप्रसंगांच्या तपशिलातून काढलेला नवा अर्थ ही महाभारताच्या आशयाची व्यक्तिपरत्वे होत जाणारी वाढ आहे. कर्णकथेचे विविध साहित्यिकांनी हे वेगळे, स्वतंत्र आविष्कार आपल्या साहित्यातून व्यक्त केले आहेत.

**कर्ण आणि नियती:-**

'जीवनाचे बंध तोडता येतात तसे नियतीचे बंध तोडता येत नाहीत.' (पृ. २७७) हे या कर्ण कहाणीचे सार आहे. आपल्या सर्व सामर्थ्यानुसार रणजित देसाई महाभारताशी एकरूप होतात आणि जणू काही आपण प्रत्यक्ष पाहिलेले (चक्षुर्वैसत्यं) वर्णन करतात. उदाहरणार्थ, कर्णाचा तेजोभंग करणारे भीष्माचार्य मरणोन्मुख असल्याचे समजातच कर्णाचा संताप विरतो. भावनाप्रधान माणसाचे स्वभावधर्म कर्णाला या कादंबरीत प्राप्त झाले आहे. 'कर्णाचे अश्रू तसेच गाला वरुन ओघळत होते, ते भरले नेत्र टिपण्याचेही भान कर्णाला नव्हते.' (पृ. २२०) असे हे चित्र मूर्त होते. नियतीने पिडलेल्या कर्णाविषयी शेवटी भीष्माचार्य 'तू अहंकारी' असशील पण खोटा नाहीस' तू 'महारथी' आहेस, असा त्याचा

गौरव करतात. येथे भीष्मही प्रांजल मनाने कबूल करतात की 'माझ्या अहंकाराला डिवचण्याचे फक्त तुझे सामर्थ्य होते म्हणून मी मत्सरी बनत असे.' भीष्माचे हे मनोगत त्यांच्या व्यक्तित्वाच्या गाभ्या पर्यंत जाऊन पोहचल्यामुळे रणजित देसाई यांना त्यांच्या मनातील हा भाव कल्पनेने रंगविता आला आहे. कर्णाची भीष्माचार्य शेवटी प्रशंसा करतात. त्यावरुनच हे अनुमान केले असले पाहिजे. कर्णही मोकळ्या मनाने भीष्माजवळ द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगाविषयीची उपरती व्यक्त करतो. कर्ण एखाद्या महावीराला साजेसा वर भीष्माचार्याजवळ मागतो 'मृत्यूला हवे तेव्हा सामोरे जाणारे आणि प्रसंगी मृत्यूलाही तिष्ठत ठेवणारे आपले बळ मला द्या?' (पृ. २२५) कर्णाची प्रबळ सोशिकता या वरातून प्रकट होते.

सूतपुत्र राधेय, अंगराज कर्ण, कौंतेय, कुरुसेनेचा सेनापती कर्ण आणि नियतीने त्याच्या जीवनात मांडलेला खेळ अशी कर्णाच्या जीवनाची विविध रूपे रणजित देसाई यांनी महाभारतातील कर्णकथेतून तन्मयतेने साकार केली आहेत. प्रत्येक प्रसंगाच्या निमित्ताने कर्णाच्या मनोवस्थेचे सूक्ष्म धागे त्यांनी उलगडून दाखविले आहेत. उदाहरणार्थ युधिष्ठिर, भीम, नकुल यांना युद्धात जिवंत सोडणारा कर्ण, अहंकाराच्या पोटी जन्मलेल्या या युद्धात पराभवाने अधिकच डिवचला गेलेला कर्ण, अर्जुनाने वृषसेनाला ठार मारुन आपल्या अभिमन्यु वधाचा उगवलेला सूड डोळ्यादेखत पाहणारा कर्ण, अर्जुनाशी लढतांना कुंतीला अभयवचन दिलेला व निळा शेला पाहून माघार घेणारा कर्ण, अशी ही कर्णाच्या चित्रणातील बलस्थाने आहेत. कर्णाचावध अर्जुन करतो ती त्याच्या दानाची वेळ असते आणि जणू काही कर्णाने सर्वात मोठे 'जीव' - 'दान' आज आपल्या मृत्यूने वाचकाला दिले आहे अशी शेवटच्या क्षणीही कर्णाला अजोड थोरवी प्राप्त करून देणारी कल्पना देसाईंनी मांडली आहे. (पृ. २८१) कर्ण आणि दुर्योधन यांच्या मैत्रीचे अभंगपण दाखविण्यासाठी दुर्योधनाच्या भेटीची वाट पाहत कर्ण काही काळ प्राण धरून होता हे लेखकोने मोठ्या कौशल्याने दाखविले आहे. (पृ.२८३) कर्ण आपल्या उघड्या मुठीच्या हातावर ओघळलेल्या दुर्योधनाच्या अश्रूंनी शेवटचे अर्घ्यदान देत आहे. काळजाचे पाणी पाणी करणाऱ्या या भावोत्कट कल्पनेने या एका उत्कर्ष बिंदूजवळ 'राधेय' कादंबरीला पूर्णविराम मिळतो. ही मराठी प्रतिभावंतांची निर्विवाद असामान्य झेप आहे. रणजित देसाई यांच्या मनात दडलेली ही कर्णकहाणी वाचकांच्या अंत:करणाला पीळ पाडणारी, उपेक्षितांचे अंतरंग उलगडून दाखविणारी आणि कर्णाची मनोभूमी विशद करणारी आहे.

**स्वेच्छापूर्वक आत्मसमर्पण :-**

'सूर्यपुत्र' हे विजय देशमुख यांचे कर्णचरित्र आहे. 'कर्णाचे जीवन म्हणजे

एक झुंज आहे. ही झुंज नियतीशी.... नियतीनं या सूर्यपुत्राची जणू जन्मापासून क्रूर थट्टा मांडली आहे.' पण 'स्वेच्छापूर्वक आत्मसमर्णणानं' नियतीवर विजय मिळविणारा हा सूर्यपुत्र आहे. कर्णाने स्वेच्छापूर्वक आत्मसमर्पण केले, असा देशमुखांनी महाभारतातील कर्णाच्या वधाचा नवा उलगडा केला आहे. महाभारतातील कर्ण हा त्यांच्या विशेष जिव्हाळ्याचा विषय असून कर्णाच्या मृत्यूविषयी त्यांचे हे नवे संशोधन आहे. एवढ्या स्पष्टपणाने हे मत या पूर्वी मांडले गेले नव्हते. विजय देशमुखांनी या चरित्रग्रंथात कर्णाच्या जीवनाचे भावनिक अंगही उत्कटतेने साकार केले आहे.

**'रथचक्रउध्दारण' कुतूहल :-**

कर्णार्जुन युद्धाच्या वेळी 'रुतलेले रथचक्र' हा देशमुखांच्या काही काळ सतत चिंतनाचा विषय होता. त्यामुळे त्यांची एकाग्रता या प्रसंगी प्रतीत होते.[१११] त्यांना कर्णवध धर्म्य की अधर्म्य या वादातील फोलपणा आपल्या नव्या शोधामुळे वाटू लागला. देशमुखांनी कर्णाच्या जीवनाच्या शोधाबरोबरच त्याच्या मनाचे विश्लेषणही जागोजाग केले आहे. म्हणूनच येथे लालित्याचा स्पर्श झाला आहे.[११२]

रवींद्रनाथ टागोरांच्या बंगाली कवितेतील कर्ण, कुंतीला वचन देतांना 'जयी होक, राजा होक, पांडव संतान' असा आत्मसमर्पणाच्या भावनेतून बोलतो. (पृ.५) हे त्यांच्या मनाला दुजोरा देणारे आहे, असे देशमुखांना वाटते. ही कविकल्पना प्रत्यक्षाच्या जवळ असली पाहिजे म्हणून जाणीवपूर्वक संशोधनाची बैठक देऊन आपला सिद्धान्त मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. 'सूर्यपुत्र'च्या निमित्ताने विचार करतांना प्रा. नरहर कुरुंदकर यांनी देशमुखांच्या नव्या भूमिकेला मान्यता दिली आहे.[११३]

**चिरंजीव मानवी प्रवृत्ती :-**

कर्णाला नियतीने एकीकडे भरभरून दिले आणि दुसरीकडे ते सारे काढून घेतले. महाभारतकाराच्या प्रतिभेला कर्णाचे भावचित्र रंगवितांना विशेष बहर आलेला दिसतो. हे कर्णजीवन म्हणजे चिरंजीव मानवी प्रवृत्तीचा कधीही न संपणारा एक प्रवास आहे. 'मोडेन पण वाकणार नाही,' या बाण्याने पराभव न पत्करता कर्ण झुंज देतो. सर्व बाजूंची माणसाची कोंडी झाली तरी अहंनिष्ठा असतेच. झालेल्या अन्यायातून ती अधिक धारदार बनते. आत्मकेंद्रितता हळूहळू व्यापक बनते आणि हे व्यक्तित्व मग नियतीलाच पराभूत करते. एखादे कर्तृत्वसंपन्न व्यक्तित्व नियतीच्या क्रूर थट्टेला बळी पडते. किंवा नियतीचा पराभव करतांना त्याला स्वत:चे मोल द्यावे लागते. अशा बलिदानाने आपण सुन्न बनतो व

मग त्या व्यक्तिविषयी जी सहानुभूती वाटू लागते, ती महाभारतातील कर्णाविषयी वाटू लागते. कर्णाच्या व्यक्तित्वाचे सारे दोष आपण विसरतो. सावंतांची 'मृत्युंजय' रणजित देसाई यांची 'राधेय' याच कर्णाविषयीच्या सहानुभूतीने व्यापलेली निर्मिती आहे. कर्णाच्या भावचित्रातून हे स्पष्ट होते, म्हणून कर्ण ही एक चिरंतन सलग प्रवृत्ती आहे. या विचाराने श्री. देशमुख कर्णाच्या जीवनाची संगती शोधतात. या संगतीतून साऱ्या घटनांचे अन्वयार्थ उलगडतात. अश्वनदीच्या प्रवाहात दासीच्या मदतीने सोडलेला कर्ण! 'या सूर्यपुत्राच्या जीवनाचा पहिला प्रवास अंधाराच्या सोबतीनं सुरू होतो.' (पृ. २२) कर्णाच्या भावी जीवनाची सगळी कहाणी या प्रतीकात्मक प्रसंगाने सूचित होते.

नियतीने सर्वस्व हिरावून घेतले असूनही कर्ण मुक्तहस्ताने दान देत राहिला. त्याच्या मृत्यूने जणू याचक रुपी पक्षिगणांचा एक कल्पवृक्ष उन्मळला हे महाभारतातील चित्रण विजय देशमुखांनी उदधृत केले आहे.

एक नवी कल्पना येथे देशमुखांनी मांडली आहे. सूर्य आणि पृथा यांच्या गुणांचा वारसा कर्णाने घेतला. सूर्याचे तेज, शरीरसौष्ठव, शत्रूला भाजून काढणारा तीक्ष्ण पराक्रम आणि पृथेचे सौंदर्य, तेजस्वी वृत्ती, धर्मनिष्ठा त्यांना कर्णामध्ये आढळते. याशिवाय लेखकाला कर्णाच्या ठिकाणी सत्यनिष्ठा, दातृत्व, कृतज्ञता, निर्मत्सरी वृत्ती व जितेंद्रिय व्यक्तिमत्त्व जाणवते.

**कर्णाच्या जीवनातील अमृतक्षण :-**

सूर्यपुत्राविषयी आत्मीयतेने लिहितांना, ओघात 'इंद्रपुत्र' अर्जुनाचा अधिक्षेप केला जातो.[११४] 'अन्त्यजं सख्यमिच्छामि।' या कावेबाज मागणीने कर्णाचे जीवन संपूर्णपणे दुर्योधन बांधून घेतो. कृतज्ञता बुद्धी हा कर्णाचा एक मनोधर्म याला कारणीभूत आहे. धनुर्विद्येसाठी परशुरामाकडे केलेल्या 'ब्राम्हणो भार्गवो...स्मि।' या असत्य भाषणापासून कर्णाच्या जीवनाची शोकांतिका तीव्र होते. ब्रम्हास्त्र विसरशील हा शाप कर्णाला मिळतो पण त्याची गुरुसेवा लक्षात घेऊन परशुरामाकडून त्याला 'न त्वया सदृशो युद्धे भविता क्षत्रियो भुवि।' असा वर आशीर्वाद म्हणून मिळतो. कर्ण असत्य बोलतो पण नियतीचा वाटा त्यात फार मोठा आहे, असे देशमुखांना वाटते. परशुराम कर्णाच्या मांडीची उशी करून झोपतो हा आणि एवढाच 'कर्णाच्या आयुष्यातील अमृतमय क्षण आहे.' (पृ. ३९)

स्वतःच्या वेदने पेक्षा गुरुसेवा त्याला मोलाची वाटली. अनवधानाने होमधेनूचे वासरु त्याच्या हातून मारले गेले. आपल्या निरागस मनाच्या अभिव्यक्तीसाठी त्याला शाप भोगावे लागले, याचे दुःख कोणत्याही सहृदय मनाला झाल्याशिवाय राहत नाही. असे हे सहानुभूती निर्माण करणारे कितीतरी प्रसंग जीवनगाथेत

आहे.[११५] पौराणिक वास्तावाचे विश्लेषण करणारी विजय देशमुख यांची दृष्टी कर्णाच्या जीवनात जे जे घडते त्याचे श्रेय सर्वस्वी नियतीला देत असल्याने त्यात सुसंगती शोधणे अवघड होते.

कर्ण कपटी नसून समोरासमोर दोन हात करणारा आहे. बाहुयुद्धात पराक्रम करून तो जरासंधाकडून मालिनी नगरी मिळवितो. स्वयंवराच्या वेळचे द्रौपदीचे दर्शन त्याला धक्का देते.[११६] द्रौपदी याज्ञसेनी असून सामान्य लौकिकाच्या मर्यादा पाळते, याची खंत या कर्णाला वाटते. निदान दैवी माणसांनी तरी भेदाभेद विसरुन वागायला पाहिजे अशी त्याची सार्थ अपेक्षा आहे. लेखक स्वकालाला विसरू शकत नाही, त्यातून या भाष्याला जन्म मिळाला आहे. देशमुखांच्या नवनिर्माणक्षम प्रतिभेचा प्रत्यय आणून देणारे असेच भाष्य एके ठिकाणी त्यांनी स्वतःच (विकारी कर्णाला) कायमचे कलंकित करून ठेवले? हा कलंक कर्णाच्या बलिदानानेच पुसता येण्याजोगा होता. 'स्वेच्छापूर्वक आत्मसमर्पण' या प्रतिपादनाला बळकटी आणणारे त्यांचे हे विवेचन आहे.

**प्रभावी कर्ण :-**

विजय देशमुखानी रंगविलेले सूर्यपुत्र कर्णाचे चित्र अधिक प्रभावी आहे. दुर्योधनाचे विचार जेथे पटत नाहीत तेथे हा कर्ण स्पष्ट शब्दात आपली असहमती दर्शवितो. 'दुर्योधन तव प्रज्ञा न सम्यगिति मे मतिः' (आदि २०२:१) (पृ. ५५) दुर्योधनावर कर्णाची छाप आहे हे येथे सूचित होते. सूर्याला सुद्धा 'न निवार्योव्रतादस्मादहं।' (मला माझ्या दातृत्त्वाच्या व्रतापासून तू परावृत्त करू नकोस) असे तो म्हणतो. देशमुखांना कर्णाचे कवचकुंडलदान निर्भेळ दान वाटते. याच्या मुळाशी त्यांची स्वतंत्र संगती आहे. कवच म्हणजे कर्णाचे प्राणच आणि कवचाच्या मानाने अमोघ कमी शक्ती प्रतीची आहे. विनिमयात दोन्ही वस्तू नेहमी तुल्यबळ असाव्या लागतात. इंद्र तात्पुरता कां होईना याचक बनून आला होता हा वाचक दात्याच्याच जीवावर उठलेला आहे. म्हणून कर्णाची कीर्ती झाली आहे. महाभारतातही या प्रसंगी त्याची स्तुती आहे. तोडलेला वृक्ष जसा अधिक भराने फोफावतो, तशी कर्णाची विष्णूवृत्ती अधिकाधिक उसळ्या मारू लागते. हा नियतीला कर्णाने दिलेला एक प्रचंड हादरा आहे.

'कर्णच तुझा करविता आहे', हे धृतराष्ट्र दुर्योधनाला सांगतो.

कुंतीच्या भेटीत कर्णाच्या सात्त्विक आणि तामसी मनाचा झगडा सुरू होतो. ह्या संघर्षात त्याच्या मनाच्या सात्त्विक वृत्तीला उदात्ततेची नवी पालवी फुटते. कर्ण अर्जुनाशिवाय अन्य पांडवांना जीवदान देतो. कर्णाच्या आयुष्यात त्याने व्याकुळ व्हावे हे प्रसंग पुष्कळ आहेत, म्हणून त्याच्या जीवनात सामान्य

माणसाचे भावविश्व आढळते. कृष्ण कर्णाला जन्मरहस्य सांगतो. तो [illegible] करणार नाही. अशी रास्त भीती कर्णाला वाटते. येथेही पांडवपक्षाची बाजू राखण्याचीच त्याची वृत्ती दिसून येते.[११७] भीष्मपतनानंतर असेच सत्वाचे धुमारे कर्णाच्या क्षुद्र अत्मकेंद्रिततेला फुटतात. भीष्मावरील त्याचा क्षोभ मावळतो. 'अर्धरथी' म्हणणारे भीष्मच त्याला आता 'सूर्यजस्त्वं महाबाहो' म्हणतात. कर्णाचे अलौकिक व्यक्तिमत्त्व भीष्माचार्यांनी प्रांजल मनाने येथे मान्य केले आहे. कर्णामध्ये त्यांना माणुसकीचा गहिवर दिसतो.

**नियतीवर कर्णाची मात :-**

कर्ण अनेक प्रसंगी नियतीशी झुंज देतो. नियतीवर मातही करतो. दुर्योधन प्रारंभी सेनापतीपद कर्णावर सोपवितो पण कर्ण मोठ्या मनाने आपल्यावर अन्याय करणाऱ्या गुरू द्रोणाचार्यांवर ते सोपवितो. लेखकाला हा कर्णाने केलेला नियतीचा पराभवच वाटतो. कर्णाच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक उजाळा देण्यासाठी अशा प्रसंगावर देशमुख आपले लक्ष केंद्रित करतात. कर्णाविषयी नवे चिंतन सर्वत्र, देण्याचा त्यांचा प्रयत्न 'सूर्यपुत्र' मध्ये यशस्वी झालेला आहे. त्यांची प्रज्ञा आणि प्रतिभा यांच्या समन्वय येथे प्रत्ययाला येतो.

काही प्रसंगी कर्णावर ते दोषारोपही करतात. उदाहरणार्थ अभिमन्युवध प्रसंगी कर्णाचाही वाटा त्यात आहे असे सांगतात. अभिमन्युचा खरा वध दुःशासनपुत्राकडून, तोही अधर्माने झाला आहे. शिवाय हे युद्ध आहे असे एकदा गृहीत धरले म्हणजे युद्धात हानी होतच असते. त्यासाठी कर्णाला दूषण देण्यात स्वारस्य नाही. देशमुखांनी कर्णजीवनाच्या चिंतनातून नव्याने काढलेले एक अनुमान विशेष लक्षणीय आहे. कर्ण नकळत दुर्योधनापासून दूर चालला आहे. (पृ. १३०) दुर्योधनाला द्रोणाचार्यांची बाजू पटवून देण्याची वेळ कर्णावर येते. त्याला ती पटलेली असते. दुर्योधनाला त्याची तो जाणीव करून देतो या प्रसंगातून प्रत्यक्षात हेच सूचित झाले आहे. म्हणजे कौरवपाशात राहून पांडवांशी असलेले आपले नाते समजल्यानंतर कर्ण जणू स्वेच्छापूर्वक आत्मबलिदानाच्या मार्गाने वाटचाल करू लागतो.

**अखेरचे द्वंद्व :-**

कर्णार्जुन युद्ध सुरू होते, तेव्हा अश्वसेन नाग योगबलाने कर्णाच्या बाणावर आरुढ होतो. पण मानी कर्ण त्याची मदत नाकारतो. शत्रूवर विजय मिळविण्याची ही संधी चालत आलेली असूनही कर्ण हा मार्ग नाकारतो. या एका नव्या प्रसंगाकडे देशमुखांनी आपले लक्ष वेधले आहे.

शेवटी कर्णाच्या रथाचे डावे चाक युद्धभूमीत रुतून बसते. कर्णाच्या व्यथित

मनात वादळ घोंघावते. 'सारं जग सत्य स्वरूपात आज कर्णासमोर उभ राहून त्याला हिणवू लागतं.' (पृ. १६६) धर्म कोणाचेच नित्य संरक्षण करीत नाही, हे जीवनाचे सार यावेळी कर्णाला मनोमनी पटते. धर्मानुसार वागूनही धर्म त्याचे हनन करतो, ही कर्णाची खंत आहे. पश्चातापादग्ध कर्ण यावेळी देशमुखांना दिसत नाही तर सभोवतालच्या परिस्थितीतील भीषणता त्यांना जाणवते. कर्णाने आपल्या अनेक कृत्यांनी धर्मपरायणता डागाळलेली आहे ह्याची येथे ते नोंद घेत नाहीत. रथचक्रउद्धरणात तथ्य नाही, हे शापित कर्णाच्या लक्षात येत नाही. शापामुळे त्याचे हे सारे प्रयत्न निष्फळच ठरणार, पण तरीही तो प्रयत्न करतो. येथे कर्णवध कर्णाचे सुसंगत जीवनदर्शन घडत नाही, याचे कारण त्याच्याविषयी सतावणाऱ्या या प्रश्नातच आहे. देशमुखांनी तर कर्णवध खरोखरीच झाला असेल काय? अशी नवीनच शंका उपस्थित केली आहे. याविषयीचे त्यांचे चिंतन हाच 'सूर्यपुत्र' या चरित्रग्रंथाचा गाभा आहे.[११८] शेवटी कर्ण एकाकी पडला. रथचक्र उद्धरण ही जबाबदारी रथीची नसून सारथ्याची होती. 'काळकाढूपणा' व ' सूर्यास्ताची वाट पाहणे' ही दोन्हीही अनंतराव आठवले यांनी 'महाभारताचे वास्तव दर्शन' या ग्रंथात सांगितलेली कारणे देशमुखांना जाणवत नाहीत. त्यांच्या दृष्टीने कर्ण सूर्यास्ताच्या बराच अगोदर मृत्यू पावलेला आहे. 'पार्थो ...पराहणे शिरउच्चकर्त.' (कर्णपर्व ९१-५१) सूर्यपुत्र (पृ. १७३) अपराण्हकाळी म्हणजे तिसऱ्या प्रहरी कर्ण मृत्यू पावला असा उल्लेख महाभारतात आहे. कर्ण विश्रांती घेत नाही, चक्रोद्धरणाचा बनावही करीत नाही महेंद्र पर्वतावरील शापाप्रमाणे तो ब्रम्हास्त्रही विसरत नाही. महाभारतकार तर स्पष्ट शब्दात सांगतात की कर्ण यावेळी अर्जुनावर ब्रम्हास्त्राचा प्रयोग करतो. 'तत्समीक्ष्य ततः कर्णो ब्रम्हास्त्रेण धर्नंजयम्। अभ्यवर्षत् ....' (कर्णपर्व ९१-२०,२१) सूर्यपुत्र (पृ. १७४) ब्रम्हास्त्र सोडल्यामुळे अर्जुन घायाळ होतो, पण कर्ण अर्जुनाला त्या स्थितीत ठार मारण्याचे सोडून देऊन पुन्हा रथचक्र वर काढण्याचे काम करतो. अर्जुन सावध होऊन आपल्या कंठाच्या दिशेने जो बाण सोडतो, तो कर्ण चुकविण्याचा प्रयत्न कां करीत नाही? असा देशमुखांचा प्रश्न आहे. यावेळच्या कर्णाच्या हालचाली आणि मौन त्यांना सूचक वाटते व त्यातून ते आपला अभिप्राय आवर्जून प्रतिपादन करतात.

अर्जुनाकडे कर्ण ब्रम्हास्त्र फेकतो, याचा अर्थ त्याचा मृत्युकाळ समीप आला नव्हता. ब्रह्मास्त्राला ब्रह्मास्त्राने अर्जुन उत्तर देतो. एका क्षणी अर्जुन कर्णाच्या बाणाने युद्धात घायाळ होतो, त्यावेळी कर्ण नियतीवर विजय संपादण्याच्या महत्त्वाकांक्षेने स्वेच्छापूर्वक आत्मसमर्पण करतो, कारण कृष्णाने केलेल्या कानउघाडणीने कर्ण पश्चातापदग्ध झालेला असतो आणि इकडे अर्जुनाला नवा जोम आलेला असतो. याशिवाय देशमुखांचे पुढील तर्क असे आहेत की, ' आपण जिवंत असून मेलेले राहू आणि अर्जुन मरुनही कायमचा जिवंतच राहील, (पृ. १८३)' हे

कर्णाला कळून चुकलेले असते. धर्मराज भाऊ म्हणून कर्णाला स्वीकारणार नाही आणि कृष्ण अर्जुनासारख्या आपल्या मित्राच्या वधानंतर कर्णाला जिवंत ठेवणार नाही, हे भविष्यही त्याला कळून चुकलेले आहे. देशमुखांच्या या कल्पनेला वेगळ्या तऱ्हेने ही, मांडता येईल. नेमक्या सात्त्विक प्रेरणा आणि भावनाच कर्णाच्या मनात यावेळी उफाळून आल्या का? अन्यत्र आढळणाऱ्या प्रवृत्तींचा लोप झाला होता का? या महत्त्वाच्या आणि अखेरच्या प्रतिपादनाच्या पुष्ट्यर्थ श्री. देशमुख महाभारतात उद्धरणांचे आधार देत नाहीत.

प्रत्येकाने कर्णाला आपल्या दृष्टिकोनातून जाणून घेण्याचा जो प्रयत्न केला आहे तसा हा देशमुख यांचाही आणखी एक दृष्टिकोन आहे. या भूमिकेतून 'सूर्यपुत्र' कडे पाहणे भाग पडते. स्वत:च्या कल्पनाविलासाने मनात रुजलेल्या कर्णाला नव्या जाणिवांच्या संदर्भात उठाव देण्याचा, त्याच्याविषयी सहानुभूती व्यक्त करण्याचा हा एक प्रयत्न आहे, असे म्हणावे लागते.

**नव्या कल्पनेची समीक्षा :-**

देशमुखांच्या या नव्याने मांडलेल्या कल्पनेतून महाभारतातील कर्णकथेचा नवा अन्वयार्थ त्यांनी लावला हे मान्य करूनही काही आक्षेप घेता येतात. रथाचे चाक भूमी गिळील हा शाप मिळूनही कर्ण रथाचे चाक काढण्याचे निष्फळ प्रयत्न करतो ते आपले आत्मसमर्पण कृत्य कौरवपक्षाला कळू नये यासाठीच. मग आपला सेनापती कर्ण कपटाने मारला गेला या जाणिवेने कौरव निकराने लढून मृत्युमुखी पडतील. कौरवसेना खरोखरच एवढी सावध नव्हती काय? कर्ण सेनापती असून अखेरीस एकाकी पडणे शक्य आहे काय? धाकटे भाऊ व कुंती यांच्याकडे पाहून कर्णाचे मन अनावर होते, असे म्हणावे तर यापूर्वी अशा भावनाप्रधान मनाचा प्रत्यय कोठेच येत नाही. कर्ण कोमल, दयाळू, संमोही आहे, असे देशमुख पुराव्यादाखल म्हणतात. पण ते पुरावे वेगळ्या संदर्भातील आहेत. कर्णाच्या अधर्म्य कृत्यांचा पाढा जेव्हा कृष्ण वाचून दाखवितो तेव्हा कर्णाची ही वृत्ती कोठेच व्यक्त होत नाही. देशमुखांच्या या संशोधनात्मक कर्णचरित्रातील मुद्द्यांना येथे फक्त स्पर्श केला आहे. कारण कर्णाकडे पाहण्याचा त्यांचा आगळा दृष्टिकोन येथे लक्षात घेणे येवढाच मर्यादित हेतू आहे. आपापल्या परीने मराठी प्रज्ञावंत व प्रतिभावंत साहित्यिक नवी भर महाभारतात टाकीत आहेत हे दाखविणे हाच येथे प्रस्तुत विषय आहे.

सूर्यपुत्र आणि अर्जुन यांच्या संघर्षापेक्षा सूर्यपुत्र आणि नियती यांच्यातील संघर्ष चित्रित करणारे हे कर्णाचे एक प्रभावी चरित्र आहे. तसे पाहिले तर प्रत्येक सेनापतीची (भीष्म, द्रोण) महाभारतीय युद्धात लढतांना द्विधा मन:स्थिती आहे, पहिल्या दोन सेनापती प्रमाणेच या तिसऱ्या सेनापतीचाही वध होतो.

भीष्म, द्रोण यांच्याविषयी मात्र आत्मसमर्पणाचा तर्क करता येण्याजोगा असूनही देशमुख करीत नाहीत.

महाभारत हे एक भाऊबंदकीतून उद्भवलेले आपापसातील युद्ध आहे. धर्मयुद्धाचे स्वरूप त्याला प्राप्त झाल्यामुळे लढतांना अनेकांच्या वाट्याला सुखदुःखे आलेली आहेत. तरीही लढणे भाग होते आणि संघर्ष अटळ होता. 'धर्मरक्षणासाठी, गतपापांचं प्रायश्चित्त घेण्यासाठी!' हा सूर्यपुत्र रथचक्रांवर आसवांचा अभिषेक करीत मृत्यू पत्करतो, ही देशमुखांना सुचलेली जी नवी कल्पना आहे ती एक कल्पना म्हणून निश्चितच प्रस्तुत संदर्भात मूल्यवान आहे, पण संपूर्ण महाभारतात हे एकट्या कर्णाचे 'शल्य' नाही, तर शल्याच्याही वाट्याला 'शल्य' आलेले आहे. अनेकांच्या संदर्भात या दृष्टीने विचार करता येण्यासारखी स्थिती आहे. देशमुखांना 'सूर्यपुत्र' मधून काही मानवी प्रवृत्तींवर प्रकाश टाकता आला आणि महाभारताच्या आशयाला या पुनर्मंथनातून एक नवा पैलू लाभला असे निश्चितपणे म्हणता येते.

**काव्यरूप 'कर्ण' :-**

बा. सी. मर्ढेकरांच्या 'कर्ण' या संगीतिकेत त्याचप्रमाणे मधु भोसले यांच्या 'जीवनव्यास' या काव्यसंग्रहात (अन्य महाभारतीय व्यक्तिरेखांप्रमाणेच) कर्णकथेचा काव्यमय अविष्कार पहावयास मिळतो. महाभारतीय कर्णकथेचे एकाचवेळी व्यक्तिनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ असे हे कविप्रतिभाजनित आविष्कार आहेत.

मर्ढेकरांचे 'कर्ण' हे संगीतक १९४३ सालीच ध्वनिक्षेपित झाले व पुस्तकरुपाने ते १९६५ साली प्रसिद्ध झाले.[११९] त्यात कर्णाच्या पराक्रमाच्या वार्ता, वेळोवेळी घडलेल्या घटना तारकांच्या समूहगानाने श्रोत्यांना सांगितल्या आहेत. या तारकांचे आनंदी व दुःखी असे दोन समूह येथे कल्पिले आहेत. कर्णाचे युद्ध, शल्याने कर्णाचा केलेला तेजोभंग, कृष्णाने केलेले अर्जुनाचे सारथ्य आणि रक्षण, असे प्रसंग या संगीतिकेत वर्णिले आहेत. दुःखी तारकांचा समूह कर्णाच्या शौर्याची आणि दुर्दैवाची कड घेतो, तर आनंदी तारका समूहाने पार्थाच्या विजयाची गाणी गायली आहेत. आशयापेक्षा शब्द आणि ध्वनीला या संगीतिकेत महत्त्व आहे. 'अन् विषण्ण आई राधेयाची हाक.' [१२०] येथे राधेय कर्णाच्या हाकेतील आर्तता मर्ढेकरांना जाणवली आहे. कर्णाच्या मनोवस्थेला व आयुष्याच्या शेवटाला येथे श्राव्य आणि दृश्य माध्यमातून चित्रित करण्याचा नाटककाराचा प्रयत्न आहे. मर्ढेकरांसारख्या अत्यंत संवेदनक्षम प्रतिभावंत कवीला 'कर्णपर्व' विलक्षण उदास करते, याची कल्पना पुढील काव्यपंक्तीतून येते.

"दैव उलटता देवहि उलटे!
अंध:कारि वारुणी सर्व शक्तिची, पुण्य हरवूनी पापच येई क्षणी!
शौर्य न पुरतें, धैर्य न पुरते, औदार्य न कारणी,
तदा मानवा कर्णकहाणी स्मरून पडावें रणी!
निळ्या नभांतून रिती भावना भिरभिता साजणी.
अशाच सान्या सूर मिळवितो आम्ही तारांगणी!"

(कर्ण : पृ. ९५)

आपेरा किंवा संगीतकाचे नियम येथे पाळले गेले आहेत. संगीतक गंभीर कथानकावर आधारित असावे आणि महाकाव्यातील संकेताप्रमाणे त्यात धीरोदात्त पुरुषाचे संकीर्तन असावे. कर्णाचा धीरोधात्तपणा मर्ढेकर रेखाटतात. त्यातून त्याचा कर्णाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यक्त झाला आहे.

'मद्राधिपा चित्त निश्चिंत ठेवी!
मनोभंग या अंगराजास ना ठावा कधीही!
कधीही न राधेय विश्वासला देवदेवांवरी!
बाहूत शक्ती नि कर्तव्य-जाणीव, माझेंच सामर्थ्य मातें पुरे
संहारण्या पंडुपुत्रास-येवोत एकेक, वा सर्व, कर्णावरी!'

(कर्ण : पृ. ८६)

येथे मर्ढेकरांना महाभारतातील कर्णकथा ही एक धीरोदात्त कर्णाची गंभीर कथा संगीतकानुरूप वाटली. कर्णाच्या व्यक्तित्वात त्यांना कर्तृत्वाचे बळ आणि स्वत:च्या सामर्थ्यावर असलेला विश्वास जाणवला. कर्णकहाणी मानवाला आदर्शभूत आहे. त्यातून जगण्याची जिद्द दिसते. धीरोदात्त पुरुषाच्या जीवनाचा उलगडा होतो.

**'अधिरथ सूतपुत्र कर्ण' :-**

'अधिरथ सूतपुत्र कर्ण' या काव्यरूप कर्णाच्या चित्रणात मधु भोसले यांनी कर्ण जीवनाचे दर्शन घडविले आहे. काव्याच्या शीर्षकातील आशयातून कर्णाची सूतपूत्र म्हणून झालेली उपेक्षा हा कवीच्या चिंतनाचा मुख्य विषय आहे, हे लक्षात येते. अतिशय हृद्य आणि विचारगर्भ अशी 'जीवनव्यास' मधील भोसले यांची कविता आहे. 'कुंतीच्या कुंवारपणातल्या मातृत्वाचा उल्लेख करून मधु भोसले जणू काही एका अप्रिय गोष्टीवर नेहमी इतर लोक करतात ते भाष्य करण्याचे टाळूण सहज पुढे निघून गेले आहेत. कारण कुंती ही त्यांना पृथ्वीसारखी प्रसवशील माता दिसते आहे. त्यांना तिने पुत्राला टाकले या विदारक सत्याची चिरफाड करावयाची नाही. त्यांना फक्त कुंतीत एकच गोष्ट दिसते की, कुंती कुठल्यातरी अज्ञेय वांछिताच्या मागे धावते आहे, पण तिची धाव धपापलेली नाही तर ती स्थिरचित्र झालेल्या एका योगिनीची अतिशय सूक्ष्म अशी भ्रमणशक्ती

आहे.'[१२१] कुंतीच्या या चित्रणातून दुर्गा भागवत म्हणतात त्याप्रमाणे श्री. भोसले यांचे नेहमीपेक्षा निराळेच भाष्य येथे आहे.' ....पण निपजला नाही, सूर्यापोटी दुसरा सूर्य' या जाणिवेने कर्णाला उद्देशून कवीने म्हटले आहे-

'हे कर्ण -
तू सूर्यपुत्र होतास
पण तू सूर्यमात्र नव्हतास
कारण
तू सूर्यपुत्र होतास
तेव्हाच कुंतीपुत्रही होतास'
(पृ. ५७-५८)

कर्ण सूर्यपुत्र होता पण दुसरा सूर्य नव्हता, कारण तो कुंतीपुत्र होता, दोन सूर्य कधी असूच शकत नाहीत, असे कवी म्हणतो. कर्ण सद्गुणी असूनही वाचाळपणाने वाया गेला हा कवीचा आक्षेप आहे.

'वाचाळपणाने वाया गेलेला
तुझा पराक्रम
तसेच
तुझे दातृत्वही.'
(पृ. ५९)

कारण कर्ण दात्याला निरहंकारी बनविणारे व याचकाला लाचार न करणारे दान देत नाही. कर्णाचे हे गुप्त नव्हे, तर नगारे पिटून द्वाही फिरवून केलेले दान होते. दान सत्पात्री व्हावे लागते, तसेही कर्णाच्या बाबतीत घडले नाही. त्यामुळे या दानाने दात्याला कृतार्थतेचा आनंद किंवा याचकाला तृप्तीचे सुख लाभले नाही, म्हणूनच दाता असूनही कर्णाची थोरवी पसरली नाही. त्याचे उन्नयन होऊ शकले नाही. काळ्या कातळावर बीज पेरुन जसे ते वाया जाते तसे या दानाचे झाले आहे. कवीला कर्णाच्या दानात हिणकसपणा जाणवतो.

'मधु भोसले' यांना इंद्राकडून कर्णाने मागितलेली अमोघ-वासवी शक्ती आणि सुरुपता खटकते. दुर्योधनासाठी सर्व जीवन कर्णाने वेचले, हेही तितकेच पटत नाही. कर्णाच्या कवचकुंडदानात दातृत्वाचा अहंकार त्यांना दिसतो. शिवाय अपात्री दान करून मित्रत्त्वाचा घात केला, म्हणून कर्ण हा गुणी असूनही त्याला पराभूत मरण पत्करावे लागले. कर्ण नुसताच सूर्यपुत्र होतो.

'थोर पित्या पोटी जन्म होणे
हे असते
आपले भाग्य
तो काही असत नाही
आपला पराक्रम.'

(पृ. ६२)

सूर्य आणि 'सूर्यपुत्र' यात अंतर आहे. दैवी अंशापेक्षा मानवी अंशच, इहतत्त्वच अधिक आहे हे कवीला येथे सांगायचे आहे. म्हणूनच कर्णाचे दातृत्व आणि कर्तृत्व शेवटी 'पराभूत मरणा'ला जन्म देते. आणि हे असे घडणे हाच या जगाचा नियम आहे. सूर्यपुत्रापेक्षा कर्ण हा कुंतीपुत्रच होता, हे कवीने महत्त्वाचे मानून त्याचे मानवीपणच चित्रित केले आहे: कारण

'सूर्य हे एक तत्त्व
मग जर सूर्य
एकाच वेळी दोन झाले
तर
सृष्टीचा तोलच सुटला असता.'

(पृ. ५७)

मधु भोसले आणखी एक स्वतंत्र दृष्टिकोन येथे स्वीकारतात. कर्णाच्या सूतपुत्रत्वापेक्षा सूर्यपुत्रत्वावरच त्यांचे लक्ष येथे केंद्रित झाले आहे. कर्णाच्या जीवनातील या कृत्यांवर त्यांचा रोष आहे. इतर साहित्यिकाप्रमाणे कर्णाकडे पाहतांना भोसले सहानुभूती वा अनुकम्पा व्यक्त करत नाहीत, उलट काहीसा अनुदार दृष्टिकोन ते येथे स्वीकारतात आणि ह्या भूमिकेतूनच त्यांच्या जीवनाचे, व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन करतात. वस्तुत: कर्णाच्या जीवनातील दातृत्व आणि सूर्यपुत्र'त्व' हा गौरवाचा भाग मानला जातो, पण कवीने कर्णाच्या जीवनातील नियतीचा हस्तक्षेप आणि त्यामुळे कर्णाची घडलेली शोकांतिका जमेला न धरता कर्णाच्या जीवनातील प्रसंगावर परखड भाष्य केले आहे. यापेक्षा 'मृत्युंजय' आणि 'राधेय' मधील कर्णाचे जीवनदर्शन निश्चितच अधिक काव्यात्म झाले आहे. येथे कर्णाच्या जीवनातील कवचकुंडलदानाचा मुख्य प्रसंग कवीच्या दृष्टिक्षेपात आहे तेवढ्यापुरती कवीची ही प्रतिक्रिया अजमाविली म्हणजे भोसले महाभारतातील कर्णाच्या चित्रणाला अबाधित ठेवतात, असे दिसून येते. मर्ढेकर आणि भोसले या कवींनी कर्णाच्या जीवनातील प्रसंगांच्या अनुरोधाने आपल्या स्वतंत्र चिंतनातून या जाणिवा प्रकट केल्या आहेत.

**समालोचन :-**

कर्णविषयक मराठी ललित साहित्याचे विस्ताराने विवेचन केल्यानंतर साहित्यिकांना

कर्णाविषयी असलेले विशेष आकर्षण प्रथम लक्षात येते. महाभारतातील व्यक्तींपैकी सर्वात जास्त कुतूहल कर्णाविषयीच आहे हे या विवेचनात स्पष्ट दिसते. महाभारतातील सर्वच व्यक्तिरेखा जिवंत आहेत. त्यातल्यात्यात कर्णाचे व्यक्तिमत्त्व अधिकच रसरशीत व चैतन्यपूर्ण आहे. त्याच्या जीवनाच्या मानवी पातळीवरील जडणघडणीमुळे त्याचे आवाहन फार व्यापक आहे. कारुण्याने भरलेले जीवन कर्णाच्या वाट्याला आले आणि अनेक गुण त्याच्याजवळ असूनही दुर्दैवाने व नियतीने त्याचा सतत पाठपूरावा केला आहे. कर्णाची जीवनात झालेली उपेक्षाच साहित्यिकांना व वाचकांना त्याच्याविषयी सहानुभूती वाटायला लावण्यास कारणीभूत झाली आहे. तेव्हा अशा या सद्‌गुणी माणसाचा केवळ दैवयोगाने आणि दुर्योधन सहयोगाने अध:पात झाला. म्हणूनच कर्ण साहित्यिकांच्या जिव्हाळ्याचा आणि चिंतनाचा विषय झाला आहे. साहित्यिक मानवीमन आणि जीवन आपल्यापरीने उजळण्याचा प्रयत्न ललित वाङ्‌मयातून करीत असतात त्यांनी महाभारतातील कर्णाच्या निमित्ताने माणसातील 'माणूसपण' टिपण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या या प्रयत्नाने महाभारतातील कर्णाची व्यक्तिरेखा निश्चितपणे अधिक प्रकाशात आली आहे. एवढेच नव्हे तर सुविकसित झाली आहे. कर्णकथेला नव्या वर्तमान परिस्थितीच्या संदर्भात नवा अर्थ प्राप्त झाला आहे. या नव्या संदर्भातून नवा अन्वयार्थ साहित्यिकांनी आपल्या साहित्यकृतीतुन कलात्मकतेची पातळी अबाधित ठेवून शोधण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या साहित्यात उद्‌बोधन आणि मनोरंजनाच्या कक्षा ओलांडून साहित्यिकांनी कलात्मकतेने कर्णाची करूण कहाणी चित्रित केली आहे. अशा या कलात्मक आविष्कारातूनच महाभारताच्या आशयाला नवे पैलू पडतात. महाभारतातील व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाला नवे धुमारे फुटतात. आणि त्यातूनच महाभारत काल आणि व्यक्तिपरत्वे वाढत असल्याचे दिसून येते. कर्णावरील ललित साहित्याने मौलिक भर महाभारतात टाकली आहे.

**चिंतनाची जोड :-**

कर्णाच्या जीवनातील हृदयस्पर्शी भावनाट्याला आपल्या संपन्न व्यक्तिमत्त्वाची आणि चिंतनाची जोड वि. वा. शिरवाडकर, बा. सी. मर्ढेकर, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, शिवाजी सांवत, रणजित देसाई इत्यादी अनेक साहित्यिकांनी दिल्यामुळे कर्णकथेला नवे रूप आणि नवे आकार लाभले. कर्णाच्या व्यक्तित्वाचे नवे पैलू प्रकाशात आले. त्याच्या भावविश्वाला अनेक अंगांनी प्रकट केले. कर्णाच्या या विविध अविष्कारातून त्याला कितीतरी अंगांनी न्याहाळता आले. साहित्यिकांच्या या प्रयत्नांनी महाभारतातील कर्णकथेचे आणि कर्णाच्या व्यक्तित्वाचे मुनर्मंथन झाले त्यामुळे महाभारतात मौलिक भर पडली आहे. या वर्धनीय महाकाव्यात वाढ झाली आहे. कर्णाचे जीवन संघर्षाने पुरेपूर भरलेले असल्याने, त्याला सतत

झुंजत ठेवणारी त्याची शोकात्म जीवनकहाणी अंत:करणाला जाऊन भिडली. त्यांनी ती आपल्या चिंतनशील काव्यात्म व्यक्तिमत्त्वाच्या मुशीतून व्यक्त केली.

१८५० ते १९०० या कालखंडातील लेखकांनी महाभारतातील कर्ण साररुपाने सामान्य व बालवाचाकांसाठी मराठीत आणला आहे. महाभारतातून कर्णाची जीवनकथा अलग करून सांगण्याची भूमिका या साहित्यातून सफल झाली आहे. कर्णाचे महाभारतनिष्ठ भूमिकेतून जीवनचरित्र सांगणाऱ्या या लेखकांच्या साहितत्यातून कर्णाचे जीवनाचे पारंपरिक आकलन प्रत्ययाला येते. पण या साहित्यातही स्वतंत्र चिंतनाची जाणीव होते. कर्णाची जीवनातील विविध पैलूंना त्यात चित्रित केलेले आढळते. त्यात अनेक नवे मुद्दे उपस्थित केले आहेत. महाभारतानुसार लेखन करणाऱ्या साहित्यिकांच्या या विवेचनात आणि आकलनातही लक्षणीय फरक आढळतो. त्यामुळे या साहित्यानेही महाभारत वाढविण्यास हातभार लावलेला आहे. त्यात नव्या चिंतनाची भर टाकली आहे. असे त्यातून व्यक्त झालेल्या विविध दृष्टिकोनावरून म्हणता येते. या प्रकारचे लेखन करणाऱ्या बाळशास्त्री हरदास, डॉ. वाळिंबे, प्राचार्य आठवले इत्यादी लेखकांपेक्षा वेगळी भूमिका स्वीकारुन नव्या दृष्टिकोनातून कर्णाच्या जीवनाचे अवलोकन वि. ह. औंधकर, वि. वा. शिरवाडकर, साधले, सावंत, देसाई इत्यादी सर्वच साहित्यिकांनी केले आहे. त्यांनी सामाजिक आशयाच्या व कलात्मक चिंतनाच्या आविष्कारासाठी आपल्या प्रतिभेचा साज वाढविला आहे.

**सूचक शीर्षके :-**

साहित्यिकांनी कर्णावरील आपापल्या साहित्यकृतींना जी शीर्षके दिली आहेत, त्यातून त्यांच्या कर्णाविषयक चिंतनाची सकृतदर्शनीच कल्पना यावी, इतपत ती बोलकी आहेत. त्यामध्ये जै वैशिष्ट्य आणि वैविध्य आहे ते केवळ शीर्षकापुरतेच मर्यादित नसून प्रत्यक्ष या साहित्यिकांच्या अविष्कारामध्येही आहे. उदाहरणार्थ के. सी. ठाकरे यांच्या नाटकाचे शीर्षक 'टाकलेलं पोर' हे आहे. नावाप्रमाणेच या नाटकात कर्णाच्या निमित्ताने तत्कालीन जातीयवादाच्या सामाजिक समस्येला स्पर्श केला आहे. कोणत्याही समाजाने उपेक्षिलेल्या 'टाकलेल्या पोराची' ती कथा होते. शि. म. परांजपे यांना कर्ण 'पहिला पांडव' म्हणून जाणवला. सर्वात जेष्ठ म्हणून त्याची भूमिका येथे मांडण्याचा प्रयत्न आहे. औंधकर 'महारथी कर्ण' मोठा कलात्मकतेने या नाटकातून रंगवितात. कर्णाचे महारथी म्हणून पराक्रमाचे चित्रण ते येथे करतात. तसेच साधले 'महापुरुष' म्हणून कर्णाचे मोठेपण आपल्या कादंबरीत सांगतात. शिरवाडकर 'कौंतेय' नाटकात कुंतीचा पुत्र कर्ण म्हणूनच त्याचा कुंतीशी झालेला संवाद रंगवितात. सावंत 'मृत्युंजय' कादंबरीत मृत्यूवरही मात करण्याचे कर्णाचे व्यक्तिचित्र भावोत्कटतेने रेखाटतात. देसाई 'राधेय' कादंबरीत सूतपुत्र म्हणून उपेक्षा झालेल्या एकाकी कर्णाची व्यथा अत्यंत परिणामकारक काव्यत्म

भाषेत चित्रित करतात. येथे *'राधाई'* चा पुत्र म्हणून *'राधाई'* आणि *कर्णाचेचित्रण* आलेले आहे. देशमुख 'सूर्यपुत्र' कर्ण होता या गोष्टीवरच सारा भर देऊन त्याचे तेजस्वी चित्रण रेखाटतात. त्याचप्रमाणे दुर्गा भागवत 'एकाकी' आणि इरावती कर्वे 'मी कोण?' म्हणून कर्णाच्या व्यक्तित्वाची सूक्ष्म स्पंदने येथे रेखाटतात. या सर्व शीर्षकांतून साहित्यिकांच्या विविध जाणिवा प्रकट झाल्या आहेत. प्रत्येकाचे वेगळेपणही सूचित झाले आहे.

दुर्गा भागवत महाभारतात ललित कलाकृतीचा घाट शोधतात, तर इरावती कर्वे समाजशास्त्रज्ञाच्या दृष्टीतून ललित आशयाबरोबरच सामाजिक चिंतन प्रकट करतात. शिरवाडकर, सावंत, देसाई हे साहित्यिक नाटक, कादंबरी या वाङ्‌मय प्रकारांच्या माध्यमातून कर्णाच्या जीवनातील उत्कट भावनाट्याचा, संघर्षाने भरलेल्या व्यक्तिमत्वाचा वेध घेतात. या सर्वांचे हे नवे आकलन आणि मूल्यांकन महाभारतातील कर्णकथेला एक नवे परिमाण आणि प्रत्ययकारी रूप प्राप्त करुन देते. महाभारत ऐतिहासिक सत्य, लालित्य आणि पुराण यांच्यामुळे संमिश्र स्वरुपाचे झाले आहे. समाजाच्या अनेक स्तरांतून व स्थित्यंतरातून, आणि अनेक मुखांनी ते मुखरित झालेले आहे. म्हणून या विविध स्वरूपाच्या जाणिवा साहित्यिकांना महाभारतात जाणवल्या आहेत.

**विविध विकसने :-**

या साहित्यकृती म्हणजे महाभारतातील कर्णकथेची विविध विकसने होत. कारण काव्यात्म अनुभूतीत जी एक वेगळी कलात्म पातळी गृहीत धरली आहे त्या पातळीवरून हे सारे व्यक्त होते. परंपरेने आपल्या हाती दिलेला महाभारत हा एक अमोल ठेवा आहे. विविध प्रकारच्या भाष्यांनी तो सतत वाढतच राहणार आहे. या भाष्याला आणि अन्वयाला अशा संस्कृतीच्या निधानामध्ये भरपूर वाव असतो. महाभारतातील या कर्णकथेने पौराणिक वास्तव येथे कलात्मक. सत्याला जन्म देतांना आढळते. 'ओल्या मातीच्या गोळ्यासारखी ही पुराणकथा साहित्यिकांच्या प्रवृत्तीनुसार नवे आकार आणि रुपसौंदर्य धारण करते. कर्णाच्या जीवनाची संगती लावण्याच्या अनेकविध उर्मीतूनच कर्णविषयक ललित साहित्य बहरून आहे. या साहित्यातून आपले स्वतंत्र प्रज्ञेने परंपराप्राप्त मूल्यांचे नवे चिंतन करण्याचे सामर्थ्य स्पष्ट झाले आहे. कर्णकथेच्या आधाराने वर्तमान जीवनावरील भाष्य रंगविले आहे. त्याच्या 'माणूसपणा' चा नवा शोध घेतला आहे.

कर्णकहाणी या साहित्यिकांची अनुभूती बनली व ती नव्याने अर्थपूर्ण होऊन व्यक्त झाली आहे. केवळ प्रतीक म्हणून कर्णाची व्यक्तिरेखा मराठी ललित साहित्यात अवतरली नाही. कर्णातील 'माणूस' शोधण्याची, कर्णाला नवे व्यक्तित्व

प्राप्त करून देण्याची कुवत या साहित्यात आहे. पुराणकथेत आणि पौराणिक व्यक्तिरेखेत ही नेहमीच कालसंदर्भ राखण्याची व जपण्याची क्षमता अधिक असते, हे मराठी प्रतिभेने या निमित्ताने सिद्ध केले आहे. या जगातील या जीवनातील विसंवाद अनुभवीत असतांना पुराण कालाच्या प्रकाशात जगाचा अर्थ शोधणारे, नव्या जीवनानुभवांना साकार करणारे हे साहित्यातील कर्णाचे चित्रण झाले आहे. महाभारतापेक्षा वेगळ्या भावना आणि जाणिवा कर्णाविषयी व्यक्त झालेल्या येथे आढळतात. 'राधेय' कार रणजित देसाई यांना माणसाच्या एकाकीपणाची वाटणारी ओढ येथे व्यक्त झाली आहे. कर्णाच्या एकाकीपणाची व्यथा अत्यंत हळुवारपणे त्यांनी टिपली आहे. तसेच कर्णाच्या जीवनातील एकाकीपणाच्या व पोरकेपणाच्या अविष्कारामुळेच 'राधेय' कादंबरी काव्यात्म व भावपूर्ण झाली आहे. ही कर्णकथा हृदयस्पर्शी झाली आहे. रणजित देसाई यांनी महाभारतातील कर्णाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कादंबरीच्या सुरवातीलाच व्यक्त केला आहे. प्रस्तुत प्रबंधाच्या संदर्भात या भूमिकेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मराठी प्रतिभेचे सामर्थ्य देसाईंच्या या कर्णचित्रातून प्रत्ययाला येते.

साहित्यातून घटना प्रसंगांच्या आधाराने व्यक्ती प्रगट होते आणि या व्यक्तीच शेवटी लक्षात राहतात. म्हणून साहित्यिकाने व्यक्तीचा किंवा व्यक्तीच्या निमित्ताने घेतलेला मानवी मनाचा व जीवनाचा शोध महत्त्वाचा असतो. व्यक्ती जशी प्रतीत होते, भावते किंवा मनात शिरते तशी साहित्यिक व्यक्त करतात. सावंतांच्या 'मृत्युंजय' कादंबरीत 'शोणा'ला कर्णाच्या भावाला महत्त्व प्राप्त झाले आहे तसे 'राधेय' मध्ये नाही. 'राधेय' मधील 'चक्रधर' 'मृत्युंजय' मध्ये येत नाही. 'वृषाली' बरोबरच 'सुप्रिया' ही 'मृत्युंजय' कादंबरीत येते. 'राधेय' मध्ये फक्त वृषालीच आहे. यावरून साहित्यिकाच्या बरोबर कर्णाचे आकलन बदलते. ते प्रत्येकाचे भिन्न असते. याशिवाय बदलत्या काळांच्या आणि परिस्थितीच्या व प्रश्नांच्या आवाहनाने हे वेगळेपण निर्माण झाले आहे. महाभारतातील एकाच कर्णाचे हे चित्रण असूनही त्यात पृथगात्मता आहे. महाभारतातील कर्णकथेची यातूनच वाढ झाली आहे. आनंद साधले व्यवहारवादी व भौतिक दृष्टिकोनातून कर्णाकडे पाहतात म्हणून त्यांना कर्ण हा 'महापुरुष' म्हणून वेगळा चित्रित करावासा वाटतो, अशीच प्रत्येकाच्या चिंतनातून कर्णाची भिन्न भिन्न रूपे साकार झालेली आहेत. महाभारताचे विविध पातळीवरील चिंतन त्यातून व्यक्त झाले आहे. अर्वाचीन मराठी साहित्यांना कालखंडाच्या दृष्टीने विचार केला तर स्वातंत्र्योत्तर (१९४७ नंतर) कालखंडातील कर्णावरील साहित्य नव्या चिंतनाच्या, संशोधनाच्या आकलनाच्या प्रेरणेतून निर्माण झाले आहे. त्यापूर्वीच्या साहित्यात या अभ्यासाची फारशी प्रचीती येत नाही. कुमारी माता, जातिभेद या प्रश्नांसाठी कर्णकथेकडे स्वातंत्र्यपूर्व काळात पाहिले

आहे. दुर्गा भागवत, इरावती कर्वे, शं. के. पेंडसे, शिवाजी सावंत, रणजित देसाई यांच्या साहित्यातून याची साक्ष पटते. साहित्यिकांच्या प्रतिमेला महाभारतातील कर्णकथेने भारावून टाकले. ती कथा त्यांच्या मनात रुजली. साहित्यिकांनीही नवनिर्मितीच्या स्वातंत्र्याचा आपला हक्क आपल्या साहित्यकृतीतून पुरेपूर बजावला आहे. कर्णाविषयी त्यांना जाणवलेला अर्थ मनापासून प्रामाणिकपणाने व्यक्त केला आहे. विजय देशमुखांनी 'सूर्यपुत्राने स्वेच्छापूर्वक आत्मसमपर्ण केले' हे मत ठामपणे मांडले आहे व 'या पुस्तकाला त्यांचा स्वत:चा आशय व आकार आणला आहे हे निश्चित .' हे दुर्गा भागवतांचे मत पटते.[१२२] साहित्यिकांच्या रंजन, प्रचार, उदबोधन, कलात्मकनिर्मिती या विविध भूमिका कालपरिस्थितीचा संदर्भ, व्यक्तिमत्वाची संपन्नता, अभ्यास यातून निर्माण झालेल्या कर्णावरील साहित्याने महाभारताची वाढ झाली आहे. हे सर्वच महाभारताधिष्ठित ललित साहित्याच्या संदर्भात दिसून येते. कर्णावर ही विपुल साहित्यनिर्मिती होऊनही कर्णाविषयीचे कुतूहल सतत वाढतच आहे असे दिसून येते. एवढेच नव्हे तर ते वाढतच राहील अशी खात्री यावरुन पटते. मधुसूदन कालेलकर (तो राजहंस एक), शिवाजी सावंत (मृत्युंजय) यांनी नाट्यरुपात कर्ण अविष्कृत केला आहे. अलिकडील दाजी पणशीकर (कर्ण खरा कोण होता?) यांच्या प्रयत्नातून हेच सिद्ध होते.

प्रामुख्याने नाटक, कादंबरी, ललितगद्य या वाङ्:मयीन आकृतिबंधातून कर्णाच्या व्यक्तित्वाला ललित साहित्यिकांनी साकार केले आहे. मुळात कर्णाची जीवनकहाणी नाट्यमय आहे. त्यात संघर्ष भरलेला आहे. म्हणूनच नाटक या वाङ्:मयप्रकारांचा विशेष अवलंब साहित्यिकांनी केला आहे. ललित साहित्यिकांनी कर्णाविषयीचे तत्त्वचिंतन, मुक्तचिंतन, भौतिक मूल्यमापन, स्वभावरेखाटन, काव्यात्म-भावोत्कट आकलन व अविष्कार केले आहेत. कर्णाच्या निमित्ताने निर्माण झालेले हे ललित साहित्य लक्षणीय झाले आहे. त्यांनी आपल्या चिंतनाची जोड महाभारताला दिली आहे. कर्णाची जन्मकथा, कर्णकुंतीभेट, कवचकुंडलदान, दुर्योधन, कृष्ण, अश्वत्थामा, द्रौपदी, वृषाली यांच्याशी कर्णाचे प्रस्थापित केलेले नवे भावसंबंध, कर्णाचे विद्यासंपादन व शापित जीवन, कर्णाचा शेवट या सर्व कर्णजीवनातील घटना-प्रसंगांवर साहित्यिकांनी कलात्मक भाष्य केले आहे. त्यांचे नवे चिंतन केले आहे. त्यातून आपल्या प्रतिभेचा आविष्कार केला आहे.

★★★

# टीपांचे संदर्भ

१. मुक्तमयूरांची भारते : डॉ.ना.गो.नांदापूरकर, १९५६, आ.१ ली.

२. ''कर्ण : मला पहिला पांडव ठरविण्याचा उपद्व्याप करणारे काही पण्डित माझ्या बीजशुद्धीचं संशोधन करण्याच्या दिमाखानं, मी हीन कुलाबद्दल फार खंतं करीत असतो. लाजेनं व्याकुळ होत असतो; अशा बदनामीची नाटक रंगविण्यात दंग असल्याचं माझ्या कानी आलं आहे. पांडवपक्षपाती भटांचा हा कट मी ओळखून आहे. असल्या मतिमंदांना या कर्णाच्या चारित्राचा नि आत्मविश्वासाच्या कमावणीचा रतिमात्र ठाव उमगलेला नाही, इतकच मानून मी तिकडं दुर्लक्ष करीत असतो. डबक्यातल्या बेडकांनी महासागरातल्या देवमाशाच्या चरित्राची कहाणी सांगण्याचे धाडस करू नये,आणि परोपजीवी बांडगुळांनी स्वयंप्रभावी पुरूषाच्या पौरूषत्वाचा ठाव घेण्याचा दिमाख मिरवू नये.''

टाकलेलं पोर : के.सी.ठाकरे. १९३९. (प्रस्तावना, पृ.३-४)

३. 'पहिला पांडव' नाटकाची भाषा नि रचना नीट पाहिली तर मात्र असे स्पष्ट दिसते की काळकर्ते पराजंपे यांच्या नावाचा दुरुपयोग करून अनेक अलबत्या गलबत्या लेखकांनी हे भारूड महाराष्ट्र नाटक मंडळीच्या गळ्यात बांधले आणि त्या वेंधळ्यांनीं कै. शिवरामपंताची ही ढोबळ बदनामी बिनदिक्कत रंगभूमीवर नाचवली.'

टाकलेलं पोर : के.सी.ठाकरे. १९३९. (प्रस्तावना, पृ.३-४)

४. टाकलेलं पोर : के.सी.ठाकरे. १९३९. (प्रस्तावना, पृ.४)

५. हिंदूजनांची सामाजिक आचारविचार क्रांती आज २० व्या शतकाच्या मैदानावर येऊन थडकली. तरी अपत्यहत्येच्या पापाला बसावा तसा आळा अजून बसत नाही. कुमारी नि विधवा यांना फुस लावून फशी पाडणारे इतकेच नव्हे तर इं.पि. कोडाच्या ३१२ कलमान्वये त्यांना फासावरही लटकावयाला कारण होणारे नराधम बिनशर्त बिनबोभाट मोकळे नि नामानिराळे राहतात आणि त्या अभागिनी जन्मठेपीच्या किंवा मुदतबंद सक्त मजूरीच्या शिक्षेला माणसातून उठतात. या अन्यायाविरूद्ध 'विधिनिषेध' नाटिकेने मी हिंदूमत जागृत करण्याचा अट्टहास केलेला आहेच.प्रस्तुत नाटकाने अपत्य हत्येच्या पापाबद्दल खुद्द स्त्रियांचीच विचारक्रांति करण्याचा यत्न केला आहे. तो कितपत साधला आहे, हे रसिकांनीच ठरविलेले बरे.'

टाकलेलं पोर : के.सी.ठाकरे. १९३९. (प्रस्तावना, पृ.५)

६. '...आणि एक नाजूक गोष्ट सांगायची, तर तू सहावा ज्येष्ठ पांडव,

म्हणून द्रोपदीसारखी त्रिभुवनसुंदरी हिशेबाप्रमाणे वर्षातून दोन महिने -तुझ्या वाटच्याला येईल.'

टाकलेलं पोर : के.सी.ठाकरे. १९३९. (अंक १: पृ.३९)

७. टाकलेलं पोर : के.सी.ठाकरे. १९३९. (अंक १: पृ.२६)

८. सूर्यपुत्राच्या निमित्ताने (लेख) : नरहर कुरूंदकर,युगवाणी दिवाळी अंक, १९७४ (पृ.३१३)

९. महाभारताचे वास्तवदर्शन : अ. दा.आठवले, १९७०, (पृ.३६)

१०. 'धृतराष्ट्र आणि पांडू हे दोघे म्हणे क्षत्रिय आणि विदूर तेवढा शूद्र.' 'तो म्हणे शूद्र.'

टाकलेलं पोर : के.सी.ठाकरे. १९३९. (अंक २: पृ.३७)

११. 'शंतनुची प्रामाणिक मेहनत अशी पाण्यात जाऊ लागली.' 'कर्ण: झक मारतात लोक.'

टाकलेलं पोर : के.सी.ठाकरे. १९३९. (अंक २: पृ.५१)

१२. 'अरे, तेजोभंग आम्हा सुतादि शुद्रजनांच्या पाचवीला पूजलेला' हाच एकूण नाटकाचा आणि कर्णाचा सूर आहे.

टाकलेलं पोर : के.सी.ठाकरे. १९३९. (अंक ३ : पृ.७५)

१३. 'लौकिकाला न समाजाच्या विकल्पांना बिचकून पोटचं पोर टाकण्याचा अत्याचार, अखेर केवढा भयंकर परिणाम करतो. हे स्त्री जातीच्या मातृहृदयी मनावर बिंबविण्यासाठी तुझा अवतार, आणि मागासलेल्या समाजाचा उध्दार करणाऱ्या स्वयंप्रकाशी वीराला, किती विरोधानां तोंड देऊन पुढे यावं लागत याचा दाखला जगाला पटविण्यासाठी या धनुर्धर कर्णाचा अवतार महाभारतीय युद्धाचा इतिहास जरी कायमचा नष्ट झाला, तरी उदारधी धनुर्धारी कर्णाचे चरित्र मागासलेल्या व पददलित अखिल मानवजातीच्या उध्दारासाठी आपल्या देदीप्यमान तेजानं शुक्रेन्दुवत प्रज्वलित राहिल.'

टाकलेलं पोर : के.सी.ठाकरे. १९३९. (अंक ३ : पृ.८३-८४)

१४. पहिला पांडव (परीक्षण) : वसंत देसाई, 'रत्नाकर' नोव्हें. डिसें. १९३० (पृ.९५१)

१५. पहिला पांडव (परीक्षण) ना.बा.केळकर, 'चित्रमयजगत' फेब्रु.१९३१.(पृ.५४९)

१६. शि.म.परांजपे (अप्रकाशित प्रबंध) डॉ.सु.के.भोसले,पुणे विद्यापीठ. १९७०, (पृ.५२८)

१७. कर्ण म्हणतो,''या भिकारडया क्षत्रियांची तोंडे बंद करण्याकरिता काहीही करून मी जन्माने क्षत्रिय ठरलो, तर ते मला पाहिजे आहे. माझे क्षत्रियत्व सिद्ध करून देणाराला मी वाटेल ते देईन.''

पहिला पांडव : शि.म.परांजपे, १९३१,(अंक १, प्र.५.पृ.२१)

१८. 'धर्म हा प्रत्यक्ष धर्मावतार आहे. त्याच्यावर माझे श्रेष्ठत्व कसे चालेल ? पुण्यावर पापाचे श्रेष्ठत्व कधीही चालावयाचे नाही.'

पहिला पांडव : शि.म.परांजपे, १९३१,(अंक २,प्र.६, पृ.५९-६०)

१९. विवेचनाच्या ओघात आळतेकरांनी कर्णाचा एक विशेष सांगितला आहे, तो असा! 'इतर दुर्दैवी नायकाप्रमाणे गुणाच्या अतिरेकाचे दुर्गुणात रूपातर होऊन जो अध:पात होतो, पश्चात्ताप होतो तो प्रकार या महाभागाच्या बाबतीत घडत नाही.'

शोककारण आणि मराठी शोकांतिका : म.म.आळतेकर, १९५२, (पृ.१८४)

२०. महारथी कर्ण : वि.ह.औंधकर,१९३४.(पृ २२)

२१. महारथी कर्ण : वि.ह.औंधकर,१९३४.(पृ. ७०-७१)

२२. "माझ्या मते कालभेदाचा हा प्रश्न अगदीच गौण आहे. कारण कालपरत्वे मनुष्यस्वभाव कधीच बदलत नाही. फक्त साधनेच बदलत असतात.पुराणकालीन योद्धा गदा,धनुष्य वगैरेंनी युद्ध करील, इतिहासकालातील वीर भाला,बरची, तलवार वगैरेंनी लढेल आणि आजचा मनुष्य रायफल, मशिनगन, बॉम्ब गोळ्यांनी लढेल,म्हणून मनुष्य स्वभावातील युद्धाची प्रवृत्ती सारखीच."

महारथी कर्ण : वि.ह.औंधकर,१९३४.(प्रस्ता.पृ.२)

२३. महारथी कर्ण : वि.ह.औंधकर,१९३४.(अंक १:प्र.१:पृ.५)

२४. 'हीन जातीय म्हणून उच्च वर्णियांनी माझी गांजवणूक मांडली असता, दयार्द्र अंत:करणाने मला जवळ करून माझ्या पाठीवर प्रेमाने हात फिरविणाऱ्या, या माझ्या थोर उपकर्त्याच्या यशाकरता वाटेल ती विटंबना मी सहन करायला तयार आहे.'

महारथी कर्ण : वि.ह.औंधकर,१९३४.(अंक १: प्र१:पृ.८)

२५. महारथी कर्ण : वि.ह.औंधकर,१९३४.(पृ.३७)

२६. 'समुद्रवलयांकित सृष्टीच्या राज्यधिकारापेक्षा स्वत:च्या शब्दाची किंमत ह्या कर्ण राजाला अधिक आहे.'

'तर त्या उपकारकर्त्यांना दिलेला शब्द मला पाळलाच पाहिजे.'

महारथी कर्ण : वि.ह.औंधकर,१९३४.(पृ.३८)

२७. महारथी कर्ण : वि.ह.औंधकर,१९३४.(अंक२,प्र.१,पृ ३९)

२८. कौंतेय : वि.वा.शिरवाडकर,१९६५, आ.३ री, (प्रस्तावना)

२९. 'इतिहास हा ज्येत्यांचा खुशमस्कऱ्या आणि पराभुतांचा निंदक असतो.'

कौंतेय : वि.वा.शिरवाडकर,१९६५, आ.३ री, (पृ.९)

३०. कौंतेय : वि.वा.शिरवाडकर,१९६५, आ.३ री, (पृ.९)

३१. शल्य म्हणतो, 'अंत:करणाचा पाठिंबा नसेल तर त्या शब्दाची किंमत

वाऱ्याच्या लहरीपेक्षा अधिक नाही.' त्रिगर्त तर अधिक तेल ओततो. तो म्हणतो, 'राजांचे नेतृत्व फक्त राजेच करू शकतात. सूतपुत्र करू शकत नाही.'

कौंतेय : वि.वा.शिरवाडकर,१९६५, आ.३ री, (पृ.११)'

३२. कर्ण म्हणतो,' 'आई' म्हणून कोणाला हाक मारायची झ ली तर याच स्त्रीला हाक मारावी.तिचे ते मायेने ओथंबलेले डोळे माझ्याकडे क्षणमात्र वळले की माझ्या अंतःकरणात कालवाकालव होई.'

'कुंतीसारखी आई लाभणं भाग्य आहे!'

कौंतेय : वि.वा.शिरवाडकर,१९६५, आ.३ री, (पृ.२८-२९)

३३. 'पाची पांडवांचा वध करून कुंतीला रडायला लावणं हेच माझं जीवित कार्य आहे.'

कौंतेय : वि.वा.शिरवाडकर,१९६५, आ.३ री, (पृ. २९)

३४. 'भाऊबंदकीच्या वैरापेक्षा महत्त्वाकांक्षेतून आणि मत्सरातून उद्भवलेलं वैर अधिक प्रखर असतं! त्यातही अधम कुळातल्या माणसाची महत्त्वाकांक्षा! - उकिरड्यावरचं रोपटं भोवतालच्या दुर्गंधीमुळे जास्त फोफावतं मात्र!'

कौंतेय : वि.वा.शिरवाडकर,१९६५, आ.३ री, (अं, १, प्र.३,पृ.३२)

३५. सूर्यपुत्र कुठला? मी सूतपुत्रदेखील नाही! सूतपुत्र म्हणून माझी नालस्ती करणारे सुद्धा माझा गौरवच करीत आहेत. कोणातरी कुमारिकेच्या अथवा विधवेच्या पोटातून पडलेला पापाचा गोळा आहे मी!

कौंतेय : वि.वा.शिरवाडकर,१९६५, आ.३ री, (पृ.४७)

३६. 'धर्मराजाची आई मोहवश होऊन कुंवारपणात अपत्याला जन्म देईल, पण कर्णाचा तेजोभंग करण्यासाठी ती त्याच्याकडे जाऊन काही कपोलकल्पित कहाणी सांगेल; हे संभवत नाही.'

कौंतेय : वि.वा.शिरवाडकर,१९६५, आ.३ री, (पृ.५४)

३७. 'समाजानं बांधलेले आंधळ्या निष्ठांचे तट एका व्यक्तीला फोडता येत नाहीत, ओलांडता येत नाहीत. जे धैर्य कुणालाही आलं नसतं ते कुंतीनं दाखवलं नाही; म्हणून तिचा तिरस्कार करायचा!'

कौंतेय : वि.वा.शिरवाडकर,१९६५, आ.३ री, (पृ.६१)

३८. कौंतेय : वि.वा.शिरवाडकर,१९६५, आ.३ री, (पृ.६१)

३९. आई नसल्याने आपण राजमातेच्या दर्शनास आलो आहोत: अशी कर्ण खोटी बतावणी करतो.

४०. आ.म.वा.इ. (भाग २ रा) : डॉ.अ.ना. देशपांडे, पुनर्मुद्रण १९७०,(पृ.२८७)

४१. 'शिरवाडकरांचे 'कौंतेय' म्हणजे कर्णासारखी समर्थ पण पोरकी माणसे कशी वागू, बोलू शकतील याचे केवळ एक कल्पनाचित्र आहे.'

मराठी साहित्यातील कर्ण : प्रा.सुशीला पाटील, प्रथमावृत्ती १९७४, ( पृ. २० ).

४२. 'महाभारतातील कर्णाच्या तोंडची ही भाषणे पाहता 'कौंतेय ' नाटकात कर्णाचे रंगविलेले चित्र महाभारताला सोडून नाही.'
रंगभूमीच्या परिसरात : द.रा.गोमकाळे, १९६५, आ.१ ली, (कौंतेय : लेख) (पृ.७३)

४३. भूमिकन्या सीता आणि कौंतेय (लेख) : उषा हस्तक
प्रतिष्ठान : सप्टें.१९७१, (पृ १९)

४४. व्यासपर्व : दुर्गा भागवत. पुनर्मुद्रण : १९६९.

४५. व्यासपर्व : दुर्गा भागवत. पुनर्मुद्रण : १९६९.(प्रस्ता. पृ. २० )

४६. 'एक अतीसूक्ष्म, अभेद्य असा कोमलतेचा कंद, काव्यछंदाच्या अनुरोधाने, कथेच्या लालित्याच्या अनुषंगाने, महाभारताच्या कठीण कवचाच्या अंतर्यामात भरून राहिला आहे. भव्य दगडी कोरीव मूर्तीच्या तोंडावर जी कोवळ्या मानवी भावनांची छटा दिसते, तीच कोवळी छटा महाभारताच्या नाट्यपूर्ण, अतिविशाल कथेच्या अंगप्रत्यंगात भरून राहिली आहे. याचा साक्षात्कार झाला तरच महाभारताच्या कलाकृतीचे भान येण्याचा संभव.'
व्यासपर्व : दुर्गा भागवत. पुनर्मुद्रण : १९६९.(प्रस्ता, पृ. ३)

४७. 'कौरवांच्या बाजूला प्रथम न्याय येत नाही न्याय येतो तो कर्णाचे धीरगंभीर रूप घेऊन.'
व्यासपर्व : एकाकी (लेख) दुर्गा भागवत. पुनर्मुद्रण : १९६९.(पृ.५६)

४८. व्यासपर्व : दुर्गा भागवत. पुनर्मुद्रण : १९६९.(पृ.५९)

४९. 'कर्णाने भोगांचे ऐश्वर्य जाणले, पण त्यांची गुलामी पत्करली नाही. जे मानाने मिळाले, जे देणे प्रेमाने आले, ते त्याने स्वीकारले.'
व्यासपर्व : दुर्गा भागवत. पुनर्मुद्रण : १९६९.(पृ.५९-६०)

५०. 'भारतीय समाजातले जातीचे कुंपण इतके बंदिस्त की, ते ओलांडून जाणे अशक्य. जातिबाह्य कितीही मोठा असो, त्याचे जीवन निर्माल्यवत.'
व्यासपर्व : दुर्गा भागवत. पुनर्मुद्रण : १९६९.(पृ.६१)

५१. 'कर्णाला आपण कोण आहोत हे माहीत नव्हते असे म्हणवत नाही.'
व्यासपर्व : दुर्गा भागवत. पुनर्मुद्रण : १९६९.(पृ.७०)

५२. '...बोलण्या-लिहिण्यामागे माझ्या मतं एकच हेतू - आपल्याला काहीतरी उत्कटतेने वाटत असते, ते इतरांना सांगावे हा.'
युगांत : इरावती कर्वे , आ.१ ली. १९६७, ( प्रस्ता.पृ. १२)

५३. 'जसजसे संशोधन होत राहते , तसतसे संशोधनाचे नवे नवे मार्ग उपलब्ध होतात. जुन्या पिढीतील संशोधनाच्या चुकाही समजतात. म्हणून

कुठचेही एक संशोधन म्हणजे कोणत्याही गोष्टीवर अगदी शेवटचे शिक्कामोर्तब झाले, असे समजू नये.'

युगांत : इरावती कर्वे, १९६७, आ.१ ली. ( प्रस्ता.पृ.१३)

५४. युगांत : इरावती कर्वे, १९६७, आ.१ ली. (प्रस्ता.पृ. १४)

५५. 'मी कोण या विचाराने त्रस्त झालेली एक व्यक्तिरेखा · आत्यंतिक मनोवृत्तीद्वारा पुनः पुनः अहंभाव शमवू इच्छिणारी- सदा अ्वस्थ असणारी एक व्यक्ती म्हणून कर्णाचे गुणदोषासह परीक्षण इरावतीबाईंनी केले आहे.'

मराठी साहित्यातील कर्ण : प्रा.सुशीला पाटील, १९७४,आ.१ ली.(पृ५७)

५६. युगान्त (परीक्षण) : बा. रं. सुंठणकर, म. सा. पत्रिका अंक (जुलै-सप्टें-आक्टो.१९६८)

५७. 'मी राधेय आहे, मी सूतपुत्र आहे.'(लेख)

'त्या कर्णाच्या पश्चातापाने मी जळत आहे.'(लेख)

'हा जय नावाचा इतिहास आहे.'

आनंद साधले : १९७४, आ. २ री, (पृ.६७ ते ७३)

५८. 'कुळाचा उल्लेख करण्यात येऊन त्याची घोर मानखंडना करण्यात आली होती, पण तिने यत्किंचितही खचून न जाता त्याने नेत्रदीपक विजय मिळविला.'

हा जय नावाचा इतिहास आहे. : आनंद साधले, १९७४, आ.२ री (पृ.७१)

५९. 'कर्णाच्या दर्शनाने डोळे दिपले म्हणजे पुष्कळदा भीष्म आणि कृष्ण यांचीही विस्मृती पडण्याचा प्रसंग येतो.'

हा जय नावाचा इतिहास आहे. : आनंद साधले, १९७४, आ.२ री (पृ.७१)

६०. महापुरूष : आनंद साधले, १९६९, आ. १ ली, (प्रस्ता. पृ.२)

६१. 'सूत कुलावतंस, स्वपराक्रमप्राप्तक्षात्रपद, महाभारत महासंग्राम महासेनापति...'

महापुरूष : आनंद साधले. १९६९, (प्रस्ता. पृ.८)

६२. 'सूर्याचा जन्म अंधाराच्या कुशीत झाला असला तरी त्याची खंत तो आपल्या प्रकाशाने विश्व उजळतांना करीत नाही.'

महापुरूष : आनंद साधले, १९६९, आ. १ ली, (प्रस्ता. पृ.६)

६३. 'अपत्याच्या सुखापेक्षा स्वतःचा स्वार्थ जिला मोठा वाटत नाही, अशा आईला कोणतीही परिस्थिती मुलाचा त्याग करावयास भाग पाडणार नाही.'

महापुरूष : आनंद साधले, १९६९, आ. १ ली, ( पृ.२९-३०)

६४. 'आपल्या पौरूषाने भुवनाला ललामभूत झालेला महापुरूष आज तुझ्या

दारी चालून आलेला होता. तो तू कोणत्या धुंदीत नाकारलास.'
महापुरूष : आनंद साधले, १९६९, आ. १ ली, (पृ.९५)

६५. 'सूडाचा आनंद आपण न्यायात वेष्टून प्रगट केला. हे अधमपणाचे झाले '(पृ.१११)
'वेश्येला नग्न केलेच पाहिजे असा कुठं वेदाचा दंडक आहे.'(पृ ११२)
'कर्णाने हिच्यासमोर मनोमन लोटांगण घातले.'(पृ.११३)
'वसू, मी स्त्री जातीचाच अपमान केला.'(पृ.११५)
महापुरूष : आनंद साधले, १९६९, आ. १ ली,

६६. 'आपल्या संस्कृतीची जी मूस आहे तिच्यातून निघालेली प्रत्येक कुलस्त्री ही द्रौपदीच आहे.'(पृ.११८)
किंवा द्रौपदीने, धर्मराजाची मुक्ती मागितली त्यावेळी त्या आत्मनिरपेक्ष मातृत्वाच्या उदात्त दर्शनाने तो थक्क झाला' असे साधले यांनी वर्णन केले आहे.
महापुरूष : आनंद साधले, १९६९, आ. १ ली, ( पृ.११३)

६७. 'धीवर मासे पकडतो ते त्याचा आत्मा लौकर मुक्त व्हावा म्हणून नव्हे तर आपल्या उदरभरणासाठी.'
महापुरूष : आनंद साधले, १९६९, आ. १ ली, ( पृ.१५९)

६८. महापुरूष : आनंद साधले, १९६९, आ. १ ली, ( पृ.१५९)

६९. वसुंधरा कर्णाविषयी म्हणते.'तुम्ही कुठेहि असता तरी स्वयंप्रकाश असतो. सूर्य भुवनांच्या प्रकाशात प्रकाशत नाही. भुवने सूर्याच्या प्रकाशांत प्रकाशतात.'
महापुरूष : आनंद साधले, १९६९, आ. १ ली, ( पृ.१९०)

७०. 'कर्ण आणि वसुंधरा यांच्या फक्त प्रणयाची ही कांदबरी असावी असे वाचतांना सतत वाटत राहते.'
'महापुरूष' मधील कर्ण (लेख) : सुभाष गढीकर, प्रतिष्ठान मे, १९७५ (पृ.२९)

७१. 'कर्णाच्या गुणांनी भारावून जाऊन त्याच्या दोषासंबंधी करण्यात येणारे वृथा समर्थन आणि पांडवांबद्दलचा आत्यंतिक आकस हे या लेखकाचे वैशिष्ट्य या कादंबरीतून प्रतीत होते.'
'महापुरूष मधील कर्ण : (लेख) सुभाष गढीकर 'प्रतिष्ठान' मे १९७५ (पृ.२६)

७२. 'श्री. साधल्यांनी तर काय, आपल्या 'महापुरूष' कादंबरीमध्ये असत्य लेखनाची आणि महाभारतातील अनेक वर्णनांना निष्कारण भाकडकथा ठरविण्याची परिसीमा केली आहे.'
महाभारताचे वरस्तवदर्शन : अ.दा.आठवले,१९७०.आ.१ ली, (पृ.२७९)

७३. मृत्युंजय : शिवाजी सावंत,१९६९,आ.३ री.

७४. 'निर्माणासाठी केवढे पिचावे लागते हे एखादा बंकिमचंद्र जाणत असतो,एखादा प्रल्हाद अत्रे जाणत असतो. बाकीचे शब्दांचे अनंत फुलोरे फुलवितात.'
'मृत्युंजय' व 'स्वामी' यासारखी पुस्तके सुखासुखी वाचकांसमोर कधीच येत नसतात.त्याचे मूल्यमापन तेवढ्याच दर्जाचे व्हावे एवढीच माफक अपेक्षा कलावंत मनाने करावी की नाही ?'
मी, माझे वाचक आणि टीकाकार : शिवाजी सावंत , सोबत दिवाळी अंक, १९७३ (पृ.५८)

७५. 'व्यासांच्या सर्वस्पर्शी प्रतिभेनं आणि त्यांच्यानंतर अनेक बुद्धिमंतांच्या प्रज्ञेनं जतन केलेला महाभारत हा प्रत्येक भारतीयानं अभिमान बाळगावा असा या देशाचा धगधगीत 'इतिहास' आहे...! चित्तथरारक आणि रोमांचक !'
मृत्युंजय : शिवाजी सावंत १९६९, आ. ३ री (अर्ध्यदान)

७६. १८४६ साली महाभारताचं परिशीलन करण्यासाठी भारतात येऊन गेलेल्या 'अॅडाल्फ हाल्ट जमन' या जर्मन कवीने नव्या जर्मन कवींना उद्देशून केलेलं आवाहन वाचलं ...'हे केलेलं आवाहन वाचलं आणि मग मात्र माझं मन महाभारतावरून पळभरही ढळायला तयार होईना.'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (अर्ध्यदान)

७७. राजपुत्र असावा तर तो दुर्योधनासारखा ऐटदार.'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.३१)

७८. 'साळिंद्राच्या शरीरातून शेकडो टोकदार नलिका एकाचवेळी बाहेर सुटतात.'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.७४)

७९. 'गुरूदेव कृपाचार्यांनी ही पराक्रमाची क्रूर चेष्टा चालविली आहे. क्षत्रिय! क्षत्रिय म्हणून या कर्णात काय कमी आहे.'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.७९)

८०. 'राजा, मी अंगराजकर्ण, नव्हे नुसता कर्ण तुला वचन देतो की, ज्या मेरू पर्वताच्या धैर्यानं आज तू मला सावरलस, त्याच धैर्यानं मी आजन्म तुझ्या पाठीशी राहीन. प्राण गेला तरी कधीही परतणार नाही.'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.८३)

८१. 'मानवरुपी घोड्याच्या पाठीवर संकेतांचे आसूड मारणारा काळ हाही एक सारथीच आहे.'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.८३)

८२. 'अंगदेशाचा राजा झालो म्हणून मी स्वत:ला भाग्यशाली मानत नव्हतो.

कारण मला पूर्णपणे माहीत होतं की ते राज्यपद मला दुर्योधनाच्या कृपेने मिळालं होतं. जे लाचार आणि दुर्बल असतात तेच केवळ असल्या दुसऱ्याच्या कृपेची ऐट धरतात.'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.१५१)

८३. 'योद्धा मरण पत्करतो पण आपल्या स्वाभिमानाचं मरण तो कधीच स्वीकारीत नाही.'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.१५१)

८४. 'मृत्यूच्या दारात जीव किती असहाय्य असतो. तो जातगोत, समाज, धर्म, प्रतिष्ठा काहीकाही पाहत नसतो. तो पाहतो तो केवळ स्वत:चे अस्तित्व.'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.१५८)

८५. 'एका जखमी माणसानं आपली दुखरी जखम सावरीत दुसऱ्या जखमी माणसाच्या जखमेवर फुंकर घालण्यासारखेच होते ते! पण मला ते करणंच भाग होतं.'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.२९२)
'दुर्योधनाचा अवमान तो माझाही अवमान होता.'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.२७९)

८६. 'सूड! प्रतिशोध! अवमान, अवहेलना, तिरस्कार, उपेक्षा, वंचना, अधिक्षेप! कर्णा, हे आणि हेच तुझं जीवन आहे'. 'जीवन कसलं हे तर जिवंत मरण!'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.३१४)

८७. 'कर्णा, ऊठ! घटकान् घटका अर्ध्यदान करणाऱ्या सूर्यशिष्या ऊठ! अंध:काराचं हे साम्राज्य उजळून टाक!'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.३१७)
'सूड ही हलक्या मनाची क्षुद्र कल्पना! ही तर पांचाली होती! स्वत:चं जीवनदान देऊन सुद्धा मी तिचं संरक्षण केलं असतं. पण अंगराजाला साद न घालता ती तशीच पुढे गेली.'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.३१९)

८८. 'ती व्याघ्रीण आपल्या पिल्लांच्या असंख्य यातना त्याला खाऊन शेवटी आपल्या उदरात पुन्हा घेऊन मातृत्त्वाची लाज तरी राखते. पण या स्त्रीनं आपल्या प्रतिष्ठेच्या दातांनी माझी कोवळी मान मोडून मला अर्धवट मेलेल्या स्थितीतच अश्वनदीच्या अरण्यात टाकलं नव्हतं काय?'
मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.५१४)

८९. कर्ण म्हणतो, "कुणीही, कधीही हे लक्षात घेण्याचा यत्न केला नाही,

की कर्ण सामान्यातून वर आलेला आहे! अन्याय कसे असह्य असतात, हे स्वत: त्यानं मुकाटपणं अनुभवलं आहे! ज्याला अन्यायाची अनुभूती असते, तो कधीच कुणावरही अन्यायाचं अस्त्र उचलत नाही! म्हणून दुर्योधनाच्या आणि मामांच्या कल्पना मला कधी पटल्या नाहीत आणि त्याबरोबरच हेही सत्य होतं की मला माझ्या कल्पना त्यांना पटवून देता आल्या नाहीत! वास्तविक माझ्या म्हणण्यात न पटण्यासारखं गुंतागुंतीचं अस काहीच नव्हतं. सरळ सरळ स्पष्ट युद्ध! वीराला शोभणारं कीर्तीला नेणारं, पण ते ऐकून त्यावर चिंतन करण्याइतकं दुर्योधनाचं मन:स्वास्थ ठीक नव्हतं. शरीरानं सन्निध असलेली माणसं मनानं पण सन्निध असतातच असं नाही!''

मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.३०१-३०२)

९०. 'मला पूर्ण माहीत होतं की मी मुळीच निर्दोष नव्हतो! पण माझ्या सदोषपणाला कोणतं ना कोणतं कारण होतं. प्रत्येक घटनेतील माझं वागणं म्हणजे एक तीव्र प्रतिक्रिया होती.'

मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.३४१)

९१. 'आता मी सरळ चाललो असतो तरी जगाला ती चाल तिरकीच दिसणार होती! मग तिरकं चालणच शहाणपणाचं नव्हतं काय?'

मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.३६८)

९२. 'क्षत्रिय प्रायोपवेशन करून मरत नसतात, समरांगणात तळपत्या सूर्यकिरणात शरीरातील चैतन्य-किरण विलीन करण्यासाठीच त्यांचा जन्म असतो.'

मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.३७७)

९३. मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.४५१-४५३)

९४. '... पण माझ्या मनातही दूरवर कुठंतरी न्यूनतेची टिटवी कर्शतच होती.'

मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.४५५)

९५. 'जे मी स्वत: कालत्रयीही केलं नसतं ते केवळ तुझ्यासाठी मी करीन.'

मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.४५६)

'कर्ण ज्या दिशेनं चालतो ती आपलीच करून टाकतो.'

मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.४६१)

९६. 'कोण सिंह आणि कोण सारमेय? त्याची कसोटी काय! केवल कुल! कुलाच्या श्रेष्ठत्वाचा तोच पुरातन कळकट ध्वज आजही हाती नाचवीत हे लोक कुणाकुणाला पायदळी तुडविणार आहेत.'

मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.४६२)

'तू सूतपुत्र आहेस -' तुझ्या हाती ब्रम्हास्त्र म्हणजे माकडाच्या हाती

मशाल.'

मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.४६३)

९७. 'हे ज्ञान मानवतेच्या संहारासाठी नाही ..., पण शस्त्रास्त्राचं हे ज्ञान मानवतेच्या उद्धारात अडथळा आणणाऱ्या क्रौर्याचा संहार करण्यासाठी मात्र खास आहे.'

मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.४७६)

९८. 'ब्रम्हास्त्रासाठी मी गुरू द्रोणांच्या द्वारात गेलो, त्यांनी मला क्षत्रिय नाही म्हणून नाकारलं! तुमच्या द्वारी उभा राहिलो, तुम्ही ब्रम्हकुमाराशिवाय कोणालाही ब्रम्हास्त्र देण्यास तयार नाही, मग ... मग आम्ही सूतांनी कुठं जावं?.'

मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.४८०)

९९. 'युद्ध! युद्धानं कुणाचेही प्रश्न मिटणार नाहीत! युद्ध हे मानवी क्रौर्य उखडून काढण्यासाठी योजावा लागणारा, पण तेवढाच कठोर उपाय आहे. युद्धामुळे मानवजातीचं कधीही कल्याण होणार नाही! कारण ते जीवनाचं अंतिम ध्येय नव्हे! जीवनाचं अंतिम ध्येय आहे प्रकाश!'

मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.४७५)

१००. 'कर्ण आणि पांडव या जन्मानं निगडित अशा जीवनरेषा असतील, पण-ग" दुर्योधन आणि कर्ण या पूर्वजन्मानं निगडित अशा जीवनरेषा आहे.'

मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.५००)

'पांडवांच जगणं हे माझ्या मरणाच्या पायावरच उभ राहणार असेल तर तो पायथ्याचा पाषाण होणही मी आनंदानं मान्य करतो.'

मृत्युंजय : शिवाजी सावंत : १९६९, आ. ३ री (पृ.५१९)

१०१. राधेय!

हे कर्ण चरित्र नव्हे.

प्रत्येकाच्या मनात एक दडलेला कर्ण असतो. माझ्या
मनातल्या कर्णाची ही कहाणी. भावकहाणी. याची
सत्यता शोधायची झाली तर त्यासाठी महाभारताची
पाने चाळण्याचे काहीच प्रयोजन नाही. कदाचित
आपल्या मनाची चार पाने उलटली तर त्यात हा कर्ण दिसेल.

राधेय : रणजित देसाई, १९७६, आ. २ री, (प्रस्ता.)

१०२. 'ज्याला आईनं टाकलं त्याला कवचकुंडलाचं बळ काय लाभणार? कृष्णा ही कवचकुंडलं शापित आहेत. प्रवाहात तरंगत रहाणं एवढंच माझ्या दैवी लिहिलं आहे.'

राधेय : रणजित देसाई, १९७३, आ. १ ली, (पृ.१८)

१०३. "कर्णा, ते दु:ख मीही जाणतो. त्याची व्यथा मलाही माहीत आहे. कुणाला नदीप्रवाहावर सोडून दिलं जातं, कुणाला नदी ओलांडून पैलतीर गाठावा लागतो. कुणी गवळ्याचा पोर म्हणून नंदाघरी वाढतो तर कुणाला सूतकुलाचा आश्रय लाभतो. मातृवियोग दोघांच्याही भाळी सारखाच लिहिलेला. सुटल्या किनाऱ्याची ओढ धरून जीवनाचा प्रवास कधी होत नसतो. अंगराज!"

राधेय : रणजित देसाई, १९७३, आ. १ ली, (पृ.१८)

१०४. शकूनी मामांसमक्ष कर्ण दुर्योधनाला म्हणतो,'युवराज', जुगाराच्या साह्याने यशाची आकांक्षा फक्त मूर्ख आणि व्यसनीच बाळगतात.'

'राजकारणात बुद्धी आणि बाहुबलाचा पराक्रम हे विजयाच साधन असतं.'

'दुबळ्या आणि अस्थिर हातांनीच फासे खेळले जातात.'

राधेय : रणजित देसाई, १९७३, आ. १ ली, (पृ.९१)

१०५. द्रोणाचार्यांनी कोरडच्या विहिरीतून विटी बाहेर काढण्यापेक्षा 'ज्याच्या जीवनाची विहिर जातीच्या, स्नेहाच्या ओलाव्याअभावी कोरडी असेल, त्याच्या मनाची विटी बाहेर काढायला समर्थ असा गुरू या धरणीवर मिळत नाही. ते कष्ट त्यानंच घ्यायला हवेत!' अशा माणसासाठी काही केले असते तर ते अधिक श्रेयस्कर झाले असते.

राधेय : रणजित देसाई, १९७३, आ. १ ली, (पृ.२६)

१०६. 'कशासाठी हे सारं सहन केलंत? असला अपमान सहन करून परतण्यापेक्षा ते स्वंयवरच उधळून त्या उन्मत्त राजकन्येला फरफटत इथवर घेऊन आला असतां.'

राधेय : रणजित देसाई, १९७३, आ. १ ली, (पृ.४३)

१०७. 'द्रौपदी मला रूपसंपन्न भासली खरी. पण ती फक्त रूपसंपन्नच होती. पुरुषापेक्षा कुलाचा आणि गुणापेक्षा रूपाचा जिला मोह आहे. त्या स्त्रीला माझ्या जीवनात जागा नाही. या घरची दासी म्हणून सुद्धा तिची येण्याची पात्रता नव्हती. म्हणूनच तो संयम पाळावा लागला.'

राधेय : रणजित देसाई, १९७३, आ. १ ली, (पृ.४४)

१०८. 'बसल्या जागी कर्णाच्या अंगाला कंप सुटला. घशाला कोरड पडली. जे घडावं अस वाटत होतं ते पहाण्याचे धाडस कर्णाला राहिलं नाही.'

राधेय : रणजित देसाई, १९७३, आ. १ ली, (पृ ११३)

१०९. 'हे ऐश्वर्य, ही मोकळी सुवर्णासने, हे सिंहासन आणि हे धारण करणारी ही भूमी अशीच मोकळी राहणार! केव्हा न केव्हातरी हे घडणार आहे. ते अटळ आहे. मग ही इर्षा, हा मत्सर , हा अपमान कशासाठी? यानं जन्ममृत्यूचं आव्हान टळणार आहे का?' या विचाराने एकाकी कर्ण कासावीस झाला आहे.

राधेय : रणजित देसाई, १९७६, आ. २ री, (पृ.११९)

११०. राधेय : रणजित देसाई, १९७६, आ. २ री, (पृ.२००)

१११. अजुनही आठवतं पुष्कळदा त्या रथचक्र काढणाऱ्या कल्पनेतल्या कर्णाच्या डोळ्यातले अश्रू पाहून कित्येकदा माझ्याही डोळ्यात पाणी तरारले आहे.

सूर्यपुत्र : विजय देशमुख , १९७३, आ. १ ली, (हृद्गत पृ. २)

११२. 'अनसुयु भूमिकेतून स्वेच्छापूर्वक आत्मसमर्पणाच्या संदर्भात सूर्यपुत्राचं सुसंगत व्यक्तिदर्शन मनोविश्लेषणात्मक पद्धतीनं घडविण्याचा हा नम्र प्रयत्न करीत आहे.'

सूर्यपुत्र : विजय देशमुख , १९७३, आ. १ ली, (हृद्गत पृ. ५)

११३. 'महाभारत हा आधुनिक अर्थाने इतिहासाचा ग्रंथ कधीच नव्हता. ती शेवटी धार्मिक संस्कृतीला कैक शतके मान्य झालेली, धर्ममान्यतेची परंपरा असलेली अशी वाङ्मयकृती आहे. परंपरेने जर एखादे कथानक आपल्याहाती दिले तर या प्रथेत कलावंताने स्वत:चे अपेक्षित रंग भरण्यास काहीच हरकत नाही.'

सूर्यपुत्रच्या निमित्ताने : प्रा. नरहर कुरूंदकर, युगवाणी, दिवाळी अंक (१९७४) (पृ.३०८)

११४. 'कर्णाच्या रंगभूमीवरील आवाहनाने अर्जुनाचा चेहरा काळवंडतो.'

सूर्यपुत्र : विजय देशमुख , १९७३, आ. १ ली, ( पृ. ३१)

११५. 'कर्ण ब्रम्हास्त्र प्राप्तीसाठी महेंद्रपर्वत चढू लागला त्याचवेळी खरं म्हणजे विकारी महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी एक पायरी तो खाली उतरला आहे.'

सूर्यपुत्र : विजय देशमुख , १९७३, आ. १ ली, ( पृ. ४१)

११६. अग्निकुंडातून वर आलेली अग्निकन्या या भूतलावरील क्षुद्र मानवाच्या लिडबडीत उच्चनीचतेच्या तत्त्वजालात फसलेली पाहून कर्णाला धक्का बसतो.'

सूर्यपुत्र : विजय देशमुख , १९७३, आ. १ ली, ( पृ. ५०)

११७. 'कृष्णा, मी जे पाडवांना कटु शब्द आजवर बोललो ते केवळ दुर्योधनाला प्रिय वाटावं म्हणून परंतु आज त्या दुष्कर्मामुळे माझ मन दु:खानं तप्त होऊन गेलं आहे. कृष्णा, अर्जूनानं मला ठार

मारलेला जेव्हा तू पाहशील तेंव्हाच या शस्त्र यज्ञाची पुनश्चिती होईल.'
सूर्यपुत्र : विजय देशमुख, १९७३,आ.१ली, (पृ. १००)

११८. 'सूर्यपुत्राच्या अर्जूनाबरोबर झालेल्या अखेरच्या द्वंद्वयुद्धाचं वर्णन काळजीपूर्वक अभ्यासलं तर महर्षि व्यासांनी गूढार्थी रचना करून वेगळच ध्वनित केल्याचं स्पष्ट दिसतं.'

सूर्यपुत्र : विजय देशमुख , १९७३, आ. १ ली, ( पृ. १७१)

'माझ्या मते महर्षींनी सूचकपणे सूर्यपुत्राचं स्वेच्छापूर्वक आत्मसमर्पण याठिकाणी ध्वनित केले आहे.'

सूर्यपुत्र : विजय देशमुख , १९७३, आ. १ ली, ( पृ. १७६)

११९. संगीतकाचे स्वरूप कृ.द.दीक्षितांनी एका इंग्रजी व्याख्येच्या आधारे पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

'Opera is drama set to music, as distinguished from plays in which music is merely incidental'

नटश्रेष्ठ आणि चार संगीतिका : कै.बा.सी.मर्ढेकर.१९६५,(प्रस्ता.पृ.१७)

१२०. "रथचक्र, कर्ण रथचक्र, दैवगती वक्र होऊनी खोल
बघ रूतून बसलें, क्षणास या बिनमोल!
अन् भ्रष्ट, कर्णपति भ्रष्ट, शापिता भ्रष्ट भार्गवास्त्राला
नाठवू शके ही अघोर या वेळेला!
करि शर्थ रथोद्धारार्थ कर्ण, परिव्यर्थ,निघेनाना चाक
अन् विषण्ण जाई राधेयाची हाक!"

नटश्रेष्ठ आणि चार संगीतिका : कै.बा.सी.मर्ढेकर.१९६५,(कर्ण : पृ.९२)

१२१. जीवनव्यास : (प्रस्ता. : दुर्गा भागवत) मधु भोसले, १९७४.
(प्रस्ता. पृ.३)

१२२. सूर्यपुत्र (परीक्षण लेख ) : दुर्गा भागवत, सत्यकथा, ऑगस्ट १९७५
(पृ.५९)

# सविता प्रकाशन, औरंगाबाद

– आमची नवी प्रकाशने –

---

१) किसान का कोड़ा — ४० रु.
(महात्मा जोतीबा फुले, अनु. प्रा. प्यारेलाल गोहेल)

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक आकलन — २५ रु.
(प्रा. नरहर कुरुंदकर)

३) अनुबंध — ५० रु.
(डॉ. ताराबाई परांजपे)

४) तेजाचे बाळ — ४५ रु.
(डॉ. यशवंत देशपांडे)

५) लोकसाहित्यविचार — ३५ रु.
(डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे)

६) आंदोलन — ४० रु.
(ॲड. अनंत उमरीकर)

७) भारतातील इंग्रजीचे अध्यापन — ५५ रू.
(प्रा. वि. वि. यार्दी अनु. प्रा. सौ. शशिकला जोशी)

८) गोपाळदासविरचित बाळक्रीडा — ५० रू.
(प्रा. अरविंद कुरुंदकर)

९) हादगा-भोंडला : विधी आणि गाणी — ३५ रु.
(प्रा. सौ. शैला लोहिया)

१०) आगटीवरचे दिवस — ४० रु.
(बाबुराव वाघचौरे)

११) विठ्ठलगान — ३० रु.
(प्रा. सौ. आंबुलगेकर)

१२) कर्ण आणि मराठी प्रतिभा — ६० रू.
(डॉ. भास्कर गिरधारी)